म. ग्रं. स. ठाणे
विषय
सं. क्र.

सं५मा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, ते न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

15 FEB 1978
22 1978
10 MAY 1978
13 MAY 1979
6 SEP 1979
3 FEB 1980
MAY 1981
14 MAR 1982

[कृ. मा. प.]

वि. क्र.
५८

८/२२/
भू. प्रथ

२९८०३

# कॉन टिकी

मूळ लेखक :

थॉर हेयरडॉल

अनुवाद :

रवींद्र गुर्जर

दीपा पब्लिकेशन्स, पुणे ३०.

प्रकाशक
जयंत जोशी
दीपा पब्लिकेशन्स
७९७ (नवा) सदाशिव,
बँ गाडगीळ स्ट्रीट पुणे ४११ ०३०

*

मुखपृष्ठ प्राणेश जोशी

*

मूल्य पंधरा रुपये

*

© रवींद्र गुर्जर

*

प्रथमावृत्ती १४ जानेवारी १९७७

*

मुद्रक
शा का राऊळ
स्वाती मुद्रणालय,
६६ नवी पेठ, गाजवेवाडी,
पुणे ४११ ०३०

# प्रास्ताविक

'कॉन–टिकी' हे पुस्तक प्रथम १९५० मध्ये प्रसिद्ध झाले वीसहून अधिक भाषात त्याला अमाप लोकप्रियता लाभली. आजवर ५० लाखाहून अधिक प्रती खपण्याचे भाग्य कॉन–टिकीला लाभले आहे.

उफाळता सागर आणि बेभरवशी वाऱ्यावर आपले जीवन सोपवून, साध्या बालसा लाकडाच्या तराफ्यावरून पेरू ते पॉलिनेशिया सफर करणाऱ्या सहा धाडसी वीरांच्या जिवंत अनुभवांचे हे चित्रण आहे आपली उपपत्ती सिद्ध करण्याच्या हेतूने ४३०० मैल प्रशांत महासागर पार करण्याची जिद्द, ही या सफरीमागील प्रेरणा आहे.


अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकात अनिवार्य असलेली गती आणि थरारक नाट्य 'कॉन-टिकी' मध्ये आपणास कदाचित आढळणार नाही परंतु तत्त्वासाठी महासागर पार करण्याची कल्पनाच अगावर रोमांच उभे करणारी आहे तो काळ विचारात घेऊन सदर पुस्तक वाचल्यास आपल्याला ते निश्चितच आवडेल

मकर संक्रांत
१४ जानेवारी १९७७

**रवींद्र वसंत गुर्जर**
१३१५, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.

कॉन-टिकी सफरीतील
सहा धाडसी वीर
(डावीकडून उजवीकडे)
क्नट, बेंट, पुस्तकाचा लेखक,
एरिक, टॉरस्टेन, हर्मन






नऊ बालसा ओंडके दोराने
घट्ट बांधताना
तराफा बांधकामात खिळा किंवा अन्य
कोणत्याही धातूचा वापर करण्यात
आला नाही.



पॅलेंकमधून
पॅसिफिक महासागराकडे
ओंडके वाहून
नेत असताना



इक्वेडर जंगलात
बाल्सा वृक्ष पाडत असताना



भोजनाचा
अवीट
आनंद

एरिक
रोजच्या नोंदी
करताना

नकाशावर सर्वजण
स्थान शोधत आहेत.





▲ संध्याकाळी
वाऱ्याचे मोजमाप करताना
हर्मन

▼ मेंडोलिन वाजवत मजेत गाणारा एरिक





◄ रेरोया खडकावर
आदळल्यानंतर
तराफ्याची
झालेली
दुर्दशा

पेरूहून आणलेले नारळाचे रोप
पॉलिनेशियात पेरताना ▼



◄ रेरोया
किनाऱ्यावर
तराफा
आदळताना



एक

# मोहिमेची पार्श्वभूमी

बऱ्याच वेळा आपण चमत्कारिक परिस्थितीत सापडतो हळूहळू त्यात अडकत जातो, अगदी सहज-पणे, आणि एकदा का पुरते फसलो की गोंधळून जातो हे सगळ कस काय सुरू झाल याचा आपल्याला प्रश्न पडतो

आता हेच बघा ना! भर समुद्रात लाकडी तराफ्या-वरून एक पोपट आणि पाच सहकाऱ्यांसह तुम्ही जेव्हा निघाल तेव्हा एक दिवस, थोडी उसत मिळाली की, नक्कीच त्यावर विचार करू लागाल

अशाच एका सुप्रभाती भिजून चिंब झालेल्या वही-वर मी लिहू लागलो

" १७ मे नॉर्वेचा स्वातंत्र्यदिन उसळता सागर अनुकूल वारा आज माझ्याकडे स्वयपाक आहे डेकवर सात मासे पडलेले आहेत, एक मोठा केबिनच्या छता-वर आणि एक अनोळखी मासा टॉरस्टेनच्या झोपा-यच्या खोलीत "

इथे पेन्सिल थबकली, आणि तसेच विचार माझ्या डोक्यात येऊ लागले आजचा दिवस खरोखरच नेहमी-पेक्षा वेगळा होता आपण कुठपर्यंत येऊन पोचलो ? या सगळ्याला सुरवात कशी बर झाली ?

डावीकडे अथांग निळ्या सागराच हृदयगम दृश्य, वरखाली होणाऱ्या लाटा, दूरदूर जाणाऱ्या क्षितिजा-पर्यन्त एकामागून एक धावणाऱ्या असख्य लाटा अविरत पाठलाग उजवीकडे बघावं तर केबिनखाली सावलीत एक दाढी वाढलेली व्यक्ती 'गोएथ' वाचत पडलेली पाय जाळ्यात खुपसलेले अस्ताव्यस्त सामान पडलेल केबिन हेच आमच घर होत

'बेंट,' मी वहीवर येऊन बसलेल्या पोपटाला बाजूला सारत म्हणालो, 'या उपद्व्यापात आपण कसे पडलो हे तुला सागता येईल ? '

त्याच्या लालसर–सोनेरी दाढीत गोएथच पुस्तक अदृश्य झाल

हातात पावडर किंवा ब्रँडी घेऊन आले तोपर्यंत !

आम्ही असेच नेहमीसारखे त्या सध्याकाळी बसलो होतो किनाऱ्यावर स्वच्छ चद्रप्रकाश पडला होता समोर उसळत्या लाटाचा समुद्र भोवतालच्या धुद वातावरणामुळे आम्ही मत्रमुग्ध झालो होतो जगलातून येणारा गध आणि त्यात मिसळणारी खारी झुळूक यामधे आम्ही गुदमरून गेलो प्रत्येक गोष्टीचा ठसा हृदयात उमटला होता लाटाच्या आवाजात इतर असख्य आवाज बुडून जात होते लाटा उसळत, फेसाळत समोरच्या खडकावर येऊन आदळत होत्या समुद्र माघार घेईपर्यन्त हा खेळ चालू राहिला त्या अजिक्य किनाऱ्यावर पुन्हा नव्या ईर्षेने हल्ला करण्यासाठी तो मागे हटला असावा

'आश्चर्य आहे,' माझी पत्नी म्हणाली, 'पण बेटाच्या पलिकडच्या किनाऱ्याला अशा लाटा येऊन आदळत नाहीत'

'नाही,' मी म्हणालो, 'ही वाऱ्याची बाजू आहे, समुद्र नेहमी याच बाजूला उसळणार'

आम्ही न कटाळता पूर्वेकडील समुद्राकडे बघत त्या जागी तासन् तास बसत असू पूर्वच्या व्यापारी वाऱ्यांमुळे सागराचा पृष्ठभाग हिंदकळत होता, क्षितिजापासून समोरच्या किनाऱ्यापर्यन्त वरखाली होत होता लाटा खडकांवर विरुन जात आणि वारे मात्र पुढे पाम वृक्षाच्या पानात आणि जगलात घुसत पश्चिम दिशा त्याना अटकाव करू शकत नव्हती एका बेटावरून दुसऱ्या बेटावर–अस सूर्यास्तापर्यन्त चालायच

सकाळपासून, पूर्वेच्या आकाशाकडून असेच ढग येत राहायचे या बेटावर प्रथम येणाऱ्या लोकाना हे नक्की ठाऊक असल पाहिजे पक्षी आणि कीटकांनासुद्धा आम्हालाही ठाऊक होत की दूर दूर, पूर्वेला दक्षिण अमेरिकेचा किनारा होता ४३०० सागरी मैल दूर, आणि मधे समुद्राखेरीज दुसर काहीच नव्हत !

वेगान प्रवास करणाऱ्या ढगाकडे आम्ही टक लावून पाहात होतो अर्धवट विझलेल्या शेकोटीजवळ एक म्हातारा बसला होता लज्जारक्षणाइतक वस्त्र कमरेला निखाऱ्यांचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडलेला

'टिकी', तो सथपणे म्हणाला 'टिकी हा ईश्वर होता आणि नेताही आम्ही राहातो या बेटावर त्यानच प्रथम आमच्या पूर्वजांना आणल त्या आधी आम्ही सातासमुद्रापलिकडे एका मोठ्या देशात राहत होतो'

निखारे पूर्णपणे विझू नयेत म्हणून त्यान हातातल्या काठीन विस्तव सारखा केला म्हातारा विचारात मग्न होता तो पुरातन काळात वावरत होता जुन्या सस्कारांची त्याच्यावर घट्ट पकड होती पूर्वज हे त्याच श्रद्धास्थान होत त्याच्याशी आपण बाधलो गेलो आहोत असा त्याचा विश्वास होता त्याची कृत्य हा त्याचा अभिमानाचा विषय होता फातुहिवा बेटावरचा 'तेइ टेटुआ'–तो म्हातारा–जुन्या जमातीपैकी एकमेव हयात इसम होता त्याच वय त्याला ठाऊक नव्हत पण तो सुरकुतलेला, रापट चेहरा आणि अगावरची वाळलेली कातडी पाहून अस वाटत होत की उन्हापावसात त्यान शभर वर्ष नक्कीच काढली होती पॉलिनेशियन लोकांच मुख्य दैवत टिकी' आणि त्याच्या विषयीच्या जास्तीत जास्त कथा–दतकथा ठाऊक असलेल्या मोजक्या लोकातील तो एक होता

त्या रात्री झोपताना टिकीच्या कथा आणि हजारो मैल अतरावर असलेला 'टेटुआ'च्या पूर्वजाचा देश हेच विषय माझ्या डोक्यात घुमत राहिले जोडीला होता किनाऱ्यावर आदळणारा लाटाचा घनगंभीर आवाज अस वाटल की त्याना काहीतरी सागायच होत कदाचित पूर्वजाचा रहस्यमय, उत्कठापूर्ण इतिहास मी झोपू शकलो नाही वेळाच भान नष्ट झाल होत जणु टिकी त्याच्या सहकाऱ्यासह नुकताच खाली किनाऱ्याला येऊन पोचला होता अचानक एक विचार मनात भिडला मी माझ्या पत्नीला म्हणालो

'से, तुझ्या ध्यानात आल का ? जगलातल्या टिकीच्या प्रचड दगडी आकृती निरखून पाहिल्या तर द अमेरिकेतील पुरातन सस्कृतीचे अवशेष म्हणून जे मोठमोठे पुतळे भग्न अवस्थेत उभे आहेत त्याची आठवण नाही येत ?'

दूरवरच्या लाटानी होकार भरला त्याचा आवाज हळूहळू कमी होत गेला आणि मला झोपेन घेरल

म्हणजे, इथेच सगळ्याला सुरवात झाली अस म्हणता येईल काही का असेना, अनेक घटनांची मालिका सुरू होऊन आम्ही सहाजण (हिरव्या पोपटासह) द अमेरिकेच्या किनाऱ्याला सलाम ठोकून एका साध्या तराफ्यावरून निघालो खरे

'न यायला काय झाल, तुलाच ते अधिक चागल ठाऊक आहे ही तुझीच अफलातून कल्पना, पण साली महानच निघाली '

पाय आणखी उचावून तो वाचण्यात पुन्हा मग्न झाला केबिनबाहेर बाकीचे तीन जण तळपत्या उन्हात काम करीत होते—अर्धनग्न, काळवडलेले आणि दाढ्या वाढलेल्या पाठीखालच्या भागावर मिठाचे पट्टे त्यांच्याकडे पाहिल्यावर, लाकडी तराफ्यावरून पॅसिफिकमधे पश्चिमेकडे जात राहणे याखेरीज त्यानी आयुष्यात काही केल असेल यावर विश्वासच बसण शक्य नव्हत एरिक उघड्या भागातून आत सरपटत आला त्याच्या हातात अश मोजायच उपकरण आणि कागद होते

'अठ्ठयाण्णव डिग्रीज आणि सेहेचाळीस मिनिटे पश्चिमेला अन् आठ डिग्रीज आणि दोन मिनिट दक्षिण—काल आपण खूपच मजल मारली, दोस्त !'

माझ्याकडून पेन्सिल घेऊन त्यान बांबूच्या भिंतीवर टागलेल्या नकाशावर एक बारीकस वर्तुळ केल पेरूच्या किनाऱ्यावरील कॅलाओ बदरापासून सुरवात करून आतापर्यन्त अशी एकोणीस वर्तुळ त्यान काढली होती हर्मन, वनट आणि टॉरस्टेनही कुतूहलान आत सरपटत आले एका दिवसात आम्ही चागले चाळीस मैल कापले होते.

'बघितलंत, मुलानो ?' हर्मन गर्वान म्हणाला, 'आपण पेरूच्या किनाऱ्यापासून ८५० मैल आलो असा याचा अर्थ आहे '

'आणि अजून ३५०० मैल गेल्यावर सगळ्यात जवळच बेट आपल्याला दिसेल,' वनटन दबल्या आवाजात पुस्ती जोडली

'आणखी निश्चित सांगायच तर,' टॉरस्टेन मजेत म्हणाला, 'आपण समुद्रतळापासून १६०० फूट उचीवर आणि चद्राखाली अवघ्या काही फुटांवर आहोत !'

अशा रीतीन आम्ही नक्की कुठे होतो हे प्रत्येकाला समजून चुकल होत! सगळ्याची मनःस्थिती मी जाणून होतो पोपटाला कशाचीच पर्वा नव्हती, नुसत लाकडावर बसून हादडणे आणि चिंघी करणे चौफेर समुद्र, सभोवार आकाशाच वर्तुळ – निळ्यावर निळा रंग चढलेला

बहुधा गेल्या हिवाळ्यात न्यूयॉर्क म्युझियमच्या कार्यालयामधे या गोष्टीला चालना मिळाली किंवा कदाचित दहा वर्षांपूर्वी पॅसिफिकमधील एका छोट्या बेटावर आधीच सुरवात झाली असही म्हणता येईल या खेपेला आम्ही त्याच बेटावर सुद्धा उतरू शकू पण ईशान्येच्या वाऱ्यान आम्हाला दक्षिणेकडे लोटता कामा नये तस झाल तर आम्ही ताहिती किंवा ट्वामोटू बेटसमूहाकडे ढकलले जाऊ मला अजूनही ते बेट स्पष्टपणे आठवत तेथील करड्या रगाचे पर्वत आणि हिरवगार जगल—समुद्रापर्यन्त उतरत आलेल एका जागी उभ राहून डुलणारे पाम वृक्ष त्या बेटाच नाव होत 'फातुहिवा' सध्या आम्ही त्या दिशेनच जात होतो वाटेत त्याखेरीज दुसरी जमीन नव्हती पण ते अद्याप हजारो मैल दूर होत

आम्ही तिथल्या एकाकी किनाऱ्यावर, सायकाळ उलटून गेली तरीही, एकामागून एक येणाऱ्या समुद्राच्या लाटा बघत बसून होतो सोबत माझी पत्नी होती आतासारखे दाढ्या वाढलेले 'चाचे' तिथे नव्हते आम्ही असख्य प्रकारचे जिवत प्राणी गोळा करीत होतो, दगडी प्रतिमा आणि इतर नष्ट झालेल्या सस्कृतीचे अवशेष. ती विशिष्ट सध्याकाळ मला चांगली आठवते सुधारलेल्या जगापासून आम्ही कित्येक मैल दूर होतो बेटावर मुक्काम ठोकून जवळ-जवळ वर्ष झाल होत तिथे गोरी माणसं फक्त आम्ही दोघच आधुनिक सुधारणापासून, त्याच्या फायद्या–तोट्याचा त्याग करून एका झोपडीत राहात होतो किनाऱ्याच्या जवळ, पाम वृक्षराजीखाली आणि रानात किंवा समुद्रात मिळेल त्यावर आपली भूक भागवत होतो.

जीवन कठीण असूनही, प्रत्यक्ष अनुभव मिळणाऱ्या त्या शाळेत आम्हाला खूप गोष्टीच नव्यान ज्ञान झाल पॅसिफिकविषयी कित्येक आश्चर्यकारक शका मनात साठल्या आम्ही मनान आणि शरीरान शोध घेत राहिलो त्या बेटावर कोणत्या अज्ञात देशाहून प्रथम लोक आले असतील! त्याच नव्हे तर आसपासच्या इतर असख्य बेटांवर आणि मूळ पॉलिनेशियन जमात कोणती ? पुढे जिन निरकुश, एकछत्री साम्राज्य उपभोगल अगदी आता आतापर्यन्त, म्हणजे आमच्या जातीचे लोक तिथे एका हातात बायबल आणि दुसऱ्या

हातात पावडर किंवा ब्रँडी घेऊन आले तोपर्यंत !

आम्ही असेच नेहमीसारखे त्या संध्याकाळी बसलो होतो किनाऱ्यावर स्वच्छ चंद्रप्रकाश पडला होता समोर उसळत्या लाटांचा समुद्र भोवतालच्या धुंद वातावरणामुळे आम्ही मंत्रमुग्ध झालो होतो जंगलातून येणारा गंध आणि त्यात मिसळणारी खारी झुळूक यामध्ये आम्ही गुदमरून गेलो प्रत्येक गोष्टीचा ठसा हृदयात उमटला होता लाटांच्या आवाजात इतर असंख्य आवाज बुडून जात होते लाटा उसळत, फेसाळत समोरच्या खडकावर येऊन आदळत होत्या समुद्र माघार घेईपर्यन्त हा खेळ चालू राहिला त्या अजिंक्य किनाऱ्यावर पुन्हा नव्या ईर्षेने हल्ला करण्यासाठी तो मागे हटला असावा

'आश्चर्य आहे,' माझी पत्नी म्हणाली, 'पण बेटाच्या पलिकडच्या किनाऱ्याला अशा लाटा येऊन आदळत नाहीत'

'नाही,' मी म्हणालो, 'ही वाऱ्याची बाजू आहे, समुद्र नेहमी याच बाजूला उसळणार'

आम्ही न कंटाळता पूर्वेकडील समुद्राकडे बघत त्या जागी तासन् तास बसत असू पूर्वच्या व्यापारी वाऱ्यामुळे सागराचा पृष्ठभाग हिंदकळत होता, क्षितिजापासून समोरच्या किनाऱ्यापर्यन्त वरखाली होत होता लाटा खडकावर विरुन जात आणि वारे मात्र पुढे पाम वृक्षाच्या पानात आणि जंगलात घुसत पश्चिम दिशा त्यांना अटकाव करू शकत नव्हती एका बेटावरून दुसऱ्या बेटावर—असं सूर्यास्तापर्यन्त चालायचं

सकाळपासून, पूर्वेच्या आकाशाकडून असेच ढग येत राहायचे या बेटावर प्रथम येणाऱ्या लोकांना हे नक्की ठाऊक असलं पाहिजे पक्षी आणि कीटकानासुद्धा आम्हालाही ठाऊक होतं की दूर दूर, पूर्वेला दक्षिण अमेरिकेचा किनारा होता ४३०० सागरी मैल दूर, आणि मधे समुद्राखेरीज दुसरं काहीच नव्हतं !

वेगानं प्रवास करणाऱ्या ढगाकडे आम्ही टक लावून पाहात होतो अर्धवट विझलेल्या शेकोटीजवळ एक म्हातारा बसला होता लज्जारक्षणाइतकं वस्त्र कमरेला निखाऱ्यांचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडलेला

'टिकी', तो संथपणे म्हणाला 'टिकी हा ईश्वर होता आणि नेताही आम्ही राहातो या बेटावर त्यानंच प्रथम आमच्या पूर्वजांना आणलं त्या आधी आम्ही सातासमुद्रापलिकडे एका मोठ्या देशात राहत होतो'

निखारे पूर्णपणे विझू नयेत म्हणून त्यानं हातातल्या काठीनं विस्तव सारखा केला म्हातारा विचारात मग्न होता तो पुरातन काळात वावरत होता जुन्या संस्काराची त्याच्यावर घट्ट पकड होती पूर्वज हे त्याचं श्रद्धास्थान होतं त्याच्याशी आपण बांधलो गेलो आहोत असा त्याचा विश्वास होता त्यांची कृत्य हा त्याचा अभिमानाचा विषय होता फातुहिवा बेटावरचा 'तेइ टेटुआ'—तो म्हातारा—जुन्या जमातींपैकी एकमेव हयात इसम होता त्याचं वय त्याला ठाऊक नव्हतं पण तो सुरकुतलेला, रापट चेहरा आणि अंगावरची वाळलेली कातडी पाहून असं वाटत होतं की उन्हापावसात त्यानं शंभर वर्ष नक्कीच काढली होती पॉलिनेशियन लोकांचं मुख्य दैवत 'टिकी' आणि त्याच्या विषयीच्या जास्तीत जास्त कथा—दंतकथा ठाऊक असलेल्या मोजक्या लोकातील तो एक होता

त्या रात्री झोपताना टिकीच्या कथा आणि हजारो मैल अंतरावर असलेला 'टेटुआ'च्या पूर्वजाचा देश हेच विषय माझ्या डोक्यात घुमत राहिले जोडीला होता किनाऱ्यावर आदळणारा लाटांचा घनगंभीर आवाज असं वाटलं की त्यांना काहीतरी सांगायचं होतं कदाचित पूर्वजांचा रहस्यमय, उत्कंठापूर्ण इतिहास मी झोपू शकलो नाही वेळाचं भान नष्ट झालं होतं जणु टिकी त्याच्या सहकाऱ्यासह नुकताच खाली किनाऱ्याला येऊन पोचला होता अचानक एक विचार मनात भिडला मी माझ्या पत्नीला म्हणालो

'से, तुझ्या ध्यानात आलं का ? जंगलातल्या टिकीच्या प्रचंड दगडी आकृती निरखून पाहिल्या तर द अमेरिकेतील पुरातन संस्कृतीचे अवशेष म्हणून जे मोठमोठे पुतळे भग्न अवस्थेत उभे आहेत त्यांची आठवण नाही येत ?'

दूरवरच्या लाटांनी होकार भरला त्याचा आवाज हळूहळू कमी होत गेला आणि मला झोपेनं घेरलं

म्हणजे, इथेच सगळ्याला सुरवात झाली असं म्हणता येईल काही का असेना, अनेक घटनांची मालिका सुरू होऊन आम्ही सहाजण (हिरव्या पोपटासह) द अमेरिकेच्या किनाऱ्याला सलाम ठोकून एका साध्या तराफ्यावरून निघालो खरे

एकमेकांपासून अलग होती अगदी आज दिसतात तशीच'

त्यामुळे आम्हाला निश्चितपणे एवढ ठाऊक होत की मूळची पॉलिनेशियन जमात इच्छेने किंवा अनिच्छेने समुद्रमार्गे त्या वेगळ्या पडलेल्या बेटावर दाखल झाली असणार आणि थोड काळजीपूर्वक पाहिल तर त्यांना तिथे जाऊन फार शतक उलटली नसणार हेही समजत होत युरोपच्या चौपट पसरलेल्या समुद्रातील त्या निरनिराळ्या बेटावर एकच भाषा वापरात होती उत्तरेच्या 'हवाई' आणि दक्षिणेकडील न्युझीलडमध्ये हजारो मैल समुद्र होता पश्चिमेला 'सामोआ' आणि पूर्वेकडे शेकडो मैलावर 'इस्टर बेट' एवढा विस्तार असूनही दूरदूरच्या अलग बेटावर बोलीभाषा एकच होती, भिन्न भिन्न नव्हती तीच पॉलिनेशियन भाषा लिहिण्याची कला त्यांना ठाऊकच नव्हती अगदी दुर्मिळ असलेल्या काही लाकडी तुकड्यांवर आढळणारी अज्ञात चित्रलिपी सोडली तर कोणालाही त्याचा अर्थ लागत नसला तरी त्या काळच्या रहिवाशांनी ते सुरक्षित ठेवले होते पण तिथे शाळा होत्या, इतिहासाची काव्यमय शिकवण हा त्याचा प्रमुख विषय होता पॉलिनेशियामध्ये इतिहास आणि धर्म अभिन्नच होते ते पूर्वजाची पूजा करीत, 'टिकी'च्या काळापासून पुढच्या सर्व प्रमुखांना मानत टिकी हा तर सूर्याचाच मुलगा अशी त्यांची समजूत होती

प्रत्येक बेटावरची 'शिकलेली' माणस पहिली वस्ती झाल्यापासूनच्या प्रमुखाची नाव ओळीने धडाधडा म्हणून दाखवत ती कायम स्मरणात राहावी म्हणून काथ्याला विशिष्ट गाठी मारून ठेवण्याची अवघड पद्धत ते अवलबत अगदी पेरू प्रांतातील इन्का इंडियन लोकाप्रमाणे निरनिराळ्या बेटांवरून गोळा केलेली नाव, आश्चर्य म्हणजे पिढयान् पिढयासह तंतोतत जुळत होती एक पॉलिनेशियन पिढी साधारण पंचवीस वर्षांची धरली तर असा निष्कर्ष निघत होता की इ स ५०० च्या सुमारास लोकांची पहिली तुकडी त्या बेटावर दाखल झाली असावी, त्या आधी नवकोच नाही नव्या सस्कृतीच लोण तिथपर्यंत पोचवणारी नव्या प्रमुखांची नामावळी लक्षात घेतली तर इ स ११०० पर्यन्त लोक तिथे जात राहिले असावेत.

मागाहून आलेले हे लोक आले कुठून ? हे लोक अश्मयुगातील होते असा निश्चित पुरावा मिळत असताना फारच थोडया सशोधकांनी त्यावर विचार केला होता बुद्धिमत्ता आणि अन्य सस्कृती–निदर्शक गोष्टींबरोबरच त्यानी दगडी कुदळ आणि कित्येक दगडी हत्यार सोबत नेली, सर्व बेटावर त्याचा प्रसार झाला, हे विसरून चालणार नव्हत.

अमेरिकेतील अनेक प्रकारच्या अज्ञात इडियन संस्कृतींचा नीट अभ्यासच झाला नव्हता माझ सार लक्ष त्या जुन्या जगाकडे लागल होत, अनेक सशय बळावत चालले होते पूर्वेकडे सगळ्यात नजीक असलेल्या पेरू प्रजासत्ताकात पुराव्यांची, अवशेषांची कमतरता नव्हती, फक्त अभ्यासाचीच काय ती होती एकेकाळी त्या ठिकाणी अज्ञात लोक राहात होते जगातील एक आश्चर्यकारक सस्कृती तिथे पूर्वी नांदत होती पुढे केव्हातरी ती पृथ्वीच्या पाठीवरून अचानक अदृश्य झाली पण त्यानी मागे ठेवलेल्या दगडातील प्रचड मानवी आकृती आणि ताहिती, मारक्वेसस इ इस्टर बेटावरील दगडी पुतळे यात खूपच साम्य आढळत होत तसेच सामोआचे पिरॅमिड. दगडी कुऱ्हाडींनी टेकडयावरील घनाकृती प्रचड शिळा–अगदी रेल्वेच्या डब्याएवढ्या–खणून काढून कित्येक मैल त्यानी वाहून नेल्या होत्या मोठमोठी प्रवेशद्वार, भिंती, मदिर एकावर एक दगड रचून उभी केली होती पॅसिफिकमधील बेटावर त्याच पद्धतीच बाधकाम झालेल होत

स्पेनच्या लोकांनी आक्रमण करीपर्यन्त इन्का इडियन लोकाच विस्तीर्ण साम्राज्य पेरूच्या पर्वतमय प्रदेशात पसरल होत पूर्वी त्या भागात वास्तव्य करणाऱ्या गोऱ्या देवतांनी भव्य दगडी स्मारक उभारली अस नवागताना इडियन लोकानी सागितल वास्तुकला आणि शेती त्या देवतानीच आमच्या पूर्वजांना शिकविली, अस ते सागत शिष्टाचार आणि रीतिरिवाज देखील त्याचेच इन्काज किंवा इतर इडियन लोकांपेक्षा हे देव वेगळे होते गोरी कातडी आणि लांब दाढ्या ते देशात आले तसेच अचानक निघूनही गेले त्यानतर पेरूतील सत्ता इन्काज लोकाच्या ताब्यात आली द अमेरिकेच्या किनाऱ्या-

एकमेकांपासून अलग होती अगदी आज दिसतात तशीच'

त्यामुळे आम्हाला निश्चितपणे एवढ ठाऊक होत की मूळची पॉलिनेशियन जमात इच्छेन किंवा अनिच्छेन समुद्रमार्गे त्या वेगळ्या पडलेल्या बेटांवर दाखल झाली असणार आणि थोड काळजीपूर्वक पाहिल तर त्यांना तिथे जाऊन फार शतक उलटली नसणार हेही समजत होत युरोपच्या चौपट पसरलेल्या समुद्रातील त्या निरनिराळ्या बेटावर एकच भाषा वापरात होती उत्तरेच्या 'हवाई' आणि दक्षिणेकडील न्युझीलंडमध्ये हजारो मैल समुद्र होता पश्चिमेला 'सामोआ' आणि पूर्वेकडे शेकडो मैलावर 'इस्टर बेट' एवढा विस्तार असूनही दूरदूरच्या अलग बेटावर बोलीभाषा एकच होती, भिन्न भिन्न नव्हती तीच पॉलिनेशियन भाषा लिहिण्याची कला त्यांना ठाऊकच नव्हती अगदी दुर्मिळ असलेल्या काही लाकडी तुकड्यांवर आढळणारी अज्ञात चित्रलिपी सोडली तर कोणालाही त्याचा अर्थ लागत नसला तरी त्या काळच्या रहिवाशांनी ते सुरक्षित ठेवले होते पण तिथे शाळा होत्या, इतिहासाची काव्यमय शिकवण हा त्यांचा प्रमुख विषय होता पॉलिनेशियामध्ये इतिहास आणि धर्म अभिन्नच होते ते पूर्वजांची पूजा करीत, 'टिकी'च्या काळापासून पुढच्या सर्व प्रमुखांना मानत टिकी हा तर सूर्याचाच मुलगा अशी त्यांची समजूत होती.

प्रत्येक बेटावरची 'शिकलेली' माणस पहिली वस्ती झाल्यापासूनच्या प्रमुखांची नाव ओळीने धडाधडा म्हणून दाखवत ती कायम स्मरणात राहावी म्हणून काथ्याला विशिष्ट गाठी मारून ठेवण्याची अवघड पद्धत ते अवलंबत अगदी पेरू प्रांतातील इन्का इंडियन लोकाप्रमाणे निरनिराळ्या बेटावरून गोळा केलेली नाव, आश्चर्य म्हणजे पिढ्यान् पिढ्यासह तंतोतंत जुळत होती एक पॉलिनेशियन पिढी साधारण पंचवीस वर्षांची धरली तर असा निष्कर्ष निघत होता की इ. स ५०० च्या सुमारास लोकांची पहिली तुकडी त्या बेटावर दाखल झाली असावी, त्या आधी नवकोच नाही नव्या संस्कृतीच लोण तिथपर्यंत पोचवणारी नव्या प्रमुखाची नामावळी लक्षात घेतली तर इ स ११०० पर्यन्त लोक तिथे जात राहिले असावेत.

मागाहून आलेले हे लोक आले कुठून ? हे लोक अश्मयुगातील होते असा निश्चित पुरावा मिळत असताना फारच थोड्या संशोधकांनी त्यावर विचार केला होता बुद्धिमत्ता आणि अन्य संस्कृती–निदर्शक गोष्टींबरोबरच त्यांनी दगडी कुदळ आणि कित्येक दगडी हत्यार सोबत नेली, सर्व बेटांवर त्याचा प्रसार झाला, हे विसरून चालणार नव्हत.

अमेरिकेतील अनेक प्रकारच्या अज्ञात इंडियन संस्कृतींचा नीट अभ्यासच झाला नव्हता माझ सार लक्ष त्या जुन्या जगाकडे लागल होत, अनेक संशय बळावत चालले होते पूर्वेकडे सगळ्यात नजीक असलेल्या पेरू प्रजासत्ताकात पुराव्याची, अवशेषाची कमतरता नव्हती, फक्त अभ्यासाचीच काय ती होती एकेकाळी त्या ठिकाणी अज्ञात लोक राहात होते जगातील एक आश्चर्यकारक संस्कृती तिथे पूर्वी नांदत होती पुढे केव्हातरी ती पृथ्वीच्या पाठीवरून अचानक अदृश्य झाली पण त्यांनी मागे ठेवलेल्या दगडातील प्रचंड मानवी आकृती आणि ताहिती, मारक्वेसस इ इस्टर बेटांवरील दगडी पुतळे यात खूपच साम्य आढळत होत तसेच सामोआचे पिरॅमिड दगडी कुऱ्हाडींनी टेकड्यांवरील घनाकृती प्रचंड शिळा–अगदी रेल्वेच्या डब्याएवढ्या–खणून काढून कित्येक मैल त्यांनी वाहून नेल्या होत्या मोठमोठी प्रवेशद्वार, भिंती, मंदिर एकावर एक दगड रचून उभी केली होती पॅसिफिकमधील बेटांवर त्याच पद्धतीच बांधकाम झालेल होत

स्पेनच्या लोकांनी आक्रमण करीपर्यन्त इन्का इंडियन लोकाच विस्तीर्ण साम्राज्य पेरूच्या पर्वतमय प्रदेशात पसरल होत पूर्वी त्या भागात वास्तव्य करणाऱ्या गोऱ्या देवतांनी भव्य दगडी स्मारक उभारली अस नवागतांना इंडियन लोकांनी सांगितल वास्तुकला आणि शेती त्या देवतांनीच आमच्या पूर्वजांना शिकविली, अस ते सांगत शिष्टाचार आणि रीतिरिवाज देखील त्यांचेच इन्काज किंवा इतर इंडियन लोकांपेक्षा हे देव वेगळे होते गोरी कातडी आणि लांब दाढ्या ते देशात आले तसेच अचानक निघूनही गेले त्यानंतर पेरूतील सत्ता इन्काज लोकांच्या ताब्यात आली द अमेरिकेच्या किनाऱ्या-

मी नॉर्वेला फातुहिवाहून परतलो तेव्हा वडिलांना किती मनस्ताप झाला आणि आईसह सर्व मित्रमंडळीही आश्चर्यात कशी बुडाली हे मला स्पष्ट आठवत त्यावेळी काचेच्या भांड्यातून चित्रविचित्र पाखरं आणि अनेक प्रकारचे मासे मी विद्यापीठाच्या प्राणिसंग्रहालयात भेट देऊन टाकले प्राण्यांचा अभ्यास सोडून आपण प्राचीन लोकांकडे वळाव अस मला वाटू लागल दक्षिणेकडील सागरांची न उलगडलेली कोडी मला खुणावत होती त्यांना तर्कसंगत खुलासे असलेच पाहिजेत असं मला खात्रीनं वाटू लागल आणि अनेक दंतकथांचा शूरवीर नायक 'टिकी' याचे पराक्रम पडताळून पाहाणे, हेच ध्येय मी निश्चित केल

परंतु पॅसिफिकमधील निवासी लोकांचा अभ्यास हे तस असंभवनीय स्वप्न होत, दूरच होत त्यासाठी असंख्य जंगले तुडवावी लागणार होती, समुद्र पार करण आवश्यक होत प्राचीन काळच्या लोकांचे विचार आणि कृती यांचा अर्थ नुसती पुस्तकं वाचून किंवा संग्रहालयांना भेटी देऊन लावण हास्यास्पद होत

मी ज्या विषयाचा पाठपुरावा करणार होतो त्यावर खूपच काम त्याआधी झालेल होतं शास्त्रीय माहिती, आधीच्या संशोधकांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके, अमेरिका आणि युरोप मधील संग्रहालयात जमा झालेल्या अक्षरश हजारो वस्तू इ इ अमेरिकेचा शोध लागल्यानंतर आमच्याच वंशाचे लोक प्रथम पॅसिफिक मधील बेटांवर पोचले होते शास्त्राच्या सर्व शाखामधील संशोधकांनी प्रचंड माहिती गोळा केलेली होती समुद्राविषयी आणि त्यातील बेटांवर वास्तव्य करणाऱ्या लोकांविषयी परंतु त्या एकाकी बेटांवरील लोक मूळ कोठले यावर अद्याप एकमत झालेल नव्हत अशा प्रकारचे लोक फक्त पॅसिफिकच्या पूर्वेकडील भागातच का आढळतात याचाही समाधानकारक खुलासा कोणी केलेला नव्हता

जेव्हा युरोपियन लोकांनी प्रथम सर्वात मोठा समुद्र ओलांडायच धाडस दाखवल तेव्हा त्यांच्या लक्षात आल की मधे मधे कित्येक डोंगराळ बेटं आणि प्रवाळाचे खडक अथांग सागरातून वर आलेले होते ही बेटं एकमेकांपासून आणि जगापासून अलग झालेली होती आणि प्रत्येक बेटावर त्यांच्याआधीच लोकांची वस्ती झालेली होती उंचनिंच, देखणे लोक. किनाऱ्यावर कुत्री, डुक्कर, कोंबड्या यांच्यासह त्यांना हिंडताना पाहून सागरी संशोधक थक्क झाले होते हे सगळे आले तरी कोठून ? त्यांची भाषा इतर कोणालाच समजत नव्हती 'त्या बेटांचा शोध आम्ही लावला' अशी धाडशी विधानं करणाऱ्या आमच्याच लोकांना तिथे नागरलेली शेतं, देवळं आणि झोपड्या असलेली खेडी दिसून आली अगदी एकूण एक बेटावर काही काही ठिकाणी तर पिरॅमिडस्, योजनापूर्वक बांधलेले रस्ते आणि दगडात खोदलेले पुतळे आढळले युरोपमधल्या चार मजली इमारतींएवढे उंच पुतळे फक्त या सगळ्याचं स्पष्टीकरण कोणीच दिलं नव्हतं ते लोक कोण आणि तिथे आले कोठून ?

याचा शोध घेणारे जेवढे लोक तितकीच निरनिराळी स्पष्टीकरणं पुढे आली वेगवेगळ्या विषयातल्या तज्ज्ञांनी काढलेले निष्कर्ष दुसऱ्या पद्धतीनं विचार करणाऱ्या लोकांनी व्यवस्थित खोडून काढले पॉलिनेशियन लोकांची मलाया, भारत, चीन, जपान, अरेबिया, इजिप्त, कॉकेशस, अॅटलांटिस आणि अगदी जर्मनी किंवा नॉर्वे हीच मातृभूमी अस छातीठोकपणे सांगण्यात आलं होत पण दर खेपेला एक तरी घोटाळा निघायचा आणि साऱ्या सिद्धांतावर पाणी पडायच

आणि शास्त्रानं हात टेकले की कल्पनेचा उदय [illegible] त्या बेटांवर उभं असलेले पुतळे आणि अन्य [illegible] आणि सगळ्यात जवळचा द अमेरिकेचा किनारा यांच्यावरून अंदाज बांधले जाऊ लागले समुद्रातल्या त्या एकाकी बेटांवर दिसणाऱ्या कित्येक गोष्टी पाहून द अमेरिकेच्या जुन्या संस्कृतीची आठवण होत होती त्यांना जोडणारा भूभाग पूर्वी होता आणि पुढे तो बुडाला का ? सर्व बेटांवरील स्मारकांमध्ये आढळणारं विलक्षण साम्य पाहून, सागरात अदृश्य झालेल्या एखाद्या देशाचे छोटे छोटे भागच वर डोकावत असतील का ?

ही उपपत्ती लोकप्रिय झाली सर्वसामान्य लोकांच त्यामुळे समाधान झाल पण भूगर्भ शास्त्रज्ञ आणि अन्य संशोधकांनी ती कल्पना उडवून लावली प्राणीशास्त्राच्या अभ्यासकांनी अगदी साध्या स्पष्टीकरणानं सिद्ध केल की 'तिथल्या पशुपक्ष्यांवरून ध्यानात येतं – ती बेटं मानवजातीचा इतिहास [illegible]

एकमेकांपासून अलग होती अगदी आज दिसतात तशीच'

त्यामुळे आम्हाला निश्चितपणे एवढ ठाऊक होत की मूळची पॉलिनेशियन जमात इच्छेने किंवा अनिच्छेने समुद्रमार्गे त्या वेगळच्या पडलेल्या बेटांवर दाखल झाली असणार आणि थोड काळजीपूर्वक पाहिल तर त्याना तिथे जाऊन फार शतकं उलटली नसणार हेही समजत होत युरोपच्या चौपट पसरलेल्या समुद्रातील त्या निरनिराळ्या बेटांवर एकच भाषा वापरात होती उत्तरेच्या 'हवाई' आणि दक्षिणेकडील न्युझीलंडमध्ये हजारो मैल समुद्र होता पश्चिमेला 'सामोआ' आणि पूर्वेकडे शेकडो मैलावर 'इस्टर बेट' एवढा विस्तार असूनही दूरदूरच्या अलग बेटांवर बोलीभाषा एकच होती, भिन्न भिन्न नव्हती तीच पॉलिनेशियन भाषा लिहिण्याची कला त्याना ठाऊकच नव्हती अगदी दुर्मिळ असलेल्या काही लाकडी तुकड्यांवर आढळणारी अज्ञात चित्रलिपी सोडली तर कोणालाही त्याचा अर्थ लागत नसला तरी त्या काळच्या रहिवाशांनी ते सुरक्षित ठेवले होते पण तिथे शाळा होत्या, इतिहासाची काव्यमय शिकवण हा त्याचा प्रमुख विषय होता पॉलिनेशियामध्ये इतिहास आणि धर्म अभिन्नच होते ते पूर्वजांची पूजा करीत, 'टिकी'च्या काळापासून पुढच्या सर्व प्रमुखाना मानत टिकी हा तर सूर्याचाच मुलगा अशी त्यांची समजूत होती.

प्रत्येक बेटावरची 'शिकलेली' माणस पहिली वस्ती झाल्यापासूनच्या प्रमुखांची नाव ओळीने धडाधडा म्हणून दाखवत ती कायम स्मरणात राहावी म्हणून काथ्याला विशिष्ट गाठी मारून ठेवण्याची अवघड पद्धत ते अवलबत अगदी पेरू प्रांतातील इन्का इंडियन लोकांप्रमाणे निरनिराळ्या बेटांवरून गोळा केलेली नांव, आश्चर्य म्हणजे पिढ्यान् पिढ्यासह ततोतत जुळत होती एक पॉलिनेशियन पिढी साधारण पंचवीस वर्षांची धरली तर असा निष्कर्ष निघत होता की इ स ५०० च्या सुमारास लोकाची पहिली तुकडी त्या बेटांवर दाखल झाली असावी, त्या आधी नवकोच नाही नव्या सस्कृतीच लोण तिथपर्यंत पोचवणारी नव्या प्रमुखाची नामावळी लक्षात घेतली तर इ स ११०० पर्यन्त लोक तिथे जात राहिले असावेत.

मागाहून आलेले हे लोक आले कुठून ? हे लोक अश्मयुगातील होते असा निश्चित पुरावा मिळत असताना फारच थोड्या सशोधकानी त्यावर विचार केला होता बुद्धिमत्ता आणि अन्य सस्कृती–निदर्शक गोष्टींबरोबरच त्यानी दगडी कुदळ आणि कित्येक दगडी हत्यार सोबत नेली, सर्व बेटावर त्याचा प्रसार झाला, हे विसरून चालणार नव्हत.

अमेरिकेतील अनेक प्रकारच्या अज्ञात इंडियन सस्कृतीचा नीट अभ्यासच झाला नव्हता माझ सार लक्ष त्या जुन्या जगाकडे लागल होत, अनेक सशय बळावत चालले होते पूर्वेकडे सगळ्यात नजीक असलेल्या पेरू प्रजासत्ताकात पुराव्याची, अवशेषाची कमतरता नव्हती, फक्त अभ्यासाचीच काय ती होती एकेकाळी त्या ठिकाणी अज्ञात लोक राहात होते जगातील एक आश्चर्यकारक सस्कृती तिथे पूर्वी नांदत होती पुढे केव्हातरी ती पृथ्वीच्या पाठीवरून अचानक अदृश्य झाली पण त्यानी मागे ठेवलेल्या दगडातील प्रचड मानवी आकृती आणि ताहिती, मारक्वेसस इ इस्टर बेटावरील दगडी पुतळे यात खूपच साम्य आढळत होत तसेच सामोआचे पिरॅमिड दगडी कुऱ्हाडींनी टेकड्यांवरील घनाकृती प्रचड शिळा–अगदी रेल्वेच्या डब्याएवढ्या–खणून काढून कित्येक मैल त्यानी वाहून नेल्या होत्या मोठमोठी प्रवेशद्वार, भिंती, मदिर एकावर एक दगड रचून उभी केली होती पॅसिफिकमधील बेटावर त्याच पद्धतीचं बांधकाम झालेल होत

स्पेनच्या लोकानी आक्रमण करीपर्यन्त इन्का इंडियन लोकाच विस्तीर्ण साम्राज्य पेरूच्या पर्वतमय प्रदेशात पसरल होत पूर्वी त्या भागात वास्तव्य करणाऱ्या गोऱ्या देवतानी भव्य दगडी स्मारक उभारली अस नवागतांना इंडियन लोकांनी सांगितल वास्तुकला आणि शेती त्या देवतानीच आमच्या पूर्वजांना शिकविली, अस ते सांगत शिष्टाचार आणि रीतिरिवाज देखील त्यांचेच इन्काज किंवा इतर इंडियन लोकांपेक्षा हे देव वेगळे होते गोरी कातडी आणि लाब दाढ्या ते देशात आले तसेच अचानक निघूनही गेले त्यानतर पेरूतील सत्ता इन्काज लोकाच्या ताब्यात आली द अमेरिकेच्या किनाऱ्या

मी नॉर्वेला फातुहिवाहून परतलो तेव्हा वडिलांना किती मनस्ताप झाला आणि आईसह सर्व मित्रमंडळीही आश्चर्यात कशी बुडाली हे मला स्पष्ट आठवत. त्यावेळी काचेच्या भांड्यातून चित्रविचित्र पाखरं आणि अनेक प्रकारचे मासे मी विद्यापीठाच्या प्राणिसंग्रहालयात भेट देऊन टाकले. प्राण्यांचा अभ्यास सोडून आपण प्राचीन लोकांकडे वळावं असं मला वाटू लागलं. दक्षिणेकडील सागराची न उलगडलेली कोडी मला खुणावत होती. त्यांना तर्कसंगत खुलासे असलेच पाहिजेत असं मला खात्रीनं वाटू लागलं आणि अनेक दंतकथांचा शूरवीर नायक 'टिकी' याचे पराक्रम पडताळून पाहाणे, हेच ध्येय मी निश्चित केलं.

परंतु पॅसिफिकमधील निवासी लोकांचा अभ्यास हे तर असंभवनीय स्वप्न होतं, दूरचं होतं. त्यासाठी असंख्य जंगलं तुडवावी लागणार होती, समुद्र पार करणं आवश्यक होतं. प्राचीन काळच्या लोकांचे विचार आणि कृती याचा अर्थ नुसती पुस्तकं वाचून किंवा संग्रहालयांना भेटी देऊन लावणं हास्यास्पद होतं.

मी ज्या विषयाचा पाठपुरावा करणार होतो त्यावर खूपच काम त्याआधी झालेलं होतं. शास्त्रीय माहिती, आधीच्या संशोधकांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके, अमेरिका आणि युरोप मधील संग्रहालयात जमा झालेल्या अक्षरशः हजारो वस्तू इ. इ. अमेरिकेचा शोध लागल्यानंतर आमच्याच वंशाचे लोक प्रथम पॅसिफिक मधील बेटांवर पोचले होते. शास्त्राच्या सर्व शाखामधील संशोधकांनी प्रचंड माहिती गोळा केलेली होती. समुद्राविषयी आणि त्यातील बेटांवर वास्तव्य करणाऱ्या लोकांविषयी. परंतु त्या एकाकी बेटांवरील लोक मूळ कोठले यावर अद्याप एकमत झालेलं नव्हतं. अशा प्रकारचे लोक फक्त पॅसिफिकच्या पूर्वेकडील भागातच का आढळतात याचाही समाधानकारक खुलासा कोणी केलेला नव्हता.

जेव्हा युरोपियन लोकांनी प्रथम सर्वात मोठा समुद्र ओलांडायचं धाडस दाखवलं तेव्हा त्यांच्या लक्षात आलं की मधे मधे कित्येक डोंगराळ बेटं आणि प्रवाळाचे खडक अथांग सागरातून वर आलेले होते. ही बेटं एकमेकांपासून आणि जगापासून अलग झालेली होती. आणि प्रत्येक बेटावर त्याच्याआधीच लोकांची वस्ती झालेली होती. उंचनिंच, देखणे लोक किनाऱ्यावर कुत्री, डुक्कर, कोंबड्या यांच्यासह त्यांना हिंडताना पाहून साहसी संशोधक थक्क झाले होते. हे सगळे आले तरी कोठून ? त्यांची भाषा इतर कोणालाच समजत नव्हती. 'त्या बेटांचा शोध आम्ही लावला' अशी धाडशी विधानं करणाऱ्या आमच्याच लोकांना तिथे नांगरलेली शेतं, देवळं आणि झोपड्या असलेली खेडी दिसून आली. अगदी एकूण एक बेटांवर. काही काही ठिकाणी तर पिरॅमिड्स्, योजनापूर्वक बांधलेले रस्ते आणि दगडात खोदलेले पुतळे आढळले. युरोपमधल्या चार मजली इमारतीएवढे उंच पुतळे. फक्त या सगळ्याचं स्पष्टीकरण कोणीच दिलं नव्हतं. ते लोक कोण आणि तिथे आले कोठून ?

याचा शोध घेणारे जेवढे लोक तितकीच निरनिराळी स्पष्टीकरणं पुढे आली. वेगवेगळ्या विषयातल्या तज्ज्ञांनी काढलेले निष्कर्ष दुसऱ्या पद्धतीनं विचार करणाऱ्या लोकांनी व्यवस्थित खोडून काढले. पॉलिनेशियन लोकांची मलाया, भारत, चीन, जपान, अरेबिया, इजिप्त, कॉकेशस, ॲटलांटिस आणि अगदी जर्मनी किंवा नॉर्वे हीच मातृभूमी असं छातीठोकपणे सांगण्यात आलं होतं. पण दर खेपेला एक तरी घोटाळा निघायचा आणि साऱ्या सिद्धांतावर पाणी पडायचं.

आणि शास्त्रानं हात टेकले की कल्पनेचा उदय होतो. त्या बेटांवर उभे असलेले पुतळे आणि अन्य अवशेष—आणि सगळ्यात जवळचा द. अमेरिकेचा किनारा याच्यावरून अंदाज बांधले जाऊ लागले. समुद्रातल्या त्या एकाकी बेटांवर दिसणाऱ्या कित्येक गोष्टी पाहून द. अमेरिकेच्या जुन्या संस्कृतीची आठवण होत होती. त्यांना जोडणारा भूभाग पूर्वी होता आणि पुढे तो बुडाला का ? सर्व बेटांवरील स्मारकांमध्ये आढळणारं विलक्षण साम्य पाहून, सागरात अदृष्य झालेल्या एखाद्या देशाचे छोटे छोटे भागच वर डोकावत असतील का ?

ही उपपत्ती लोकप्रिय झाली. सर्वसामान्य लोकांचं त्यामुळे समाधान झालं पण भूगर्भ शास्त्रज्ञ आणि अन्य संशोधकांनी तो कल्पना उडवून लावली. प्राणीशास्त्राच्या अभ्यासकांनी अगदी साध्या स्पष्टीकरणानं सिद्ध केलं की 'तिथल्या पशुपक्षांवरून ध्यानात येतं — ती बेटं मानवजातीचा इतिहास सुरू होण्याआधी

## दोन

# साहसी कल्पनेला चालना

दक्षिण सागरातील एका बेटावर, शेकोटीसमोर बसलेल्या त्या वृद्धानं त्याच्या जमातीविषयी सांगितलेल्या दंतकथा ऐकताना माझ्या मनात विचारचक्र सुरू झालं. काही वर्षांनंतर दुसऱ्या एका म्हाताऱ्या गृहस्थासमवेत मी न्यूयॉर्कमधील प्रचंड संग्रहालयाच्या खूप वरच्या मजल्यावर तसाच बसलो.

भोवताली काचेच्या कपाटांमध्ये जुन्या काळातील मातीच्या मोडक्या तोडक्या वस्तू व्यवस्थित रचून ठेवलेल्या होत्या. मी धुंडयातून वाट शोधीत होतो. भिंतीला लागून पुस्तकांच्या राशीही होत्या. त्यातली काही काही, एकानं लिहिलेली पुस्तकं दहाजणांनी सुद्धा वाचली नसतील अशी होती. त्या आजोबांनी मात्र ती सगळी वाचलं होती आणि त्यातली थोडी लिहिली सुद्धा होती. कामाच्या टेबलापाशी ते बसले होते. केस पांढरे झालेले आणि स्वभाव मिश्किल. पण या खेपेला त्यांचं स्वास्थ्य हरपल्यासारखं दिसत होतं. त्यांनी हातानं खुर्ची घट्ट पकडली--जणु मी त्यांच्या सोशिकतेचा अंत पाहिला होता.

'नाही!' ते ठामपणे म्हणाले, 'कदापि शक्य नाही!'

'पुढच्या वर्षी ख्रिसमस उन्हाळ्याच्या सुटीत येतोय' असं सांगितल्यावर एखादा धर्मगुरु तुमच्याकडे डोळे फाडफाडून जसा पाहील तसंच त्यांनी माझ्याकडे पाहिलं.

'तुझी सपशेल चूक होतीय,' जोरजोरात मान हलवून त्यांनी माझी कल्पना संतापानं झटकून टाकली.

'पण माझा युक्तिवाद अजून तुम्ही ऐकला सुद्धा नाही,' मी आपलं घोडं पुढं दामटून म्हणालो.

'युक्तिवाद!' ते म्हणाले, 'मानववंशशास्त्राचा अभ्यास म्हणजे तुला काय रहस्यकथेची उकल वाटली?'

'का नाही?' मी म्हणालो. 'शास्त्रानं नोंदलेल्या सत्य घटना आणि माझं स्वतःचं निरीक्षण यावर आधारित असे निष्कर्षच मी काढलेले आहेत.'

'शास्त्राची स्वच्छ आणि निश्चित कामगिरी म्हणजे सतत संशोधन करीत राहणं,' ते शांतपणे म्हणाले.

वरून पॅसिफिकमधे पश्चिम दिशेला गोरे शिक्षक लुप्त झाले

पॅसिफिकमधल्या बेटांवर युरोपियन्स प्रथम आले तेव्हा तिथल्या दाढीवाल्या गोऱ्या लोकांना पाहून ते थक्क झाले सोनेरी लालसर कातडी, काळेभोर केस आणि बाकदार नाकाचे चेहरे, हे पॉलिनेशियन रहिवाशांचे वैशिष्ट्य होते जगातील अन्य बेटांवर असे लोक कधीच आढळले नव्हते लाल रंगाचे केस असलेले लोक स्वत ला 'उरुकेहु' म्हणवत सुरवातीच्या प्रमुख नेत्यांच्या वशातले ते होते अस मानल जाई टांगॅरोआ, केन आणि टिकी ही त्यांची दैवत होती जुन्या काळच्या कित्येक दतकथा तिथे आजही लोकप्रिय होत्या 'सूर्यामुळे पवित्र झालेल्या पूर्वेकडील डोंगराळ मुलुखातून प्रथम टिकी या बेटावर आला, हजारो मैल समुद्र पार करून त्याला यावं लागल,' अशी सर्वांची श्रद्धा होती

माझा शोध मी जारी केला आणि पेरू प्रांतातील जुनी सस्कृती, पुराणकाळ आणि भाषेचे कित्येक आश्चर्यकारक पुरावे मला मिळू लागले त्यावर लक्ष केंद्रित करून अधिकाधिक खोल जाव अस साहजिकच मला वाटू लागल पॉलिनेशियन लोकांचा देव टिकी याच मूळ स्थान कोणतं हे शोधून काढायचच असा मी निश्चय केला

आणि लवकरच माझी इच्छा पूर्णही झाली इन्का लोकांच्या पौराणिक कथा मी वाचत बसलो होतो पेरूमधील अदृश्य झालेला, सूर्यकुलातील गोऱ्या लोकांचा सर्वश्रेष्ठ राजा 'विराकोचा' याचा सदर्भ आला त्यात लिहिल होत

"विराकोचा हे इन्का नाव आहे आणि अगदी अलिकडच आहे पेरूमध्ये जुन्या काळी नेहमीच वापरात असलेलं त्याच मूळच नाव होत कॉन-टिकी किंवा इला-टिकी कॉन म्हणजे सूर्य आणि इला म्हणजे अग्नी कॉन टिकी हा थोर धर्मोपदेशक आणि गोऱ्या लोकांचा राजा होता 'लेक टिटीकाका'च्या काठावर वसलेल्या विशाल सस्कृतीची स्थापना त्यान केली आजही तिथे कित्येक अवशेष सापडतात तिथूनच टिकी एकाएकी अदृश्य झाला. एक असा प्रवाद आहे की 'कोकिंवो' खोऱ्यातील प्रमुख 'कारी' यान टिकीवर हल्ला चढवला युद्धात बहुसख्य गोरे लोक मारले गेले परतु काही अनुयायांसह टिकी मात्र निसटला 'लेक टिटीकाका' भागातच ही धुमश्चक्री झाली नतर तो पॅसिफिकच्या किनाऱ्यापर्यंत आला आणि अखेर समुद्रातून पश्चिम दिशेला रवाना झाला."

इन्का इंडियन लोकांचा पेरूमधून परागदा झालेला ईश्वर कॉन-टिकी आणि पूर्वपॅसिफिक मधील बेटांवर वास्तव्य करणाऱ्या लोकांचा मूळपुरुष व सस्थापक टिकी हे दोघही एकच यांविषयी मला तिळमातही संदेह राहिला नाही. पेरूमध्ये प्रत्यक्ष लागलेला ठावठिकाणा आणि बेटांवर प्रचलित असलेल्या दंतकथा या अगदी नावानिशी जुळल्या

परतु पॉलिनेशियाभर मला आढळलेल्या पुराव्यांवरून अस लक्षात आल की टिकीच्या शांतताप्रिय जमातीला बेटांवरील राज्य स्वतत्रपणे टिकवून ठेवता आल नाही वायव्येकडील इडियन लोकांच्या आणि टिकीच्या युद्धनौकांची समुद्रात टक्कर झाली पुढे त्यांचा समेट होऊन दोघात रक्ताची नाती निर्माण झाली त्यातूनच बेट-समूहांवर नव्या सस्कृतीचं अधिराज्य सुरू झाल तो होता अश्मयुगाचा उत्तरार्ध धातुकला, मातीकला, चाकाचा वापर किंवा विणकाम आणि धान्यपेरणी या विविध कला तिथे अद्याप पोचल्या नव्हत्या इ स ११०० च्या सुमारास नवे लोक तिथे दाखल झाले

अशा रितीन मी निश्चित ध्येयान प्रेरित होऊन मिळेल ती महत्त्वाची माहिती गोळा करू लागलो जणु पॉलिनेशियन लोकांच्या जुन्या कलेप्रमाणे पाषाणामधे भव्य शिल्प उभारण्यास मी प्रारभ केला

याचवेळी जर्मन लोकानी नॉर्वेवर आक्रमण केलं

लेफ्ट-राईट, लेफ्ट-राईट अबाऊट टर्न बिनतारी शिक्षण शाळा, पॅराशूट, बदूका यडीचे महिने उलटे पर्यन्त युद्धदेवतेची सूर्यदेवतेवर राजवट चालली

शांतता निर्माण झाली आणि एक दिवस माझा सिद्धांत, माझी उपपत्ती पूर्ण झाली आता अमेरिकेला जाऊन मला ती लोकांसमोर मांडायलाच हवी

दोन

# साहसी कल्पनेला चालना

दक्षिण सागरातील एका बेटावर, शेकोटीसमोर बसलेल्या त्या वृद्धान त्याच्या जमातीविषयी सांगितलेल्या दंतकथा ऐकताना माझ्या मनात विचारचक्र सुरू झालं काही वर्षांनंतर दुसऱ्या एका म्हाताऱ्या गृहस्थासमवेत मी न्यूयॉर्कमधील प्रचंड संग्रहालयाच्या खूप वरच्या मजल्यावर तसाच बसलो

भोवताली काचेच्या कपाटांमध्ये जुन्या काळातील मातीच्या मोडक्या तोडक्या वस्तू व्यवस्थित रचून ठेवल्या होत्या मी धुकंयातून वाट शोधीत होतो भिंतीला लागून पुस्तकांच्या राशीही होत्या त्यातली काही काही, एकान लिहिलेली पुस्तकं दहाजणांनी सुद्धा वाचली नसतील अशी होती त्या आजोबांनी मात्र ती सगळी वाचलं होती आणि त्यातली थोडी लिहिली सुद्धा होती कामाच्या टेबलापाशी ते बसले होते केस पांढरे झालेले आणि स्वभावं मिश्किल पण या खेपेला त्यांच स्वास्थ्य हरपल्यासारख दिसत होत त्यांनी हातान खुर्ची घट्ट पकडली—जणु मी त्याच्या सोशिकतेचा अंत पाहिला होता

'नाही!' ते ठामपणे म्हणाले, 'कदापि शक्य नाही!'

'पुढच्या वर्षी खिसमस उन्हाळ्याच्या सुटीत येतोय्' असं सांगितल्यावर एखादा धर्मगुरु तुमच्याकडे डोळे फाडफाडून जसा पाहील तसंच त्यांनी माझ्याकडे पाहिलं

'तुम्ही सपशेल चूक होतीय्,' जोरजोरात मान हलवत त्यांनी माझी कल्पना संतापान झटकून टाकली

'पण माझा युक्तिवाद अजून तुम्ही ऐकला सुद्धा नाही,' मी आपलं घोडं पुढं दामटून म्हणालो

'युक्तिवाद!' ते म्हणाले, 'मानववंशशास्त्राचा अभ्यास म्हणजे तुला काय रहस्यकथेंची उकल वाटली?'

का नाही? मी म्हणालो 'शास्त्रानं नोंदलेल्या सत्य घटना आणि माझं स्वतःच निरीक्षण यावर आधारित असे निष्कर्षच मी काढलेले आहेत'

'शास्त्राची स्वच्छ आणि निश्चित कामगिरी म्हणजे सतत संशोधन करीत राहणे,' ते शांतपणे म्हणाले,

अमुक किंवा तमुक सिद्ध करण्याचा प्रयत्न करणे ही नव्हे '

न उघडलेलं माझं हस्तलिखित त्यानी हळूच बाजूला सरकवलं आणि ते पुढे झुकले

'ही गोष्ट तर निश्चितच की जुन्या अनेक चमत्कृतिजन्य संस्कृतीचं माहेरघर द अमेरिका हेच आहे इन्का सत्तेवर येण्यापूर्वी तिथे कोण राहात किंवा नंतर ते कुठे निघून गेले हे आपल्याला ठाऊक नाही पण त्यातले कोणीही पॅसिफिकमधल्या बेटांवर स्थायिक झाले नाहीत एवढं निश्चितपणे सांगता येतं '

शोधक नजरेनं माझ्याकडे पाहून ते पुढे म्हणाले

का ते ठाऊक आहे? उत्तर अगदी सोपं आहे त्याच्याजवळ होड्या नव्हत्या त्यांना तिकडे जाता येणंच अशक्य होतं!'

'पण त्याच्याकडे तराफे होते ' मी विरोध नोंदवला 'बालसा-लाकडाचे तराफे '

म्हातारा हसला आणि थंडपणे म्हणाला

'अच्छा! मग तुम्ही का नाही पॅसिफिकमधून तशी सहल काढत? पेरूच्या किनाऱ्यापासून त्या बेटांपर्यंत, आणि अर्थातच लाकडी तराफ्यावरूनच हं!'

त्यावर मी काहीच बोलू शकलो नाही उशीरही बराच झाला होता. त्या वृद्ध शास्त्रज्ञान उठल्यावर माझे खांदे थोपटले आणि कसलीही मदत लागली तरी त्याच्याकडे 'संकोच न करता ये' असं सांगितलं पण भविष्यात मी एक पॉलिनेशिया तरी किंवा अमेरिका हा संशोधनाचा स्वतंत्र विषय ठरवावा, दोन भिन्न मानववंश असलेल्या प्रांतांची गल्लत करू नये असा बहुमोल इषाराही त्यानं कळकळीनं दिला. तो पुन्हा टेबलाशी गेला

'तू हे विसरलास,' माझं बाड परत देताना तो म्हणाला त्यावरचं नाव मी मनात खिन्नपणे वाचलं ''पॉलिनेशिया आणि अमेरिका, प्राचीन संबंधांचा अभ्यास' हस्तलिखित काखेत मारुन मी खाली रस्त्यावर गर्दीत जाऊन मिसळलो

त्याच संध्याकाळी 'ग्रीनविच्' खेड्यातील एका जुन्या-पुराण्या घरापाशी जाऊन मी दार ठोठावलं मला अस्वस्थ करुन सोडणारे काही प्रश्न घेऊन मी तिथे गेलो होतो

लांब नाकाच्या एका बारक्याशा इसमान दार उघडलं आनंदाची आरोळी ठोकून त्यानं मला आत खेचलं तो मला सरळ स्वयंपाकघरात घेऊन गेला आणि कामाला लावलं गॅसवर कुठलातरी पदार्थ तयार होत होता

'बरं झालं आलास,' तो म्हणाला, 'आज काय काम काढलं?'

'वैतागच आहे,' मी त्रासून म्हणालो 'माझं लिखाण कोणीच वाचायला तयार नाही '

त्यानं बशा भरल्या, आम्ही त्यावर तुटून पडलो

'ते असंच आहे,' तो म्हणाला, 'तू ज्यांना ज्यांना भेटलास त्यांना हे तुझ्या डोक्यातलं खूळ वाटतय् इथे अमेरिकेत कोणीही उठतो आणि तऱ्हेवाईक कल्पना मांडतो '

'शिवाय आणखी एक गोष्ट आहे,' मी म्हणालो

'होय,' तो पुढे म्हणाला 'या प्रश्नाकडे बघण्याचा तुझा दृष्टिकोन प्रत्येक विषयाचे असंख्य तज्ज्ञ आहेत, त्यांना एका सिद्धांतामध्ये वनस्पतीशास्त्र ते पुरातत्वशास्त्र या अनेक विषयांचा अंतर्भाव केलेला कसा खपेल! तपशीलासाठी आपल्या विषयापुरतंच ते अधिकाअधिक खोल जातात आणि क्षेत्र संकुचित बनवतात आधुनिक संशोधक प्रत्येक खास विषयाला स्वतंत्र कुंपण घालून घेतात त्यातून निघणारे निष्कर्ष एकत्रित करून पडताळून पाहण्याचे कष्ट कोण घेत बसणार!'

तो उठला आणि एका प्रचंड हस्तलिखिताजवळ गेला.

'हे बघ,' तो म्हणाला 'चिनी शेतकऱ्यांच्या कशिदाकामातील पक्ष्यांच्या आकृतींचा मी केलेला अभ्यास याला सात वर्षं लागली, पण त्यानी प्रकाशनासाठी हे ताबडतोब स्वीकारलं हल्ली सूक्ष्म तपशील देणारी माहिती लागते '

कार्लचं म्हणणं ठीकच होतं परंतु सर्व अंगाचा विचार न करता पॅसिफिकचे प्रश्न सोडवणं मला सर्वस्वी अशक्य वाटत होतं त्या बाबतीत दुराग्रह, अट्टाहास अयोग्य होते

आम्ही टेबल साफ केलं आणि बशा धुवून टाकल्या

'शिकागो विद्यापीठाकडून नवीन काही आलं नाही?'

'छे!'

'पण म्युझियममधला तुझा म्हातारा दोस्त आज काय म्हणाला?'

मी सावकाश सांगितल 'त्यालाही यात काही तथ्य वाटल नाही त्याच म्हणण असं की इंडियन लोकांकडे उघडे तराफेच होते, त्यामुळे पॅसिफिक बेटांचा शोध त्यांनी लावला असेल ही शक्यताच नष्ट होते '

माझा मित्र धुतलेल्या बशा गंभीर चेहरा करून जोरजोरात पुसू लागला

'खर आहे,' तो अखेर म्हणाला 'स्पष्टच सांगायच तर तुझ्या सिद्धांतामध्ये तो व्यावहारिक आक्षेप घेता येईलच '

एकमेव आशास्थान असलेल्या त्या मानववंशशास्त्राच्या अभ्यासकाकडे मी निराश होऊन पाहिल

'पण गैरसमज करून घेऊ नकोस, तो घाईघाईन म्हणाला ' एका दृष्टीन मला तुझ पटत, पण त्यात शंकेला जागा आहे एवढच माझा आकृतींचा अभ्यास तुझ्या सिद्धांताविरोधी नाही, उलट आधारच देतो '

'कार्ल,' मी म्हणालो, 'इंडियन लोकांनी तराफ्यावरुनच पॅसिफिक ओलांडला अशी माझी पक्की खात्री झालेली आहे ती गोष्ट शक्य होती हे सिद्ध करण्यासाठी तसाच एक तराफा बनवून समुद्र पार करायची आपली तयारी आहे '

'मूर्ख आहेस!'

माझ्या मित्राला तो विनोदच वाटला, त्यामुळे या कल्पनेला तो हसला

वेडा आहेस की काय! तराफा?'

काय बोलाव हे त्याला सुचत नव्हत म्हणून तो माझ्याकडे नुसता आ वासून बघत राहिला मीही केव्हा हसतो याची तो वाट बघत असावा

पण मी गंभीरच होतो माझ म्हणण प्रत्यक्षात कोणीही मान्य करणार नाही हे मला कळून चुकल होत पेरु आणि पॉलिनेशियामध्ये पसरलेल्या अथांग आणि अनंत सागरात जुन्या काळच्या तराफ्यावरून जाण त्याच्या दृष्टीन हास्यास्पद होत

कार्ल अविश्वासाच्या नजरेन माझ्याकडे पहात होता

'आपण आता बाहेर जाऊन ड्रिंक घेऊ,' तो म्हणाला

आम्ही बाहेर पडलो आणि एक बार गाठला

त्याच आठवड्यात मला खोलीच भाडं भरायच होत आणि त्यात बँक ऑफ नॉर्वेकडून पत्र आल की आणखी डॉलर्स मला मिळू शकणार नाहीत चलनावरील बंधने मी आपल सामान उचलल आणि ब्रूकलीनला रवाना झालो, तिथे 'नॉर्वे खलाशी गृहा'त माझी सोय लागली जेवण स्वस्त आणि चांगल मिळत होत निवास माझ्या खिशाला परवडणारा होता खोली वरच्या मजल्यावर पण मेस खाली होती

खलाशी येत आणि जात तऱ्हेतऱ्हेचे नमुने तिथे बघायला मिळत एक गोष्ट मात्र सगळयांची सारखी होती ते जेव्हा समुद्राविषयी बोलत तेव्हा रंगात येत आपण काय बोलतो हे त्यांना पक्क ठाऊक असे, त्यात सुसंगती होती, आत्मविश्वास होता, अभिमान होता तिथेच मला समजल की समुद्राच्या खोलीवर किंवा जमिनीपासूनच्या अंतरावर लाटा आणि सागराचा रौद्रपणा अवलंबून नसतो त्याउलट किनाऱ्याच्या जवळपासच जास्त धोका असतो तिथे जी नौका किंवा तराफा तग धरील त्याला समुद्रात मध्यावर प्रवास करण बिलकुल अवघड जात नाही मला अशीही माहिती मिळाली की खवळलेल्या समुद्रात मोठमोठया जहाजामध्ये उसळत पाणी जोरात फेकल जाऊन ती पिसासारखी वरखाली होतात, पण त्या जागी लहान होडी असेल तर प्रतिकूल हवामानाचा फारसा विपरीत परिणाम तिच्यावर होत नाही कारण लाटांच्या ओळीमधोमध तिला बरोबर जागा मिळते आणि समुद्रपक्षाप्रमाणे मुक्तपणे—मुख्य म्हणजे सुरक्षितपणे—ती नाचू शकते असा अनुभव त्यांना कित्येक वेळी आला होता

परंतु त्यांना तराफ्याविषयी फारच थोडी माहिती होती तराफा म्हणजे धड जहाज नाही की होडी. धोक्याचे वेळी जीव बचावण्यासाठी उपयोगात येणार ते एक तरंगत साधन कुठल्या ना कुठल्या जहाजान उचलून घेईपर्यंन्त टिकाव लागला की झाल एकजण मात्र असा भेटला की त्याला तराफ्यान तीन आठवडे सांभाळल होत मध्य अॅटलांटिकमधे जर्मन पाणबुडीन त्याच जहाज बुडविल्यावर त्याच्या पुढे दुसरा पर्यायच नव्हता

'पण आपल्याला तराफा ताब्यात ठेवता येत

नाही,' तो म्हणाला 'वारा नेईल तसा तो भरकटतो, गरागर फिरतो '

पॅसिफिकमधून द अमेरिकेचा किनारा प्रथम गाठणाऱ्या युरोपियन लोकांनी खूप माहिती जमा केलेली होती इंडियन लोकांच्या लाकडी तराफ्याची वर्णने आणि आकृत्या यांची कमतरता नव्हती उपलब्ध असलेली सर्व माहिती मी लायब्ररीत वाचून काढली बालसा लाकडाच्या तराफ्याला चौरसाकृती शीड आणि मधोमध फळ्या असत मागच्या बाजूला लांब वल्ही असल्यामुळे दिशा हवी तशी बदलता येणं शक्य होत

खलाशाच्या निवासस्थानी कित्येक आठवडे गेले माझी उपपत्ती मी जिथे जिथे पाठवली होती त्या शिकागो आणि अन्य शहरातून अद्याप एकही उत्तर आल नव्हत. बहुधा कोणी काही वाचलहि नसावं

अखेर, एका शनिवारी, मी थेट जाऊन जहाजोपयोगी वस्तूच दुकान गाठलं ताडेल वापरतात तो पॅसिफिकचा नकाशा खरेदी केला, तेव्हा मला तिथे नम्रपणे 'कॅप्टन' पुकारण्यात आल नकाशा बगलेत मारून मी 'ऑसिनिंग'ला जाण्यासाठी रेल्वे पकडली नॉर्वेच्या तरुण नवदांपत्याकडे आठवड्यात एकदा मी नियमितपणे जात असे गावाबाहेर त्यांची सुरेख जागा होती पूर्वी तो जहाजाचा कप्तान होता सध्या न्यूयॉर्क मधल्या एका कंपनीत तो मॅनेजर होता

पोहोण्याच्या तलावामध्ये मनसोक्त पोहोल्यावर उरलेल्या दिवसात शहरी जीवनाचा पूर्णपणे विसर पडतो त्या दिवशी अॅबिजॉर्ग—माझा मित्र विल्हेमची पत्नी—कॉकटेल घेऊन आली उन कडक होत मी स्वस्थ बसू शकलो नाही गवतावर नकाशा पसरला आणि विल्हेमला विचारल, 'तराफ्यावरून पेरू ते दक्षिण सागरीय बेटाचा प्रवास जिवंतपणे पार पाडता येईल ?

नकाशाऐवजी त्यान माझ्याकडेच पाहिलं प्रश्नानं तो थोडासा हादरला पण लगेच हो असहि म्हणाला मला तर त्यामुळे हवेत तरंगल्याचा भास झाला काही झाल तरी विल्हेमचा तो प्रांत होता—आवड आणि व्यवसाय नौकानयन किंवा तत्संबंधी सर्व काही त्याच्याच मार्गदर्शनात होऊ शकणार होत माझी योजना त्याला एकदम आवडली पण आश्चर्य म्हणजे 'शुद्ध वेडेपणाच आहे' असहि तो वरती म्हणाला

'पण आत्ताच तू सांगितलस ना की तसा प्रवास शक्य आहे ? ' मी विचारल

'अर्थात,' त्यान मान्य केल 'पण अपयश येण्याची शक्यताही आहेच बालसा लाकडाच्या तराफ्यावर तू अद्याप एकदाहि बसलेला नाहीस आणि एकदम पॅसिफिक ओलांडायची भाषा! कदाचित तुम्हाला जमेल, कदाचित नाही सुद्धा पेरूतल्या जुन्या इंडियन्सना पिढ्यान् पिढ्यांचा अनुभव होता एक तराफा थेट जाणार त्या आधी इतर दहा बुडत सुद्धा असतील—शतकानुशतकात शेकडो गडप झाले असतील तुझ्याच म्हणण्याप्रमाणे इन्का लोक सामुदायिकपणे बऱ्याच तराफ्यावरून जात काही गडबड झाली की इतर लोक मदतीला धावू शकत असणार पण भर समुद्रात • तुम्हाला कोण उचलून घेणार? तुम्ही अगदी वायरलेस सेट जवळ ठेवला तरी हजारो मैल पसरलेल्या सागरात एक छोटासा तराफा शोधून काढण केवळ अशक्य आहे वादळात फेकले जाल आणि मदत मिळण्यापूर्वी हजारदा बुडाल कोणी तरी तुझ हस्तलिखित वाचेपर्यंत तू शांतपणे इथेच राहाव हे उत्तम पुन्हा पुन्हा लिही आणि त्यांना धक्के दे, तस केल्याशिवाय इलाज नाही '

'मी आता मुळीच थांबणार नाही, काही दिवसातच माझ्याकडे छदाम शिल्लक राहणार नाही '

'मग आमच्याकडे ये आणि तस असेल तर द अमेरिकेहून पैशाविना तुझी धाडसी सफर कशी सुरू होईल ? '

'न वाचलेल्या हस्तलिखितापेक्षा प्रत्यक्ष मोहिमेत लोकांना रस वाटू शकेल '

'पण त्यात तुझा काय फायदा ? '

'माझ्या सिद्धांतावरचा महत्त्वाचा आक्षेप खोडून काढल्याच समाधान शास्त्रज्ञांना तिकडे लक्ष द्याव लागेल ते वेगळच '

'पण वाटेत काही विपरीत झाल तर ?

तर माझ म्हणण सिद्ध होणार नाही '

'म्हणजे सगळ्यांसमोर तुझी थेअरी नष्ट होणार नाही का ?

'शक्य आहे, पण दहात एक तरी—तुझ्या म्हणण्यानुसार—यशस्वीपणे पोचलाच असणार '

त्याच वेळी मुल बाहेर खेळायला आली आणि आमच्या संभाषणात खड पडला त्या दिवशी आमच पुन्हा बोलण झालच नाही

पुढच्या शनिवारी नकाशे घेऊन मी पुन्हा 'ऑसिनिंग' ला गेलो आणि परत येताना पेरूच्या किनाऱ्यापासून टुवामोटू बेटापर्यंत पॅसिफिकमध्ये पेन्सिलची एक जाड-जूड रेघ नकाशावर आखलेली होती माझा निश्चय मोडून काढण्याचे विल्हेमचे सगळे उपाय थकल्यावर आम्ही तासन्तास एकत्र बसून तो मार्ग आणि तराफ्याचा अदाजे वेग काढला

'सत्याण्णव दिवस,' विल्हेम म्हणाला, 'पण हे उत्तम परिस्थिती गृहीत धरून काढलेले आहेत कायम अनुकूल वारा आणि तुझ्या कल्पनेप्रमाणे तराफा निश्चित वाहू शकेल हे गृहीत धरून तुम्ही कमीत कमी चार महिने धरून चालले पाहिजेत जास्त लागले तरी तयारी ठेवा '

'ठीक आहे,' मी समाधानाने म्हणालो, 'आपण चार महिने राखून ठेवू, पण सत्याण्णव दिवसात सफर पूर्ण करू '

सध्याकाळी मी घरी परतलो माझी छोटी खोली आता प्रशस्त, आरामशीर भासू लागली नकाशा घेऊन मी कॉटवर बसलो तराफ्याचा आकार कॉट-पेक्षा बराच मोठा असणार मी खिडकीतून बाहेर चमचम करणाऱ्या आकाशाकडे नजर टाकली भविष्यात तराफ्यावर कसो जागा असली तरी आकाश आणि एकूण एक ताऱ्याना त्यावर स्थान मिळणार होत

सेन्ट्रल पार्कजवळ, ७२ व्या रस्त्यावर, न्यूयॉर्क-मधील एक वैशिष्टचपूर्ण क्लब आहे बाहेर स्वच्छ चकचकित ब्रास पाटीवर 'सशोधकांचा क्लब एवढ लिहिल आहे आत काही तरी वेगळ्याच प्रकारचे कार्यक्रम चालत असतील एवढ रस्त्यावरून जाणाऱ्या लोकाना त्या पाटीवरून नक्की समजत पण एकदा का आत गेल की एका वेगळ्याच दुनियेत पॅरा-शूटमधून उडी टाकल्यासारख वाटत न्यूयॉर्कच्या गगनचुबी इमारती आणि धावणाऱ्या मोटारीच्या रांगा-पासून हजारो मैल दूर. एकदा मागच दार बद केल की जगलातील सिहाची शिकार, पर्वतारोहण, ध्रुव-प्रदेशातील जीवन याच अनोख दर्शन पाहून एखाद्या क्रीडानौकेतून जगाची सफर केल्याचा भास होतो हिप्पोपोटॅमस आणि हरणाची मुडकी, मोठमोठ्या बंदुका, हत्तीचे सुळे, भालेबरच्या, इडियन गालिचे, जहाजांच्या प्रतिकृती, निरनिराळे ध्वज, फोटो आणि नकाशे तिथे सदस्य मेजवान्यांसाठी किंवा दूरदूरच्या देशातील वक्त्याची भाषण ऐकायला एकत्र येतात

मारक्वेसस बेटांचा दौरा करून आल्यानतर मला त्या क्लबचा क्रियाशील सभासद करून घेण्यात आल मी शहरात हजर असताना त्यांची एकही मीटिंग चुकवली नव्हती पावसाळी नोव्हेम्बरच्या एका सध्याकाळी मी जेव्हा क्लबमध्ये शिरलो तेव्हा आतल बदललेल वाता-वरण पाहून मला मुळीच आश्चर्य वाटल नाही मधोमध जमिनीवर फुगवलेला रबरी तराफा होता त्यावर नाना वस्तू आणि पदार्थ होते पॅराशूटस, सरक्षित जाकिटे आणि कपडे, जलशुद्धीकरण बलून्स आणि असे इतर अनेक शोध टेबलावर माडून ठेवलेले होते नव्यान सभासद झालेल्या कर्नल हस्किन याच भाषण आणि प्रात्यक्षिक होते 'एअर मटेरियल कमाड'या प्रयोगशाळेचे ते मुख्य होते मिलिटरीन कित्येक नवीन शोध लावले होते शास्त्रीय मोहिमा-मध्ये पुढे त्याचा खूपच उपयोग होईल असा कर्नल हस्किनना विश्वास वाटत होता

भाषणानतर मोठी जोरदार आणि मजेदार चर्चा झाली ध्रुवाची सफर करणारा प्रसिद्ध डॅनिश गृहस्थ 'पीटर फरेचन' आपली दाढी सावरत उठला तसल्या नव्या पद्धतीच्या साधनसामुग्रीचा त्याला अजिबात भरवसा वाटत नव्हता पूर्वी ग्रीनलॅण्डला जाताना त्यानं रबरी होडी आणि तबूचा वापर केला होता त्यावेळी तो थोडक्यात बचावला या रबरी गोष्टी-विषयी त्याचा अनुभव वाईट होता एस्किमो लोकांच्या कयाक (कातड्याची होडी) मुळे तो वाचला, नाहीतर बुडतच होता 'एस्किमोनी हजारो वर्षांच्या अनुभवा-वरून त्याच्या प्रातात उपयुक्त होतील अशा गोष्टी बनवल्या कोणताही शहाणा आधुनिक संशोधक त्या-पेक्षा चागल्या गोष्टी नुसत प्रयोगशाळेत बसून बनवू शकणार नाही,' अस पीटर म्हणाला

चर्चेचा शेवट आश्चर्यकारक ठरला कर्नल हस्किनन जाहीर केल की त्यान नुकतच ज्याच प्रात्यक्षिक दाखवल

होतं त्या वस्तु क्रियाशील सभासदाना त्यांच्या पुढील मोहिमेत वापरण्यासाठी मिळू शकतील त्याची अट फक्त एकच होती मोहिमेहून परत आल्यावर त्यावरचा अभिप्राय प्रयोगशाळेकडे पाठवणे

एकूण असं होत त्या सध्याकाळी मी सगळचात शेवटी क्लबच्या बाहेर पडलो अचानक समोर आलेल्या साधनांचा मला बारकाईन अभ्यास करायचा होता आता मी फक्त मागण्याचाच काय तो अवकाश ! तशाच गोष्टीची मला गरज होती–प्रतिकूल हवामाना-मुळे आमचा लाकडी तराफा नष्ट होण्याची वेळ आली तर जीव बचावण्यासाठी जवळ दुसरे तराफे असणार नव्हते

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता करत असताना माझ्या डोक्यात तेच विचार घोळत होते तेवढ्यात मेसमध्ये एक सुदृढ तरुण आला त्याचे कपडे भारी-पैकी दिसत होते डिशेस घेऊन तो सरळ माझ्याच टेबलाजवळ येऊन बसला आमच्या गप्पा सुरू झाल्या. तोहि खलाशी नव्हताच 'ट्रॉन्डहेम' युनिव्हर्सिटीचा तो इंजिनियर होता मशिनरी खरेदी करण्यासाठी आणि रेफ्रिजरेशनमध्ये अधिक शिक्षण घेण्यासाठी तो अमेरिकेत आला होता त्याचा मुक्काम दूर होता, पण 'खलाशी गृहात' जेवण उत्तम मिळत असे म्हणून तो वारवार आमच्या मेसमध्ये येई त्यान मी काय करतो हे विचारल मी थोडक्यात माझी योजना त्याला सांगितली त्या आठवड्यात कुठूनच उत्तर आल नाही तर मी सफरीच्या तयारीला लागणार होतो, असहि त्याला सांगितल तो फारसा बोलत नव्हता, पण माझ म्हणण त्यान लक्षपूर्वक ऐकून घेतल

चार दिवसानतर आमची पुन्हा तिथेच गाठ पडली

'तुम्ही मोहिमेला जायच निश्चित केल का नाही ?' त्यानं विचारल

'होय,' मी म्हणालो 'मी जाणारच

'केव्हा ?'

'लवकरात लवकर उगीच वेळ काढत बसलं तर ॲण्टार्क्टिककडून जोरदार वारे वाहू लागतील त्या बेटांवरहि चक्री वादळ सुरू होईल काही महिन्यातच मला पेरूहून निघाल पाहिजे, पण त्या आधी पैशाची सोय आणि कार्यक्रमाची व्यवस्थित आखणी करायला हवी.'

'तुम्ही किती जण निघणार ?'

'एकूण सहाजण असावेत, अस मला वाटत भिन्न प्रकारच्या व्यवसायातील लोक तराफ्यावर असण बर प्रत्येकान चार–चार तास रोज वल्हवायच म्हटलं तर तेवढे हवेतच '

तो एकाएकी उभा राहिला एकदोन क्षण काही तरी विचार करून प्रत्येक शब्दावर जोर देत तो म्हणाला .

'पण काय हो, त्यात माझा समावेश केलात तर! मी तांत्रिक मोजमाप आणि कसोट्या यांची जबाब-दारी पत्करू शकेन नाहीतरी वारा, प्रवाह आणि लाटाचे वेग बिनचूक अजमावल्याशिवाय तुमचा प्रयोग सफल होणारच नाही तुम्हाला अज्ञात असं प्रचंड अतर कापायच आहे, कारण सगळ्या जहाज-मार्गा-पलिकडे हजारो मैलावर ती बेट आहेत या मुलखा-वेगळ्या सफरीतून हवामानाविषयक आणि जल-सशोधनातील कित्येक प्रकारची मौलिक माहिती उपलब्ध होऊ शकेल थर्मो–डायनॅमिक्स या विषयातील माझं ज्ञान तिथे उपयोगी ठेल '

त्या माणसाविषयी मला काही एक ठाऊक नव्हत दिसत होता फक्त बोलका, उत्तेजित चेहरा तो बरच काहीतरी प्रकट करीत होता

'ओके,' मी म्हणालो, 'आपण बरोबर जाऊ '

तीन

# अनपेक्षित मदत

माझ्यासह येऊ इच्छिणाऱ्या त्या तरुणाचं नावं होतं हर्मन वॅटझिंगर समुद्राविषयीचं त्याचं ज्ञान माझ्यासारखंच ' अगाध ' होतं

काही दिवसांनी मी हर्मनला आमच्या ' संशोधकां'च्या क्लबमध्ये गेस्ट म्हणून घेऊन गेलो आम्ही लगेच ध्रुव-प्रवासी पीटर फ्रेचनची गाठ घेतली कितीही गर्दीमध्ये उठून दिसण्यासारखं त्याचं व्यक्तिमत्त्व होतं भीमकाय शरीर आणि लोंबकळणारी दाढी त्याच्याभोवती विशिष्ट वातावरणच निर्माण व्हायचं

भिंतीवर असलेल्या एका नकाशापाशी त्याला नेऊन आम्ही आमची पॅसिफिक मोहिमेची मनीषा त्याला सांगितली त्याचे बालिश निळे डोळे बशीएवढे मोठे झाले तराफ्यावरून जाण्याची गोष्ट ऐकून तो दाढी ओढू लागला आपला लाकडी पाय जमिनीवर आपटून कप-ऱ्याचा पट्टा त्यानं बरीच भोकं आवळून घट्ट केला

'पोरांनो ! मलाही तुमच्याबरोबर यावंसं वाटतंय् !'

त्या ग्रीनलँडच्या प्रवाशानं आमचे बियर ग्लासेस भरले आणि जुन्या लोकांच्या तराफ्यावर त्याचा कसा विश्वास होता हे तो सांगू लागला निसर्गाशी मिळतं जुळतं घेऊन जमिनीवर काय किंवा समुद्रात राहण्याची त्याची प्रवृत्ती आणि कसब पीटरला गौरवास्पद वाटायचं. त्यानं स्वतः सैबेरियातील नद्यामधून आणि आर्क्टिकच्या किनाऱ्याला लागून तराफ्यानं प्रवास केलेला होता. बोलताना तो दाढी एकसारखी खेचतच होता ' आपला वेळ फार चांगला जाणार, 'असं भविष्यही त्यानं ऐकवलं

आमच्या योजनेला फ्रेचनचा उत्सुक पाठिंबा मिळा-ल्यावर प्रचंड वेगानं हालचाली सुरु झाल्या आणि साहजिकच स्कॅन्डिनेव्हियन वृत्तपत्रांनी त्याविषयी पांढ-ऱ्यावर काळं केलं अगदी दुसऱ्याच दिवशी सकाळी स्नानगृहात माझं दार जोरजोरात ठोठावण्यात आलं खाली कुणाचातरी फोन आला होता त्याचीच निष्पत्ती म्हणजे संध्याकाळी शहरातील गजबजलेल्या एका

चौकात असलेल्या सुशोभित घरासमोर हर्मनसह उभं राहून मी बेल दाबली निळ्या सुटावर रेशमी गाऊन आणि पायात सपाता घातलेल्या तरुण गृहस्थानं आम्हाला अदबीनं आत घेतलं नाकाशी सुवासिक रुमाल धरून आपल्याला सर्दी झाल्याबद्दल त्यानं दिलगिरी व्यक्त केली युद्धात त्यानं विमानदलात बरीच कामगिरी बजावली होती, एवढंच आम्हाला ठाऊक होतं त्याच्या-खेरीज दोन अति-उत्साही वार्ताहर तिथे उपस्थित होते. त्यातला एक नावाजलेलाही होता

उत्तम व्हिस्कीचा आस्वाद घेताना आम्हाला कळलं की त्या घराच्या मालकाला आमच्या मोहिमेत इंटरेस्ट होता मोहिमेहून यशस्वीरीत्या परतल्यावर, वृत्तपत्रात लेख लिहिणे आणि गावोगाव त्याविषयी व्याख्यानं देणे, या गोष्टी आम्ही मान्य केल्या तर आवश्यक ते भांडवल आपण उभारू असं त्यानं सुचवलं आम्ही अर्थातच ते मान्य केलं मोहिमेत भाग घेणाऱ्यांना सुयश चिंतून आणि लागेल त्या सहकार्याचं पुन्हा आश्वासन देऊन त्यानं आम्हाला निरोप दिला आता आमचा आर्थिक प्रश्न सुटल्यासारखा होता, आम्हाला पाठिंबा देणाऱ्यांनी ती जबाबदारी उचलली होती मी आणि हर्मन लगेच साधन सामुग्री गोळा करायच्या मागे लागलो तराफा सुद्धा तयारच करायचा होता वक्रीवादळ सुरू होण्या-पूर्वी निघणं जरूरीचं होतं

दुसऱ्या दिवशी हर्मननं नोकरीचा राजिनामा दिला आणि आम्ही जोरात तयारी सुरू केली एअर मटेरिअल कमांडतर्फे बऱ्याच वस्तू मिळणार होत्या काही संशो-धकांच्या क्लबकडून सुरुवात चांगलीच झाली आता महत्त्वाचं काम म्हणजे तराफ्यावरून आमच्यासह येण्याची तयारी असलेल्या चार लायक व्यक्तींची निवड करणे आणि सफरीमध्ये लागणाऱ्या पदार्थांचा साठा करणे

भर समुद्रात तराफ्यावरून जायचं असल्यामुळे बाकीच्या चारांची निवड फार काळजीपूर्वक करायला हवी होती नाहीतर वाटेत त्रास उद्भवायचा आणि एखादा महिना जमिनीपासून तुटल्यावर कोणी बंड पुकारायचा मला खलाशी तर नकोच होते तराफा कसा हाकायचा हे त्यांना माझ्याइतकंच ठाऊक असणार होतं दुसरं म्हणजे जुन्या काळच्या पेरूतील लोकांपेक्षा आमच्यातले लोक अधिक उत्तम आणि अनुभवी खलाशी असल्यामुळे आम्ही मार्गक्रमण करू शकलो असा मुद्दा मागाहून कोणी काढू नये तरीही किमान एकजण असा हवा होता, ज्याला अक्षांशात्मक अंतर मोजता येतात आणि नकाशावर आमचा कापलेला मार्ग तो निश्चितपणे नोंदू शकेल ! त्यावरच आमचा शास्त्रीय अहवाल अवलंबून राहणार होता

'एक चित्रकार मला ठाऊक आहे,' मी हर्मनला म्हणालो, 'तो चांगला गबदुल आहे, गिटार वाजवू शकतो आणि गमत्या आहे नाविक शाळेत शिक्षण घेऊन त्यानं बऱ्याच वेळा जगभर जलप्रवास केलेला आहे शेवटी तो घरी ब्रश हातात धरून स्थिर झाला लहानपणा-पासून तो माझा दोस्त आहे त्यावेळी आम्ही कित्येक डोंगर एकत्र पालथे घातलेले आहेत मी त्याला पत्र टाकून विचारतो, तो नक्की येईल '

'तो असायला हरकत नाही,' हर्मननं मान डोलावली 'शिवाय आपल्याला वायरलेस सांभाळणाऱ्या एका माणसाची गरज आहे '

'वायरलेस ! ' मी घाबरून म्हणालो, 'आपल्याला त्याची काय गरज ? इतिहासपूर्वकालीन तराफ्यावर ती अस्थानी आहे '

'मुळीच नाही तो एक सुरक्षिततेचा उपाय आहे आणि त्यामुळे तु या सिद्धांतावर काहीच परिणाम होणार नाही आपण त्यावरून मदत मागवली नाही म्हणजे झालं हवामानविषयक निरीक्षण आणि इतर रिपोर्टस् पाठवायला त्याचा उपयोग नाही होणार ? पॅसिफिक-च्या त्या भागातील हवामान अज्ञातच आहे, त्यामुळे आपल्याला धोक्याची सूचना वगैरे मिळण्याचाही प्रश्नच नाही किंवा मिळाला तरी तसा उपयोगही नाही

त्याच्या युक्तिवादापुढे माझा निषेध थंड पडला

'त्याबाबतीत माझ्या चांगल्या ओळखी आहेत,' मी मान्य करून म्हणालो 'दूर अंतरावरून छोट्या सेटचा वापर करायचा म्हणजे जाणकार हवाच युद्धाचे वेळी मीही वायरलेस सेक्शनमध्ये काम केलेलं आहे योग्य जागी योग्य माणूस हवा मी क्नट हॉकलँड आणि टॉरस्टेन राबीला पत्र टाकतो '

'तुझी त्यांची ओळख आहे ?

'होय. क्नटची आणि माझी ओळख १९४४ साली इंग्लंडमध्ये झाली अॅटम बॉम्ब हस्तगत करण्यासाठी जर्मनीनं आकाशपाताळ एक केलं त्यावेळी त्याच्याविरुद्ध

उभारलेल्या पॅराशूट ॲक्शनमध्ये त्यानं जी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली, त्याबद्दल त्याला गौरवपर पदक देण्यात आलं उत्तम वायरलेस ऑपरेटर म्हणूनच त्यानं काम केलं गेस्टापोंनी त्याला पकडण्यात जवळजवळ यश मिळवलं होतं एका प्रसूतिगृहात त्यानं गुप्त वायरलेस स्टेशन बसवलं होतं नाझी अधिकाऱ्यांना त्याचा सुगावा लागल्यावर तो सर्वांसमक्ष त्यांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला एका जुन्या इंग्लिश किल्ल्यात आमची गाठ पडली भूमिगत राहून शंभरएक प्रसारण केन्द्र जर्मनव्याप्त नॉर्वेत सुरू करण्याची जमवाजमव तो करीत होता

'मी नुकतंच पॅराशूटचं शिक्षण घेतलं होतं आम्ही दोघं गुप्तपणे जर्मन तळानजिक उतरणार होतो, तेवढ्यात रशियन सैन्यानं त्या भागाचा ताबा घेतला मला पुढे फिनमार्कला पाठवण्यात आलं तिथे माझी अन् टॉरस्टेनची गाठ पडली निळ्या डोळ्यांचा आणि हसतमुख चेहेऱ्याचा टॉरस्टेन पर्वतावर एका झोपडीत राहत होता तोही पळून आला होता त्यानंही नॉर्वेतून दहा महिने वायरलेस सेटवरून रोजच्या रोज इंग्लंडला संदेश पाठवले होते अखेर जर्मनांनी माघार घेतली आणि त्याची कामगिरी समाप्त झाली मी पैज मारून सांगतो की क्नट आणि टॉरस्टेन घरी बसून कंटाळले असतील आणि आपल्या मोहिमेत आनंदानं सामील होतील '

'मग पत्र टाकच, हर्मन म्हणाला,

म्हणून मी पत्र टाकली एरिक, क्नट आणि टॉरस्टेनला कुणालाही खास अशी गळ घातलीच नाही

" लाकडी तराफ्यावरून पॅसिफिक ओलांडणार आहे. दक्षिण सागरातील बेटांवर पेरूहून प्रथम लोक गेले या माझ्या सिद्धांताच्या बळकटीसाठी तुम्ही येणार का? पेरूपर्यंत आणि पुढे त्या बेटांचा मोफत प्रवास, याखेरीज मी कसलंच आश्वासन देऊ शकत नाही सफरीमध्ये तुमच्या तांत्रिक ज्ञानाचा खूप उपयोग होईल उत्तर त्वरित पाठवा "

दुसऱ्याच दिवशी टॉरस्टेनची तार आली 'येत आहे, टॉरस्टेन' बस्स् !

बाकीच्या दोघांनीही मान्यता कळविली

सहाव्या माणसाची निवड करताना हा का तो असं फार झालं दर खेपेला कांहीतरी अडथळा यायचा

मी आणि हर्मन वस्तू गोळा करण्यामागे जोरात लागलो होतो प्रवासांत आम्ही कच्चं मास किंवा सुकलेले बटाटे खाणार नव्हतो, कारण पूर्वी आम्हीच इंडियन्स होतो ही गोष्ट सिद्ध करायची नव्हती आम्हाला इन्का तराफ्याचा दर्जा आणि कामगिरी बघायची होती समुद्रात तो किती टिकाव धरतो आणि त्यावर सामान किती राहू शकतं ! आमच्यासकट पॉलिनेशियापर्यन्त तो सुखरूप जाणार का नाही, हा प्रश्न होता वाटेत मासे मिळू शकणार होते, तसंच पावसाचं पाणी मिळेल का ? जुन्या काळचे इंडियन लोक त्यांच्या भरवशावर समुद्रात तराफे लोटत असतील का ? युद्धात आम्हाला साध्या आणि किमान आहाराची सवय झाली होती तशीच व्यवस्था आम्ही करणार होतो

त्याच सुमारास वॉशिंग्टनमध्ये नॉर्वे मिलिटरी पलटणीत एक नवा साहाय्यक दाखल झाला फिनमार्कला असताना मी त्याच्या कंपनीत दोन क्रमांकाचे अधिकाराच्या जागेवर होतो रानटी स्वभावाच्या शत्रूवर तुटून पडून वाटेल त्या अडचणीवर मात करण्याची त्याला आवड होती जॉर्न रॉर होल्ट म्हणजे नुसती आग होती अशा व्यक्तिरेखा दुर्मिळ एक प्रश्न सुटल्यावर दुसरा त्याच्यासमोर उभा नसला तर तो अतिशय अस्वस्थ होई

मी त्याला पत्र लिहून सगळी परिस्थिती कळवली अमेरिकन आर्मीच्या पुरवठा विभागात कोणाची ओळख निघते का हे त्याला बघायला सांगितलं इतर नव्या शोधाप्रमाणेच मिलिटरीनं युद्धभूमीवर उपयोगात आणण्यासाठी नवे अन्नपदार्थ निवडले होते त्यांचा प्रयोग आम्ही मोहिमेत करू शकणार होतो

दोन दिवसांनी जॉर्नचा वॉशिंग्टनहून फोन आला अमेरिकन युद्धखात्याच्या संबधित विभागाला मोहिमेची नेमकी माहिती हवी होती

हर्मन आणि मी पहिल्या गाडीनं वॉशिंग्टनला गेलो

जॉर्न त्याच्या कार्यालयातच सापडला

मला वाटतं सगळं काही जमू शकेल !' तो म्हणाला, ' एका कर्नलकडून आपण पत्र घेतलं म्हणजे आपल्याला त्याची गाठ घेता येईल '

कर्नल ओटो मुंदे–कास यांना आमचं काम

समजल्यावर मोठ्या आनंदानं त्यांनी पत्र द्यायचं मान्य केलं

दुसऱ्या दिवशी आम्ही रीतसर कागदपत्र घेण्यासाठी गेलो तो म्हणाला, 'मी स्वतःच येणं चांगलं' त्याच्याच गाडीतून आम्ही जगातल्या सर्वांत मोठ्या (लांबच लांब) पेंटॅगॉन इमारतीकडे रवाना झालो तिथे युद्धखात्याची सर्व कार्यालये होती तीस हजार कारकून तिथे लेखण्या झिजवत होते, एकूण पसारा सोळा मैलाचा तिथेच वरिष्ठ अधिकाऱ्याच्या उपस्थितीत आमची 'तराफा कॉन्फरन्स' भरणार होती हर्मनला आणि मला त्यापूर्वी किंवा नतरही आमचा छोटा तराफा त्यावेळइतका केविलवाणा वाटला नाही

असंख्य व्हरांड्यांतून पायपीट झाल्यावर आम्ही हव्या त्या हॉलमध्ये पोचलो लगेच गोल टेबलाभोवती आमच्यासह नव्या कोऱ्या युनिफॉर्मसची बैठक जमली

भारदस्त व्यक्तिमत्व असलेल्या मुख्य अधिकाऱ्याला प्रथम लक्षात येईना की आमच्या लाकडी तराफ्याचा अमेरिकन युद्धखात्याशी सबंध काय ? पण कर्नलच्या नीट विचार करून व्यक्त झालेल्या शब्द–चातुर्यामुळे आणि चौफेर प्रश्नांच्या सरबत्तीला तोंड देण्यात यशस्वी झाल्यामुळे पारडं हळूहळू आमच्या बाजूला झुकलं एअर मटेरियल कमांडकडून मिळालेल्या पत्राचाही उपयोग झाला शेवटी त्या अधिकाऱ्यानं योग्य त्या लोकांना आम्हाला मदत देण्याची सूचना केली आणि तो हॉलबाहेर पडला जाताना शुभेच्छा व्यक्त करायला तो विसरला नाही तो निघून गेल्यावर एक तरुण कॅप्टन माझ्या कानात कुजबुजला

'तुम्हाला काय हवं ते मिळणार, काळजीच करू नका तुमचं एक–लहानसं का होईना–मिलिटरी ऑपरेशनच आहे शांतता काळातील आमचं रूटीन त्यामुळे थोडं बदलेल शिवाय साधनसामुग्रीची शास्त्रोक्त तपासणी घ्यायची ही चांगली संधी आहे '

कर्नल लुईस याच्या उपस्थितीत प्रयोगशाळेमध्ये ताबडतोब मीटिंग बोलावण्यात आली हर्मन आणि मला गाडीनं तिथे नेण्यात आलं

भव्य शरीरयष्टीचा कर्नल लुईस खिलाडू वृत्तीचा होता प्रयोगशाळेच्या निरनिराळ्या खाते–प्रमुखांना त्यानं लगेच बोलावून घेतलं शिधा, उष्म्यापासून बचाव करणारी मलम, झोपायच्या खोळी इत्यादि असंख्य वस्तू त्या लोकांनीच सुचवल्या आम्हाला त्या समक्ष दाखवल्याही प्रायमस स्टोव्ह, ओल्या झाल्या तरी पेटणाऱ्या काड्या, अन्नाची पुडकी, वॉटर बॅग्ज, रबर बॅग्ज, खास बूट, तरंगता चाकू, स्वयपाकाची भांडी–मोहिमेत उपयोगी पडतील अशा सर्व काही वस्तू

मी हर्मनकडे पाहिलं लहान मूल आईवडलांबरोबर गोळ्या–चॉकलेटस्च्या दुकानांवरून जाताना ज्या अपेक्षेनं बघतं तसाच चेहेरा त्यानं केला होता उच कर्नल प्रात्यक्षिक करून दाखवत होता संपूर्ण चक्कर मारून झाल्यावर कारकुनांनी गरजेच्या सर्व वस्तूंची, अंदाजे किती लागतील यासह, यादी केली युद्ध जिंकल्याच्या अविर्भावात मला हॉटेलात परत जायची उत्कंठा लागली होती सगळं शांततेत आणि सुलभपणे पार पडलं की ! तेवढ्यात कर्नल म्हणाला

'ठीक आपण आता साहेबाची गाठ घेऊ. या वस्तू तुम्हाला द्यायच्या का नाहीत हे तेच ठरवतील '

माझ्यातलं त्राणच नष्ट झालं पुन्हा एकदा तीच रेकॉर्ड लावावी लागणार ते साहेब कसल्या प्रकारचे होते देव जाणे

ते होते लहानसरच मला ते उत्साही आणि उत्सुक वाटले आपल्या निळ्या डोळ्यांनी त्यांनी आमची 'पाहणी' केली आम्ही त्यांच्या समोर बसलो

'अच्छा, मग या लोकांना काय हवय ? ' त्यानं कर्नल लुईसला तीक्ष्ण शब्दात विचारलं माझ्यावरची नजर त्यानं मुळीच बाजूला केली नाही

'काही किरकोळ गोष्टी', लुईसनं लगेच सांगितलं त्यानं थोडक्यात सर्व माहिती दिली प्रमुखानं थंडपणे सगळं ऐकलं

'आणि त्याच्या बदल्यात हे काय देणार ?' कसलाही परिणाम झाल्याचं न दाखवता त्यांनी विचारलं

हां, आपल्या नव्या गोष्टीबाबत ते अभिप्राय देऊ शकतील,' विजयी हास्य फेकत कर्नल म्हणाला, 'वाईट परिस्थितीत त्याचा कितपत उपयोग होतो हे आपल्याला कळेल,'

माझ्यावरची नजर ढळू न देता तो अधिकारी थंडपणे म्हणाला, 'हे आपल्याला काही देऊ शकतील

असं वाटत नाही मला खोल बुडत चालल्याचा भास झाला

खोलीत स्मशान–शांतता पसरली कोणीच काही बोलेना कर्नल कॉलरशी चाळा करू लागला

'परंतु,' अधिकाऱ्याच्या या शब्दानं आमची आशा पुन्हा पालवली त्याचे डोळे चमकत होते

'धैर्य आणि वाटेल त्या परिस्थितीला तोंड द्यायची तयारी याही काही कमी महत्त्वाच्या गोष्टी नाहीत कर्नल लुईस, यांना हवं ते द्यायला हरकत नाही !'

आम्हाला घरी नेऊन सोडणाऱ्या गाडीत मी हर्षानं बधिर होऊन बसलो होतो शेजारी बसलेला हर्मन एकदम स्वतःशी हसायलाच लागला

'तुझ्यावर खूप ताण पडला का ?'

'नाही,' तो निर्लज्जपणे म्हणाला 'पण मी विचार करतोय्––आपल्याला मिळणाऱ्या एकूण वस्तू-मधे ६८४ अननसाच्या पेट्या आहेत, माझी ती आवडती डिश् आहे ना !'

शेकडो गोष्टी उरकायच्या होत्या आणि त्याही एकदमच सर्व साठा एकत्र करून सहा जणांना पेरूच्या किनाऱ्यावर लाकडी तराफ्यासह हजर राहायचं होतं आमच्या हातात, फक्त तीन महिने होते आणि अल्लाउद्दीनचा 'जादु–ई चिराग' काही जवळ नव्हता

मिलिटरी अधिकाऱ्याचं ओळखपत्र घेऊन आम्ही न्यूयॉर्कला रवाना झालो तिथे कोलंबिया विद्यापीठात प्रोफेसर बेहरे यांची गाठ घेतली युद्धखात्याच्या भौगोलिक संशोधन कमिटीचे ते मुख्य होते त्यांच्या शब्दामुळे हर्मनला शास्त्रीय मोजमापासाठी बहुमोल उपकरण आणि अन्य साहित्य मिळालं

नंतर वॉशिंग्टनला जाऊन आम्ही ॲडमिरल ग्लोव्हर यांची गाठ घेतली पॅसिफिकचे चालू नकाशे त्यांच्याकडून मिळाले आम्ही ते प्रत्यक्ष तपासून पाहणार होतो

आमच्या मोहिमेची चक्रं जलद गतीनं फिरू लागली वॉशिंग्टनमधे ब्रिटिश मिलिटरी मिशनच्या कार्यालयात कर्नल ल्युम्सडनन त्यावर एक चर्चा आयोजित केली 'संभाव्य अडचणी आणि फलनिष्पत्ती' हा विषय होता आम्हाला तिथे अनेक मौलिक सल्ले मिळाले त्याशिवाय तराफा–मोहिमेत वापरण्यासाठी इंग्लंडहून भेटी दाखल आलेल्या खूपच वस्तूही मिळाल्या एका उत्साही मेडिकल ऑफिसरनं नवीनच निर्माण झालेल्या रहस्यमय 'शार्क पावडर'चा पुरस्कार केला

'शार्क माशाचा उपद्रव होऊ लागला तर पाण्यात ती पावडर टाकायची, म्हणजे मासे ताबडतोब पळून जातील,' त्यानं सांगितलं

'सर,' मी नम्रपणे विचारलं, 'या पावडरवर आम्ही विश्वासून राहायचं ना ?'

'त्याचं असं आहे,' तो इंग्लिश सद्गृहस्थ मदस्मित करून म्हणाला, 'की आम्हाला खरं म्हणजे तेच तर बघायचय्'

जेंव्हा वेळ कमी पडतो तेव्हा रेल्वेच्या जागी विमान आणि पायी जाण्याऐवजी मोटार अशी प्रगती नाईलाजास्तव होते पाण्यासारखा पैसा खर्च होतो तरीही त्याचं काही वाटेनासं होतं नॉर्वेला परत जाण्यासाठी राखून ठेवलेले पैसेही जेंव्हा उडाले तेव्हा आम्हाला मित्रांचं आणि न्यूयॉर्कमधल्या पाठिराख्यांचं दार ठोठवावं लागलं चमत्कारिक आणि नाउमेद करणारे त्यांचे प्रश्न ऐकून आम्ही हैराण झालो आमची सोयही लगेच होऊ शकली नाही आम्ही आमचा कार्यक्रम थोडा पुढे ढकलावा अशी विनंती करण्यात आली ती गोष्ट तर आता अशक्यच होती कारण निरनिराळ्या हालचाली वेगानं सुरू झाल्या होत्या थांबणं किंवा त्यांची गति रोखणं आमच्या हातात राहिलं नव्हतं मित्रांनी आम्हाला स्वतंत्रपणे प्रयत्न करण्याची 'मोकळीक' देऊन टाकली

आणि अशा रीतीनं आम्ही विजारीच्या मोकळ्या खिशात हात घालून रस्त्यावर आलो

'डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी,' हर्मन म्हणाला

'फारतर मार्च,' मी म्हणालो, 'पण त्यावेळी मात्र आपल्याला निघालंच पाहिजे'

सगळे मार्ग खुंटले असते तरी एक गोष्ट निश्चित होती विशिष्ट ध्येयानं आम्ही प्रवासाला प्रवृत्त झालो होतो आपल्याला किंवा मोहिमेला कोणी आलतू–फालतू समजावं असं आम्हाला वाटत नव्हतं

'तसल्या श्रीमंत आबटशौकिनांची मदत आपल्याला नकोच,' हर्मन म्हणाला

यावर आमचं एकमत झालं,

ग्रॅंटसाठी अर्ज करता आला असता, पण शंकास्पद सिद्धांतासाठी ती मिळणं दुरापास्तच होतं तरवा-

साठी तर आम्ही तराफ्यावरून निघणार होतो शेवटी आमच्या लक्षात आलं की वृत्तपत्रसंस्था किंवा खाजगी लोकाकडून अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता. त्यांना आणि विमाकंपन्याना आमची मोहीम आत्मघातकीच वाटत होती हां ! आम्ही सुखरूप परतलो तर गोष्ट वेगळी !

निराशजनक परिस्थिती होती आणि कित्येक दिवस किनारा दिसत नव्हता त्याच वेळी कर्नल मुंदे-कास पुन्हा पुढे आले

'तुम्ही अडचणीत आहात ना,' ते म्हणाले, 'सध्या मी तुम्हाला चेक देतो मोहिमेहून परत आल्यावर सावकाशीन मला पैसे परत द्या'

नतर बऱ्याच जणांनी त्यांचं अनुकरण केल आणि पुरेस कर्ज उभं राहिलं आता कोणापुढे हात पसरण्याची गरज राहिली नाही द अमेरिकेला जाऊन तराफा बांधायच्या तयारीला लागणं आवश्यक होत

जुन्या काळचे तराफे बालसा लाकडापासून बनवलेले असत ओले नसतील तर बुचापेक्षाही ते हलके असतात पेरूमधे बालसा वृक्ष वाढतात, पण अँडीजच्या कक्षेबाहेरील पर्वतांवर म्हणून इन्का इडियन किनाऱ्याकिनाऱ्यान इक्वाडोरपर्यंत जात आणि तिथेच मोठमोठे लाकडी ओंडके पॅसिफिकमधे टाकत आम्हालाही अगदी तेच करायच होत

त्या काळच्या प्रवासातील अडचणी आजच्याहून भिन्न होत्या आज गाड्या आहेत, विमान आहेत पण बरोबर नाना प्रकारच सामान भरलेल्या पेट्या घेऊन सरहद्दी ओलाडताना तिथल्या रक्षकांकडून त्रास होण्याचा संभव नाकारता येत नव्हता त्या तपासण्या, वजन करणे, अर्ज भरणे, त्यातून झाली तर सुखरूप सुटका 'छे!' हर्मन म्हणाला 'आपण रीतसर ओळखपत्र बरोबर घेऊ'

एका ओळखीच्या वृत्तपत्र प्रतिनिधीसह आम्ही सयुक्त राष्ट्रांच्या असेंब्लीत गेलो निरनिराळ्या देशांचे लोक तिथे बाकांवर एकत्र बसलेले पाहून आम्ही भारावून गेलो काळ्या केसाच्या रशियन गृहस्थाच भाषण सर्वजण शांतपणे ऐकून घेत होते मागच्या भिंतीवर जगाचा प्रचड नकाशा होता

नतर आमच्या मित्रान पेरूच्या आणि इक्वाडोरच्या प्रतिनिधींना गाठल त्या दोघांनी माझी उपपत्ती आणि महासागर ओलांडायची मनीषा उत्सुकतेन ऐकून घेतली त्यांच्याच देशाहून लोक प्रथम द सागरीय बेटावर गेले आणि तिथे वसाहत केली, ही गोष्ट त्याना विशेष वाटली त्यानी सरकारतर्फे योग्य ती मदत देण्याच आश्वासन दिल चिलीच्या डॉ बेंजामिन कोहेन यांनी आम्हाला पेरूच्या अध्यक्षांचे नावे पत्र लिहून दिलं ते स्वत प्राचीन काळच्या लोकांचे अभ्यासक होते त्याचवेळी नॉर्वेचे राजदूत विल्हेम व्हॉन मुन्दे भेटले पुढच्या काळात त्यानी दिलेल्या अमूल्य पाठिंब्याचा फारच उपयोग झाला

आम्ही दोघ विमानान द अमेरिकेला निघालो चार इंजिनांची घरघर सुरू झाल्यावर खोल आरामखुर्चीत पाय पसरून स्वस्थपणे बसलो खूपच शीण आला होता तरीही मोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे सपल्यामुळे मन हलक झालं होत तो आनद अवर्णनीय होता आम्ही आता प्रत्यक्ष धाडसाला सामोरे जात होतो

चार

# बालसा लाकडाच्या शोधात

इक्वेटर ओलांडल्यावर विमान दुधाळ पांढऱ्या ढगातून खाली झुकल त्यावेळपर्यंन्त ढगाचा बर्फासारखा थर विमानाखाली सर्वत्र पसरला होता खिडकीतून थंडगार बाष्प अंगाला जाणवत होत नतर एकदम जंगलाच हिरवगार छत समोरून धावू लागल द अमेरिकेच इक्वेडोर प्रजासत्ताक मागे पडल आणि विमान 'ग्वायाकिल' तळावर उतरल

आदल्या दिवशी अगात जाकिट, कोट त्यावर ओव्हरकोट याच्या आवरणात आम्ही बुडालो होतो त्या नवीन वातावरणात मनस्वी उकाडा होता शर्ट घामान पाठीला चिकटलेच होते आम्ही कपडे बदलले कस्टम आणि इमिग्रंट अधिकाऱ्याना तोड देऊन एक-हॉटेल गाठल गावातल सगळ्यात चांगल आणि एक मेव आधी बाथरूममध्ये शिरून गार पाण्याच्या शॉवर खाली आडवे पडलो

बालसा वृक्ष उगवतात त्या देशाला आम्ही येऊन पोचलो होतो तराफा बाधण्यासाठी ते लाकूड खरेदी करायच होत

पहिला दिवस तिथल्या चलनाची आकडेमोड करण्यात आणि 'हॉटेलला परत कस जायच' हे विचारण्याइतपत मोडक तोडकं स्पॅनिश शिकण्यात घालवला

दुसऱ्या दिवशी बालसाच्या शोधासाठी बाहेर पडायच ठरवल

पण आम्हाला हवे तसे लाबच लांब ओडके मात्र तिथे मिळू शकले नाहीत बारिक सारिक ओंड बऱ्याच प्रमाणात उपलब्ध होती युद्धकाळात हजारो वृक्ष उन्मळले होते आणि विमानाच्या कारखान्यात ते जहाजा-वरून रवाना झाले होते जंगलाच्या आत अगदी घनदाट भागात–हवे तसे मोठे ओडके मिळू शकतील अस आम्हाला कळल

'म्हणजे आपल्याला आत जाऊन स्वतःच ते तोडायला पाहिजेत,' आम्ही सुस्कारा सोडला

'अशक्य,' काही जाणकार म्हणाले, 'पावसाला नुकतीच सुरुवात झालेली आहे पुराचं पाणी आणि खोल चिखल यामुळे सगळे रस्ते बंद झालेले आहेत बालसा लाकडासाठी तुम्ही अजून सहा महिन्यांनी इक्वाडोरला या तोवर ते रस्ते सुकलेले असतील'

इक्वाडोरमधला बालसा लाकडाचा सर्वात मोठा व्यापारी 'डॉन गुस्ताव्ह व्हॉन बुचवाल्ड' याला आम्ही भेटलो त्यानं देशातल्या सगळ्या गिरण्यात फोनवरून चौकशी केली, आणि काही प्रतिनिधींना शोधासाठी समक्ष पाठवलं, पण हवे तसे ओंडके मिळू शकत नव्हते त्याच्या स्वतःच्या साठ्यात दोन मोठे ओंडके होते पण तेवढ्यानं आमचं काम भागत नव्हतं

'माझ्या भावाच्या मालकीची बरीच बालसा झाडं आहेत,' डॉन गुस्ताव्ह म्हणाला, 'त्याचं नाव डॉन फेडरिको तो 'क्विवेडो'मध्ये राहतो जंगलातलंच ते छोटं गाव आहे पावसाळ्यानंतर त्याला भेटलात तर तो तुमचं काम आनंदानं करील सध्या पावसामुळे तिथे जाताच येणार नाही

गुस्ताव्हच्या मते लगेच काहीही होण्यासारखं नव्हतं, म्हणजे इतर कोणताही तज्ञ तेच म्हणणार यात शंका नव्हती आम्ही ग्वायाकिलला हात हलवत परतलो अजून काही महिने तसेच वाया जाणार आणि त्यावेळी खूप उशीर झालेला असणार

'वेळ तर अगदी थोडा आहे,' हर्मन म्हणाला

'आणि बालसा तर मिळायलाच पाहिजे,' मी त्यावर म्हणालो, 'डिझाईनप्रमाणे तराफा बनवला नाही तर जिवंत परतण्याची शाश्वती नाही'

हॉटेलमध्ये आम्हाला छोटासा नकाशा मिळाला त्यात पॅसिफिकपासून उत्तुंग अँडीजच्या पायथ्यापर्यंत पसरलेली हिरवी जंगलं आणि करडे पर्वत दिसत होते त्या शेकडो मैलांच्या परिसरात वस्ती अगदीच तुरळक होती किनाऱ्यापासून आत क्विवेडोपर्यंत लाकडासाठी जाणं केवळ अशक्य होतं, पण अँडीजच्या बर्फापासून सरळ खोल जंगलात शिरलं तर? एवढीच एकमेव शक्यता आम्हाला दिसत होती

विमानतळावर एक लहानसं कार्गो विमान होतं त्या विलक्षण देशाच्या राजधानीला — क्विटोला त्यातून जायचं ठरलं अँडीजमध्ये समुद्रसपाटीपासून ९००० फूटावर ते होतं सामानासह आम्ही अखेर निघालो खाली घनदाट जंगलं आणि चकाकणाऱ्या नद्या दिसत होत्या थोड्या वेळानंतर धुक्यातून निळ्या आकाशात उंच गेलेली अँडीजची शिखरं डोकावू लागली विमान जगातल्या एका वैशिष्ट्यपूर्ण राजधानीला टेकलं सर्वत्र बर्फच बर्फ

क्विटोचे दीड लाख नागरिक मिश्र जातीय किंवा शुद्ध इंडियन आहेत कोलंबसला अमेरिकेचा शोध लागायच्या आधीपासून त्याची ती राजधानी जुन्या काळचे अवशेष, इमारती आणि कलावस्तूंचे संग्रहालय आजही तिथे आहे त्यावेळच्या संस्कृतीचा ठसा त्याच्यावर कायम असलेला दिसतो त्याची घरं बुटकी आणि विटांची असतात

मोठ्या टोप्या घातलेले लोक गाढवावर सामान लादून चाललेले दिसत होते बरेच जण कडक उन्हात भिंतीवर बसून चकाट्या पिटत होते मधूनच एखादुसरी मोटार धीम्या वेगानं, एकसारखा हॉर्न वाजवत उघड्यावाघड्या इंडियन मुलांमधून आणि गाढवांमधून रस्ता काढत होती एकूण वातावरण जादूनं भरल्यासारखं होतं एवढं निश्चित!

कार्गो विमानातला आमचा स्पॅनिश मित्र जोर्ज — त्याला सगळे वेडा वैमानिक म्हणत — मूळ क्विटोचा रहिवाशी होता त्याचं घर तिथलंच त्यानं आमची खूप तैनात राखली एक चांगलं हॉटेल बघून दिलं क्विटोच्या जंगलात जाण्याचे काही सोय होते का हे तो बघत होता काही वेळा आम्ही बरोबर हिंडलो, काहीवेळा तो एकटा रोज संध्याकाळी एका जुनाट कॅफेमध्ये आम्ही एकत्र येत असू जोर्ज प्रतिकूल बातम्याच घेऊन येत होता क्विवेडोला जायची कल्पना डोक्यातून काढून टाकावी असं शेवटी त्यानं सांगितलं पर्वतावर किंवा जंगलात आमच्याबरोबर येण्यासाठी एकही माणूस किंवा वाहन मिळू शकत नव्हतं भर पावसाळ्यात फसव्या चिखलाचा काय भरवसा! कोण उगीच आपला जीव धोक्यात घालणार! त्यात आदल्या वर्षीच दहा अमेरिकन इंजिनियर्सची तुकडी इक्वाडोरच्या पूर्व भागात विषारी बाण लागून ठार झाली होती अजूनही त्या भागातील जंगलात संपूर्ण

उघड्यान वावरणारे इंडियन्स धनुष्यबाणान शिकार करून जगत होते

'त्यातले काहीजण मुडकी तोडतात,' खोल आवाजात जोर्ज म्हणाला हर्मनवर त्याचा काहीच परिणाम झालेला दिसला नाही

'मी अतिशयोक्ति करतोय् अस तुम्हाला वाटत असेल,' तो पुढे बोलू लागला 'कायद्यान गुन्हा असला तरी सुकलेल्या मानवी मुडक्याची तिथे विक्री होते त्यावर अजूनही नियंत्रण प्रस्थापित झालेल नाही शत्रूचो डोकी उडवताना त्याना आसुरी आनद होतो आतली कवटी काढून घेऊन गरम वाळू त्या रिकाम्या भागात ते भरून ठेवतात मूळ आकार तसाच कायम राहतो, अगदी तोंडावरचे भावसुद्धा किनाऱ्यावर प्रवाशांकडून या 'पदार्था'ला भरपूर किंमत येते '

जोर्जन विजयी मुद्रा करून आमच्याकडे पाहिल त्याच दुपारी एका इसमान आम्हाला दोन मुडकी हजार सकरना (स्थानिक पैसे) विकत देऊ केल्याची गोष्ट त्याला ठाऊक नव्हती हल्ली त्यातही फसवणूक होते माकडाची डोकी माणसाची म्हणून विकली जातात पण आम्हाला दाखवलेली खरोखरच इंडियन माणसाची होती चेहऱ्यावरची रेघन् रेघ बोलकी होती ते पाहून माझ्या अंगावर शहाराच आला पर्वताच्या पश्चिमेकडे असले रानटी लोक अजूनही असतील का अस मी जोर्जला विचारल

काही सांगता येत नाही, तो म्हणाला 'समजा तुझा मित्र अचानक अदृष्य झाला आणि काही दिवसांनी त्याच डोक बाजारात आलेल दिसल तर तुला काय वाटेल ? माझ्या मित्राच्या बाबतीत एकदा तस झालेल आहे, माझ्याकडे मांजिरासारख बघत त्यान विचारल

'ती काय कथा आहे, साग पाहू,' बीफचा तुकडा सावकाश चघळत हर्मन मजेने म्हणाला

जोर्जन कथा सागायला सुरुवात केली तो पूर्वी बायकोसह जगलात राहात असे त्याचा एक मित्र काही वस्तूच्या बदली सोन विकायला तिथे नेमान येत असे एक दिवस जगलातच त्याला ठार करण्यात आल खुनी इसमाचा जोर्जन पाठलाग केला आणि त्याला गोळी घालायची धमकी दिली तो रानटी इसम मुडकी विकत असे मित्राच डोक परत मिळाल तर मारणार नाही अस जोर्जन सांगितल्यावर त्या माणसान लगेच ते काढून दिल प्रिय मित्राच डोक पाहून तो फारच अस्वस्थ झाला त्याच रद्दीत त्यान ते घरी नेल त्याची बायको तर ते बघून बेशुद्धच पडली पुढे जोर्जन ते पुरून टाकल

'मस्त खाना झाला,' विषय बदलण्यासाठी मी म्हणालो

मुक्कामाला जाईपर्यंत बरीच रात्र झाली पर्वतावरून थड वारे वाहू लागले होते

दुसऱ्या दिवशी आम्ही आमच्या देशाचे वकील ब्रिन यांच्या घरी गेलो मोठ्या बागेतल्या युकॅलिप्टसच्या झाडाखाली सर्वजण बोलत बसलो जगलातून किवेडोला जाण्याची आमच्या सुपीक डोक्यातली कल्पना ब्रिनला फारशी खटकली नाही, पण त्या भागात दरवडेखोरांचा सुळसुळाट होता पावसाळ्यानतर कायमचा बदोबस्त करण्यासाठी त्या भागात सैनिक पाठवावेत, अस वर्तमानपत्रातून सुचवण्यात आल होत म्हणून तसा धोका पत्करून जाण त्याच्या मते महामूर्खपणाच होत वाटाडे किंवा वाहतुकीची सोय होण कठिणच ! म्हणजे तराफाच काय पण अद्याप त्याच लाकूडही दूर जगलात होत तेवढ्यात मला एक कल्पना सुचली

काही न बोलता मी लगेच तिथल्या अमेरिकन मिलिटरी कार्यालयात गेलो मुख्य अधिकाऱ्याला परिस्थिती समजावून सांगितली आणि एक छोट विमान-किंवा निदान जीप तरी तात्पुरती आम्हाला देण्याची विनती केली आमच्या मोहिमेची वार्ता त्याच्यापर्यंत आधीच पोचली होती सुरुवातीला तो काहीच बोलेना पण निरुपाय झाल्यासारखी मान हलवून त्यान ड्रायव्हरसह जीप देण्याच अखेर मान्य केल

दुसऱ्या दिवशी पहाटे सव्वापाच वाजताच हॉटेलच्या दाराशी जीप हजर झाली एक इक्वेडोरियन कॅप्टन 'सेवेला रुजू आहे' अस जीपमधून उडी टाकून म्हणाला आम्ही तयारच होतो चिखल असो वा नसो आम्हाला किवेडोपर्यंत न्यायची जबाबदारी त्याच्यावर होती जीपमधे पेट्रोलचा भरपूर साठा घेतला होता, कारण वाटत ते मिळणार नव्हत आमचा नवा मित्र कॅप्टन अल्वारेझ बरोबर शस्त्रास्त्र घेऊन (चाकू वगैरे) आला होता आम्ही रोख पैसे देऊन लाकूड खरेदी

करणार होतो बरोबर एकूण सामान म्हणजे अन्नपदार्थ, खाकी कपडे, बऱ्यापकी कॅमेरा इ. होत संरक्षणाच्या दृष्टीने जवळ तसं काहीच नव्हतं मार्गात, ऐकल्याप्रमाणे चोरभय होतच म्हणून बिरन यांनी भरपूर गोळ्यासह एक पिस्तूल देऊन ठेवलं, गरज पडली तर हाताशी असाव म्हणून मावळत्या चंद्राच्या प्रकाशात जीप गावाबाहेर पडली रस्ता चढ उताराचा होता तो प्रदेश पर्वतमय होता वाळूची जमीन असल्यामुळे जीपच्या दृष्टीने रस्ता उत्तमच म्हणायचा म्हणून वेगही चांगलाच आला

लॅंटाकुगा या दक्षिणेकडील डोंगराळ खेड्यापर्यंत आम्ही मजल मारली खिडक्या नसलेली इंडियन घर शुभ्र परिसरात गर्दी करून उभी होती एका चौकाजवळ पाम वृक्षांच्या छायेत लहानस चर्च दिसत होत तिथूनच आम्ही पश्चिमेकडे वळलो हा मार्ग अँडीजच्या दऱ्याखोऱ्यातून जात असल्यामुळे जीपला एकसारखे गचके बसत होते मोहिमेत, अशा प्रकारचा प्रवासही करावा लागेल हे आमच्या स्वप्नातसुद्धा आल नव्हत तिथल इंडियन लोकांच जग अनोख होत तेथील स्थलकालाचे नियम अगदीच भिन्न होते वाटेत इंडियन लोकांची कुटुम्बच्या कुटुम्ब भेटत, म्हणजे दिसत त्या खेरीज बकऱ्यांचे कळप त्यांच्या पाठीवरच सामानसुमान लादलेल असायचं काही काही वेळा गाढवं व खेचराचे कळपही लागले

आम्ही जसजसे पुढे जाऊ लागलो, तसतशी इंडियन लोकांची स्पॅनिश बोली आम्हाला कळेनाशी झाली कॅप्टन अॅगर्टो अल्वारेझ त्या भागात राहात असूनही त्यांचीही तीच स्थिती होती वाळू आणि मातीच्या झोपड्या मागे पडल्या, आणि डोंगरावर झाडांच्या फांद्या आणि गवतापासून बनवलेल्या झोपड्या अधून-मधून दिसू लागल्या उन्हात रापलेले, मुरकुतलेले लोक त्याच भूमीत जन्मलेले आणि वाढलेले एकूण कपडे व चीजवस्तु कमीच अंगात किरकोळ, पण चिवट. बोलण्यापेक्षा हसणंच फार नव्या जगाची त्यांना चाहूलही लागलेली नव्हती

उन्हात चमकणाऱ्या चढावरून जाताना एकही झाडझुडूप आढळल नाही उतारावर मात्र मैलन्मैल पसरलेल्या वाळूतुन क्वचित निवडुंगाची झाड उगवलेली होती दूरवर अँडीजची बर्फाच्छादित शिखर दिसत होती वातावरणात हळूहळू बदल होऊ लागला थंड वारे अंगाला झोंबू लागले जंगलातील उष्म्याच्या भीतीमुळे आमच्या अंगात पातळसर शर्टच होते थंडीपासून बचाव करण्यासाठी शेवटी जीपचा वेग कमी करावा लागला

आमची जीप सावकाशीने जात होती झाडीतून पर्वताच्या कडेने जाताना बऱ्याच वेळा मार्ग शोधून काढावा लागत होता पुढे तो रस्ताही दिसेनासा झाला स्टियरिंग व्हील हातात घेऊन कौशल्याने गाडी चालवणाऱ्या अॅगर्टोवर आमचा भरवसा होता अचानक, वाऱ्याचा भयानक झोत अंगावर आला आम्ही आता अँडीज पर्वतश्रेणीच्या अगदी अखेरच्या (बाह्य) भागात पोचलो होतो खाली १२००० फुटावर जंगलच जंगल होत, तळ अजिबात दिसतच नव्हत. पहाड तिथपर्यंत सरळ खाली गेले होते तिथून खूप उताराचा रस्ता मात्र होता जसजसे खाली जाऊ लागलो तसतशी हवा उबदार होऊ लागली त्यात जंगलाचा गंधही मिसळू लागला आम्ही ढगातून पार झालो

आणि पाऊस सुरू झालाच आधी रिमझिम पण नंतर झोडपायलाच लागला जीपवर पाण्याचा ताड्ताड आवाज येत होता सर्व बाजूनी खडकातून पाणी वाहत येत होत आम्ही जवळजवळ त्यात तरंगतच चाललो होतो म्हणा ना ! झाडी वाढू लागली, आणि मोठमोठी पानं जीपच्या बाजूला घासू लागली ते आवाज आणि पाण्याचे फटकारे झाडांची उंची हळूहळ वाढत होती उतार कमी कमी होत गेला आणि चिकणमातीच्या चिखलयुक्त रस्त्यावरून गाडी मार्ग काढू लागली आम्ही अखेर जंगलात शिरलोच हवेत ओलसरपणा आणि उब होती निरनिराळ्या सुवासानी वातावरण ' जड ' झाल होत

पामच्या झावळ्यांची छत असलेल्या झोपड्या लागल्या तेव्हा अंधार चांगलाच झाला होता कोरड्या जागेत रात्र काढण्यासाठी आम्ही जीपबाहेर पडलो डासांच्या थव्यानी पुरत हैराण केल, दुसऱ्या दिवशी मात्र ते गडप झाले पुन्हा प्रवास सुरू आम्ही उतारावरून इतके खाली आलो होतो की जवळजवळ तळच गाठला

होता चिखल त्रासदायक होऊ लागला पण त्यान आमचा मार्ग रोखला नाही हे नशीब सारी चोर डाकू मंडळीसुद्धा कुठे गेली होती कोणास ठाऊक !

जंगलातून वाहणाऱ्या चिखलमीश्रीत नदीपाशी जीपन माघार घेतली म्हणजे ती फसलीच पुढही जाईना, मागेही होता येईना उंचवट्यावर एक झोपडी दिसत होती काही इंडियन लोक कसल तरी कातड कमावत बसले होते कुत्रा आणि कोंबड्या उन्हामध्ये मजेत उड्या मारत होत्या जीप एकदाची बाहेर आली तिथल्या एकान स्पॅनिशमध्ये सांगितल की नदीच नाव पॅलॅंक आणि किवेडो नदीपलीकडेच होत नदीवर पूल नव्हता पण तराफ्यावरून त्यांनी आम्हाला जीपसह पलिकडे नेण्याची तयारी दाखविली पाण्याला वेगही होता आणि खोलीही आमच्या समोरच तराफा बांधण्यात आला धडधडत्या अन्तःकरणान आम्ही जीप त्यावर चढवली पाण्यात तराफा लोटल्यावर काय होणार ? पण आमच्यासह तो सुरक्षितपणे तरगू लागला चार जण शिवाय बरोबर होते

बालसा ?' मी आणि हर्मनन एकदमच विचारल

बालसाच,' त्यांच्यातला एकजण म्हणाला उगीचच त्यानं बालसच्या ओंडक्याला लाथ मारली प्रवाहानं आम्हाला घेरल आणि तो खाली नेऊ लागला हातातल्या लाब बाबूंन ते लोक वेग रोखत होते हीच आमची आणि बालसा वृक्षाची पहिली भेट, आणि त्याच्या तराफ्यावरून पहिलो सहल पलिकडच्या काठाला सुरक्षितपणे लागलो आणि विजयानंदात किवेडोकडे निघालो लाकडी घराच्या दोन ओळीमुळे मध्ये रस्ता तयार झाला होता पाम-वृक्षांवर गिधाड निश्चिंतपणे बसलेली दिसल, हीच मुक्कामाची जागा हातातल काम बाजूला ठेवून काळसर करड्या रंगाचो माणसं, उघडीनागडी पोर आमच्याकडे कुतूहलान पाहात होती खिडक्यादारातून त्यांचे विस्मयजनक चेहरे दिसत होते जीपभोवती सर्वांनी गर्दी केली आम्ही आमच सामान घट्ट पकडून ठेवल अॅमर्टो स्टिअरिंग सोडीना आणि एक टायर पंक्चर झाल्यामुळे त्या बाजूला जीप कलली किवेडो आल होत लोकांच्या स्वागताला आता सामोर जाण भाग होत

डॉन फेडरिकोची शेती नदीपासून बरीच दूर होती आम्ही जीप तशीच रामटली आंब्याच्या झाडामधून डॉनच्या आधारापर्यंत गेलो आम्हा तिघांना पाहून म्हातारा डॉन पुढे झाला त्याच्या मागोमाग त्याचा लहान भाचा अॅंजलोसुद्धा जवळ आला आम्ही डॉन गुस्तावचा निरोप त्याला दिला घरात गेलो आणि पुन्हा पावसाला सुरवात झाली जंगली फळांचा समाचार घेताना मी आमच्या येण्याच प्रयोजन सांगितल खास मेजवानीची सिद्धता चालू होती बाहेरील पाण्याचे ओहोळ आणि छतावरचा टपटप् आवाज सुखद भावना निर्माण करीत होते शितोडे खिडकीतून आत येत होते

फेडरिकोच्या आनंदाला मूलासारख उधाण आल होत लहानपणापासून बालसाचा तराफा त्याला परिचित होता पन्नास वर्षांपूर्वी, तो समुद्रकिनाऱ्याला लागून राहत होता, त्या काळीसुद्धा पेरहून इंडियन लोक मोठमोठ्या बालसा—तराफ्यावरून मासे विकायला येत असत तराफ्याच्या मधोमध उभारलेल्या बांबूच्या केबिनमधून दोन टन सुकलेले मासे सहज आणता येत किंवा बायका-मुलं, कुत्री-कोंबड्या यांनी भरभरून तराफे येत 'पण आता पाऊस—पाण्यात तेवढ्या मोठ-मोठ्या बालसा वृक्षापर्यंत जाण अशक्य आहे,' अस तो म्हणाला अगदी घोड्यावरून सुद्धा चिखलच तसा होता पण त्यानं शक्य ते सर्व प्रयत्न करण्याच आश्वासन दिल त्याच्या घराजवळ एखाद—दुसर मोठ झाड मिळू शकेल अस त्याला वाटल आम्हाला काही फार लाकूड नकोच होत

सध्याकाळ उलटल्यावर पाऊस थोडा वेळ थांबला आम्ही आंब्याच्या झाडापर्यंत पाय मोकळे करण्या-साठी बाहेर पडलो चालता चालता हर्मनच्या डोक्यावर फांदीवरून काहीतरी लोंबल्यासारख दिसल छोट्या एंजलोन काठीचा जोरदार फटका वर मारला आणि पाहिल तर एक लांबलचक साप जमिनीवर पडला दुसऱ्याच क्षणी आकडीच्या काठीन त्याला दाबण्यात आल आणि त्याच डोक त्यान चिरडून टाकल

'मॉर्टल्, एंजलो म्हणाला सापाच्या तोंडातले दोन वाकडे विषारी दात त्यान दाखवल्यावर आम्हाला घामच फुटला

आम्हाला आता जिकडे तिकडे सापच दिसायला लागले आम्ही घराकडे वळलो फेडरिकोने मृत साप काठीला गुंडाळून घेतला हर्मन त्याचं कातडी काढायला बसला डॉन फेडरिको विषारी प्राण्यांच्या गमती-जमती सांगू लागला तेवढ्यात कसला तरी आवाज झाला बघितलं तर दोन भल्या मोठ्या विंचवांची लढत सुरू झाली होती प्रत्येकाची नांगी आपल्या बोटाएवढी मोठी होती त्यांच्यात जीवन-मृत्यूचा झगडा चालू होता आम्हाला तर फार भीती वाटली

'तिकडे चालू दे,' फेडरिको हसून म्हणाला 'एक जण दुसऱ्याला ठार करील आणि आम्हाला जिवंत राहिलेल्या विंचवाची शुरुळ नाहिशी होण्या-साठी गरज आहेच तुम्ही काळजी करू नका झोपताना मच्छरदाणी बिछान्याभोवती घट्ट बांधा आणि कपडे घालताना नेहमी झटकून घाला म्हणजे झालं मला आजवर असंख्य विंचू चावलेले आहेत आणि तरीही मी जिवंत आहे,' म्हातारा आम्हाला हसत होता

मला बऱ्यापैकी झोप लागली अधूनमधून उशीजवळ कसला आवाज झाला की विषारी प्राण्याच्या भीतीने दचकून जाग येई एवढंच

दुसऱ्या दिवशी आम्ही लवकर उठलो आणि बालसा वृक्षाच्या शोधार्थ बाहेर पडलो

'कपडे झटकून घेतलेले बरे,' ॲगर्टो असं म्हणत असतानाच त्याच्या शर्टाच्या एका बाहीतून विंचू खाली पडला आणि वेगानं भिंती लगतच्या एका भोकामध्ये अदृश्य झाला

सूर्योदयानंतर डॉन फेडरिकोनं सर्व दिशांना त्याची माणसं झाडाच्या तपासासाठी पाठवली अर्थात घोड्यां-वरून मी, डॉन आणि हर्मन एका दिशेला निघालो लवकरच मोकळ्या जागेत आलो त्या बाजूला एक जुना प्रचंड बालसा वृक्ष असल्याचं डॉनला आठवत होतं लवकरच तो सापडलाही इतर झाडांच्या तुलनेत तो उंच आकाशात गेला होता त्याचं खोड सुमारे तीन फूट रुंद होतं आम्ही त्याला नम्रपणे अभिवादन केलं त्याचं नाव 'कू' असं ठेवलं कुऱ्हाडी उचलल्या आणि झाडावर घाव घालायला सुरवात केली जंगलात त्याचे प्रतिध्वनी ऐकू येत होते पण जुनाट बालसा तोडणं महामुश्किल होत तिघांनाही घामाच्या धारा लागल्या, पण छे।

दुपार उलटल्यावर मात्र झाडाचा ताठा कमी झाला एका बाजूला ते धाड्कन् कोसळलं मोठ्या फांद्या आणि लहानसहान झाडं त्याखाली चिरडली गेली आम्ही फांद्या साफ करू लागलो एवढ्यात हर्मन कुऱ्हाड फेकून देऊन गुडघ्याला धरून नाचू लागला एक मोठी मुंगी त्याला कडाडून चावली होती पाया-खाली तो दाबलीही जाईना इतकी टणक होती

'कोंगो,' डॉन म्हणाला, 'हा प्राणी विंचवा-पेक्षाही वाईट पण सुदृढ माणसाला त्याचा त्रास जाणवत नाही'

हर्मनला ताप आलाच पण रोज आमच्याबरोबर घोड्यावरून जंगलात तो न चुकता येत राहिला आणखी बालसा झाडांची आवश्यकता होती डॉनच्या साथीदारांना एक-एक मोठ्या झाडाचा शोध लागत गेला आणि 'कू'च्या जोडीला केन, कामा, इलो, माऊरी, रा, रंगी, पपा, तरंगा, कुरा कुकरा आणि हिती या झाडांची भर पडली एकूण बारा भले मोठे वृक्ष त्यांची नावं पॉलिनेशियन दंतकथांमध्ये टिकीशी निगडित अशी होती, म्हणून आम्ही मुद्दामच ठेवलेली होती लाकडाचे ओंडके घोड्यावरून ओढून आणण्यात आले राहिलेले लाबलचक ओंडके डॉन फेडरिकोच्या ट्रॅक्टरमधून आम्ही घेऊन आलो सगळा साठा त्याच्या बंगल्यासमोर रचण्यात आला

त्या ओंडक्यातून चिकट द्रव वाहत होता लाकूड म्हणावं तसं हलकं बिलकुल नव्हतं एकेका तुकड्याचं वजन टनापर्यंत सहज असेल पाण्यावर त्यांचा तराफा कसा काय तरंगेल याची आम्हाला काळजी लागली सगळे ओंडके नदीच्या किनाऱ्याजवळ नेऊन, विशिष्ट वेलींनी एकत्र घट्ट बांधून नदीच्या प्रवाहात लोटून दिले पाणी जोरात उसळलं लाकडाचा पाण्यात जितका भाग बुडाला होता तेवढाच वरही होता जरुरीच्या वस्तू आणि मोहिमेमध्ये उपयोगी पडतील म्हणून बांबूच्या काठ्या आम्ही त्या नव्या तराफ्यावर चढवल्या मी, हर्मन आणि दोन जण त्यावर चढलो, तरीही तराफा स्थिर राहिला

किनारा सोडल्यावर आम्ही लवकरच प्रवाहात शिरलो आणि तराफ्यानं वेग चांगलाच घेतला

किनाऱ्याला डॉन आणि नव्यान ओळख झालेले लोक जोरजोरात हात हलवत होते बरोबरच्या दोन अनोळखी इंडियन लोकाना तराफा हाकण्याच चागल ज्ञान होत त्याच्या भरवशावर आम्ही मोठ्या केळीच्या पानाखाली स्वस्थपणे पडून राहिलो आमचा प्रवास सुखरूपपणे चालू होता

नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर घनदाट जंगल दिसत होत पोपट आणि चित्रविचित्र पक्षी उडताना स्पष्टपणे दिसत होते पाण्याच्या पृष्ठभागावरही त्यांचा खेळ चालू होता थोड्या वेळान धुराचा वास येऊ लागला बाजून गवताची छत असलेल्या कित्येक झोपड्या दिसत होत्या त्यातली माणस किनाऱ्यावर जमून आमच्याकडे कुतूहलान पाहू लागली इंडियन, निग्रो आणि स्पॅनियर्ड जातीच मिश्रण त्यात होत किनाऱ्याला कित्येक होड्या, मोठ्या नौका बांधलेल्या होत्या

भूक लागल्यावर आम्ही दोन तराफा-चालकाना मोकळ केल आणि स्वत वल्हवू लागलो त्यांनी झटकन चिकणमातीची चूल बनवून विस्तव पेटवला त्यावर मासे आणि ब्रेड भाजले रोस्ट चिकन, अंडी आणि फळ अगोदरपासूनच तयार होती एव्हाना तराफा विलक्षण वेगान समुद्राकडे चालला होता उसळत्या पाण्याची किंवा लाटांच्या फटकाऱ्याची आम्हाला मुळीच चिंता नव्हती त्यामुळे उलट प्रवासाचा वेग वाढतच होता

अंधार झाला किनाऱ्यावरून रातकिडे आणि बेडकांच सगीत अन् त्यात डासांची गुणगुण ऐकू येऊ लागली एकामागून एक जगली मांजराचे आवाज त्या काळोखात अंगावर शहारे आणत होते अधूनमधून (खांचा झोपडीतून विस्तव दिसे क्वचित माणसाचे आवाज आणि कुत्र्याच भुकणही कानावर पडे अशा वातावरणात आम्ही त्यांच्या छत्राखाली कितीतरी वेळ बसून होतो नतर पाऊस सुरू झाला आणि आम्हाला गुंगीही आली त्यामुळे केळयाच्या पानांखाली आडवे झालो झोप चागलीच आली होती कमरेशी पिस्तुल सज्ज ठेवून आम्ही झोपेच्या आधीन झालो,

जाग आली तेव्हा बरच अतर कापल गेल होतं झोपड्याच आणि मळ्याच प्रमाण वाढल होत एका-मागून एक खेडी लागत होती लाकडाच्या मोठ्या खोडातून तयार केलेल्या अनेक होड्या आजूबाजूला हिंडत होत्या एका बालसाच्या छोट्या तराफ्यावर हिरव्या केळ्याचा प्रचड ढीग रचून एकजण नेत असताना दिसला

पॅलेंक नदीला रिओ ग्वायाज नदी येऊन मिळाल्यावर पाणी खूपच वाढल आता आम्ही चौघही तराफा चालवू लागलो ग्वायाकिलला उतरून हर्मन लाकडी ओडके तिथून पुढे स्टीमरमधून पेरुला नेणार होता त्या ठिकाणी त्याच्या मार्गदर्शनाखाली खास जुन्या इंडियन पद्धतीन तराफा बनवण्यात येणार होता अगदी मिळालेल्या वर्णनाबरहुकूम ठरल्याप्रमाणे तो कामाला लागला मी पेरूची राजधानी लिमा येथे जाण्यासाठी विमान पकडल तराफा बांधण्यासाठी सोयिस्कर अशी जागा निवडायची होती

पाच

# अखेरची धावपळ

पॅसिफिकच्या किनाऱ्याच्या बाजून आमचं विमान उचं निघालं एका बाजूला पेरूतले उघडे बोडके डोंगर आणि दुसरीकडे महासागराचं चकचकीत पाणी. याच ठिकाणाहून आम्ही तराफा समुद्रात लोटणार होतो खूप उंचावरूनही सागर अमर्याद दिसत होता पश्चिमेकडे लांबवर आकाश आणि पाणी एकत्र मिसळलेलं होतं एक पंचमांश पृथ्वीला वळसा घालून गेल्यानंतर लागेल तं. पॉलिनेशियाची जमीन ! छाती या विचारानं दडपल्यासारखी झाली काही आठवड्यानंतर आपण समुद्रात कोणत्या परिस्थितीत असू ? माझं लक्ष याच विचाराकडे केन्द्रित झालं पण लगेच ते विचार मी झटकून टाकले पॅराशूट बांधून उडी मारताना जशी अस्वस्थता येते तशीच येऊ लागली होती

लिमा आलं मी ट्राम पकडून कॅलाओला गेलो तिथे तराफा बांधण्यासाठी जागा शोधू लागलो बंदरावर जागा इतकी गच्च भरली होती–गलबतं, क्रेन्स, दुकानं इ. इ.–की ते ठिकाण बादच झालं एकच शक्यता होती–कॉंक्रीटच्या भिंतीआड असलेलं नेव्हल हार्बर. त्याच्या लोखंडी दाराआड उभे असलेले सशस्त्र सैनिक आणि आसपासचे रिकामटेकडे लोक माझ्याकडे संशयानं बघत होते आत प्रवेश मिळालाच तर सुरक्षितपणे तराफ्याचं काम चालू शकेल

वॉशिंग्टनमधल्या ‘पेरू नेव्हल अधिकाऱ्या’ची पूर्वीच गाठ घेऊन मी त्याच्याकडून मदतीसाठी एक पत्र घेतलं होतं दुसऱ्या दिवशी ते घेऊन ‘जल–मंत्रालया’त गेलो त्या खात्याचे मंत्री मॅन्युअल निएटो यांची गाठ पडली मी त्यांना जाण्याचं प्रयोजन सांगितलं नेव्हल डॉकयार्डमध्ये आमचं काम करायला परवानगी मागितली

‘तरुण गृहस्था,’ टेबलावर बोट वाजवत ते म्हणाले, ‘तू मुख्य रस्त्यानं न येता आडमार्गानं जात आहेस मी मदत जरूर करीन, पण परराष्ट्रमंत्र्याकडून मला तशी

आज्ञा मिळाली पाहिजे परकीय इसमाला तशी नुसती परवानगी देता येणार नाही त्याच्याकडे अर्ज कर गुड लक

या कागदपत्रांच्या देवाण-घेवाणीचा मला वीट आला ते कॉन–टिकीच्या काळातले दिवस किती सुखाचे! विनती अर्ज, परवानगी या त्रासदायक गोष्टींची त्याना ओळखसुद्धा नव्हती

परराष्ट्रमंत्र्याची गाठ घेणं तितकं सोप नव्हत डॉ कोहेन यांनी दिलेल्या पत्राची मला आठवण झाली त्याचा उपयोग होऊन पेरूच्या अध्यक्षांचे निवासस्थानी त्याना एक–दोन दिवसात भेटाव अस ठरल

लिमा ते पाच लाख वस्तीचं शहर अतिशय सुंदर आणि अत्याधुनिक जगातली एक उत्तम राजधानी अध्यक्षाचा राजवाडा शहराचे मध्यावर अत्यंत कडक पहारा चित्तपटाच्या पडद्याखेरीज अध्यक्षाच दर्शन महामुश्किल होत दोन सैनिकाच्या बरोबर मला आत नेण्यात आल तीन ठिकाणी नाव लिहून झाल्यावर एका प्रशस्त दिवाणखान्यात मला बसवल आजू-बाजूला खूप खुर्च्या होत्या शुभ्रवेषधारी गृहस्थान माझ स्वागत केल आणि तो अदृष्य झाला काही वेळात समोरच दार उघडून आणखी एका चागल्या खोलीत नेल तिथे असलेल्या गृहस्थाला पाहून मला वाटल तेच अध्यक्ष पण छे! मला खास जुन्या ढंगाच्या खुर्चीवर अदबीन बसवून तोही निघून गेला असा प्रकार आणखी दोन वेळा झाला मंत्रिमंडळाची सभा उरकल्यावर अध्यक्ष येत असल्याचा निरोप मात्र मधेच आला

अशाच आणखी तीन खोल्याचा पाहुणचार झाल्यावर पाढऱ्या सुटातला एक बुटका इसम तिथे आला आता-पर्यंतच्या अनुभवावरून तो कुठेतरी नेणार या कल्पनेनं मी उभा राहिलो, पण नाही तो स्वस्थच राहिला त्यान मला अभिवादन केल ते अध्यक्ष रिव्हेरो होते

माझ स्पॅनिश त्याच्या इंग्लिशपेक्षा कितीतरी चागल म्हणायच भाषेच। देवाण–घेवाण करून थकल्यावर आम्ही खुणाखुणा आणि आविर्भाव सुरू केले पण त्याचा उपयोग होऊन पेरूतल्या नेव्हल हार्बरवर तराफा बाधायची परवानगी मिळण दुर्लभच होत मी काय मागत होतो हे त्याना बिलकुल समजत नव्हत, एवढ मला निश्चितपणे समजल मधेच बाहेर जाऊन त्यांनी

'एअर मिनिस्टर'ना बोलावून घेतल जनरल रेव्हरेडो त्यांच इंग्रजी अमेरिकन उच्चारांसह अस्खलित होत

गैरसमजाबद्दल मी दिलगिरी व्यक्त केली हवाई दलाकडून नव्हे तर नाविकदलाकडून मला परवानगी हवी होती जनरल मोठ्यान हसले ते म्हणाले की त्याना फक्त दुभाषा म्हणून बोलावल होत माझी उपपत्ती थोड थोड करून अध्यक्षाना ऐकवण्यात आली त्यानी लक्षपूर्वक ऐकून घेतल आणि मधून मधून चागले प्रश्नही विचारले शेवटी ते म्हणाले

'पॅसिफिकमधली बेटं प्रथम पेरूतल्या लोकांनी शोधून काढली असतील तर पेरूला या मोहिमेत निश्चित रस आहे आमच्याकडून तुम्हाला कोणती मदत हवी आहे?'

मी मागणी केली–नेव्हल हद्दीत बंदिस्त जागा, वापरापुरती वर्कशॉपमधली हत्यार, साधनसामुग्री साठवण्यासाठी सोय आणि देशाबाहेरून काही सामान आणायची परवानगी, लागली तर तिथल्या अधिकाऱ्याची काही मदत

'त्याना काय हवय?' अध्यक्षानी उत्सुकतेन विचारल• मलाही ते कळल

'विशेष काही नाही,' जनरल रेव्हरेडो म्हणाले–माझ्याकडे पाहून त्यानी डोळे मिचकावले अध्यक्षानी समतीदर्शक मान हलवली

पुढची व्यवस्था ठीक होणार होती योग्य त्या आज्ञा लगेच रवाना करण्यात येणार होत्या

'ईश्वर तुम्हा साऱ्याच रक्षण करो!' अध्यक्षानी हसत हसत निरोप दिला मला बाहेर नेऊन सोडण्यात आल

लगेच लिमातल्या वर्तमानपत्रामध्ये आमच्या पेरूहून सुरू होणाऱ्या मोहिमेच वृत्त प्रसिद्ध करण्यात आल बाजूलाच आणखी एक बातमी होती ॲमेझॉन भागातल्या इंडियन लोकाचा अभ्यास करून एक स्वीडिश–फिनिश तुकडी नुकतीच परत आली होती त्यातले दोघ स्वीडिश एका होडीतून पेरूमध्ये दाखल झाले होते एकाच नाव होत बेंट डॅनियलसन तो आता पेरूतल्या डोंगरी इंडियन्सचा अभ्यास करणार होता त्या बातमीच कात्रण मी कापून जवळ ठेवल

माझ्या हॉटेलमधे बसून घडलेल्या गोष्टी मी हर्मनला पत्रात लिहित असतानाच दारावर थाप पडली एक उंच काळवंडलेला माणूस आत आला त्याची

तांबडी दाढी पाहून मला उगीचच वाटल 'बेन्ट डॅनियलसन'

'बेन्ट डॅनियलसन,' त्यान स्वतःची ओळख करून दिली

'त्याला बहुधा आमच्या तराफ्याविषयी समजल असाव,' माझ्या मनात आल

'मी नुकतच तुमच्या मोहिमेबद्दल वृत्त वाचल,' तो म्हणाला

'आणि आता हा माझी उत्पत्ती खोडून काढणार,' माझी खात्रीच झाली

'मला तुमच्या तराफ्यावरून यायची इच्छा आहे,' तो शांतपणे म्हणाला 'तुमच्या स्थलांतर-थेअरीत मला इंटरेस्ट आहे'

तो शास्त्रज्ञ होता आणि नुकताच जगलाच्या अंतर्भागात जाऊन आला होता, याखेरीज मला त्याची माहिती नव्हती पण नॉर्वेच्या पाच लोकांबरोबर एक स्वीडिश गृहस्थ यायला तयार होतो हे काही कमी नव्हतं त्याच्या घनदाट दाढीतूनही त्याचा विनोदी स्वभाव आणि उमद व्यक्तिमत्व लपत नव्हत

सहावी रिकामी जागा अशा रीतीन बेन्टन भरली त्या एकट्यालाच स्पॅनिश चांगल येत होत

उतारू विमानातून मी जेव्हा उत्तरेकडे निघालो तेव्हा खालच्या अथांग सागराकडे अत्यादरान आणि डोळे भरून पाहून घेतल सारी पश्चिम दिशा क्षितिजापर्यंत महापुरान जलमय झाली अस वाटत होत आम्ही सहाजण प्राण पणाला लावून एक जुगारच खेळणार होतो एका अदिस्त पण वेगळ्या जगातच आम्ही बांधले जाणार होतो हर्मन सध्या इक्वाडोर मध्ये लाकडाची वाट बघत होता क्नट आणि टॉरस्टेन नुकतेच विमानान न्यूयॉर्कला आले होते एरिक 'ओस्लो'हून बोटीन निघाला होता मी विमानान वॉशिंग्टनच्या मार्गावर होतो आणि बेन्ट लिमातल्या हॉटेलात इतरांची वाट बघत निघण्याच्या तयारीत मुक्काम ठोकून होता

त्यातले कोणीही एक-दुसऱ्याला ओळखत नव्हते आणि प्रत्येकाच्या व्यक्तिमत्वात जमीन-अस्मानाचा फरक होता हे एक प्रकारे ठीकच झाल आम्ही कित्येक दिवस एकत्र राहणार ते एकमेकाच्या त्याच त्या कथा ऐकून कंटाळणार तरी नाही महिनेन् महिने तराफ्यावर काढताना आम्ही मानसिकदृष्ट्या बांधलेले राहण्याची अत्यंत गरज होती अशावेळी लाईफ-बेल्टपेक्षा एखाद्या चांगल्या विनोदाचीच खरी गरज!

वॉशिंग्टनमधे कडक थंडी होती जिकडे तिकडे बर्फच बर्फ फेब्रुवारी उजाडला होता जॉर्नन वायरलेसचा बंदोबस्त केला होता क्नट आणि टॉरस्टेन शॉर्ट वेव्ह ट्रान्समीटर बनवण्याच्या खटपटीत होते लहान-मोठ्या हजारो गोष्टी उरकण अद्याप बाकी होत मोहिमेत अनेक गोष्टींचा अभ्यास होणार होता

फाईल्समध्ये कागदाचे गठ्ठे वाढले मिलिटरी आणि साधी कागदपत्र, रगीबेरंगी, चार भाषातली साध्या तराफा मोहिमेसाठी शेकडो रुपयांची स्टेशनरी कामी आली होती कायदा आणि नियमानी एकसारखी नाकेबंदी होत होती एकेक गाठ हळूहळू सोडवायची होती

'मी सांगतो, या कागदाच वजन वीस पौण्ड तरी नक्की भरेल,' टाईपरायटरवर काहीतरी टाईप करताना क्नट वैतागून म्हणाला

'सब्बोस,' टॉरस्टेन कोरड्या शब्दात म्हणाला 'मी आधीच वजन केलेल आहे'

आमच्या त्या वेळच्या नाट्यमय तयारीवरून माझ्या आईला मोहिमेची पूर्ण कल्पना आली होती तिन लिहिल

माझी एवढीच प्रार्थना आहे की तराफ्यावरून तुम्ही सहाहीजण सुखरूप परत या'

त्यात एक दिवस लिमाहून एक्स्प्रेस तारच आली जबरदस्त लाटेच्या तडाख्यान हर्मन किनाऱ्यावर फेकला गेला होता त्याची मान मोडली होती लिमा हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार चालू होते

टॉरस्टेन लगेच तिकडे विमानान रवाना झाला हर्मनच्या मानेच वरच हाड पिचल होत त्याच्या सुदृढ प्रकृतीमुळेच केवळ तो वाचला लवकरच सुधारणा होऊन तो मूळपदाला आला त्यान बालसा लाकडापासून काम सुरू केल डॉक्टरांची त्याच्यावर देखरेख होती त्याला आमच्याबरोबर यायला परवानगी मिळते का नाही याची आम्हाला शंका येऊ लागली त्याला मात्र तशी क्षणभरही आली नाही

नंतर एरिक पनामाहून हजर झाला क्नट आणि मी वॉशिंग्टनहून आलो लिमामधे आम्ही सर्वजण प्रस्थानासाठी एकत्र जमलो

किवेडो जंगलातून आणलेले मोठमोठे बालसा लाकडाचे तुकडे नेव्हल डॉकयार्डमध्ये पडलेले होते दृश्य तर अगदी केविलवाणं दिसत होत नुकतेच कापलेले गोल ओंडके, पिवळे बांबू इतर बांधणी साहित्य नेव्हीच्या पाणबुडया आणि विनाशिकांमध्ये ढीग रचून ठेवलं होत सहा गोरे आणि दोन काळे लोक हातात कुऱ्हाडी, लांब चाकू आणि दोर घेऊन तयारीनिशी उभे होते निळया आणि सोनेरी गणवेषातील नेव्ही अधिकारी मोठया उत्सुकतेन आमच्याकडे बघत होते. ही अनाहूत मंडळी कोण असा त्याना प्रश्न पडला असावा

कॅलाओ बंदरावर शेकडो वर्षांच्या अवधीनतर बालसा तराफा बनविला जात होता कॉन-टिकीच्या नेतृत्वाखाली इन्का इंडियन लोकानी समुद्रमाग पलायन केल्यावर कित्येक वर्ष अशी तराफा वाहतूक चालू असावी परंतु अलिकडच्या शास्त्रज्ञांनी ती गोष्ट पार उडवून लावली होती त्याच्या मते साध्या तराफ्या-मधून भर समुद्रात जाणे केवळ अशक्यच होते बांबू आणि बालसा पुराणकालीन झाले आता चिलखत किंवा स्टीलची भाषा बोलायची कडक इस्त्रीचा गणवेष व शस्त्रसज्जता

अत्याधुनिक डॉकयार्डची आम्हाला विलक्षण मदत झाली बेन्ट दुभाषा आणि हर्मन मुख्य रचनाकार. सुतारी आणि खलाशी साहित्य हाताशीच होतं आम्हाला मिळालेली जागा निम्मी या साधनसामुग्रीनीच भरलेली होती अशा रीतीन तराफा बनायला सुरवात तर झाली

प्रत्यक्ष तराफ्यासाठी नऊ मोठे ओंडके निवडलेले होते. ते एकत्र घट्ट बांधण्यासाठी लाकडात खोल भोक पाडली त्यातून दोर ओवून तराफा आवळण्यात येणार होता बांधणीसाठी साधा खिळा, वायर किंवा तसल्याच इतर साहित्याचा अजिबात वापर करायचा नव्हता

नेव्हीच्या कक्षेतील आवारात समुद्र-किनारा होताच प्रथम आम्ही सर्व ओंडके पाण्यात टाकले ते एकत्र जोडण्यापूर्वी प्रत्येकाची पाण्यात तरगायची नैसर्गिक स्थिती समजणे आवश्यक होते सर्वांत मोठा ४५ फुटी ओंडका मधोमध घेऊन कमी कमी लांबीचे तुकडे दोन्ही बाजूना एकसारखे बांधण्यात आले त्यामुळे तराफ्याची बाजू ३० फूट लांब झाली नतर तीन तीन फुटांवर कमी जाडीचे ओंडके आडवे जोडण्यात आले. आता तराफा जवळ जवळ पूर्ण झाला. प्रत्यक्ष त्यासाठी निरनिराळे ३०० लहान मोठे दोर घट्ट गाठी मारून उपयोगात आणले मधोमध बांबूचे तुकडे पसरवून आणि नीट बांधून डेक तयार झालं. त्यावर आम्ही छोटस केबिन उभारल त्यालाही बांबूचा आणि केळीच्या पानांचा वापर केला केबिनच्या बाजूला दोन डोलकाठ्या उभ्या केल्या लोखडाइतक टणक लाकूड त्याकरता उपयोगात आणलं. त्या एकमेकांच्या दिशेला झुकवून वरच्या टोकाला दोरानं घट्ट बांधल्या. भक्कम-पणासाठी दोन बांबू एकत्र जोडून तयार झालेल्या काठीवर चौरसाकृती शीड गुंडाळून ठेवल.

याच तराफ्यावरून आम्ही शेकडो मैल महासागर पार करणार होतो पाणी नीट कापता याव म्हणून ओंडक्याची टोक घासून लहान करण्यात आली वारा किंवा लाटांमुळे तराफा वाटेल तसा भरकटू नये म्हणून तळाशी एक इच जाडी, दोन फूट रुंदी आणि पाच फूट पाण्यात बुडतील अशा फळया खालच्या पृष्ठभागाला लावण्यात आल्या तराफ्याच्या बाजूंना सरक्षणासाठी कठडे उभारले नाहीत परंतु बालसाचे ओंडके मात्र चारी बाजूना जोडले, एवढंच.

जुन्या काळच्या तराफ्याची ही प्रामाणिक प्रतिकृति होती बाकीच्या गोष्टी आमच्या मनाप्रमाणे करण्यात कोणतीच अडचण नव्हती, कारण त्यामध्ये माझ्या उपपत्तीला बाधा येणार नव्हती भावी काळात हा तराफाच आमचं जग असणार होतं दिवस उलटू लागल्यानतर बरोबर घेतलेल्या बारीकसारीक गोष्टींचं महत्त्व कळत जाणार होत म्हणून आम्ही नतरच्या तयारीत लहानलहान तपशीलाचाही काळजीपूर्वक विचार केला

केबिनमधली जागा अगदी अपुरी होती सामानाच्या पेटया आत रचल्यावर येण्याजाण्यासाठी अरुद जागा शिल्लक राहिली जवळजवळ सरपटतच आत जावं लागे

आमचा तराफा आकार घेऊ लागल्यावर एकदा जल-मंत्र्यानी स्वत येऊन जातीन पाहाणी केली आजूबाजूच्या भल्या मोठ्या जहाजांमध्ये तराफा डौलान तरंगत होता. त्याच्याकडे बघताना आम्हाला अत्यत अभिमान वाटला. इन्का काळाची आठवण पुन्हा ताजी झाली. तराफा

पाहून मंत्री महाशय मात्र जबरदस्त हादरले मला नेव्हीच्या कार्यालयातून बोलावण आलं. त्या जागेत आम्ही जे काही काम केलं किंवा लोकांसह किनारा सोडला तर त्याची संपूर्ण जबाजदारी माझ्यावर राहील असं त्यांनी माझ्याकडून लिहून घेतलं

त्यानंतर कित्येक परकीय तज्ञ आणि राजकीय लोक त्या डॉकयार्डमध्ये येऊन तराफा पाहून गेले आम्हाला प्रोत्साहन म्हणून कोणीच दिलं नाही काही दिवसांनी एका वरिष्ठ राजदूतानं मला अगत्यपूर्वक निमंत्रण दिलं

'तुमचे पालक हयात आहेत ना ? ' त्यान विचारलं मी 'होय' सांगितल्यावर माझ्याकडे रोखून बघत हताश स्वरात तो म्हणाला,

'तुमच्या मृत्यूची वार्ता ऐकून त्यांना अतिशय दुःख होणार आहे '

त्यान खाजगीरीत्या मला मोहीम रद्द करण्याची विनंती केली आम्ही तराफा चुकीच्या पद्धतीनं बांधला होता, अशी त्याची समजूत झाली होती त्याच्या मते तो इतका लहान होता की प्रशांत महासागरात त्याचा टिकाव लागणं अशक्य होतं त्याशिवाय दोन लाटांच्या मधोमध राहण्याच्या दृष्टीनं तो तराफा मोठाच होता लाटांच्या तडाख्यात माणसं आणि सामान फेकलं जाऊन त्याच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या उडतील असं त्यानं सांगितलं त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे देशातल्या एका मोठ्या बालसा निर्यातदारानं त्याला सांगितलं होतं की, " ते सच्छिद्र लाकूड एक चतुर्थांश प्रवासभर तरंगू शकेल पण त्यानंतर मात्र खूप पाणी शोषून घेतल्यामुळे आमच्या वजनानं सहज बुडून जाईल "

हे आम्हाला नवीनच होतं थोडीशी चलबिचलही झाली, पण आमचा बेत मात्र बदलला नाही, म्हणून प्रवासात बरोबर नेण्यासाठी बायबलची एक प्रत मला देण्यात आली भेट देणारे लोक निराश होऊन आणि ते व्यक्त करून परत जात. 'वादळात तराफा गोल गोल फिरत राहील जलाशय संथ असताना सुद्धा खाऱ्या पाण्यामुळे आमची कातडी सोलवटेल किंवा सर्व सामान नष्ट होईल' थोडक्यात, सुरक्षितपणे जाता येईल अशी एकही समाधानकारक गोष्ट त्यांच्या मते दिसत नव्हती आम्ही किती दिवस जिवंत राहू शकू यावर अनेक पैजा मारण्यात आल्या दक्षिण सागरीय बेटांना सुखरूप पोहोचलो तर राहिलेल्या आयुष्यात लागेल तितकी व्हिस्की आम्हाला पुरवण्याचं आश्वासन तिथल्या अधिकाऱ्यांनी दिलं

सर्वांत कळस झाला तो, एक नार्वेच गलबत किनाऱ्याला लागल्यावर. त्यांच्या व्यावहारिक प्रतिक्रिया ऐकण्यासाठी आम्ही उत्सुक होतो त्यातल्या अनुभवी लोकाकडून असं कळलं की शिडाचा तराफ्याला काही एक उपयोग होणार नाही आणि 'हमबोल्ट'च्या प्रवाहात खेचला जाऊन आमचा तराफा एक किंवा दोन वर्षसुद्धा समुद्रात अडकून पडेल त्या लोकांनी तराफ्याकडे दृष्टिक्षेप टाकून खेदपूर्वक मान हलवली. 'पंधरा दिवससुद्धा दोर टिकणार नाहीत, कारण एकसारख वरखाली झाल्यामुळे ओंडके एकमेकावर घासून ते झिजतील', असं भविष्य त्यांनी वर्तवलं. वायर किंवा साखळी उपयोगात आणली नाही तर आम्ही देवाचं नाव घेऊनच निघावं, असा प्रामाणिक सल्ला त्यांनी दिला

त्यांच्या युक्तिवादाला उत्तर देणं कठिण जात होतं. अनेक भीतींमधली एक जरी खरी ठरली तरी आशेला जागाच नव्हती आपण हे काय करतोय् ! आपल्याबरोबर इतरांचंही जीवन धोक्यात टाकतोय का ? असा प्रश्न मी हजार वेळा तरी स्वतःला केला मी स्वतः खलाशी नसल्यामुळे खात्रीपूर्वक काहीच सांगू शकत नव्हतो फक्त एकच गोष्ट मला दिलासा देणारी होती, ती म्हणजे जुन्या काळची पेरूतील संस्कृती केवळ अशा प्रकारच्या तराफ्यांवरूनच निरनिराळ्या बेटांवर पसरली होती तेवढं एकमेव तरंगत नेणारं साधन त्यांच्यापाशी होतं मी स्वतःशी असा निष्कर्ष काढला की ज्या अर्थी इ. स. ५०० मध्ये कॉन–टिकी याने बालसा तराफ्यावरून समुद्र ओलांडू शकला, त्याअर्थी, त्याची डोळे झाकून जशीच्या तशी प्रतिकृती तयार केली तर आजही आम्ही सुखरूप जाऊ शकलोच पाहिजे. बेंट आणि हर्मन या दोघांनी माझी उपपत्ती काळजीपूर्वक वाचून काढली होती कोणी काहीही म्हणालं तरी ते अगदी शांत आणि स्वस्थ राहिले होते

लिमामध्ये आमचा वेळ फारच आनंदात चालला होता.

निघण्याचा दिवस जवळ येऊ लागला आम्ही पासपोर्ट कार्यालयात देश सोडण्याची परवानगी मागायला

गेलो. बेंट दुभाषा म्हणून ओळीत पहिला उभा राहिला. 'तुमच नाव?' बेंटच्या लांब दाढीकडे आपल्या चष्म्यातून सशयान पाहत एका कारकुनाने विचारलं.

'बेंट एमरिक डॅनियलसन,' बेंटनं अदबीनं उत्तर दिलं

त्या माणसान लाबलचक फॉर्म टाईपरायटरवर चढवून विचारलं, 'तुम्ही कोणत्या जहाजातून पेरूला आला?' 'बर का!' टेबलावर रेलून बेंटन समोरच्या बासलेल्या माणसाला उत्तर दिल. 'मी जहाजातून आलो नाही. पेरूला मी होडीतून आलो'

थक्क होऊन बेंटकडे पाहत कारकुनान फॉर्मवर 'होडी' शब्द रिकाम्या जागेत टाईप केला

'आणि कोणत्या जहाजातून तुम्ही पेरू सोडणार आहात?'

'तुमचा गैरसमज झालाय,' बेंट पुन्हा नम्रतेनं म्हणाला, 'मी जहाजानं देश सोडणार नसून एका तराफ्यावरून जाणार आहे'

'अर्थात, अर्थात!' तो कारकून रागात म्हणाला आणि कागद मशीनबाहेर काढून त्यान तो फाडून टाकला 'तुम्ही माझ्या प्रश्नांची उत्तर नीट देणार आहात का?' त्याची समजूत पटण फारच कठीण गेल

सर्व साधनसामुग्री, जरुरीचं साहित्य आणि प्यायच पाणी तराफ्यावर चढवण्यात आल होत सहाजणाना चार महिने पुरेल इतक कोरड साहित्य कार्डबोर्डच्या पेट्यांमधून आम्ही घेतल होत ५६ लहान बरण्यांमधून आम्ही २५० गॅलन पिण्याच पाणी भरून घेतल नारळ आणि फळाच्या करड्या एकमेकाना घट्ट बाधून, तराफा वरखाली होताना पडणार नाहीत, अशा बेतान ठेवल्या.

क्नट आणि टॉरस्टेननं बाबूच्या केबिनचा एक कोपरा वायरलेससाठी ताब्यात घेतला आम्ही त्याशिवाय आठ पेट्या एकत्र बाधून आतमध्ये ठेवल्या होत्या दोनात शास्त्रीय उपकरण आणि फिल्म्स ठेवल्या होत्या आणि उरलेल्या सहा पेट्या आमच्या प्रत्येकाच्या नावान एकेक अशा. प्रत्येकाला खाजगी वापरासाठी जे काय घ्यावयाचं असेल ते त्यानं स्वतःच्या पेटीतच ठेवावं. अेरिकन ड्रॉईंग पेपरचे कित्येक रोल आणि गिटार आणलं असल्यामुळे त्याची पेटी भरून गेली कपड्यासाठी त्याला टॉरस्टेनच्या पेटीत जागा मिळवावी लागली बेंटच्या पेटीत ७३ जाडजूड ग्रंथ होते प्रत्येक पेटीच्या तोंडाशी आम्ही गवताच्या चटया आणि सतरज्या ठेवल्या निघण्याची तयारी पूर्ण झाली.

प्रथम आमचा तराफा नेव्हीच्या हद्दीतून बाहेर काढण्यात आला किनाऱ्यावर इकडे तिकडे थोडं फिरून सामानाचं वजन सगळीकडे सारख्या प्रमाणात असल्याची खात्री करून घेतली नतर कॅलाओ जलविहार क्लबसमोर तराफा उभा करण्यात आला. निघण्याच्या आदल्या दिवशी त्या ठिकाणी निमत्रित पाहुणे आणि अन्य लोकांच्या उपस्थितीत तराफ्याचा नामकरणविधी होणार होता

२७ एप्रिलला तराफ्यावर नॉर्वेचा ध्वज उभारण्यात आला ज्या ज्या देशानी मोहिमेसाठी प्रत्यक्ष मदत केली होती त्यांचे ध्वजही डोलकाठीवर लावण्यात आले. किनाऱ्यावर लोकांची एकच झुबड उडाली होती दोन्ही रंगाचे आणि तऱ्हेतऱ्हेचा पोषाख केलेले लोक त्यातल्याच काही लोकांच्या पूर्वजांनी तराफ्यावरून किनारा असाच सोडला असेल. अनेक देशांचे प्रतिनिधी आणि मत्री उपस्थित होते आमचे असख्य मित्रही मुद्दाम निरोप द्यायला दूरवरून आले होते बातमीदाराना तोटा नव्हता सिनेमा कॅमेरे आणि साध्या कॅमेऱ्याची उघडझाप चालू होती. कमतरता फक्त एकाच गोष्टीची होती ती म्हणजे बॅन्ड आणि ड्रमची हे तर निश्चितच होत की, तराफा नष्ट झाला तर आम्हाला एकेका ओडक्यावर बसून पॉलिनेशियाला जाण परवडणार होतं पेरूला परत तोंड दाखवायला आम्ही धजू शकणार नव्हतो

जेर्ड व्होल्ड, मोहिमेचा चिटणीस आणि जमिनीवरून आमच्याशी सपर्क ठेवणारा गृहस्थ, तराफ्याची पूजा करणार होता त्यासाठी नारळ आणण्यात आला ही

अश्मयुगातील पद्धत होती. १५०० वर्षांपूर्वी सूर्य-कुलातील राजा पेरूहून अदृश्य झाला आणि ज्या प्रकारच्या तराफ्यावरून पॉलिनेशियात दाखल झाला, तसाच एक तराफा किनाऱ्याला लागून उभा होता. इंग्रजी आणि स्पॅनिशमध्ये भाषणं झाली तराफ्याचं नाव ठेवण्यात आलं : कॉन-टिकी त्यावर नारळ फोडण्यात आला त्याचं पाणी व बारीक तुकडे इकडे-तिकडे उडाले उपस्थित मंडळी भारावून गेली होती

दोर सोडून शीड उभारण्यात आलं. त्यावर कॉन-टिकीचा दाढी असलेला चेहेरा एरिकन काढला होता आम्हाला आढळलेल्या टिकीच्या एका पुतळ्यावरून त्यानं लाल रंगात हुबेहूब चित्र काढलं होतं

अध्यक्षानी आम्हाला निरोप दिला. सागरात शिरण्या-पूर्वी आम्ही शहरात फिरलो जवळच्या पर्वतावर देखील जाऊन आलो. आमच्यासमोर ॲन्डीज पर्वताची रांग दिसत होती त्याच्या शिखरांना आणि लांबच लांब पसरलेल्या समोरच्या हिरव्यागार शेतांना आम्ही वंदन केलं 'दगड-मातीमधल्या वास्तव्याला कंटाळून आम्ही आता पाण्यात शिरणार आहोत,' असं आम्ही स्वतःला बजावलं त्यासाठीच तर आम्ही इतकी धडपड केली होती.

सहा

# प्रशांत महासागरात

कॉन-टिकी समुद्रात शिरणार त्यादिवशी किनाऱ्यावर तुफान गर्दी लोटली जलमंत्र्यांनी आज्ञा दिली की किनाऱ्या जवळील नौकांच्या वाहतुकीतून मार्ग काढून देण्यासाठी नाविक दलाच्या नौकेनं समुद्रात थोड्या अंतरापर्यंत जावं पूर्वीचे इंडियन्स तिथपर्यंत तराफ्याबरून मासे पकडण्यासाठी जात मोठ्या टाईपात, लाल आणि काळ्या रंगाच्या शाईत वर्तमानपत्रामध्ये बातम्या झळकल्या होत्या २८ एप्रिलच्या सकाळी शहरातले लोक किनाऱ्यावर मोठ्या संख्येनं जमा होऊ लागले

आम्ही सहाजण आयत्या वेळेला निर्माण झालेल्या काहीना काही कामात गुंतलो होतो धक्क्याजवळ फक्त हर्मन तराफ्याचं रक्षण करीत बसला होता मी मुद्दाम गाडीतून दूर उतरलो आणि पायी तिकडे निघालो मला पाय मोकळे करून घ्यायचे होते. कोणास ठाऊक, पुन्हा जमिनीला पाय केव्हा लागतील ! मी तराफ्यावर उडी टाकली त्यावर केळी, संत्री आणि इतर फळांच्या पेट्या इतस्तत पडल्या होत्या त्या नुकत्याच भेट म्हणून मिळाल्या होत्या आम्ही त्या नीट रचून ठेवल्या. त्यातच हर्मन एक पोपटाचा पिंजरा घेऊन स्वस्थपणे बसला होता लिमातल्या एका मित्रानं दिलेली खास भेट

'एक मिनिट या पोपटाकडे बघ,' हर्मन म्हणाला. 'किनाऱ्यावर जाऊन मी बियरचा अखेरचा ग्लास मारून येतो निघायला अजून बराच अवकाश आहे'

तो गर्दीत मिसळल्यावर लोक बोट दाखवून हात हलवू लागले नाविकदलाची नौका भर वेगानं येऊन जवळ उभी राहिली तिनं नांगर टाकला त्यावर अनेक अधिकारी, सिनेमा–फोटोग्राफर उभे होते. तराफ्याच्या एका टोकाला दोर बांधण्यात आला

'थांबा, थांबा,' मी जोरात ओरडलो 'घाई करू नका, अजून बाकीचे लोक यायचेत' शहराकडे बोट दाखवून मी स्पष्टीकरण करू लागलो

पण ते कोणाच्याही लक्षात आलं नाही. अधिकारी फक्त विनम्रपणें हसले आणि आपलं काम त्यानी चालूच ठेवलं खाणाखुणा करत मी दोर सोडू लागलो त्या संधीचा फायदा घेऊन पोपटानं पिंजऱ्याचं दार उघडलं आणि बांबूच्या डेकवर मजेत बसून तो एकदा ओरडला मी त्याला पकडायचा प्रयत्न केला पण त्यानं दाद दिली नाही एक डोळा दोर बांधू इच्छिणाऱ्या खलाशावर ठेवून मी पोपटाचा पाठलाग चालू ठेवला शेवटी केबिनच्या कोपऱ्यात मी त्याला गाठलं तोपर्यंत तराफ्याला दोर बांधून झाला होता आणि नौका चक्क सुरू झाली. कॉन-टिकीची मोठी सफर सुरू झाली होती. माझा एकमेव साथीदार म्हणजे स्पॅनिश बोलणारा, टकाटका इकडे-तिकडे बघत असलेला, पिंजऱ्यातला पोपट किनाऱ्यावरचे लोक हर्षानं ओरडत होते, निरोप देत होते नौकेतील फोटोग्राफर समुद्रात उड्या टाकून, घेता येतील तितकी छायाचित्रं टिपत होते प्रसंग होताच असा नाट्यपूर्ण हताश होऊन मी माझ्या साथीदाराचा शोध घेऊ लागलो. पण कोणीही आलं नाही नांगर वर खेचून नौका हलणार त्यावेळी मी इतका आरडाओरडा केला की ती तात्पुरती थांबली एक होडी पाण्यात उतरली आणि किनाऱ्याकडे गेली. पुन्हा परतली त्यावेळी त्यात बरेच लोक होते पण कॉन-टिकीच्या बेपत्ता साथीदारातील एकही नव्हता होडी पुन्हा त्यांच्या शोधाला निघाली

त्या दरम्यान एरिक आणि बेंट सामान सांभाळत तिथे हजर झाले त्याना असंख्य लोक घरी परतताना दिसले. एका पोलिसानं त्या दोघाना थांबवून म्हटलं की, ' तिथे आता बघण्यासारखं काहीच नाही ' बेंट हातवारे करून त्याला म्हणाला की ते काही पाहायला आले नसून स्वतःच जाणार होते

' काही उपयोग नाही, ' पोलिस सहजपणे म्हणाला, ' कॉन-टिकी एक तासापूर्वीच रवाना झाला '

' अशक्य, ' एरिक हातातलं पार्सल दाखवत म्हणाला. 'यात मेणबत्त्या आहेत, पाहा '

' आणि मी स्वयंपाकी आहे, ' बेंट त्याला म्हणाला, ते धावतच किनाऱ्यावर आले, पण तराफा निघून गेलेला होता खिन्न होऊन ते इकडे-तिकडे वेड्यासारखे फिरू लागले त्यावेळी बाकीचे साथीदार त्याना तसेच हिंडताना आढळले. नंतर त्यांना ती होडी येताना दिसली.

आणि अखेर आम्ही सहाजण एकत्र आलो

नाविकदलाची नौका आम्हाला समुद्रात ओढून नेत असताना तराफ्याभोवती पाणी फेसाळत होतं

तोपर्यंत दुपार होऊन गेली जलवाहतुकीपासून पूर्णपणे दूर जाईपर्यंत, म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत आमचा प्रवास एकत्र चालणार होता आमच्या आजूबाजून येणाऱ्या लहान-महान होड्या एकएक करून मागे फिरल्या आमचं काय होतं हे बघण्यासाठी थोड्याच मोठ्या होड्या शिल्लक राहिल्या

नौकेमागून जाताना पाणी उसळत असल्यामुळे कॉन-टिकीवर ते शिरत होतं. हे काही ठीक नव्हतं, कारण पाणी संथ असताना ही स्थिती तर पुढे काय होणार ! तेवढ्यात उपसागरामध्ये दोर तुटला आणि शांतपणे पाण्यात बुडला नौका तशीच पुढे जात राहिली. इतर होड्या नौकेला थांबवण्यासाठी पुढे जाऊ लागल्या. तराफा एकदम एका बाजूला कलला आम्ही सर्वजण पालथे पडून दोर हाताला लागतो का ते बघत होतो तराफा पुन्हा सरळ झाला आणि आमची डोकी चक्क समुद्रात बुडाली नाकातोंडात खारं पाणी गेल्यामुळे आम्ही थुंकू लागलो तोपर्यंत नौका परतली. नौकेच्या धक्क्यानं आमचा तराफा उलटण्याची शक्यता निर्माण झाली आमची गच्छंतीच होती डेकवरचे लोक धावाधाव करत होते किंचाळत होते नशिबानं ती थोडी बाजूला वळली तराफ्याला किंचित धक्का लागला एवढच

' सुरवात अशी वाईट झाली आहे, याचा अर्थ शेवट निश्चित चांगलाच होणार, ' हर्मन म्हणाला ' पण हे खेचत जाणं पुरे बुवा एखाद वेळेस तराफ्याचे तुकडे तुकडे व्हायचे. '

रात्रभर नौकेनं आम्हाला ओढत नेलं एक दोन प्रसंग सोडले तर प्रवास सुरळितपणे चालू होता. किनाऱ्यावर दिसणारा प्रकाश केव्हाच अदृश्य झाला होता अंधारातून काही वेळा इतर जहाजांचे दिवे मात्र दिसले आम्ही दोराकडे लक्ष देण्यासाठी पाळीपाळीनं जागलो, त्यामुळे झोपही पुरेशी झाली पहाटेला पेरूच्या दिशेनं दाट धुकं पसरलं होतं पश्चिमेला मात्र स्वच्छ निळं आकाश आम्हाला,

खुणावत होतं समुद्र सथ होता दवामुळे आमचे कपडे, भोंडके आणि इतर गोष्टी ओल्या झाल्या होत्या हवेत चागलाच गारवा होता पाणी थड लागत होतं हाच तो हमबोल्ट प्रवाह त्याच्या थड पाण्याचा प्रवाह अँटार्क्टिककडून वाहत येऊन उत्तरेकडे पेरूच्या किनाऱ्याला लाधून पश्चिमेला वळेपर्यंत आणि तसच इक्वेटरच्या खालपर्यंत जातो दिवसभर किनाऱ्याकडून इकडे वारे वाहत असतात सध्याकाळी किनाऱ्याच्या दिशेन त्यांचा उलट प्रवास चालतो.

नौका आमच्या जवळच होती लाटाबरोबर तराफा फूटबॉलसारखा वरखाली होत होता पॅसिफिकचा चार्ट बघून बेंटन सांगितल की किनाऱ्याहून कॅलाओच्या वायव्येकडे पन्नास सागरी मैल आम्ही पोचलो होतो सुरवातीच्या काही रात्री तरी जहाजांचा धक्का लागून बुडायची पाळी येऊ नये, म्हणून तराफ्यावर दिवा लावण अगत्याच होत त्यापुढे मात्र धोका नव्हता, कारण एकही जलमार्ग नतर शिल्लक राहत नव्हता

नौकेवरील लोकांनी आम्हाला समारंभपूर्वक निरोप दिला कॉन–टिकीला जोडण्यात आलेला दोर निघाला आमचा तराफा स्वतंत्र झाला. नौका परतीचा मार्ग आक्रमू लागली त्यावरचे ३५ लोक आम्ही दिसे-पर्यंत हात हालवत होते अखेर क्षितिजावर ती अदृष्य झाली

'गुड बाय, गुड बाय,' टॉरस्टेन म्हणाला 'आता आपल्याला इजिन चालू केलं पाहिजे' आम्ही सर्वजण हसलो

वारा जाणवू लागला होता झुळूक तशी मदच होती. दिशा दक्षिणेकडून आग्नेयेकडे आम्ही चौरसाकृती शीड उभारल ते नीट उभं राहिल नाही, त्यामुळे त्यावरचा कॉन–टिकीचा चेहरा सुरकुतलेला दिसत होता तो नाखूष झाला असावा

'म्हाताऱ्याला हे आवडलेल दिसत नाही,' एरिक म्हणाला, 'तो जेव्हा तरुण होता तेव्हा हेच वारे ताजेतवाने होते'

'आपला मार्ग बहुधा चुकतोय की काय,' हर्मन म्हणाला

'सध्याकाळच्या वाऱ्याबरोबर आपली दिशा फिरली नाही, म्हणजे झालं,' बेट म्हणाला

आम्ही तराफ्यावर इकडे–तिकडे पडलेल्या वस्तू नीट आवरून ठेवल्या एका रिकाम्या पेटीत बेंटन प्रायमस स्टोव्ह पेटवला. गरम कोको आणि बिस्किटं घेताना आम्ही आनदाच्या आरोळ्या ठोकल्या प्रत्येकानं एक–एक नारळही फस्त केला केळी अद्याप पिकली नव्हती

'आपण एका दृष्टीनं आता मजेत आहोत,' एरिक म्हणाला त्याच्या खाद्यावर पोपट बसला होता

'मला फक्त एकच गोष्ट आवडत नाही,' तो पुढे म्हणाला 'आपण जर असेच लोळत राहिलो तर हे लहान–लहान आडवे प्रवाह किनाऱ्याकडे नेऊन आप-ल्याला खडकावर आदळतील'

आमची वल्हवायला तयारी होती, पण वारा वाहू लागेपर्यंत थांबायच ठरल.

आणि अखेर वारा आला सथपणे पण नियमित लवकरच शीड फुगल कॉन–टिकीचा चेहरा समाधानानं ओसडल्यासारखा दिसू लागला आमचा तराफा हलू लागला जोडीला आम्ही वल्ही मारायला सुरवात केली

'एक–दोन–तीन . अठरा, एकोणीस–मारो!

आम्ही एक एक यार्ड पुढे जात होतो कॉनटिकीला म्हणावा तसा वेग येत नव्हता त्याला घाई अशी नव्हतीच पण एकदा वेग आला की खूप जोरात तो पुढे जाई

सध्या तरी वल्हवण हा एक प्रश्नच होता तराफा वर्णनाप्रमाणे बनवला असला तरी तो चालवावा कसा हे सांगणार कोणीच भेटलेल नव्हतं त्यावर तज्ञाशी खूप चर्चा करण्यात आली होती, पण उपयोग शून्य झाला याबाबतीत आमच्याएवढच त्याच ज्ञान मर्यादित होत वारे जसजसे वाहू लागले, तसा आमचा मार्ग बदलू न देण्याची जबाबदारी वाढली नाहीतर तराफा फिरण्याची शक्यता होती तो प्रश्न फार कठीण झालेला होता तीन जण शीड सांभाळत होते आणि बाकीचे तीनजण तराफा काबूत ठेवण्यासाठी वल्ही मारत होते ही वेळ आमच्यावर वारवार येत होती

वल्ह एकोणीस फूट लांब होत तराफ्याच्या मागच्या बाजूला दोन भोकामधून ते सैल ठेवलेल होत ते चागलच जड होतं–अगदी लोखडाइतकं हातात एकसारखं ते धरून बोटं पार थकून गेली तारपुरतं काम ठीक चाललं होत आणि तोपर्यंत वारे चागलेच वाढले

दुपार उलटल्यावर व्यापारी वारे अधिक जोरात वाहू लागले होते त्यामुळे समुद्राचा पृष्ठभाग वर-खाली होत होता महासागराचं खर दर्शन आम्हाला इथे झाल आम्ही आता एकटे पडलो होतो सगळे संपर्क तुटलेले होते आता बालसा लाकडाच्या तराफ्याच्या दर्जावरच आम्ही भर समुद्रात किती टिकाव धरू शकतो हे अवलबून होतं य'पुढे मागे किनाऱ्याकडे नेणारे वारे संपले होते, हे आम्हाला कळून चुकल होत व्यापारी वाऱ्यांच्या ताब्यात आम्ही आता पूर्णपणे होतो तेच आम्हाला सागरात पुढे-पुढे नेणार होते शीडाच्या प्रभावाने पुढे जाणं एवढंच आता बाकी होत मागे वळण आमच्या हातात राहिल नव्हत सूर्याच्या दिशेन जात राहणं हाच आमचा मार्ग पेरूहून निघाल्यानतर जुन्या काळी कॉन टिकीन असच केल होत

लाटाच्या चढ-उतारावरोबर तराफा सुखरूप वर-खाली होत होता हा आमचा विजयच होता ते लक्षात आल्यावर सर्वांनी सुटकेचे नि:श्वास टाकले. फक्त वल्हवणाऱ्या माणसाला उसळत्या लाटांमध्ये वल्ह सांभाळण जड जात होत त्यावेळी ते सरळ वर उचलून घेणं हिताच होत दोघांना सुद्धा ते पेलण जड जाई.

समुद्राची खोली जसजशी वाढू लागली, तस लक्षात आल की हमबोल्ट प्रवाहाच्या वेगवान भागापर्यंत आम्ही येऊन पोहचलो होतो पाणी हिरवट आणि गार होत समुद्राचा आम्हाला भरवसा वाटत नव्हता तो मित्र राहील का शत्रू हे अनिश्चित होत अधार वाढला चारी बाजूनी समुद्राचा विशिष्ट आवाज येत होता दुरून लाटांचा घनगभीर पण कानठळया बसवणारा आवाज आला लाटांची एक भिंतच्या भिंत मागून येत होती आम्ही एकमेकाना घट्ट पकडून पाणी डोक्यावरून जाण्याची वाट पाहू लागलो खूपच अस्वस्थता आली होती पण दर खेपेप्रमाणे कॉन-टिकी त्यावर सहजपणे आरूढ झाला आणि आकाशाच्या दिशेनं उचावला बाजूला पाण्याची प्रचड उची जाणवत होती पुन्हा आम्ही खाली आलो मोठ्या लाटा एका-मागून एक अशा दोन किंवा तीन येत त्यानतर मध्ये असख्य लहान लाटा वल्हवणाऱ्या माणसाला कमरे-भोवती दोर बाधून घेण्याची गरज होती वाऱ्याचा शीडाद्वारे जास्तीतजास्त उपयोग करून घेण ही त्याचीच जबाबदारी होती होकायत्रावरून एरिक दिशा वारवार तपासत होत आमची स्थिती आणि वेगही तो मोजत होता. काहीवेळ तरी आम्ही नक्की कोठे होतो, हे कळेना कारण आकाशात ढगाची दाटी आणि क्षितिजावर लाटांच तांडव सर्व शक्ती पणाला लावून दोन-जणाना वल्ह सांभाळाव लागलं एकाच लांब वल्हयाचा वापर आम्ही करत होतो बाकीचे लोक बाबूच्या उघड्या केबिनमध्ये झोप घेण्याचा प्रयत्न करत होते जाग्या असलेल्या दोघांवर तराफा सुरक्षित ठेवण्याची मोठी जबाबदारी होती, कोन थोडा जरी बदलला तरी पाणी थेट तराफ्यावर उसळण्याचा सभव होता तराफ्यावर जिथे-जिथे खळगे होते, तिथून वर उसळणार पाणी खाली जाई, हे विशेष त्यातून पाणी वर कधीच आल नाही.

मध्यरात्री, उत्तरेच्या दिशेन एका जहाजावरील प्रकाश जाताना दिसला. तीनच्या सुमारास त्याच दिशेनं आणखी एक जहाज गेलं आम्ही आमचा छोटा पॅराफिन दिवा हातान फिरवला आणि विजेऱ्यांचे झोत पाडून त्यांना बोलावण्याचा प्रयत्न केला, पण त्याच आमच्याकडे लक्ष गेल नाही अधारात ते दिवे दिसेनासे झाले त्यांच्या लक्षात आल नाही की लाटांवर जीवन झोकून काहीजण आपल्या जवळूनच, जुन्या इडियन लोकांप्रमाणे जात आहत त्याच दुर्दैव ! आणि महा-सागर ओलांडून जाईपर्यंत पुन्हा माणूस दिसण्याची आमचीही सधी अशा रीतीन हुकली

आम्ही दोघ-दोघ वल्हयाला गांधीलमाशीप्रमाणे चिकटून बसलो होतो. आमचे हात लाकडासारखे ताठ झाले होते त्या पहिल्या दिवसांत आणि रात्री आम्हाला नवं शिक्षण मिळत होत जमिनीवर वावरणाऱ्या लोकाचं सागरी पर्यटकात रूपांतर झालं होत. पहिल्या चोवीस तासात प्रत्येकाला, न चुकता, दोन तास काम आणि तीन तास विश्रांती मिळत होती दर तासाला एक नवा माणूस कामावर येई शरीराच्या प्रत्येक स्नायूला हिसका बसत होता. छाती आणि दंड भरून आले होते त्यातून सुटका झाली की अर्धवट गुगीत आम्ही केबिनमध्ये जाऊन पडत असू पायाला दोर बांधून खाऱ्या कपड्या-निशी तसेच गाढ झोपी जात होतो तीन तासानंतर दुसऱ्याची सुटका करण्यासाठी पुन्हा उठाव लागे.

दुसरी रात्र अधिकच त्रासदायक ठरली, समुद्र शांत होण्याऐवजी अधिकच खवळला एक तासाच्या वर वल्हवण मुष्किल झालं त्यामुळे आम्ही क्रम बदलला एक तास काम व दीड तास विश्रांती. पहिले आठ तास अशा रीतीन लाटांशी झगडण्यात गेले आमच्यामध्ये सर्वांत जास्त त्रास झाला तो क्नटला त्याला आम्ही कामापासून मुक्तता दिली, पण त्यामुळे आमच्यावर अधिक ताण पडत गेला पोपट पिंजऱ्यात शांतपणे बसून होता तराफ्याला एखादा हिसका बसला की तो फडफड करून उडे पण कॉन टिकी तसा स्थिर राहात होता इतर होडयांच्या तुलनेत तर नक्कीच तराफा पूर्णपणे काबूत ठेवण्याची कला मात्र आम्हाला साधली नाही लाटांचा काहीच भरवसा देता येत नव्हता तिसऱ्या रात्री सागर थोडा शांत झाला आवाज नुसताच होत होता पहाटे चारच्या सुमारास अनपेक्षित-पणे एक प्रचंड लाट तराफ्यावर येऊन आदळली कोणाच्या काही लक्षात येण्यापूर्वीच तिचा जबरदस्त तडाखा बसला शीड बांबूच्या केबिनवर जोरात आपटल केबिनचे आणि त्याचे तुकडे तुकडे होतात काय अशी आम्हाला भीती पडली सर्वांना तिकडे धावून कापड घट्ट दाबून धराव लागल तोपर्यंत तराफ्याची दिशा पार बदलली होती. आमच्यातले दोघजण पाण्यात फेकले जाण्याच्या बेतात होते जलाशय संथ झाला. आमचे डोळे पेंगुळले होते आणि हात सोलवटले होते पाच मिनिट सुद्धा बसून राहण्याच त्राण बाकी नव्हत पुन्हा हवामान पालटलं तर शक्ती शिल्लक हवी, म्हणून आम्ही स्वस्थपणे पडायच ठरवल शीड गुंडाळून आम्ही सर्व वस्तू कशाला ना कशाला तरी घट्ट बांधून ठेवल्या सर्वजण मेल्यासारखे पडून राहिलो

खूप कष्टान आम्ही आतापर्यंत वल्हवत राहिलो होतो महासागरात खूप आत गेल्यावर तराफा चाल-वण्याची इन्का-लोकांची सोपी आणि सुयोग्य पद्धत आम्हाला सापडली

आम्हाला खूप वर वाटेपर्यंत तसेच पडून राहिलो पोपट शिटया आणि जोरजोरात उडया मारू लागला. पाणी फेसाळत होतंच, पण आदल्या दिवसइतकं नाही प्रथम आमच्या कोणती गोष्ट लक्षात आली असेल तर विवळघा डेकवर स्वच्छ सूर्यप्रकाश पडलेला होता. सभोवताली पाणी चमकत होत, मित्रत्वाची खूण दाखवत होतं आम्ही तराफ्यावर सुरक्षित असलो की बाजूला पाणी उसळल काय किंवा लाटांनी गर्जना केल्या तरी बिघडलं कुठे! कोणत्याही स्थितीत तराफा त्यावर आरुढ होणारच दूरच्या समुद्रप्रवासात खोलगट होडी कामाची नाही, हे जुन्या जाणत्या लोकांनी बरोबर ओळखलं होत

बाराच्या सुमारास एरिकन आपली जागा घेतली त्याच्या लक्षात आल की आमचा मार्ग बराच विचलित झाला होता अजूनही आम्ही हमबोल्टच्या प्रवाहात किनाऱ्यापासून अवघ्या शभर मैलांवर होतो आता नक्की काय कराव? आग्नेयेचा वारा अद्याप वाहत होता आम्ही शीड उभारल, तराफ्याची दिशा बदलली आणि पुन्हा पश्चिमेचा मार्ग धरला

क्नटला आता बर वाटत होत तो आणि टॉरस्टेन वायरलेस सेट जवळ गेले एका बलूनमधून त्यांनी एरियल आकाशात सोडली. त्यांच्यातला एक जण एकदम ओरडला की, 'लिमातल नेव्हल स्टेशन आपल्याला सदेश देत आहे' त्यांनी मागून आम्हाला सांगितल की अमेरिकन राजदूताच विमान आम्हाला अखेरचा गुड-बाय् करण्यासाठी आणि वरून तराफा कसा दिसतो हे बघण्यासाठी निघाल होत विमानातल्या ऑपरेटरशी सपर्क साधल्यावर आम्ही त्याच्या बरोबर खूप गप्पा मारल्या आम्ही कोठे होतो हे जास्तीत-जास्त अचूकपण त्याला सागण्याचा प्रयत्न केला हा कार्यक्रम बरेच तास चालू होता आर्मी ११९ हे विमान गोल गोल घिरटया घालत होतं पण आम्हाला त्याचा आवाजही ऐकू आला नाही किंवा ते एकदाही दिसल नाही पाण्याला चिकटून असलेला तराफा शोधून काढण सोप नव्हत तसच, आम्ही फार दूरवर पाहू शकत नव्हतो कंटाळून विमान मागे परतलं आमचा शोध घेण्याचा तो अखेरचा प्रयत्न

असेच काही दिवस गेले फारशी महत्त्वाची किंवा अनपेक्षित घटना घडली नाही वल्हवण सोप जाऊ लागल होत. तराफा फक्त एकाच दिशेनं चालला होता व्यापारी वारे आणि हमबोल्ट प्रवाह आम्हाला गॅलापेगॉस बेटाभोवतून समुद्रात शिरणाऱ्या प्रवाहाकडे दिवसेदिवस लोटत होता वायव्येच्या दिशेन तराफा

इतक्या वेगानं जाऊ लागला की रोजची सरासरी ५५ ते ६० मैल पडू लागली एक दिवस तर आम्ही ७१ मैल गेलो

'गॅलापेगाँस बेट चांगल आहे ना?' क्नटनं काळजीच्या स्वरात विचारल त्यावेळी तो नकाशा बघत बसला होता

'मुळीच नाही,' मी म्हणालो 'इन्का लोकातील युपाकी कोलंबसच्या आधी त्या बेटावर गेला होता पण तो किंवा त्याचे अनुयायी तिथे राहिले मात्र नाहीत, कारण पिण्याचं पाणी तिथे नव्हतं'

'ओ. के,' क्नट म्हणाला, 'आपण मग तिथे जायलाच नको काहीही झालं तरी ती वेळ येऊ नये. अर्थात प्रवाहावर सर्व काही अवलंबून आहे'

आम्हाला समुद्रात वरखाली होण्याची आता एवढी सवय झाली की त्याच काहीच वाटेनासं झाल आम्ही थोडेसे 'नाचलो' किंवा आजूबाजूला पाणी थोडस उसळलं तर आपल काय जातं? आपण आणि तराफा त्यावर स्वार झालेले असलो की संपलं! पण पुढचा प्रश्न असा होता की वरच किती वेळ राहू? बालसा लाकडात पाणी मुरत होत आडवा ठोकलेला लाकडी वासा वाईट परिस्थितीत होता काहीही न बोलता त्याचा एक लहानसा तुकडा तोडून मी पाण्याच्या पृष्ठभागावर टाकला तो लगेच खाली दिसेनासा झाला माझ्याखेरीज इतर दोन तीन सहकाऱ्यानी, कोणीही बघत नाही अशी समजून करून घेऊन तोच प्रयोग केला होता निघताना तराफा किती पाण्यात बुडाला होता, हे आम्ही पाहिल होत, पण उग्र सागरात आता तो नेमका किती बुडाला होता याचा अदाज लागत नव्हता काहीवेळा तो वर येई, काही वेळा पाणी वर येई पण आम्ही लाकडात चाकू खुपसून पाहिला तेव्हा एक इंचाच्या खाली ते कोरडं असल्याचं आमच्या लक्षात आलं त्यामुळे आम्हाला अत्यानद झाला पाण्याचा वेग जर असाच कायम राहिला तर जमीन लागेपर्यंत तराफा तग धरील असा आम्ही अदाज बांधला पण, पाणी मुरण्याचं प्रमाण आता सारखच कायम राहिल तर!

पहिल्या काही आठवड्यात आम्हाला त्रास देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे दोर दिवसा आम्ही इतके कामात असू की त्याच आम्हाला काही वाटायच नाही पण अंधार झाला आणि आम्ही खाली आडवे झालो की सगळ्या काळज्या सुरू होत विचार करायला, कान देऊन ऐकायला आणि सगळीकडे लक्ष द्यायला त्यावेळी भरपूर अवधी असे तराफ्याच्या हालचालीबरोबरच नऊ ओंडके आडवे हालत, वर-खाली होत, फार नाही, पण एखाद्या श्वासोच्छ्वास करणाऱ्या प्राण्याच्या पाठीवर आपण बसलो आहोत इतक वाटण्याजोगे नक्कीच त्यामुळे आम्ही ओंडक्याना समांतर झोपत असू पहिल्या दोन रात्री या गोष्टीचा फार ताप झाला पण त्यानंतर आम्ही त्यावर विचार करण सोडून दिल. नतर दोर थोडे पाण्यामुळे फुगल्यासारखे झाले ओंडके एकसारखे हलत असल्यामुळे प्रत्येक गाठीला बारीक हिसडा बसे बाबूचं डेक, डोलकाठी, केबिनच्या चार भिंती आणि छप्पर– सर्व काही दोरानच घट्ट बांधलेलं होत आणि ते सर्व वरखाली आडव उभ, विरुद्ध दिशांना हालत होत. फार मोठ्या प्रमाणात नाही, पण कायम चालू

दोरांवर सर्व वजन पडल होत रात्रभर त्यांचा करकर आवाज ऐकू येई ते सर्व एका सुरात तक्रार करीत आहेत असं वाटत असे रोज सकाळी आम्ही त्याची पूर्ण तपासणी करीत होतो एकजण पाण्यात डोकं घालून खालची बाजूही तपासत असे त्यावेळी दोनजण त्याला घट्ट धरून ठेवत

पण दोर झिजले नव्हते खलाशी म्हणाले होते की ते फार तर पंधरा दिवस टिकतील नतर झिजून आणि कुजून जातील पण अद्याप आम्हाला कोठेही झीजेची खूण दिसली नव्हती समुद्रामध्ये खूप आत जाईपर्यंत आम्हाला त्याच कारण समजल नव्हत बालसा लाकूड इतक मऊ होतं की त्यात दोर थोडे घुसून सुरक्षित झाले होते हा उलटाच प्रकार झाला नाही?

आठवड्यानंतर समुद्र शात झाला पाणी हिरव्याऐवजी निळसर दिसू लागल आम्ही थेट वायव्येऐवजी वायव्य-पश्चिमेला जाऊ लागलो किनाऱ्यानजिकच्या प्रवाहातून पार होऊन समुद्रात शिरण्याची ती निशाणी होती

अगदी पहिल्याच दिवशी, आम्ही निघालो तेव्हा तराफ्याभोवती मासे दिसत होते पण आम्ही कामात इतके गुतलो होतो की ते पकडण्याचा विचारही

डोक्यात शिरला नव्हता दुसऱ्या दिवशी आठ फूट लांबीचा शार्क मासा पाण्यावर तरंगताना दिसला थोडा वेळ तो तराफ्याशी खेळला, पण आम्ही हातात 'हारपून' घेऊन सज्ज झालो, तेव्हा तो अदृश्य झाला दुसऱ्या दिवशी आम्हाला दोन मोठे डॉल्फिन मासे मिळाले त्याचं प्रत्येकी वजन २० ते ३५ पौंड सहज असेल त्यामुळे आमची खूप दिवसांची सोय झाली. आम्हाला इतके हरत-हेचे मासे दिसत की सगळ्यांच्या जाती ठाऊकच नव्हत्या त्यांचा खेळ बघायला गंमत येई तेवढीच करमणूक आम्ही जसजसे इक्वेटरजवळ आणि किनाऱ्यापासून दूर गेलो तशी उडत्या माशांची गाठ पडू लागली विशेषत निळं पाणी लागल्यानंतर

आम्ही रात्री पॅराफिन दिवा लावला तर त्याच्याकडे उडते मासे आकर्षित होत, आणि तराफ्यावर उड्या मारत बांबूच्या केबिनवर किंवा शिडावर धडपडून ते डेकवर पडत. त्या ठिकाणाहून त्याना उडता न आल्यामुळे हताशपणे जागीच तडफडत काही काही वेळा एखाद्याच्या तोंडावर, वेगात आलेल्या माशाचा फटकारा बसे, पण नंतर मिळणाऱ्या त्याच्या मेजवानीमुळे, गालाच्या होणाऱ्या आगीचा विसर पडे आम्ही बहुतेक वेळी मासे सकाळी न्याहारीला तळून खात असू

सकाळी आचाऱ्याच पहिलं काम म्हणजे डेकवर पडलेले मासे गोळा करून आणणे रोज निदान सहा तरी असत एकदा तर २६ जाडजूड मासे आम्हाला मिळाले.

काही रात्रीनंतरची गोष्ट टॉरस्टेन डोक्यावर दिवा अडकवून खाली झोपला होता पहाटे चारचा सुमार. वरचा दिवा जोरजोरात हलू लागला आणि कानाशी थंड आणि ओला पदार्थ वळवळला म्हणून टॉरस्टेनला जाग आली त्याला वाटलं उडता मासा तो दूर फेकण्यासाठी त्यान हात सरसावला आणि त्याला सापाचा भास झाला अंधार चांगलाच होता खरोखरच एक लांबलचक प्राणी हातात आलेला जाणवून त्यान चटका बसल्याप्रमाणे तो फेकून दिला अद्याप न दिसलेला तो पाहुणा, पलिकडे हर्मन होता तिकडे जाऊन पडला हर्मन चटकन उठला टॉरस्टेन विझलेला दिवा लावण्याच्या खटपटीत होता या गडबडीमुळे मलाही जाग आली मला आठवलं की रात्रीच्या वेळी तिथल्या पाण्यात बऱ्याच वेळा ऑक्टोपस येऊ शकतो दिवा पेटला हर्मन विजयी भावनेनं एका माशाचीच मान पकडून बसलेला होता. तो मासा तीन फूट लांब आणि अगदी सापासारखा नाजूक होता. काळे निस्तेज डोळे, अणकुचीदार दात असलेला आधाशी जबडा, मऊ-मऊ पाठ त्याचे दात चाकूसारखे धारदार होते तोंडात आलेली वस्तू आत जावी यासाठी आतल्या बाजूला वळू शकत हा निश्चितच खोल पाण्यातील मासा होता. माशाची पाठ निळसर-जांभळी आणि खाली स्टीलसारखी होती

या गडबडीत बेंटलाही जाग आली तो म्हणाला, 'माशासारखा दिसतो खरा पण मासा नसावा ' त्याचं म्हणणं फार चुकीच नव्हतं तसा दुर्मिळ मासा ऐकिवात नव्हता, किंवा त्याचं वर्णनही कुठे वाचावयास मिळालेलं नव्हत एका आठवड्यानंतर पहाटे चारच्या सुमारास आणखी एक तसला मासा डेकवर येऊन आमची झोपमोड झाली आम्ही माशांचे आणि अन्य अनोळखी प्राण्याचे नमुने बाटल्यांमध्ये साठवून ठेवायला आधीच सुरवात केली होती सागरामध्ये अनेक आश्चर्यं दडलेली आहेत डोळे उघडे ठेवून पाहिलं आणि काळजीपूर्वक अभ्यास करायच ठरवलं तर ती दिसतात नाहीतर हजारो मैलांची सफर जहाजातून करून आल्यावर एखादा इसम सांगू शकेल की महासागरात नुसतं पाणीच पाणी होत आम्हाला नवा प्राणी दिसला नाही, असा एकही दिवस गेला नाही ते आमच्या भोवती फिरत, घोटाळत काही काहीजण–डॉल्फिन्स् आणि पायलट माशांसारखे–तर इतके परिचयाचे झाले की दिवसभर ते आम्हाला तराफ्याबरोबर साथ देत काही काही तर रात्रीसुद्धा

एका रात्री आम्ही स्वच्छ चांदण्यात बसलो होतो अचानक पाण्यावर काहीतरी चमकल्यासारखं दिसलं जणू ताऱ्याची दोन प्रतिबिंबच ते आम्हाला प्रथम दिसलं तेव्हा आम्ही चांगलेच दचकलो चमकणारे दोन डोळे असलेला तो माशाचाच एक प्रकार होता पाण्यातून डोकं वर काढून ते मासे एकटक, मंत्र टाकत असल्यासारखे आमच्याकडे बघत अंधारात फॉस्फरस प्रमाणे चकाकणाऱ्या त्या दोन हिरव्या डोळ्यांची भीती वाटायची तसले डोळे आणखी एका वेगळ्या जातीच्या

माशांचे सुद्धा होते तराफ्यावरील दिव्यामुळे ते आजूबाजूला जमत. कित्येक वेळा, समुद्र शांत असताना तराफ्याभोवती अचानक, असंख्य गोल गोल डोकी (दोन ते तीन फूट रुंदी असलेली) आमच्याकडे बघत निश्चलपणे पाण्यावर तरगत.

या गोष्टीची आम्हाला हळूहळू सवय झाली तरी एखादा नवीन प्राणी दृष्टीस पडला की आम्हाला आश्चर्य वाटायच एकदा रात्री, दोनच्या सुमारास वल्हच्यावरील माणसाला प्रचड काळोखात अस्पष्टपणे काळा पृष्ठभाग समोर हालताना दिसला अधारामुळे निश्चित काय ते समजत नव्हत बघता बघता त्याचे दोन भाग झाले आणि थोड्या वेळानं तिसरा तराफ्याबरोबर त्याचा प्रवास चालू होता. आम्ही सर्वजण उठलो दिवा समोर धरून त्या प्राण्याची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला. प्रकाशाची त्यांना काहीच फिकीर वाटली नाही आज वरच्या प्रवासात दिसलेले ते सर्वात अजस्त्र मासे हत्तीपेक्षाही ते मोठे होते, पण ते व्हेल मासे नसावेत कारण व्हेल श्वास घेण्यासाठी वर कधीच येत नाहीत मग ते आकार बदलणारे 'रे' मासे होते का? भूत-पिशाच्याप्रमाणे, पहाट होऊ लागल्यानतर ते पाण्याखाली दिसेनासे झाले

ते नक्की कोण होते याचा खुलासा झाला नव्हता. जर आणखी दीडच दिवसांनी भर दुपारच्या सूर्यप्रकाशात त्यांनी पुन्हा भेट दिली नसती तर तो कधीच नसता झाला दिवस होता चोवीस मे मदगतीनं प्रवास चालू होता आम्ही बरोबर ९५ अंश पश्चिम आणि ७ अंश दक्षिणेला होतो बाराचा सुमार पाण्यात पाय सोडून मी आरामात बसलो होतो तेवढ्यात मला सहा फूट लांब, स्फटिकासारख्या स्वच्छ, ब्राऊन रगाचा मासा, पाण्यातून माझ्या दिशेनं येताना दिसला पाय घाईघाईन वर घेऊन मी मागे येऊन बसलो क्नट बांबूच्या केबिनमागून प्रचड किंचाळला, 'शार्क!' अगदी आवाज फुटेपर्यंत तो ओरडला

क्नट त्याची पँट धूत होता, तोच समोर त्याला एक प्रचड आणि विद्रूप चेहरा दिसला खरोखर तेवढा प्राणी आम्ही जन्मात पाहिला नव्हता समुद्र-राक्षसच तो. त्याच रूप इतकं भयप्रद होतं की आमची पाचावर धारण बसली त्याच डोकं पसरट होत, बाजूला दोन छोटे डोळे आणि चार ते पाच फूट रुंदीचा जबडा. त्यातून सुळे बाहेर डोकावत होते. डोक्यामागे विशालशरीर आणि शेवटी लहानसर शेपटी पाण्याखाली तो करड्या रगाचा दिसत होता पण वर आलेल्या डोक्यावर आणि पाठीवर लहान लहान पाढरे ठिपके दिसून आले हा राक्षस सथपणे आळशासारखा पोहत मागच्या बाजून बरोबर येत राहिला एखाद्या बुलडॉगप्रमाणे तो दात विचकत होता आणि सावकाश शेपटीनं फटकारे मारत होता त्याच्या आजूबाजून झेब्र्यासारखे पट्टे अगावर असलेले पायलट मासे धव्याधव्यान पोहत होते एक मोठा 'रेमोरा' मासा आणि इतर अनेक प्रकारचे छोटे मासे शार्कच्या विशाल शरीराला चिकटून बसले होते एकूण दृश्य प्राणीशास्त्राच्या प्रदर्शनासारख दिसत होत पाण्याबाहेर डोकावणाऱ्या विस्तीर्ण खडकावर जणू ते प्रदर्शन उभ केलेल होत

एक पचवीस पौंडी डॉल्फिन मासा, आम्ही मासे पकडायच्या सहा हुकांवर अडकवून त्या शार्कमाशासाठी आमीष म्हणून तराफ्याच्या मागील बाजूस अडकवून ठेवला पायलट माशाचा एक थवा डॉल्फिनपर्यंत येऊन घाईघाईन पुन्हा मागे आपल्या मालकाकडे, त्या सागर सम्राटाकडे परत गेला जबडा वासून तो राक्षस डॉल्फिन माशाकडे धावला. आम्ही डॉल्फिनला थोड मागे खेचलं, त्या बरोबर ते धूडही हळूहळू तराफ्याच्या टोकावर आल तोड न उघडता त्यान भक्ष्याला बारकासा धक्का दिला आयत्या मिळालेल्या त्या मामुली तुकड्याच त्याला महत्त्व वाटल नसाव शार्क मासा हळूहळू बराच तराफ्यावर आला त्याची पाठ वल्हच्यावर घासली गेली आम्हाला बारीक निरीक्षण करायला चागली सधी मिळाली होती आम्ही इतके जवळून त्याच्याकडे पाहत होतो की त्या वेळी आम्हाला बहुधा वेडच लागल असाव कारण आम्ही मूर्खासारखे जोरजोरात हसत होतो आणि समोरच्या अकल्पनीय दृश्यान फारच उत्तेजित झालो होतो तराफ्यावर आपला भयानक जबडा उघडून शार्क समोर पाहत होता आमच्या अगावर अक्षरश शहारे उभे राहिले वॉल्ट डिस्नेलासुद्धा आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरावर तसला समुद्र-सैतान निर्माण करता आला नसता

तो व्हेल-शार्क होता सर्वात मोठा आणि जगातील सर्वात लांब मासा ते फार दुर्मिळ आहेत, पण त्याचे

नमुने खोल महासागरात कधी कधी बघायला मिळतात. व्हेलशार्कची सरासरी लांबी ५० फूट आणि वनस्पतीशास्त्रज्ञाच्या मते वजन १५ टन असत ६५ फुटापर्यंत लांबी असलेली शिकार पूर्वी मिळालेली होती अगदी लहान माशाच्या लिव्हरचं वजन सुद्धा ६०० पौंड असत त्याच्या रुंद जबड्यात तीन हजार दात असतात

ते जनावर इतक मोठ होतं की आमच्या भोवती त्यान चकरा मारायला सुरवात केली, तेव्हा तराफ्याच्या एका बाजूला तोंड आणि मागच्या बाजूला संपूर्ण शेपटी दिसत होती त्याचं विशाल तोंड इतकं विद्रूप होत की आम्हाला हसल्यावाचून आणि ओरडल्यावाचून गत्यतरच नव्हत तरी आमच्या लक्षात आलं नव्हत की त्यान हल्ला करायचं ठरवल तर बालसाचे ओंडके आणि दोऱ्यांचे तुकडे तुकडे करण्याची ताकद फक्त त्याच्या शेपटीतच होती त्याच्या फेऱ्या चालूच राहिल्या जे काय होईल ते बघत राहण एवढंच आमच्या हातात होत हातात शस्त्र घेऊन आम्ही तयारीत होतो, पण त्याच्या अजस्त्र देहापुढे आमची हत्यार (हारपून) म्हणजे जणू काही त्याचे टूथ-ब्रशच शार्क निघून जाण्याचं नाव घेत नव्हता आमच्याभोवती गोल फेऱ्या मारत तो इमानी कुत्र्याप्रमाणे बरोबर येत राहिला. यासारखा अनुभव हाच मोठं धाडसच ते एक सागर सैतान तराफ्याच्या खाली आणि मागे-पुढे फिरत होता तो प्रसंग इतका अनपेक्षित आणि अनैसर्गिक होता की आमच्यात यायला हव इतक गांभीर्य आलंच नाही

फार तर एक तास हा खेळ चालला असेल पण आम्हाला तो दिवसभर चालल्यासारखा वाटला शेवटी एरिकला राहवल नाही त्यान आपल आठ फुटी शस्त्र आरोळी ठोकून शार्कच्या डोक्यावर सर्व शक्तीनिशी फेकल काय होत, हे माशाला कळायला थोडा वेळ लागला नतर तो पाण्यात एकदम उभा राहिला त्या उसळीमुळे तराफ्याच्या काठाला असलेले तीनजण धडपडले खोल पाण्यात व्हेल शार्क अदृश्य झाला काही सेकदानतर मोडलेल हारपून पाण्यावर तरगताना दिसल कावरे-बावरे झालेले पायलट मासे आपल्या धन्याच्या शोधार्थ त्या दिशेनं गेले शार्क बदला घेण्यासाठी पुन्हा आमच्या मागे येईल, अस वाटल होत-पण त्यानतर तो पुन्हा दिसलाच नाही.

आम्ही आता दक्षिण इक्वेटरच्या प्रवाहात येऊन पोहोचलो होतो. पश्चिमेला आमचा तराफा चालला होता 'गॅलापेगॉस' बेटाच्या दक्षिणेला अवघ्या ४०० मैलांवर आम्ही होतो त्या बेटाकडे वाहत जाण्याची भीती आता राहिली नव्हती आमच स्वागत करण्यासाठी त्या बेटापासून आम्ही होतो तिथपर्यंत भली मोठी समुद्र कासवं मात्र आलेली होती एका कासवाखाली आम्हाला हिरवा, निळा आणि सोनेरी रगाचा खेळ चालू असलेला दिसला आमच्या लक्षात आलं की डॉल्फिन माशांबरोबर त्याचा जीवन-मृत्यूचा झगडा चालू होता तो लढा तसा एकतर्फीच चालू होता बारा ते पधरा मोठे मासे कासवाच्या मानेवर आणि खालच्या नाजूक भागावर तुटून पडत होते डोक आणि पाय कवचाखाली घेऊन दिवसचे दिवस पडून राहणं कासवाला शक्य नव्हतं

तराफा कासवाच्या दृष्टीस पडताच सूर मारून ते आमच्या दिशेने येऊ लागल मागोमाग ते चमकणारे मासे होतेच कडेला येऊन लाकडाच्या आधारान वर येण्याचा प्रयत्न ते करू लागल तेवढ्यात, तिथेच उभे असलेल्या आमच्याकडे त्याचं लक्ष गेल आम्हाला सराव असता तर नुसत्या दोरानी आम्ही त्याला सहज पकडल असत ते आता तराफ्याच्या कडेकडेन सरकत होतं आम्ही बघण्याच्या नादात वेळ वाया घालवला जेव्हा त्याला पकडायचा प्रयत्न आम्ही सुरू केला तेव्हा ते कक्षेबाहेर निघून गेल होतं पण बेंट हा प्रमुख आचारी असल्यामुळे त्याच्या नजरेसमोर माशाच्या असख्य डिशेस आणि त्याहूनही चवदार असलेल कासवाच सूप तरळू लागल झटपट हर्मन, बेंट आणि टॉरस्टेन छोट्याशा रबरी होडीतून त्याचा पाठलाग करू लागले होडीचा वेग अपुरा पडला आणि शंभर यार्डावर कासव पाण्याखाली दिसेनास झाल पण त्यामुळे एक गोष्ट नक्कीच चांगली झाली ती छोटी पिवळी रबरी होडी नाचत नाचत परत आली तेव्हा डॉल्फिन माशाचा थवा तिच्या मागोमाग आला या नव्या 'कासवा' भोवती त्यानी फेर धरला काही धाडशी माशानी वल्ही ओरबाडण्याचा प्रयत्नही केला. त्या दरम्यान ते निरुपद्रवी, शांत स्वभावाच कासव त्याच्यावरील सकटातून यशस्वीपणे निसटल होत

सात

# निम्मा प्रवास पूर्ण

कित्येक आठवडे निघून गेले वाहत येणारी एखादी वस्तू किंवा एकही जहाज आम्हाला भेटलं नाही त्यामुळे माणूस दिसण्याचं चिन्ह नव्हतं सगळा समुद्र आमचाच होता सर्व दिशांना क्षितिजाची दारं मोकळी होती. खरीखुरी शांतता आणि स्वातंत्र्य जणू आम्ही स्वर्गातूनच खाली उतरलो होतो

आजूबाजूची खारी हवा आणि विशुद्ध निळा जलाशय यात न्हाऊन आमचं शरीर आणि आत्मा दोन्ही स्वच्छ झालं होतं तराफ्यावर आम्हाला सुधारलेल्या जगाचे प्रश्न अगदीच छोटे आणि भ्रामक वाटू लागले, मानवी मनाचे ते विकृत खेळ वाटू लागले फक्त पंचमहाभूतं महत्त्वाची आणि त्यांच्या दृष्टीनं तराफा यत्किंचित होता किंवा कदाचित एक नैसर्गिक वस्तू म्हणून त्यांनी आम्हाला तराफ्यासह स्वीकारलं असेल समुद्राची शांतता आणि लय यांचा भंग त्यामुळे होत नव्हता प्रवाह आणि समुद्राशी पक्षी किंवा माशा-प्रमाणे आम्ही जमवून घेतलं होतं सागर आमचा भीती-दायक शत्रू न बनता लाटांवरून वाहून नेणारा, पुढील काळात निश्चितपणे मदत करणारा विश्वासू मित्रच ठरला वारा आणि लाटा ढकलत असताना महासागराचा प्रवाह आम्हाला सावरत होता, आमच्या ध्येयाच्या दिशेनं थेट नेत होता

कोणत्याही दिवशी समुद्रात एखादं जहाज आमच्या मार्गात आलं असतं तर त्यातील लोकांना आम्ही शांतपणे वर-खाली होत, पांढऱ्या शुभ्र फेसाबरोबर पुढे जाताना दिसलो असतो व्यापारी वारे किरमिजी रंगाच्या शिडात भरून पॉलिनेशियाकडे नेताना दिसले असते

पुढच्या बाजूस एक करडी दाढी असलेला उघड्या अंगाचा माणूस लांबलचक वल्ह्याशी झगडताना किंवा शांत वातावरणात एखाद्या पेटीशी कडक उन्हात बसलेला दिसला असता

हा जर बेंट नसता तर दुसरा केबिनच्या दाराशी पोटावर पालथा पडून समाजशास्त्राच्या आपल्या ७३

पुस्तकांपैकी एक वाचताना दिसला असता बेंटला पुढे-पुढे आचारी नेमण्यात आलं त्याच्यावर रोजच्या जेवणाची जबाबदारी होती हर्मन दिवसा कोणत्याही वेळी डोलकाठी जवळ आपली मौसम विज्ञानाची उपकरणं घेऊन नोंदी घेताना किंवा डोळ्यावर पोहण्याचा गॉगल अडकवून तराफ्याखाली मधला कणा तपासायला गेला आहे असं समजावं तो आमच्यातील प्रमुख तज्ञ होता हवामान विषयक किंवा जलसशोधनातील सर्व निरीक्षण त्याच्यावर सोपवण्यात आली होती.

कनट आणि टॉरस्टेन बॅटरीशी काही तरी करताना नेहमी दिसत लोखंड आणि सर्किट जोडताना किंवा तसंच काहीतरी पाण्याच्या पृष्ठभागापासून एक फूटावर असलेलं छोटंस वायरलेस स्टेशन तुषार आणि दंवापासून वाचवण्यात त्यांचं युद्धकालीन प्रशिक्षण खर्ची पडत होतं रोज रात्री ते पाळीपाळीनं आमचे अहवाल आणि हवामान विषयक नोंदी सेटवरून संदेशरूपानं आकाशात सोडत वॉशिंग्टन मधील वेधशाळा आणि इतर हौशी रेडिओ तंत्रज्ञ ते संदेश पकडत एरिक बहुधा शीड शिवताना आणि दोर एकत्र जोडताना किंवा कागदावर दाढीवाल्या लोकांची आणि चित्रविचित्र माशांची रेखाचित्रे काढण्यात दंग झालेला दिसायचा आदल्या दिवसापासून प्रवास किती झाला हे बघण्यासाठी रोज दुपारी ठीक बारा वाजता अंतर मोजण्याचं उपकरण घेऊन बसलेला दिसायचा लॉग-बुक आणि रोजचा अहवाल लिहिण्याचं पुरसं काम माझ्याकडे होतं. त्याशिवाय सूक्ष्म जलजीव गोळा करणे, मासे पकडणे आणि फोटो घेणे प्रत्येकावर काहीना काही जबाबदारी होती, आणि एक दुसऱ्याच्या कामात कोणीही हस्तक्षेप करत नव्हतं त्रासदायक काम-वल्हवणे, स्वयंपाक करणे इत्यादी-सर्वांना पाळीपाळीनं करावी लागत दिवसा दोन तास आणि रात्री दोन तास प्रत्येकाला वल्हवावं लागे तराफ्यावर काही कायदे आणि नियम आम्ही केले होते रात्रीच्यावेळी जागं राहणाऱ्या माणसानं कमरेभोवती दोर गुंडाळून, खाद्य पदार्थ केबिन बाहेर खाणं आणि 'सकाळच्या कार्यक्रमांची जागा मागच्या टोकाला ओडक्यापाशी होती, तिथेच जाणे. एखादा महत्त्वाचा निर्णय घ्यायचा असेल तर इंडियन पद्धतीप्रमाणे आमसभा बोलावून सर्वांची चर्चा होई आणि नंतरच काय ते निश्चित केलं जाई.

दिवसाची सुरवात सामान्यपणे आदल्या रात्री डेक वर येऊन पडलेले मासे जेवणासाठी गोळा करण्यानं होई पॉलिनेशियाच्या किंवा पेरूतील त्यांच्या पूर्वजांच्या पद्धतीप्रमाणे आम्ही कच्चे मासे मात्र खात नव्हतो आम्ही ते स्टोव्हवर तळून घेत होतो प्रायमस स्टोव्ह ठेवलेली पेटी हेच आमचं किचन एकदा वारा आणि समुद्राच्या तांडवामुळे स्टोव्हच्या ज्वाला लाकडी पेटीत लागून सगळी पेटीच पेटली. आचाऱ्याला त्यावेळी नेमकी झोप लागली होती भडकलेल्या ज्वाला बांबूच्या केबिनला लागणार तेवढ्यात आम्ही त्या झटपट विझवल्या, पाण्यासाठी कॉन-टिकीपासून फार दूर जाण्याची गरज नव्हतीच

तळलेल्या माशाच्या वासानं घोरणारी मंडळी आपोआप जागी होत त्यासाठी फार कष्ट पडत नसत किंवा आचाऱ्याला 'नाष्टा तयार आहे!' असं जोरात ओरडाव लागे त्याचं किंचाळणं ऐकण्यापेक्षा झोपलेल्या लोकांना उठणं परवडे आसपास शार्क मासा नाही असं पाहून दिवसाच्या नित्यक्रमाला सुरवात होई

नानाप्रकारे बनलेल्या अन्नाला खूप शिव्या खाव्य लागत आम्ही त्याचा दर्जा दोन प्रकारे ठरवत असू एक विसाव्या शतकातलं, आणि दुसरं कॉन-टिकी खात होता त्या पाचव्या शतकातलं जेवणाचा पहिला प्रयोग टॉरस्टेन आणि बेंटवर करण्यात येई नंतर नंतर त्यांनी निघताना बरोबर आणलेल्या डब्यातील आणि इतर पदार्थांवर समाधान मानायचं ठरवलं तो सर्व साठा आम्ही बांबूच डेक आणि ओडके यामधल्या खळग्यात करून ठेवला होता काही काही वेळा त्यातून पदार्थ अदृश्य होत ताज्या माशांना पर्यायच नव्हता काही डबे रिकामे झाले की त्यात आम्ही नवीन 'माल' भरत असू पाण्यापासून त्या पदार्थांचं संरक्षण करणं, हे एक महत्त्वाचं काम होतं

कॉन-टिकीवर अशा रीतीनं खाण्याची ददाद नव्हती. जमिनीवरून निघताना एकतर भरपूर साठा घेतलेला होता आणि प्रवासात त्यामध्ये रोज भर पडत होती. सूर्यास्ताच्या दिशेनं आमचा प्रवास अखंड चालू होता.

दोन महिने झाल्यावर आमच्या लक्षात आलं की पिण्याचं पाणी खराब होऊ लागलं, त्याला वास येत होता. पण आम्ही महासागराच्या पहिल्या कमी पाऊस पडणाऱ्या टप्प्यातून पार झालो होतो आणि भरपूर

पावसाच्या भागात केव्हाच येऊन पोहोचलो होतो. त्यामुळे नवा साठा मिळण्याची शक्यता होतीच रोज आम्हाला खूप पाणी लागे त्यामानानं आमचं खाणं बरचं कमी होतं भूकेमुळे मृत्यू येणं तर अशक्यच होतं रोज स्नान करून तशाच ओल्या स्थितीत केबिन-मध्ये आरामात पडलं की पाणी पिण्याची आवश्यकता कमी भासे एखादा शार्क मासा दिमाखात आमच्या आजूबाजून फिरत असेल तर हातानं आणि पायानं दोर घट्ट पकडून तराफ्याच्या काठाला नुसतं पडून राहिलं की पॅसिफिकच्या स्फटिक–जलानं दर सेकंदाला स्नान घडे

(उष्णतेमुळे तहानेनं व्याकुळ झालं की कोणालाही असं वाटणं स्वाभाविक आहे—आपल्याला पाणी पिण्याची गरज आहे. वारंवार पाणी पिऊनही विशेष उपयोग न होता त्यामुळे पोटात नुसतीच भरती होते. कडक उन्हाच्या दिवसात उष्ण कटिबंधातील प्रदेशात तुम्ही घशात एकसारखं पाणी ओतत राहिला तरी तहान आपली कायमच राहते शरीराला त्यावेळी द्रव पदार्थांची खरी गरज नसते तर, आश्चर्य वाटेल पण मिठाची आम्ही बरोबर आणलेल्या साठ्यात, विशेषत उन्हाळ्याच्या दिवसात घेण्यासाठी मिठाच्या गोळ्या आणलेल्या होत्या कारण घामामुळे अंगातले क्षार कमी होत असतात आम्हाला तोच अनुभव प्रवासात आला वारा पडला की तळपणाऱ्या उन्हाचा आम्हाला खूप त्रास होई कितीही पाणी प्यायलं तरी तहान शमत नसे अशावेळी आमच्या ताज्या पाण्यात आम्ही २० ते ४० टक्के समुद्राचं खारं पाणी मिसळत असू विशेष म्हणजे त्या काळपट पाण्यामुळे आमची तहान भागत असे )नंतर बराच वेळ खारी चव जिभेवर रेंगाळत राही, पण त्याचं आम्हाला काहीच वाटत नसे. पाण्याचा साठाही त्यामुळे वाढल्यासारखा होई

(जुन्या पॉलिनेशियन लोकांकडे त्यावर परंपरागत उपाय होते त्यांचे पूर्वज जेव्हा समुद्रात फिरत तेव्हा एका विशिष्ट वनस्पतीची पानं ते चघळत, चावत त्यामुळे त्यांना तहानच लागत नसे. ते पान तोंडात धरलं की समुद्राचं पाणी सुद्धा तोंड वाकडं न करता पिता येत असे दक्षिण सागरीय बेटांवर तशी वनस्पती उगवत नसे, याचा अर्थ पूर्वजांची ती आधीच्या वसती-स्थानामधील देणगी होती नंतरच्या संशोधकांनी सिद्ध केलं की फक्त कोका वनस्पतीच्या पानात तशी शक्ती होती आणि ती वनस्पती फक्त पेरू प्रांतात उगवत असे एकेकाळी इन्का लोक कोकेन असलेल्या कोका पानांचा वापर सर्रास करीत असत. पर्वतमय प्रदेशातील दूर-दूरचे प्रवास आणि समुद्रातून लांब सफरींचे वेळी थकावट आणि तहान यांचा विसर पडावा म्हणून ते कोका पानाचा वापर करीत त्यासाठी ते बरोबर त्यांचे भारेच्या भारे घेऊन जात.) पण कॉन-टिकीवर आम्ही मात्र कोका पानाचा प्रयोग केला नाही.

जाता जाता सांगायचं तर पॉलिनेशियामध्ये रताळ्याची लागवड टिकीच्या काळातच करण्यात आली इतर कोणत्याही युरोपियन देशाआधी अमेरिकेत बटाट्याचं उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरू झालं होतं हे गोड बटाटे किंवा रताळी जुन्या काळापासून सफरी-मध्ये प्रमुख खाद्य पदार्थ म्हणून वापरली जात त्या बेटांवर रताळ्याला 'कुमारा' असं म्हणत. तराफ्यावर आम्ही भरपूर रताळी घेतली होती

त्या खालोखाल आमच्या बरोबर पॅसिफिकच्या इतिहासात महत्त्वपूर्ण भाग बजावणारा दुसरा एक पदार्थ घेतलेला होता दोनशे नारळ त्यांनी आमच्या दातांना व्यायाम ही दिला,आणि त्याच्या गोड पाण्यामुळे तरतरही कित्येक नारळांना कोंबही फुटू लागले होते. दहा आठवड्यानंतर एक फुटावर त्यांची उंची गेली, आणि जाड हिरवी पानं येऊ लागली नारळ कोलंबसाच्या आधीपासून उगवत होते पॅसिफिकच्या लांबलचक किनाऱ्यावर नारळाची हजारो झाडं उगवलेली दिसत

काही-काही वेळा, शांत दिवशी निळ्या सागरातून जात असताना पाण्यावर तरंगणाऱ्या पक्षाचे पांढरे पंख दिसत एखादा तसा पक्षी किंवा इतर समुद्र पक्षी समुद्राच्या पृष्ठभागावर ते झोप काढू शकत जमिनी-पासून हजार मैलापर्यंत जाण्याची शक्ती त्यांच्यात असते पंख उभारून ते वाऱ्याच्या गतीने पुढे पुढे तरंगत जात एकदा असेच तीन पक्षी आम्हाला दिसले त्यांच्या-पेक्षाही वेगानं जाणारा आमचा तराफा त्यांच्या दृष्टीस पडताच उडत-उडत ते कॉन-टिकीवर येऊन बसले. अशा रीतीनं तराफ्यावर फुकटच्या प्रवाशांची गर्दी वाढू लागली त्या पक्ष्यांची आमची लवकरच गट्टी जमली.

मासे आणि समुद्रपक्षी कोणत्या अन्नावर जगत असतील, असा प्रश्न पडू शकतो प्रवाहाबरोबर शेकडो मैल वाहत येणारे सूक्ष्म जलजीव अथवा वनस्पती हे त्याच उत्तर होत त्याशिवाय मासे आणि बारीक-सारीक प्राणी हे खाद्य होतच सूक्ष्म वनस्पती इतक्या लहान असतात, की पेलाभर पाण्यात हजारो आढळतात यावरून त्यांच्या अगणित संख्येची कल्पना येईल पुढेमागे माणसाला भुकेसाठी या पदार्थांचा वापर करावासा वाटेलही, जशी एकेकाळी धान्य उत्पादनाची कल्पना त्याच्या डोक्यात शिरली.

जीवशास्त्रज्ञ डॉ ए डी. बाजकोव्ह यांनी आम्हाला त्याबद्दल कल्पना दिली होती आणि एक रेशमी जाळही पाठवून दिलं होत त्याच्या दर चौरस इंचामध्ये तीन हजार सूक्ष्म जाळ्या (आडवे उभे धागे) होत्या. त्याचा आकार फनेल सारखा होता वरती गोल लोखंडी रिंग आणि खाली निमुळत होत गेलेल तराफ्याच्या मागील बाजूस आम्ही ते बांधून ठेवल होत त्यात अनेक प्रकारचे मासे तर मिळतच, शिवाय स्थळकाळाप्रमाणे इतर नमुनेही जलाशय कोमट होऊ लागला की शिकार कमी कमी मिळे रात्रीच्या वेळी मात्र मोठ्या प्रमाणात प्राप्ती होई सूर्य तळपू लागला म्हणजे असंख्य प्राणी पाण्यात खोलवर जाऊन बसत जाळ्यात अडकणारे जलजीव तराफ्यावर पसरून त्याकडे बघत बसणे, हा एक करमणुकीचा कार्यक्रम होता. इतके विविध आकार आणि रंग दिसत, की त्याला अंतच नव्हता त्यांचा वास आणि स्वरूप वाईट असे हे सर्व नमुने मी बरण्यातून आणि पिशव्यांमधून ठेवत होतो त्यांची चव आम्ही चाखूनही पाहात होतो फारशी वाईट नसायची पोषणाच्या दृष्टीने तर ते चांगलेच होते जगातील एक प्रचंड प्राणी व्हेल शार्कसुद्धा अशा जलजीवावर जगतो, यावरून त्यामधून किती कॅलरीज् शरीराला मिळत असतील, याचा विचार केलेला बरा

शार्क माशानी आम्हाला अनेक वेळा भेट दिली काही काही वेळा लहान व्हेल माशांचे थवेच्या थवे येत, पण बहुधा एखाद-दुसरा अजस्त्र प्राणीच अचानक उगवत असे एकदा तर तराफ्यापासून अवघ्या दोन फुटावर एक शार्क जोर जोरात श्वास घेताना दिसला मोठं विलक्षण दृष्य होत ते मोठ्या जहाजातून जाताना किंवा प्राणी संग्रहालयात ठेवलेला मासा बघण, आणि हाताच्या अंतरावर उभं असलेल जिवंत धूड बघण यात महदंतर होतं आतापर्यंत शार्क माशानी आम्हाला अनेक वेळा घाबरवल असल, तरी त्यांचा उपद्रव असा झाला नव्हता नाहीतर आमचा तराफा त्यांच्या शेपटीच्या एका फटकाऱ्यासरशी केव्हाच उध्वस्त झाला असता तराफ्यावर पडल्या पडल्या ओंडक्यांच्या फटीमधून स्वच्छ निळ्या पाण्यात इतरही रंगीबेरंगी असंख्य मासे दिसत

डॉल्फिन्स आणि पायलट मासे बहुधा तराफ्यावर तुटून पडत अर्थात त्यांच्या ताकदीप्रमाणे कॅलाओच्या प्रवाहाला लागल्यानंतर डॉल्फिन्स दिसले नाहीत, असा एकही दिवस गेला नाही त्यांना तराफ्याचं काय आकर्षण होत कुणास ठाऊक! कदाचित छताखालच्या सावलीतून पोहण्यामध्ये त्यांना जादू वाटत असावी किंवा ओंडक्यां-मधून दिसणारे निरनिराळे पदार्थ त्याना आकर्षित करत असतील. तराफ्यावर शेवाळं आणि काही सागरी वनस्पती उगवू लागल्या होत्या सर्व बाजूनी त्याची वाढ मोठ्या प्रमाणात होत होती.

काही दिवसानंतर तराफ्याच्या वरच्या भागात मुग्या दिसू लागल्या. ओंडक्यावर लहान काळ्या मुग्या फिरताना दिसत लाकडात पाणी जसजस मुरू लागल, तशा त्या मुग्या इकडे-तिकडे पसरू लागल्या झोपण्याच्या खोलीतही त्यांनी शिरकाव केला काही काळ त्यांचं प्रमाण इतक वाढल की आम्हालाच त्या तराफ्यावरून पिटाळून लावतात काय, अशी परिस्थिती निर्माण झाली परंतु तराफ्याचा ओलसरपणा वाढू लागला, तसतसा त्या कमी कमी झाल्या आम्ही मुक्कामाला पोहोचलो, तेव्हा तर अगदीच थोडया शिल्लक राहिल्या

डॉलफिन दोन प्रकारचे होते एक सुंदर रंग असलेला लहानसर आणि दुसरा छोट्या दाताचा पहिला साधारणपणे ३। फूटापासून ४।। फुटापर्यंत लांब असे पसरट शरीर आणि मोठ डोक एकदा तर ४ फूट ८ इंच लांबीचा व १३।। इंच डोक असलेला मासा आम्हाला मिळाला होता डॉलफिनचा रंग अतिशय सुंदर असतो पाण्यात तो निळसर हिरवा दिसतो, शिवाय त्यावर सोनेरी रंगाची चमक मधून-मधून आढळते तोच तराफ्यावर आला की रंग चंदेरी गडद होत, जाई आणि

हळूहळू काळे ठिपके अंगावर दिसत रंग अखेरीस सगळ्या भागात चांदीसारखा होऊन जाई चार–पाच मिनिटानंतर पाहावं तर पहिले रंग पुन्हा दिसू लागत. पाण्याखाली असताना सुद्धा डॉलफिनची रंग बदलण्याची करामत सुरू असे त्याचं तोंड वाजून एखाद्या बुलडॉग-प्रमाणे दिसे एखादवेळेस तराफ्यावर उडताना ते चावा घेत, परंतु अगदी क्वचित त्याच्या पोटात मात्र आख्खा उडता मासा किंवा तत्सम मासा सापडे उडता मासा हे त्याचं आवडतं खाद्य होतं

निदान सहा–सात डॉलफिन मासे तराफ्यामागोमाग किंवा खालून आले नाहीत, असं एकही दिवस नव्हता तीस–चाळीस जणांचा थवा सुद्धा काही कमी वेळा मागोमाग आला नाही ताज्या माशांची गरज निर्माण होई, तेव्हा हुकावर उडत्या माशाचं आमीष दाखवून आचारी २–३ डॉलफिन तरी सहज पैदा करत असे ताजेपणी त्यांचं मांस खूपच रुचकर लागे हे मासे दोन दिवस सहज टिकत अधिक टिकण्याची गरजच नव्हती, महासागरात त्यांची बिलकुल कमतरता नव्हती

शार्क माशाची भेटही जवळ–जवळ रोज ठरल्या-सारखी होती पायलट मासे त्यांच्या आगमनाची खबर देत शार्क तराफ्याची टेहळणी करत काही भक्ष्य पदरात पडेल काय याचा अदाज घेत उसळत्या लाटांबरोबर काहीकाही वेळा ते आमच्या पातळीहून उंचावर जात त्यामुळे त्यांच्या विशाल शरीराचं आम्हाला पूर्ण दर्शन घडे

सुरुवातीच्या काळात आम्हाला शार्क माशाबद्दल अतिशय आदर वाटत होता. एकतर त्याच्याबद्दलचा दबदबा आणि थरारक उपस्थिती प्रचंड ताकद, जवाढव्य शरीर अघाशी भूक आणि फुटबॉलही सहज गिळता येईल एवढा विशाल जबडा 'शार्क' अशी आरोळी एखाद्यानं ठोकली की आम्ही सगळे हारपून, भाले घेऊन तराफ्याच्या कडेला जमायचे. कितीही जोरात हारपून फेकलं तरी त्याच्या जाड कातडीत ते खोल घुसत नसे. शार्क जवळ असताना आसपासचं पाणी जणू उकळत असे तो पसार झाल्यावर पृष्ठ-भागावर तेलाचा तवंग शिल्लक राही त्याला किंचित इजा झाली असेल तर

तरीही आम्ही बऱ्याच शार्क माशाची शिकार केली निळ्या आणि करड्या रंगाचे शार्क–सहा ते दहा फुटी याहून मोठ्या माशाच्या वाट्याला मात्र आम्ही गेलो नाही डॉलफिनचं आमीष दाखवून त्याला हळूहळू तराफ्यावर यायला लावायचं आणि आमची शस्त्र व जोडीला दोराच्या साहाय्यानं त्याला एका जागी बांधून ठेवायचं अशा अनेक प्रयोगानंतर आमच्या लक्षात आलं की आल्या प्रचंड शक्तीचा वापर त्यानी कधीच केला नव्हता अर्थात हे आमचं सुदैव! शार्कच्या अंगावर वास्तव्य करणारे छोटे छोटे रेमोरा किंवा अन्य मासे, आपला धनी बराच काळ पाण्यात शिरत नाही असं पाहून, नव्या मालकाच्या शोधार्थ पलायन करीत.

पॅसिफिकमधून 'कॉन–टिकी' चा एखाद्या सागर सम्राटाप्रमाणे मुक्त संचार चालू होता

निघताना तज्ञ लोकांनी ऑक्टोपसपासून काळजी घ्यायला सांगितलं होतं रात्रीच्या वेळी ते तराफ्यावर येण्याची शक्यता होती नॅशनल जिऑग्राफिकल सोसायटी मध्ये आम्ही त्यांच्याबद्दलचे रिपोर्टस् वाचले होते. कित्येक फोटोही बघायला मिळालेले होते. माशाच्या आमीषाला बळी पडून एखादा विषारी ऑक्टोपस हूकमध्ये अडकला तर त्यांचा दुसरा साथीदार मित्राचेच लचके तोडायला कमी करत नाही, असं आम्ही ऐकलं होतं त्याचे हात मोठ्या शार्कला आवळू शकतील इतके लांब असत व्हेलच्या पाठीवर त्यामुळे जखमा होत रात्रीच्या वेळी मानेभोवती त्याचा असा विळखा बसावा, हे कोणाला आवडेल! त्यामुळे झोपताना प्रत्येकाजवळ एक धारदार चाकू ठेवलेला असे विशेषतः हमबोल्टच्या प्रवाहात ऑक्टोपसची भीती होती

पण कित्येक दिवस ह्या प्राण्याची निशाणी दिसली नाही तराफ्यावर नाहीच, शिवाय पाण्यातही तो कधी उगवला नाही एक दिवस सकाळी मात्र त्यांची चिन्ह दिसू लागली आठ हात असलेला लहानसा प्राणी एका ओंडक्यावर बसलेला दिसला हाताच्या मधल्या बोटा-एवढ्या जाडीचा एकेक हात होता तो चिरडल्यावर त्यातून शाई सारखं काळं द्रव्य बाहेर पडलं आमच्या वहीत आम्ही त्यानं लिहिलं सुद्धा आणि अशी लहान लहान पिल्लं वारंवार तराफ्यावर येऊ लागली पण दोन महिन्यापर्यंत मोठा ऑक्टोपस् कधीच तराफ्यावर का आला नाही याचं कोडं मात्र कधीच उलगडलं नाही ज्या भागात त्यांचं भय होतं तो आम्ही जवळ जवळ ओलांडला सुद्धा

लहान लहान पिल्लं काही दिवस तराफ्यावर येतच राहिली एका दिवशी, सकाळी स्वच्छ सूर्यप्रकाशात पाण्याबाहेर काहीतरी चमकल्यासारखं उंच उडालेलं दिसलं त्याजागी डॉलफिन्सनी पाठलाग करत एकच गर्दी केली आम्हाला आधी वाटलं, की ते उडते मासेच असावेत कारण त्या वेळपर्यंत तसले तीन प्रकारचे मासे आम्ही पकडले होते. जवळ आल्यावर त्यातला एक प्राणी चार पाच फूट उडी मारून बेंटच्या छातीवर आदळला ते दहा हात असलेलं छोटसं पिल्लूच होतं हवाई रॉकेटच्या तत्वावर त्याचं उड्डाण होत, हे आम्हाला आधीच ठाऊक होतं

परंतु दरखेपेला ओळखीचे प्राणीच वाटेत दिसत असं मात्र नाही दैनंदिनीत अशा स्वरूपाच्या नोंदीसुद्धा होत असत

११।५–तराफ्याच्या कडेला बसून जेवण करीत असताना बाजूला दोन वेळा एक मोठा जलचर पृष्ठभागावर आलेला दिसला पाण्यावर जोरदार फटकारे मारून तो अदृष्य झाला

त्याच्याविषयी आम्हाला काहीही माहिती नाही

६।६– हर्मनला एक जाडजूड गडद रंगाचा मासा दिसला आखूड शेपटी, पांढरी पाठ आणि खवले त्यानं कित्येक उड्या मारल्या.

१६।६–आज एक चमत्कारिक मासा दिसला ६ फूट लांब, जास्तीतजास्त रुंदी एक फूट, करडा रंग, मोठे कल्ले, हुकासारखी शेपटी मी आणि हर्मन रबरी नावेतून हारपून घेऊन जाताच सूर मारून अदृश्य थोड्या वेळाने पुन्हा दिसला पण लगेच अदृश्य झाला

दुसरा दिवस दुपारी बाराच्या सुमारास एरिक डोलकाठीजवळ बसला असतांना काळ्यासारखे ३०।४० करड्या रंगाचे मासे दिसले एखाद्या सावलीसारखे सरकत सरकत ते मागील बाजूला दिसेनासे झाले

१८।६–बनट्ला सापासारखा एक प्राणी दिसला २ ते ३ फूट लांब आणि लहानसर. पृष्ठभागाखाली आणि वर असा तो उभा होता नंतर सापासारखाच वळवळत पाण्यात शिरला

कित्येक वेळा स्वच्छ जलाशयात खोलवर सपाट जमिनीसारखा किंवा विस्तीर्ण खडकासारखा निश्चल पृष्ठभाग दृष्टीस पडे पाण्याखाली सूर मारून आम्ही त्याचा अंदाज घेण्याचा प्रयत्न काही वेळा केला पण अगदी जवळ जाण्याचा धोका मात्र आम्ही पत्करला नाही त्याची हालचाल होत नसली तरी एखादा अनोळखी भीमकाय प्राणी असण्याची शक्यता नाकरता येत नव्हती

अशा साथीदाराच्या समवेत प्रवास करताना वेळ कसाही निघून जायचा तराफ्याखाली बुडी मारून जेव्हा दोर तपासावे लागत तेव्हा मात्र वाईट परिस्थिती असायची एकदा मधली एक फळीच सैल झाली आणि खालच्या दोरावर कशीबशी पेलली गेली हर्मन आणि बनट उत्तम पोहणारे होते हर्मनने दोन वेळा पाण्याखाली जाऊन दोर घट्ट करण्याची खटपट केली श्वास घेण्यासाठी तो तराफ्याच्या काठावर येऊन बसला, तेवढ्यात एक आठ फुटी शार्क त्याच्या पायापासून अवघ्या दहा–बारा फुटावर अवतीर्ण झाला त्याचा उद्देश गैर असावा असं समजून आम्ही त्याच्यावर अन्यायच केला, त्या शार्कच्या डोक्यावर हारपून फेकलं. पाण्यात प्रचंड खळबळ माजली आणि तो अदृष्य झाला पृष्ठभागावर फक्त तेलाचा तवंग नेहमी प्रमाणे आला फळी बांधण्याचं काम तसंच अर्धवट पडलं

त्यातूनच एरिकच्या डोक्यात कल्पना आली पाण्याखाली जाण्यासाठी एखादी बास्केट तयार करावी आमच्याकडे साहित्याची कमतरता होती, पण बांबू दोर आणि नारळ ठेवलेली एक जुनी बास्केट होती दोराच्या साहृयानं, बांबूचा वापर करून आम्ही ती बास्केट वरच्या बाजूस वाढवली त्यात बसून तराफ्याच्या बाजून पाण्याखाली जाणं सोपं झालं आता कोणतही संकट आलं तरी वरच्या लोकांना बास्केटला लावलेला दोर हलवून सूचना देता येत होती त्यामुळे घाईघाईने वर ओढून घेणं शक्य झालं होतं या बास्केटचा आम्हाला उपयोग तर झालाच पण करमणुकीचं एक साधन म्हणून तिचा जास्त वापर झाला तराफ्याखाली वाहत

जाणाऱ्या जलजीवांचं निरीक्षण त्यामध्ये बसून करणं अधिक सुकर झालं होतं

जलाशय शांत असताना आम्ही एक एक करून बास्केटमधून खाली जात असू. जितका वेळ श्वास कोंडून ठेवता येई, तेवढा वेळ एका खेपेला पाण्याखाली राहणं शक्य होतं. पाण्याखाली डोळे उघडे ठेवून फिरायला आम्ही सरावलो होतो. तराफ्याचा तळ आणि पाण्याखाली होणारं प्रकाशाचं वक्रीभवन बघणं विलोभनीय होतं. सर्व तराफ्याभोवती आणि वल्ह्यावर पाणवनस्पती उगवल्या होत्या. झेब्र्यासारखे पट्टे अंगावर असलेले पायलट मासे मजेत फिरताना दिसत. मोठे डॉलफिन अवस्थ असल्याप्रमाणे, जोरजोरात वळणं घेत भक्ष्याच्या शोधात हिंडत. ओंडक्यामधील फटीतून खाली येणारा प्रकाश सुंदर दिसे. कडक उन्हाची सवय झाल्यामुळे पाण्याखाली गेल्यावर खूप सुखद वाटे. समुद्र-तळाचा थांग लागणं शक्यच नव्हतं, परंतु पृष्ठभागाखाली गेल्यावर स्वच्छ-स्वच्छ निळ्या जलाशयातून खूप खोलीवर इतस्तत वावरणारे मासे स्पष्ट दिसत. त्या सगळ्यांच्या जाती आम्हाला ठाऊकच नव्हत्या. समुद्रामध्ये सर्वत्र माशांचा असाच संचार होता, की आम्हाला काही दिवस कंपनी देण्यासाठी 'कॉन-टिकी' खाली असंख्य मासे एकत्र आले होते, असा सर्वांना प्रश्न पडला.

आठ

# सागरी जीवनाशी एकरूप

महासागरात आम्ही जसजसे अधिक आंत जात राहिलो, तस आम्हाला आपल्या घरी असल्यासारख वाटू लागल आश्चर्य, भीती या गोष्टी कमी कमी होत गेल्या. सागराविषयी विलक्षण आपलेपणा आम्हाला वाटू लागला सागराशी सुसंवाद प्रस्थापित करणाऱ्या जुन्या रानटी लोकांबद्दल अतिशय आदर आमच्या मनात निर्माण झाला त्यांना पॅसिफिकचा परिचय एका वेगळ्या भूमिकेतून झाला असणार. आता आम्ही पाण्यात मीठाच प्रमाण किती, माशांची नांवं आणि प्रकार यांची तपशीलवार यादी वगैरे गोष्टी करू शकत असू हे खरं त्यानी हें केलं नव्हतं, पण तरी मला असं वाटतं की आमच्यापेक्षा त्यांनाच सागराच खर दर्शन झालं असणार !

या ठिकाणी महासागरात निश्चित अशा फारशा खुणा नव्हत्या. लाटा आणि मासे, सूर्य आणि तारे एका पाठोपाठ येत आणि जात पेरु आणि दक्षिण सागरीय बेटें यांमधील ४३०० मैलांत कुठल्याही प्रकारची जमीन लागण्याचा संभव नव्हता म्हणूनच एका गोष्टीच आम्हाला प्रचंड आश्चर्य वाटल, आम्ही १०० अंश पश्चिमेला असताना नकाशात पाहिल तर त्यात मोठे मोठे खडक दाखवले होते एक लहानसा गोल तेथे करून त्याचं अस्तित्व दाखवल होतं या पुस्तकात पुढील उल्लेख आला होता जलप्रवाशांकरिता सूचना १९०६ साली आणि पुन्हा १९२६ मध्ये गॅलापेगॉस बेटाच्या नैऋत्येस ६०० मैलावर ( ६४२ द अक्षांश, ९९ ४३ प. रेखांश) मोठे खडक आढळल्याची नोंद झालेली आहे १९२५ साली या ठिकाणाहून पश्चिमेला अवघ्या एका मैलावरून एक स्टीमर जात असताना खडकांची निशाणी दिसली नाही तसेच १९३४ मध्ये दक्षिणेकडे एका मैलावरून जाणाऱ्या बोटीला तें दिसले नाहीत १९३५ साली याच ठिकाणी एका मोटार बोटीला १००० फुटापर्यंत तळ आढळला नाही

अलिकडे प्रसिद्ध झालेल्या नकाशात ते ठिकाण अजूनही वादग्रस्त म्हणून स्पष्टपणे दाखवलेलं होतं तेथून जहाज जाणं धोक्याचं होतं, कारण पाण्याखाली ज्याचा बराच भाग बुडाला आहे, अशा वेगात असणाऱ्या जहाजाच्या ठिकऱ्या होण्याचा संभव असतो पण आमचा तराफा असल्यामुळे ती भीती नव्हती म्हणून आम्ही सरळ त्या ठिकाणी जाऊन तिथे काय दिसतं, हे बघायचं ठरवलं त्यासाठी थोडं उत्तरेला जाणं आवश्यक होतं नेहमीपेक्षा लाटांचे तडाखे हळूहळू अधिक जाणवू लागले पण हवाही विशेष ताजीतवानी आणि उत्साहवर्धक होऊ लागली वारा अनुकूल होता दोन दिवस आणि रात्री आम्ही तराफा उत्तर–वायव्येला नेत राहिलो उसळत्या लाटांबरोबर आम्ही सुखरूपपणे वर–खाली होत होतो. लाटा दोन बाजूनी उफाळत एकमेकावर धावून यायच्या, तेव्हा बांबूच्या केबिनवरही सहा–सहा फूट पाणी उडे बेभरवशी व्यापारी वाऱ्यांमुळे आम्हाला शीडाची आणि डोलकाठीची फारच काळजी लागली होती निरनिराळ्या पेट्या केबिनच्या दाराशी रचून आम्ही रात्री झोप घेण्याचा प्रयत्न करीत असू दुसऱ्या रात्री, नुकतीच पेंग येत असताना कडाड, कडाड, आवाज होऊन एका भिंतीचे बांबू मोडले, त्याबरोबर निर्माण झालेल्या असंख्य फटी-मधून पाण्याची कारंजी पदार्थ साठ्यांवर आणि अर्थातच आमच्यावर येऊन आदळली

'प्लंबरला फोन करा,' कोणीतरी झोपेत बरळलं आत आलेलं पाणी जमिनीवरून बाहेर वाहून जावं म्हणून आम्ही खटपट सुरू केली प्लंबर आलाच नाही, आणि आमच्या बिछान्यात त्या रात्री पडल्यापडल्या स्नान करण्याइतकं पाणी साठलं एक मोठा डॉल्फिन मासा तराफ्यावर प्रत्यक्ष आलेला हर्मनला त्यावेळी सहजच दिसला

दुसऱ्या दिवशी समुद्र फार खवळला नाही, कारण व्यापारी वाऱ्यांनी आमच्यावर कृपा करायचं ठरवलं होतं दुपारी आम्हाला हवं ते ठिकाण लागण्याचा संभव होता वातावरण अनुकूल असल्यामुळे आमच्यावरचा ताण आपोआपच कमी झाला आम्ही त्या दिवशी अधिक उत्तेजित झालो होतो

आम्हाला अधूनमधून आकाशात पक्षी उडताना दिसू लागले त्याप्रकारचे पक्षी दिसणं याचा अर्थ जवळपास जमीन असण्याची शक्यता त्यामुळे आमचा आशावाद बराच वाढला

'बहुधा पाण्यावर डोकवणारा खडक किंवा वाळूचा किनारा असावा,' कोणीतरी म्हणालं सर्वात आशावादी असलेला एक मित्र विचार करू लागला समजा हिरव्यागार गवतानं आणि वनस्पतींनी डोलणारं छोटंसं बेट लागलं तर–या ठिकाणी पूर्वी कोण केव्हा आलं होतं हे कळायला काहीच मार्ग नाही म्हणजेच आपण नवी जमीन शोधून काढली असं होईल. कॉन–टिकी बेट!'

दुपारपासून एरिक आपल्या उपकरणांसह निश्चित स्थिती शोधण्याच्या खटपटीत होता संध्याकाळी ६–२० ला त्यानं सांगितलं की आम्ही ६ अंश ४२ मिनिटं अक्षांश दक्षिण आणि ९९ अंश ४२ मिनिट रेखांश पश्चिम या ठिकाणी होतो याचा अर्थ नकाशात दाखवलेल्या खडकापासून फक्त १ मैल पूर्वेला आम्ही होतो म्हणून शीड उतरवण्यात आलं वारा पूर्वेकडेच वाहात असल्यामुळे तो आम्हाला सावकाश त्या ठिकाणी नेणार, यात शंका नव्हती सूर्य सागरात बुडाल्यावर पौर्णिमेचा चंद्र लगेच उगवला त्याच्या तेजामुळे त्या क्षितीजापासून या क्षितीजापर्यंत पाण्याचा पृष्ठभाग उजळून निघाला सर्वत्र लाटांच्या रांगा उसळताना दिसत होत्या खडकांची निशाणी कुठेच दिसत नव्हती सर्वजण अतिशय उत्सुकतेनं उभे होते आणि दोन–तीन मित्र एकदम कामाला लागले आम्ही नकाशातील खुणेच्या जागी मध्यावर येऊन पोहोचलो होतो रेशमी दोऱ्याची ५४ रीळं एकत्र जुळवून आम्ही टोकाला एक जड वस्तू लावून दोर पाण्यात सोडला सुमारे २४०० फूट खाली जाऊनही तळ काही लागला नाही जवळ चारी बाजूनी आम्ही अशीच तपासणी केली पण तळाचा ठावठिकाणा लागला नाही त्या भागाचा सर्व्हे पूर्ण झाला असं निश्चितपणे म्हणायला हरकत नव्हती, म्हणून आम्ही शीड पहिल्यासारखं उभारलं सर्व काही जागच्या जागी ठेवून झाल्यावर कॉन–टिकी वेगात पुढे जाऊ लागला आता जेवण करून झोपायला हरकत नव्हती समुद्र कितीही खवळला तरी त्याची आम्हाला पर्वा नव्हती वल्हवण्याचा कार्यक्रम नेहमीप्रमाणे चालूच होता

अजून बराच टप्पा पार करावयाचा होता समुद्रात शिरल्यापासूनचा तो पचेचाळीसवा दिवस होता पेरूचा किनारा आणि लागणारं पहिले बेट यांच्या बरोबर मध्यावर आम्ही होतो पूर्वेला दोन हजार मैलांवर दक्षिण अमेरिका आणि तेवढ्याच अंतरावर पश्चिमेला पॉलिनेशिया, गॅलापेगॉस बेट पूर्व आणि ईशान्येच्यामध्ये आणि इस्टर बेट दक्षिणेला ती दोन्ही किमान ५०० मैलांवर होती एकही जहाज अद्याप दिसल नव्हतं तशी शक्यताच नव्हती, कारण पॅसिफिकमधल्या कोणत्याही जहाजमार्गापासून आम्ही कित्येक मैल दूर येऊन पोहोचलो होतो

पण त्या प्रचंड अंतराच आम्हाला विशेष काहीच वाटत नव्हत, कारण आम्ही पुढे सरकत असताना क्षितिजही नकळत आमच्याबरोबर येत होत आमच स्वत चं तरगत जग नेहमीचंच राहिल होत मध्यावर तराफा आणि डोक्यावर तेच गोलाकार आकाश आणि रात्रीमागून रात्री तेच तारांगण आमच्यासह पुढे पुढे सरकत होत

समुद्र जेव्हा फार खवळलेला नसे तेव्हा आम्ही छोटी रबरी होडी घेऊन बाहेर पडत असू त्यावेळी भरपूर चित्रे घेण्यात येत प्रथम जेव्हा दोघेजण असे बाहेर पडले, तेव्हा त्यांना इतका आनंद झाला होता की ते मोठ्यान हसायलाच लागले काही–काही वेळा त्यांची होडी अदृश्य होई, तराफा पुन्हा दिसला म्हणजे त्यांनी दणाणून केलेल हास्य पॅसिफिकमध्ये वाऱ्यासह घुमत राही त्याना वेड तर लागल नाही ना, असं वाटे प्रत्येकान तो अनुभव वारंवार घेतला मलाही डोळ्यातून पाणी येईपर्यंत हसू आल होत

कारणही तसच होत, जोवर आमच्या तराफ्याकडे आम्ही दुरुन दृष्टिक्षेप टाकत नव्हतो, तोपर्यंत एकाकी पडलेल्या आम्हाला अथांग महासागरात समोर काही-तरी दिसल म्हणजे कोणत्या भावना उचबळून येतील याची कल्पना करण शक्यच नव्हत लाटेबरोबर कॉन-टिकी दिसेनासा होई आणि नतर प्रथम केबिनच छत दिसे मागाहून उन्हामुळे काळवडलेले, दाढ्या वाढलेले लोक दिसत पाण्याच्या भिंतीबरोबर तराफा नष्ट झाला असे वाटे पण पुढच्याच क्षणी शीड, डोलकाठी, त्यावरचे लोक हे सगळ काही सुस्थितीत आहे हे लक्षात येई एकूण दृश्य फारसं चागल नसे, त्यामुळे आतापर्यंत सर्व काही सुरळीतपणे कसं काय पार पडल याच आम्हाला आश्चर्य वाटे

एकदा असेच आम्ही दोघंजण तराफ्यापासून बरेच दूर गेलो अचानक वारा जोरात वाहू लागला- आणि कॉन-टिकी अनपेक्षीत अशा वेगानं पश्चिमेकडे जाऊ लागला आमची लहानग्या वल्हान त्याला गाठायची धडपड चालू होती त्यावेळी प्रत्येकाच्या मनात विचार आला की एकमेकापासून कधीही अलग होता कामा नये आम्ही जेव्हा तराफ्यावर पुन्हा आलो तेव्हा सर्वांना हायस वाटल, आपल्या घरी आल्याइतका आनंद झाला

या दिवसापासून नियमच करण्यात आला की तराफ्याला घट्ट दोर बांधून त्याच लांब टोक होडीतल्या माणसान पकडायच, म्हणजे गरज पडली तर होडी तराफ्यावरील लोकाना खेचून घेता येणं शक्य होणार होत जलाशय अगदी शात असेल अशा वेळी क्वचित रबरी होडी स्वतत्रपणे दूर जाई तेव्हा एखाद्या वेळेस एकाकीपणाची भावना फार उफाळून येई अस वाटे की आपण अवकाशात अधातरी अडकलेलो आहोत, आमच जग पूर्णपणे रिकामं आणि निळं आहे, कोठेही स्थिर बिंदू त्यात नाही, फक्त तेजस्वी सूर्य आणि त्याचे उबदार, कडक किरण । तराफा पुन्हा गाठला म्हणजे मोठा आधार वाटे, सुरक्षित वाटे

बांबूच केबिन १४ फूट लांब आणि ८ फूट रुद होत वारा किंवा समुद्राचा त्यावर परिणाम होऊ नये म्हणून त्याची उंची एवढी कमी ठेवली होती की आत सरळ उभ राहण शक्यच नव्हतं तरीही एकदा सरपटत आत गेल म्हणजे पूर्णपणे सुरक्षित असल्यासारख वाटे तराफ्यावरील तो भाग त्यातल्या त्यात कोरडा असे कोणत्याही परिस्थितीत बालसा ओडके न डगमगता पृष्ठभागावर स्थिरपणे तरंगत असल्यामुळे चिंतेच कारण नव्हतं आम्ही जसजसे दूर गेलो तसे अधिकाअधिक निर्धास्त झालो म्हणूनच केबिनच्या भिंती हे आम्हाला सरक्षक कवचच वाटे एकदा जमिनीवर अंग टाकलं की झावळ्यांनी शाकारलेले छत बघताना, जोडीला बाबूंचा वास नाकात शिरत असल्यामुळे एखाद्या जगलातील झोपडीची भावना निर्माण होई

तरीही, काही वेळा तराफ्याकडे नजर टाकण्यासाठी आम्ही रात्रीचे वेळी रबरी होडीतून बाहेर पडत असू सर्व बाजूनी काळंभोर पाणी उसळताना दिसे. आकाशात

चमचमणाऱ्या ताऱ्याच अस्पष्ट प्रतिबिंब पाण्यात पडलेलं दिसे जग अगदी साधं-सरळ होत, अंधारातील असंख्य तारे इ स १९४७ काय किंवा ख्रिस्त पूर्व १९४७ काय त्याला काही महत्वच नव्हत आम्ही एक वेगळ जीवन जगत होतो, आणि ते अगदी उत्कटपणे जागृत राहून आमच्या ध्यानात आलं की यांत्रिक युगापूर्वीही मानव वंश अस्तित्वात होताच आणि आधुनिक माणसापेक्षा त्याकाळच जीवन कितीतरी प्रकारे अधिक समृद्ध होत काळ आणि उत्क्रांती याच अस्तित्व जणू काही थांबल होत जे काही सत्य होतं आणि आज जाणवत होत, ते पूर्वापार तसंच होतं आणि तसच पुढे चालत राहणार होतं इतिहासाच परिमाण कुचकामी ठरत होत वर अगणित तारे, खाली अखंड जलाशय त्यातच कॉन-टिकी मस्तीमध्ये सचार करत होता हे एखाद्या परिकथेप्रमाणे भासत होतं, वास्तव नव्हेच.

इन्का इंडियन असेच बालसा तराफ्यावरून जमिनीच्या शोधात आले असतील गॅलापेगॉस बेटाचा शोध असाच लागला होता शेकडो वर्षांपूर्वी कॉन टिकी असाच निघाला आणि पॉलिनेशियन बेटांवर आपल्या शेकडो अनुयायांसह स्थायिक झाला तिथून परत फिरण्याचा प्रश्नच नव्हता

बांबूच्या डेकवर लावलेल्या पॅरॉफिनच्या दिव्याभोवती गोल करून बऱ्याच वेळा रात्री आम्ही बसत असू सुमारे १५०० वर्षांपूर्वी पेरूहून निघालेल्या जलप्रवाशांनाही आमच्यासारखेच अनुभव आले असतील, या विषयावर आम्ही बोलायचो दिव्यामुळे शिडावर दाढीवाल्या माणसांच्या मोठमोठ्या सावल्या पडायच्या त्यामुळे एक गूढ वातावरण निर्माण होत असे याच मार्गाने पूर्वेकडील कितीतरी इंडियन संस्कृती निरनिराळ्या बेटावर पसरल्या असतील त्याचे नानाविध पुरावे संशोधकाना मिळू लागले होते--मिळत होते

पेरू ते इस्टर बेट हे जेवढ अतर आहे तेवढा पल्ला निम्म्या प्रवासात आम्ही गाठला होता दक्षिणेला जुन्या काळीच सापडलेली बरीच बेटं होती. पेरूच्या किनाऱ्यावरून निघताना आम्ही वारे आणि प्रवाहाचा वेग याचा विचार केला होता सुदैवानं आम्ही समुद्रात भलत्याच दिशेला भरकटलो नव्हतो.

आम्ही ११० अंश पश्चिम ओलांडल्यावर पॉलिनेशियन महासागराच्या हद्दीत प्रवेश केला होता आमची अंत करणं उचंबळून येत होती उद्दिष्ट पुर होत आलं होतं

इस्टर बेटाचा शोध युरोपियन संशोधकांना १७२२ मध्ये लागला त्यांना तिथे सुसंस्कृत लोक आढळले होते दगडात कोरलेले त्यांच्या पूर्वजाचे, नेत्यांचे पुतळे आढळले होते दोन-दोन तीन-तीन मजल्याएवढं उंच शिल्पकाम ते करू शकले, याचा अर्थ ती कला त्यांना आधीपासून अवगत असली पाहिजे आजच्या स्थापत्य शास्त्रज्ञांनी तोंडात बोट घालावी एवढ ज्ञान शकडो वर्षांपूर्वी त्या लोकांना अवगत असलं पाहिजे दक्षिण सागरीय बेटावर आढळणारे निरनिराळे पुरावे गोळा करून त्यांचा समन्वय साधला तर या रहस्याची पूर्ण उकल झाल्याशिवाय राहणार नाही

इस्टर बेट हे पॅसिफिकमधील एक प्रगत सास्कृतिक केंद्र होत, तसच ते आजही आहे किनाऱ्यावर सर्व बाजूनी आढळणाऱ्या निशाण्यांवरून-होड्या, तराफे इ ना उपयुक्त असे धक्के वगैरे-हे बेट एखाद्या बुडलेल्या अखंड देशाचा वर राहिलेला भाग नाही हे सिद्ध होत

अपुऱ्या राहिलेल्या शिल्पातील आकृतीवरून कशा पद्धतीन ते काम होत असेल याची कल्पना येते. साठसाठ फुटी पुतळे हा एक चमत्कारच नव्हे काय ? पूर्ण झालेले अजस्र पुतळे एका ठिकाणाहून दुसरीकडे नेण्यात येत अशी वाहतुक हे मोठ रहस्यच आहे, पण ते नाकारता येत नाही त्या काळच्या प्रगत विज्ञानाची साक्षच त्यावरून मिळते पेरूमध्ये आढळणाऱ्या भग्न अवशेषात आणि इथल्या शिल्पकामात विलक्षण साम्य आहे अशा कामाला दीर्घकाळ लागत असला तरी काही तज्ञ कामगार पुरेसे असत याउलट पुतळ्याची वाहतूक जलद होत असे,पण त्यासाठी असख्य लोकांची आवश्यकता लागे.

या बेटावर शास्त्रशुद्ध शेतीसुद्धा होत असे शिवाय माशांची कमतरता नव्हती रताळ्याची लागवण येथे मोठ्या प्रमाणावर होत असे. जाणकाराचे मत असं आहे की 'सात ते आठ हजार वस्तीला सहज पुरेल एवढ उत्पादन एकेकाळी त्या ठिकाणी होत असावं एखादा प्रचंड पुतळा आडव्याचा उभा करण्यासाठी हजार लोक आणि तो वाहून नेण्यासाठी ५०० लोक पुरेसे होत असावेत ' हे तत्र निश्चितच गौरवास्पद आहे जुन्या संस्कृतींना आपण कमी लेखण सोडून द्यायला हव

पण त्यांना हे पुतळे उभारण्याच मुळात कारणच काय ? आणि ते चार-चार मैल ओढत नेऊन मस्तक बनवण्यासाठी खास लाल रंगाचा दगड निवडण्याची गरजही का ? दक्षिण अमेरिका आणि मारक्वेसस बेटांवर सपूर्ण पुतळे सारखे होते लाल केशभूषा हे पॉलिनेशिया आणि पेरू या दोन्ही देशांत उच्च अधिकार दर्शवण्याच प्रतीक होतं

हे पुतळे कोणाच प्रतिनिधित्व करतात हे आधी पाहू या बेटांना युरोपियन लोकानी प्रथम भेट दिली तेव्हा त्यांना किनाऱ्यावर " गोरे लोक " दिसले होते विशेष म्हणजे त्यांना लांब दाढ्या होत्या त्या बेटावर स्थानिक झालेल्या सुरवातीच्या लोकाचे ते वशज होते तेथील रहिवासी असं सांगत की त्यांचे काही पूर्वज गोरे होते तर काही काळे पूर्वेकडून असख्य तराफ्यांवरून पळून आलेले लोक सत्तावन्न पिढ्यांपूर्वी स्थायिक झाले होते. आणि शेवटची तुकडी बावीस पिढ्यांपूर्वी आली

जिकडे तिकडे, एकही वृक्ष नसलेल्या त्या बेटावर, प्रचड मानवी आकृती आकाशात झेपावताना दिसतात त्यांची उची किमान तीन ते चार मजल्याच्या घराएवढी असते आधुनिक तंत्र आणि तज्ज्ञ ही जुनी कला पाहून थक्क होतात काळावर मात करून टिकून राहिलेले हे अवशेष पाहिल्यावर पॉलिनेशियन संस्कृतीचे मूळ दक्षिण अमेरिकेत होते, या बद्दल शकाच उरत नाही त्या काळच शिल्पकाम आजही जसच्या तस उभं आहे. अँडीज पर्वताच्या पायथ्याशी काही पुतळे अद्यापही आढळतात कॉन-टिकीचे असेच काही पुतळे पेरूहून पळून जाताना त्यांनी हलविले, काही मात्र तसेच राहिले

तो काळ साधारणपणे इ स ४०० ते ५०० या दरम्यानचा येतो पूर्वेकडून आलेल्या लोकांना 'लंब कर्ण' असं नांव देण्यात आलं होत त्याच कारण म्हणजे ते लोक कानाच्या पाळ्यामध्ये असलेल्या भोकात वजन अडकवून कानाची लांबी वाढवत त्यामुळे ते खांद्या-पर्यंत लोंबकळत बेटावर जेव्हा 'लघु-कर्ण' लोक आले तेव्हा लंब-कर्ण मारले गेले इस्टर बेटावरील सर्व पुतळ्यांचे कान लांब होते, याचा अर्थ दाढीवाल्या गोऱ्या लंब-कर्ण लोकांनी त्यांची निर्मिती केली

पेरूमधील इन्का लोकाच्या दतकथेत असं म्हटलं आहे, की मोठ्या कानांच्या, दाढी असलेल्या गोऱ्या लोकांवर सूर्यकुलातील राजा कॉन-टिकी यान राज्य केल त्या गोऱ्या लोकांनी कृत्रिमरीत्या कानांची लांबी वाढवलेली होती लेक टिटिकाका या भागात झालेल्या युद्धानतर गोरे लोक पेरूहून परागंदा झाले. त्यांनीच मोठे मोठे पुतळे उभारलेले होते

थोडक्यात कॉन-टिकीच्या वेळचे मोठे कानवाले लोक पेरूहून पश्चिमेकडे पळाले. त्यांना शिल्पकलेचा दीर्घ अनुभव होता आणि टिकीच्या काळी इस्टर बेटावर पूर्वेकडून गोरे लंब कर्ण दाखल झाले. त्यांनाही तीच कला अवगत होती दोन्ही ठिकाणच्या शिल्पात काडी-मात्र फरक दिसत नाही

बऱ्याच बेटांवर अद्यापही निरनिराळ्या धार्मिक उत्सवात लोक आपल्या सर्व अगाला गोरा रंग आणि केसांना करडा रग फासतात गोरे लोक हेच आमचे पूर्वज असं त्यांना दाखवून द्यायच असतं इस्टर बेटावर होणाऱ्या वार्षिक समारंभात वरिष्ठ व्यक्ति आपले सर्व केस कापून टाकत असे, नतर डोक्याला लाल रग देण्यात येई

नऊ

# किनारा जवळ आला

रात्रीच्या वेळी चमचमत्या आकाशाखाली बसून इस्टर बेटाचा विलक्षण इतिहास आम्ही एकमेकांना सांगत असू एका इस्टरच्या रविवारी या बेटाचा शोध एका डच माणसाला अचानक लागला, त्यामुळे त्याला 'इस्टर' असे नाव पडले. पॉलिनेशियामध्ये त्यालाच किमान तीन नावे आहेत एक नाव 'ते-पिटो-ते-हेनूआ,' म्हणजेच बेटांचा मध्य ' इस्टरचे दुसरे नाव 'रापा-नुइ' तिसरे नाव मजेशीर आहे 'माता-किते-रानी' या अर्थ 'स्वर्गाकडे लागलेला नेत्र ' पेरुमधील एका स्थानाचे हेच नाव होते अँडीज पर्वतामधील कॉन-टिकीच्या एका उध्वस्त झालेल्या शहराचे याचाच अर्थ पूर्वेकडून लोक पॅसिफिकमधील बेटांवर येऊन स्थायिक झाले आणि त्याच्या स्मरणार्थ ही नावे ठेवण्यात आलेली होती

गप्पा मारायला इस्टर बेटच निरनिराळे विषय पुरवत होते जुन्या काळच्या सागरी साहसात आम्ही जणु सामील झालो होतो आम्हाला असं वाटू लागलं होत की टिकीच्या काळापासून आम्ही फक्त प्रवासच करत होतो. सूर्य-तारे यांच्या छताखालून जमिनीच्या शोधात भर समुद्रातून

लाटा आणि समुद्राचं भय आता पूर्वीसारखं राहिलं नव्हतं त्यांची ओळख पुरेशी झाली होती. तराफ्याशी अतूट संबंध निर्माण झाला होता शार्क मासा हा सुद्धा नित्याच्या जीवनचित्राचा एक भाग झाला होता त्यांच्या हालचाली पुरत्या कळून चुकल्या होत्या शार्क दिसला तर आम्ही तराफ्याच्या काठावरुन जागचे हलतही नव्हतो हारपून किंवा दोराचा वापर न करता केवळ आमीष दाखवून आम्ही माशाची शिकार करू लागलो होतो तो एक खेळच झाला होता शार्क मासे या खेळाला बळी पडत असत

प्रवासाला तीन महिने होऊन गेल्यानंतर जुलैमध्ये डायरीत अशी नोंद करण्यात आली

'आज आमचा पाठलाग करणाऱ्या एका शार्क माशाबरोबर आमची दोस्ती जमली जेवणाचे वेळी त्याच्या थेट जबड्यात आम्ही माशांचे घास भरवले भुकेल्या आधाशी कुत्र्याला तुकडे घालताना जो अनुभव येतो तसाच काहीसा हा होता. आपण स्वतःच त्याच्या अजस्त्र जबड्यात जाण्याची वेळ येत नाही, तोवरच ही सगळी गंमत आहे '

अशावेळी आम्हाला स्नान घडे

एक दिवस कनटला शार्क बरोबर पोहण्याची 'संधी' मिळाली तराफा सोडून पाण्यात पोहायला परवानगी नव्हती एक तर तराफ्याभोवती पाण्याचा जोर असायचा आणि शार्कची भीती पण एकदा जलाशय खूपच संथ होता. आणि पाठलाग करणाऱ्या एका शार्कला आम्ही नुकतच वर खेचलं होतं म्हणून थोड्या वेळासाठी पाण्यात उडी मारायला परवानगी देण्यात आली होती कनटन सूर मारला पुन्हा पाण्यावर डोकं येईपर्यंत तो बराच दूर गेला होता नंतर तो परतू लागला तेवढ्यात त्याच्या मागून एक मोठी सावली आम्हाला दिसली गोंधळ होणार नाही अशा बेतान पण धोक्याची जाणीव मिळावी म्हणून आम्ही ओरडून इशारे दिले कनट धापा टाकत पुढे येत होता, पण त्याच्या खालील सावली अधिकच तरबेज दिसली दोघही तराफ्याशी एकदमच पोचले आम्ही घाईघाईन पुढे केलेल्या डॉलफिनच्या डोक्यावर शार्क महाशय संतुष्ट झाले म्हणून ठीक नाहीतर त्यदिवशी आमचा एक साथीदार कमी होत होता

वस्तूपेक्षा शार्क वासामुळे अधिक आकर्षित होतात तराफ्याच्या कडेला पाण्यात पाय सोडून बसल्यानंतर अनेक वेळा आम्हाला हा अनुभव आला होता पाय समोर करून शार्क जवळ आला की एकदम ते वर घ्यायचे असा जीवघेणा खेळ आम्ही अनेक वेळा केला होता आमच्या खेळाचा पुढील भाग म्हणजे आम्ही शार्क माशाच्या शेपट्या ओढायला सुरवात केली प्राण्यांच्या शेपट्या ओढणे हा कनिष्ठ दर्जाचा खेळ आहे, पण अद्याप शार्कच्या शेपट्या कोणी पिरगळल्या नसणार म्हणूनच हा खेळ जिवंत होता प्रथम लांब काठीला डॉलफिन अडकवून शार्कला पाठ वळवायला लावायची नतर शेपटी आवाक्यात आली की सर्वांनी मिळून काठाच्या लाकडावर घट्ट दाबून ठेवायची आधी त्याच्या लक्षात येणं कठिण, पण जखडल्याची जाणीव त्याला झाली की तो धडपड सुरु करायचा आश्चर्य म्हणजे शेपटीशिवाय त्याला जोरच मिळत नाही जिवाच्या आकांताने हालचाल करून थकल्यावर तो निपचित पडून राहायचा आम्ही नतर सर्व शक्ति पणाला लावून त्याला वर खेचत असू निम्म्याच्या वर आला की त्याची शक्ति पुन्हा जागृत होई जोरजोरात उसळ्या मारून त्याचे तांडव सुरू होई यावेळी त्याच्यातील मित्रत्वाची भावना नष्ट झालेली असे जबड्याच्या टप्प्यात जे जे येई, त्याला चावा घेण्यासाठी तो धडपडे. यावेळी बचावासाठी आम्हाला इतस्तत धावपळ करावी लागे एकतर तो पुन्हा पाण्यात अदृष्य होई किंवा तडफडून तराफ्यावरच शांत होई

पोपट हे सर्व अतिशय घाबरून बघत असे केबिनच्यावर बसून मान हलवत तो हळूच खालच्या दृष्याकडे बघत राही, आणि किंचाळत बसे पुढे पुढे त्यालाही गमत वाटू लागली तो आमचा सातवा साथीदारच होता रात्रीच्या वेळी तो आपण होऊन पिंजऱ्यात जाऊन बसे डोलकाठीवर, दोरावर किंवा केबिनवर तो बसून राही आमचे शब्द ऐकून तोही ओरडे, 'हॉल, हॉल ( ओढा, ओढा ) हो, हो, हो ' आमच्या हसण्याचीही नक्कल करी. दोन दिवस तो बराच आजारी पडला त्या काळात त्यानं अन्नाला स्पर्शही केला नाही पिंजऱ्यात मान टाकून नुसता बसून होता पोपटाचा आम्हाला फारच लळा लागला होता एकदा तो कुठेच दिसेना बहुधा तो हवेत उडाला असावा हे लक्षात आलं तेव्हा बराच उशीर झाला होता तो आम्हाला कायमचा अतरला होता तराफा मागे वळवण किंवा थांबवण अशक्य होतं मागे पडलेली कोणतीही वस्तू परत मिळवण शक्यच नव्हतं अनेक गोष्टींवरून ते सिद्ध झालं होत

पोपटाची अनुपस्थिती आम्हाला चांगलीच जाणवली पहिल्या संध्याकाळी तर सगळेच खिन्न झाले होते आमच्यापैकी कोणीही पहारा देत असताना असंच मागे पाण्यात पडल तर हीच परिस्थिती होणार ' त्यामुळे सुरक्षिततेच्या सर्व उपाय योजना अमलात

नऊ

# किनारा जवळ आला

रात्रीच्या वेळी चमचमत्या आकाशाखाली बसून इस्टर बेटाचा विलक्षण इतिहास आम्ही एकमेकांना सांगत असू. एका इस्टरच्या रविवारी या बेटाचा शोध एका डच माणसाला अचानक लागला, त्यामुळे त्याला 'इस्टर' असे नाव पडले. पॉलिनेशियामध्ये त्यालाच किमान तीन नावे आहेत. एक नाव 'ते-पिटो-ते-हेनुआ,' म्हणजेच बेटाचा मध्य. ' इस्टरचे दुसरे नाव 'रापा-नुइ' तिसरे नाव मजेशीर आहे 'माता-किते-रानी' या अर्थ 'स्वर्गाकडे लागलेला नेत्र' पेरूमधील एका स्थानाचे हेच नाव होते. अँडीज पर्वतामधील कॉन-टिकीच्या एका उध्वस्त झालेल्या शहराचे याचाच अर्थ पूर्वेकडून लोक पॅसिफिकमधील बेटांवर येऊन स्थायिक झाले आणि त्याच्या स्मरणार्थ ही नावे ठेवण्यात आलेली होती.

गप्पा मारायला इस्टर बेटच निरनिराळे विषय पुरवत होते. जुन्या काळच्या सागरी साहसात आम्ही जणू सामील झालो होतो. आम्हाला असं वाटू लागलं होतं की टिकीच्या काळापासून आम्ही फक्त प्रवासच करत होतो. सूर्य-तारे यांच्या छताखालून जमिनीच्या शोधात भर समुद्रातून.

लाटा आणि समुद्राचं भय आता पूर्वीसारखं राहिलं नव्हतं. त्यांची ओळख पुरेशी झाली होती. तराफ्याशी अतूट संबंध निर्माण झाला होता. शार्क मासा हा सुद्धा निधाच्या जीवनचित्राचा एक भाग झाला होता. त्यांच्या हालचाली पुरत्या कळून चुकल्या होत्या. शार्क दिसला तर आम्ही तराफ्याच्या काठावरून जागचे हलतही नव्हतो. हारपून किंवा दोराचा वापर न करता केवळ आमीष दाखवून आम्ही माशांची शिकार करू लागलो होतो. तो एक खेळच झाला होता. शार्क मासे या खेळाला बळी पडत असत.

प्रवासाला तीन महिने होऊन गेल्यानंतर जुलैमध्ये डायरीत अशी नोंद करण्यात आली.

'आज आमचा पाठलाग करणाऱ्या एका शार्क माशाबरोबर आमची दोस्ती जमली जेवणाचे वेळी त्याच्या थेट जबड्यात आम्ही माशाचे घास भरवले भुकेल्या आधाशी कुत्र्याला तुकडे घालताना जो अनुभव येतो तसाच काहीसा हा होता. आपण स्वतःच त्याच्या अजस्त्र जबड्यात जाण्याची वेळ येत नाही, तोवरच ही सगळी गमत आहे '

अशावेळी आम्हाला स्नान घडे

एक दिवस वनटला शार्क बरोबर पोहण्याची 'संधी' मिळाली तराफा सोडून पाण्यात पोहायला परवानगी नव्हती एक तर तराफ्याभोवती पाण्याचा जोर असायचा आणि शार्कची भीती पण एकदा जलाशय खूपच संथ होता आणि पाठलाग करणाऱ्या एका शार्कला आम्ही नुकतच वर खेचल होतं म्हणून थोड्या वेळासाठी पाण्यात उडी मारायला परवानगी देण्यात आली होती वनटनं सूर मारला पुन्हा पाण्यावर डोक येईपर्यंत तो बराच दूर गेला होता नंतर तो परतू लागला तेवढ्यात त्याच्या मागून एक मोठी सावली आम्हाला दिसली गोंधळ होणार नाही अशा बेतान पण धोक्याची जाणीव मिळावी म्हणून आम्ही ओरडून इशारे दिले वनट धापा टाकत पुढे येत होता, पण त्याच्या खालील सावली अधिकच तरबेज दिसली दोघही तराफ्याशी एकदमच पोचले आम्ही घाईघाईन पुढे केलेल्या डॉलफिनच्या डोक्यावर शार्क महाशय सतुष्ट झाले म्हणून ठीक नाहीतर त्यदिवशी आमचा एक साथीदार कमी होत होता

वस्तूपेक्षा शार्क वासामुळे अधिक आकर्षित होतात तराफ्याच्या कडेला पाण्यात पाय सोडून बसल्यानतर अनेक वेळा आम्हाला हा अनुभव आला होता पाय समोर करून शार्क जवळ आला की एकदम ते वर घ्यायचे असा जीवघेणा खेळ आम्ही अनेक वेळा केला होता आमच्या खेळाचा पुढील भाग म्हणजे आम्ही शार्क माशांच्या शेपट्या ओढायला सुरवात केली प्राण्याच्या शेपट्या ओढणे हा कनिष्ठ दर्जाचा खेळ आहे, पण अद्याप शार्कच्या शेपट्या कोणी पिरगळल्या नसणार म्हणूनच हा खेळ जिवत होता प्रथम लांब काठीला डॉलफिन अडकवून शार्कला पाठ वळवायला लावायची नतर शेपटी आवाक्यात आली की सर्वांनी मिळून काठाच्या लाकडावर घट्ट दाबून ठेवायची आधी त्याच्या लक्षात येणं कठिण, पण जखडल्याची जाणीव त्याला झाली की तो धडपड सुरु करायचा आश्चर्य म्हणजे शेपटीशिवाय त्याला जोरच मिळत नाही जिवाच्या आकांताने हालचाल करून थकल्यावर तो निपचित पडून राहायचा आम्ही नतर सर्व शक्ति पणाला लावून त्याला वर खेचत असू निम्म्माच्या वर आला की त्याची शक्ति पुन्हा जागृत होई जोरजोरात उसळ्या मारून त्याचे तांडव सुरू होई यावेळी त्याच्यातील मित्रत्वाची भावना नष्ट झालेली असे. जबड्याच्या टप्प्यात जे जे येई, त्याला चावा घेण्यासाठी तो धडपडे. यावेळी बचावासाठी आम्हाला इतस्तत धावपळ करावी लागे एकतर तो पुन्हा पाण्यात अदृष्य होई किंवा तडफडून तराफ्यावरच शांत होई

पोपट हे सर्व अतिशय घाबरून बघत असे केबिनच्यावर बसून मान हलवत तो हळूच खालच्या दृष्याकडे बघत राही, आणि किंचाळत बसे पुढे पुढे त्यालाही गमत वाटू लागली तो आमचा सातवा साथीदारच होता रात्रीच्या वेळी तो आपण होऊन पिंजऱ्यात जाऊन बसे डोलकाठीवर, दोरावर किंवा केबिनवर तो बसून राही आमचे शब्द ऐकून तोही ओरडे, 'हॉल, हॉल ( ओढा, ओढा ) हो, हो, हो ' आमच्या हसण्याचीही नक्कल करी दोन दिवस तो बराच आजारी पडला त्या काळात त्यान अन्नाला स्पर्शही केला नाही पिंजऱ्यात मान टाकून नुसता बसून होता पोपटाचा आम्हाला फारच लळा लागला होता एकदा तो कुठेच दिसेना बहुधा तो हवेत उडाला असावा हे लक्षात आल तेव्हा बराच उशीर झाला होता तो आम्हाला कायमचा अतरला होता तराफा मागे वळवणं किंवा थाबवण अशक्य होत मागे पडलेली कोणतीही वस्तू परत मिळवण शक्यच नव्हतं अनेक गोष्टीवरून ते सिद्ध झालं होत

पोपटाची अनुपस्थिती आम्हाला चागलीच जाणवली पहिल्या सध्याकाळी तर सगळेच खिन्न झाले होते आमच्यापैकी कोणीही पहारा देत असताना असंच मागे पाण्यात पडल तर हीच परिस्थिती होणार ! त्यामुळे सुरक्षिततेच्या सर्व उपाय योजना अमलात

आणल्या पहिले दोन महिने सुरळितपणे पार पडले याचा अर्थ पुढे धोका नव्हता असे नाही. एखादी अविचारी कृती किंवा चुकीचे पाऊल आम्हाला पोपटाच्या दिशेने नेण्यास चुकणार नव्हते. अगदी दिवसा ढवळयासुद्धा, त्या हिरव्या पोपटाने आम्हाला सावध केले होते

पोपटाचे दुःख आम्ही लवकरच विसरलो वायर-लेसवरून संदेश देण्याचे व पकडण्याचे प्रयत्न, शार्क माशांचा खेळ या गोष्टी आम्हाला गुंतवून ठेवण्यास पुरेशा पडत

एरियलचा त्रास होत होता हव्या त्या उंचीवर ती पोचू शकत नव्हती पण एका रात्री अचानक टॉरस्टेनला शॉर्ट वेव्हवर एक संभाषण ऐकायला मिळाल लॉस एन्जलसमधील एक वायरलेस फॅन स्वीडनमधल्या एका मित्राशी संपर्क साधत होता. टॉरस्टेन त्याच्याशी बोलला आमचा सेट कोणता आहे, हे त्याला सांगितल आम्ही कोण आणि कुठे आहोत हे ही सांगितल अमेरिकेतल्या त्या माणसाच नाव होतं हॉल आणि त्याच्या पत्नीच ॲना तिचा जन्म स्वीडनमध्ये झाला होता आम्ही तराफ्यावर सुरक्षित आहोत, असा संदेश आमच्या घरी पोहोचता करण्याचं आश्वासन त्यानं दिल

पॉल हा सिनेमा ऑपरेटर होता आमच्यापासून अलग झालेल्या जगातील, या एका माणसालाच आम्ही अद्याप जिवत असल्याच कळू शकल होतं ही गोष्ट विलक्षण होती त्या रात्रीपासून हॉल आणि त्याचा मित्र फ्रँक दररोज आमच्याशी बोलू लागले हर्मन दररोज दोन वेळा हवामान विषयक अहवाल पाठवत असे ते मिळत असल्याबद्दल हवामान खात्याकडून धन्यवाद पॉलने पोचते केले पॉलप्रमाणे इतर काही हौशी रेडिओ धारकाबरोबर संपर्क साधण्यात पुढे यश आल

काही दिवस आमचा वायरलेस सेट खाऱ्या पाण्याच्या तडाख्यामुळे बंद पडला होता त्यामुळे त्याचे काम थंडावले दोन्ही ऑपरेटर्स सेटशी झटत होते दूरवरच्या आमच्या मित्राला वाटलं की तराफा नष्ट झाला असावा पण एका रात्री अचानक सेट सुरू झाला आणि शेकडो अमेरिकन ऑपरेटर्सनी आनंद व्यक्त केला. सेटला पाण्यामुळे मधून-मधून विजेचा शॉक बसत असे आम्ही बाकीचे अज्ञानी चारजण सेटजवळ सहसा फिरकत नव्हतो

फोटो घेण्याच काम एरिक किंवा मी करत होतो. एरिक ते तराफ्यावरच डेव्हलप करायचा जे फोटो चांगले आले नसतील ते आम्ही पुन्हा घेऊ शकत होतो कॅमेरे दोन होते फिल्म कशी धुवावी या बाबत एकदा आम्हाला हॉलिवुडच्या सेटवरून मार्गदर्शन मिळाल हा सल्ला पुढे खूपच उपयोगी पडला

आमचे काही रोलस् वाया गेले होते फिल्म धुण्याच रसायन व पाणी यांचे मिश्रण बहुधा चुकत असावे, म्हणून आम्ही वायरलेसवरून त्याबाबत पृच्छा केली त्यानुसार आमच्या मित्राने स्थानिक लॅबोरेटरीकडे चौकशी करून आम्हाला हवी ती माहिती पुरवली. त्यानंतर फोटो चागले येऊ लागले जुन्या काळी अशा स्वरूपाच्या उपकरणाचा प्रश्नच नव्हता वायरलेस, कॅमेरा ही आमची चैनच होती सुमारे १५०० वर्षा-पूर्वीच्या, पश्चिमेकडे नेणाऱ्या लाटा आणि त्यावर आरूढ झालेला तराफा या गोष्टी मात्र आजही तशाच होत्या

द सागरीय बेटे जसजशी जवळ येऊ लागली, तसे हवामान थोडे अस्थिर झाले पावसाच्या लहानलहान सरी मधूनमधून यायच्या व्यापारी वाऱ्यांची दिशा बदलली आजवर वायव्येकडून ते संथपणे येत होते वाऱ्याच्या दिशा सुरवातीला थोड्या बदलत होत्याच आतापर्यंत आम्हाला वल्हवण्याचा त्रास अजिबात झाला नव्हता रात्रीच्या वेळी पहारा देणारा केबिनच्या दाराशी स्वस्थपणे बसून आकाशातील तारे मोजत बसे आता मात्र तराफ्याची दिशा बदलू न देण्याची गरज निर्माण झाली

आकाशातील ताऱ्याची स्थिती आम्हाला चांगली पाठ झाली होती त्याच्यावरून दिशा समजणे किती सोपे होते ! मृग-नक्षत्र, ध्रुवतारा आणि सप्तर्षी. कॉन टिकीला दिशा समजण्यासाठी त्यावेळी दुसरे कुठले साधन उपलब्ध होते ? दिवसा सूर्य आणि रात्री तारे पृथ्वी गोल आहे हे त्यांना ठाऊक होते प्राथमिक स्वरूपाचे नकाशेही त्यांनी बनविलेले होते आकाशातील नेमक्या कोणत्या भागातून ग्रहतारे उगवतात, आणि

भावळतात, याच ज्ञान त्याना अवगत होत वर्षानुवर्षं तीच स्थिती कायम राहिलेली आहे त्यावरूनच बेटा-बेटांमध्ये अचूक वाहतुक त्याना करता येत होती. अक्षांश-रेखांश त्यांना माहीत नसले तरी त्या स्वरूपाची कल्पना त्यांच्यासमोर असावी

त्यांना एवढे खगोलज्ञान कसे झाले असावे ? कॅलेण्डर किंवा अन्य मापनपद्धती कोणती असावी ? बहुधा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परपरेने ते ज्ञान, ते आडाखे जात असावेत पेरु आणि पॉलिनेशिया येथील कॅलेण्डर विशिष्ट दिवशीच सुरू होत असे

२ जुलैला रात्रपाळीचा रक्षक स्वस्थ बसू शकला नाही वाऱ्याचा जोर अतिशय वाढला, त्यामुळे समुद्रही खवळला आम्ही सगळे जागे झालो स्वच्छ चन्द्रप्रकाश पसरला होता तराफ्याचा वेग नेहमीपेक्षा कितीतरी वाढला होता मला दूरवरून पाण्याची प्रचड भिंत येताना दिसली सर्वजण येणाऱ्या प्रसगाला तोंड देण्यासाठी सिद्ध झाले पहिल्या लाटेच्या तडाख्यावर तराफा नेहमीप्रमाणे सहज स्वार झाला पाण्याचा फेस आजूबाजूला जणु उकळत होता पाण्याच्या दुसऱ्या भिंतीबरोबर आम्ही पुन्हा हवेत उंचावलो. असा वर खाली झोके बसण्याचा प्रकार अनेकवेळा झाला तराफ्याला धोका नाही, हे निश्चितपणे कळूनही आम्ही जीव मुठीत घेऊन बसलो होतो काही लाटा दूरवर फुटताना चन्द्रप्रकाशात दिसल्या

शेवटच्या लाटेन केबिनला जोरदार फटकारा दिला होता टॉरस्टेन सेटकडे धावला सर्वांची झोप चांगलीच उडाली होती केबिनच्या भिंतीमध्ये लहानसं भोक निर्माण होण्यापलिकडे विशेष उलथा-पालथ मात्र झाली नाही सागराची ही अस्वस्थता अन्तर्गत हालचालीमुळे होत असावी. या भागात समुद्रातळाशी धरणीकप होत असत

दोन दिवसानंतर पहिल्या वादळाने आम्हाला गाठले व्यापारी वारे अजिबात पडले होते डोक्यावरून जाणाऱ्या भुरकट विरळ ढगाचे रूपांतर एकाएकी दाट काळ्या ढगांत झाले दक्षिण क्षितिजावरून ते वाहत येत होते वाऱ्याचा वेगही अनपेक्षितपणे वाढला तराफ्यावर ताबा राहीना वाऱ्याच्या मध्या क्षिरेन आम्ही तराफ्याची दिशा बदलली आम्ही त्वरा केली म्हणून ठीक. शीडात वार तुफान भरल १५ ते २५ फुटांच्या लाटा चहूबाजूनी उमळत होत्या वादळी वारा बांबूच्या डेकमध्ये घुसून गर्जना करीत होता

वायरलेस-सेट सुरक्षित रहावा म्हणून केबिनच्या त्या कोपऱ्यात आम्ही कॅनव्हस पसरल सर्व सुटच्या वस्तु दोराने एकत्र बाधून ठेवल्या हो-या. धावपळ करून शीड उतरवाव लागलं आकाश काळकुट्ट झाल होत फुटणाऱ्या लाटामुळे सतत पाण्याचे शितोडे उडत होते ते खाऱ्या पावसाचा भास निर्माण करीत होते सर्वजण गारठून गेलो आमच्या दाढ्या आणि केस यामधून पाणी सतत निथळत होत सुरवातीला निश्चित काय होईल याची कल्पना नसल्यामुळे वादळाची धास्ती वाटत होती परंतु, तराफ्याच्या सुरक्षिततेला नित्याप्रमाणे धक्का पोचत नसल्यामुळे आम्हाला त्यातही गमत वाटू लागली उत्तेजित करणाऱ्या खेळाचा तो एक प्रकार ठरला याचा अर्थ आम्ही निष्काळजी होतो असा मात्र नव्हे लाटेच्या फटकाऱ्याबरोबर तराफा क्षणभर थरथरायचा आणि पुन्हा स्थिर व्हायचा

हर्मन वादळाचा वेग मोजण्यात सतत गुतलेला होता.

हवामानाचा जोर ओसरल्यावर भोवताली शार्क, डॉलफिन्स, बॅनिटोज इ. माशाची गर्दी उसळली त्याचा एकमेकात पाठलाग चालू होता जोडीजोडीनं सूर मारत त्याच्यात जीवन मृत्यूचा झगडा चालू होता. त्यामुळे तराफ्याभोवती दाट रक्ताचा तवग जमा होई. डॉलफिन आणि टनीझ मासे एकमेकांवर जीव खाऊन तुटून पडत शार्क हा त्याचा समान शत्रू होता निरुप-द्रवी पायलट मासे अजिबात दिसत नव्हते ते बहुधा युद्धभूमीवरून पसार झाले असावेत किंवा आपल्या मोठ्या भाऊबदाच्या पोटात आधीच गडप झाले असा-वेत यावेळी पुढे झुकून पाण्यात बघण्याच धैर्य आम्हाला झाल नाही त्या दिवसाची नोद डायरीत अशी झाली.

" सहा फुटी शार्कची शिकार करून त्याला प्रथम वर खेचण्यात आल, त्यानतर आठ फुटाचा शार्क आमच्या तडाख्यात सापडला दोन मोठे शार्क मात्र हुकातून यशस्वीपणे निसटले पायाखालच लाकूड आता निसरड झाल असल्यामुळे कडेला उभ राहू शिकार करत बसण धोक्याच होत.

तरीही एक मोठा टनी मासा आम्ही मिळवलाच शार्क माशापेक्षाही त्याच्याशी जास्त झगडा द्यावा लागला. तो एवढा जाड आणि जड होता की शेपटीला धरून त्याला ओढण मुश्किल गेलं.

" पाण्यात सर्वत्र हिंस्त्र माशाच्या पाठी दिसत होत्या आणखी तीन शार्क पकडण्याचा मोह आम्ही आवरू शकलो नाही. आजवरची ही सर्वात मोठी शिकार ठरेल "

डेकवरून चालताना वाटेत जिकडे तिकडे हे शार्क येत होते ते लगेच मरत नाहीत अजूनही लाकडावर त्यांच्या शेपटांचे फटकारे चालू होते एकूण नऊ मासे त्या दिवशी आम्ही मारले सर्वजण पुरते थकून गेलो होतो कोणाच्याही अंगात त्राण उरल नव्हतं सर्वांनाच विश्रांतीची नितांत गरज होती

दुसऱ्या दिवशी आमची शिकार पुन्हा सुरू झाली परंतु लगेच आम्ही ती थांबवली डेकवर सगळीकडे शार्क माशांच रक्त पसरलेल होत त्या वासामुळे इतर मासे तिकडे आकर्षित होत होते आम्ही सगळं डेक धुवून स्वच्छ केल शार्कच्या दातांमुळे आणि खरखरीत पाठीमुळे लाकूड घासल गेल होत मेलेले मासे आम्ही पाण्यात फेकून दिले त्या दिवशी आम्हाला समोर सतत आधाशी शार्क माशांचे उघडे जबडे दृष्टीसमोर दिसत होते त्याच्या रक्ताचा वास नाकात भिनला होता शार्कच मास वाईट लागत नाही, पण टनी किंवा बॉनिटो त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने चागले

त्या संध्याकाळी प्रथमच एकजण म्हणाला की आता थंड मासे आणि उसळता सागर याचा कटाळा आला. लवकरच पाम वृक्षराजीखाली, हिरवळीवर पाय पसरून आडवं व्हायला आनन्द वाटेल !

हवा शात झाली होती पण पूर्वीसारखी स्थिर आणि अनुकूल नव्हती मधून-मधून पावसाचे फटकारे किंवा वाऱ्याचे झोत येतच राहिले पावसामुळे आम्हाला आनदच होत होता, कारण प्यायचं पाणी खराब झाल होत त्याची चव अतिशय वाईट लागत होती केबिनच्या छतावर आम्ही ताज पाणी जमा केल डेकवर उघड्या अगानं भिजताना फारच समाधान झाल आमच्या अगावर चिकटलेले मिठाचं अश धुतले जात होते

२१ जुलैला वारा पुन्हा पडला हवामान पूर्णपणे सथ झाल. पूर्वीच्या अनुभवामुळे त्याचा अर्थ आमच्या लगेच लक्षात आला. पुढच्या वादळाची ती चिन्हे होती आणि चहू दिशांनी वाऱ्याचा जोर वाढू लागला काळे, धडकी भरणारे ढग आसमंतात पुन्हा भरले हर्मन कायम वाऱ्याचा वेग मोजत होताच अचानक टॉर्स्टेनची झोपायची खोळ समुद्रात उडून गेली पुढच्या काही सेकंदात काय घडल हे आम्हाला कळलंच नाही

खोळ उडून जात असताना हर्मननं ती पकडण्याचा प्रयत्न केला आणि चुकीचं पाऊल टाकल अचानक तोल जाऊन तो पाण्यात फेकला गेला. लाटांच्या आवाजामधून त्यान मदतीसाठी मारलेली अस्फुट किंचाळी आम्हाला ऐकू आली त्याचं डोकं आणि पाणी कापणारा एक हात दिसत होता त्याच्याजवळच काही-तरी हिरवी गोष्ट तरंगताना दिसत होती तराफा गाठण्यासाठी तो धडपडत होता पाण्याच्या पृष्ठभागावर तो एकसारखा वर-खाली होताना दिसत होता. टॉर्स्टेनला आणि मला तो प्रथम बाहेर फेकला गेलेला दिसला भीतीमुळे आम्ही थंडच पडलो बेंबीच्या देठा-पासून आम्ही ओरडलो डेकवर एकच गोंधळ उडाला हर्मन पट्टीचा पोहणारा होता त्याचा जीव धोक्यात असल्याची जाणीव आम्हाला असली, तरीही तो वेळीच तराफ्याला पकडेल अशी आम्हाला आशा वाटत होती

टॉर्स्टेन सर्वात जवळ होता त्यान बांबूचा ड्रम उचलला त्याला लांब दोर बांधलेला होता त्याचा उपयोग लाईफबोट सारखा आम्ही करत असू हर्मन आता तराफ्याच्या बाजूला होता, पण थोडे यार्ड दूर. वल्हं पकडता आलं तरच आपण वाचू अस त्याला वाटत होतं मी आणि बेंग्ट रबरी होडी पाण्यात टाकली क्नट आणि एरिकनं लाईफबोट केबिनच्या छताला दोराच एक टोक आणि लाईफबोटला दुसर पण त्या दिवशी वारा एवढा बेफाम झाला होता की अनेकवेळा ती परत फिरली एव्हाना हर्मन बराच मागे पडला. वाऱ्याच्या प्रत्येक झोताबरोबर हे अंतर वाढतच होत त्याला रबरी होडीचीच काय ती आशा शिल्लक होती दोराशिवाय होडी त्याच्यापर्यंत पोचू शकली असती, पण ती पुन्हा तराफा गाठू शकेल याची खात्री नव्हती तथापि, होडीत तीन जण असतील तर काहीतरी बर, भर समुद्रात एकटा माणूस म्हणजे संपलंच ! फक्त देवाचं नाव घेणं.

एकदम क्नटन पाण्यात उडी टाकली लाईफबोटवर

एक हात पकडून तो मागच्या बाजूला पोहू लागला. जेव्हा क्नटचं डोकं दिसायच तेव्हा हर्मन अदृष्य व्हायचा हर्मन दिसायचा तेव्हा क्नट पाण्याखाली जायचा आणि एकदम दोन डोकी लाईफबोटीजवळ वर आली तोपर्यंत रबरी होडी डेकवर चढवण्यात आली होती आम्ही चौघांनी लाईफबोटीचा दोर जोरात मागे ओढला यावेळी त्या दोघांच्या मागे एक अजस्त्र काळं धूड दिसत होत त्याच प्राण्यानं क्नटला एक जोरदार ढुशी दिली होती तो शार्क नव्हता एवढ निश्चित त्याच्या तोंडात टॉरस्टेनची खोळ होती त्यासह तो पृष्ठभागाखाली दिसेनासा झाला दोन्ही मित्र धडधाकटपणे तराफ्यावर परतले तो प्राणी कुठला का असेना, पण त्याच्या नशिबात त्यादिवशी चांगल भक्ष्य नव्हत

'मी त्या खोळीत नव्हतो हे सुदैव ?' टॉरस्टेन म्हणाला.

काही वेळानतर परिस्थितीचं गांभीर्य ध्यानात येऊन सर्वांच्या अगावर काटाच आला आम्ही सहाजण सुरक्षितपणे एकत्र होतो, ही सुखद भावनाही जोडीला होतीच

सर्वांनी क्नटचा सत्कारच केला तो आनंद काय वर्णावा !

पण झाल तें गेलं त्यावर जास्त विचार करायला वेळच नव्हता काळे ढग आकाशात भरून आले होते रात्रीपूर्वी पुढच्या वादळाचा जोर वाढला तराफ्याला मागच्या बाजूला लाईफबेल्ट आम्ही बाधून टाकला पुन्हा कोणी चुकून पडलाच तर त्याचा उपयोग होणार होता. अधार इतका झाला की समुद्र किंवा तराफा नीट दिसतच नव्हता फक्त काळोखात वरखाली होत असल्याच समजत होतं. वारा घुमत होता, केबिनच्या बांबूमधून जाताना त्याचा चमत्कारिक आवाज होत होता. लाटाप्रमाणे ओडके हलत होते त्यामधल्या फटीतून पाणी वर न येता, ठराविक पातळीवर तराफा कसा राहतो, याच वार वार आम्हाला आश्चर्य वाटत राहिल होतं

पाच दिवस हवामानात चढउत्तार होत राहिला प्रचड वादळ ते सथ झुळुका नतर आकाशाचं दर्शन झाल चिरविजयी निळ आकाश वल्ह मोडकळीस आल होतं, शीडाला काही भोक पडली आणि तळाचा लाकडी कणा खिळखिळा झाला त्याला बांधलेले दोर जीर्ण झाल्यामुळे तसा तो झाला होता फक्त आम्ही आणि इतर वस्तू एवढ शाबूत राहिल होत

वादळानतर कॉन-टिकी बाध्यामध्ये बराच 'अशक्त' झाला होता लाटाशी झगडताना दोर टेकीस आले होते बालसा लाकडात ते घुसले होते, घासले गेले होते इन्का लोकाना धन्यवाद आम्ही दोराऐवजी वायर वापरली असती, तर एव्हाना तराफ्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या असत्या शिवाय मुळात पूर्ण सुकलेले बालसा ओंडके वापरले असते, तर त्यात पाणी मुरून आम्हाला जिवंत जलसमाधी मिळाली असती, ठिकठिकाणी शेवाळं उगवल असल्यामुळे पावलं जपून टाकावी लागत होती तराफा लाटेबरोबर उच गेला की उभ राहण अशक्य होत वेळोवेळी गुडघ्यावरून चालाव लागे

किरकोळ दुरुस्त्या आम्ही लगेच करून टाकल्या. वल्हचाला मॅंग्रूव्ह लाकडी पट्ट्यांचा जोर देऊन ते पक्व केल कॉन-टिकी पुन्हा दिमाखात, मान उचावून पॉलिनेशियाकडे आगेकूच करू लागला तळाचा कणा मात्र पूर्वस्थितीला येऊ शकला नाही दोरावर पाणवनस्पती उगवल्या होत्या त्यामुळे त्यांची तपासणी करण अशक्य कोटीतल होत लाकडात पाणी खूपचं मुरलं होत, पण खाद्यपदार्थ आणि पाणी बरेच कमी झाल्यामुळे वजन हलक झाले होतं म्हणून तराफा जवळजवळ पूर्वीसारखाच तरंगत होता

मुक्काम गाठेपर्यंत असाच टिकाव धरला की झाल ! आमच्यापुढे आता दुसराच प्रश्न उभा राहिला होता या मोहिमेची अखेर कशी होणार ?

खडक किंवा अन्य स्थिर वस्तूला अडल्याशिवाय कॉनटिकी थांबणार नव्हता पश्चिमेकडे तो तसाच वेगात जात राहणार ! पुढे असलेल्या असख्य पॉलिनेशियन बेटांपैकी एकावर सर्वजण सुखरुप उतरेपर्यंत मोहीम यशस्वी झाली असं म्हणता येणार नव्हत

गेल्या वादळामुळे तराफा नेमका कुठे पोचेल हे अनिश्चित होत मारक्वेसस आणि टूवामोटू बेटे सारख्याच अतरावर होती दोन्हींच्या मधून तराफा निसटला तर जमिनीचं दर्शन दुर्लभ होणार होतं सर्वात जवळच बेट आता वायव्येला ३०० मैलांवर होत वारा किंवा लाटा यांचा भरवसा नसल्यामुळे आम्हाला कशाचीच खात्री नव्हती

सर्वात अलिकडचं बेट 'फातुहिवा' होतं. लहानसं जंगल असलेला तो डोंगराळ प्रदेश होता. त्याच ठिकाणी समुद्रकिनाऱ्याजवळ झोपडी बांधून मी राहिलो होतो. टिकीच्या कथा तेव्हाच एका म्हाताऱ्याच्या तोंडून मला ऐकायला मिळाल्या. त्याच किनाऱ्याला तराफा पोचला, तर मला कितीतरी ओळखीचे लोक भेटतील. पण तो म्हातारा भेटेल का? त्यांचा नेता कॉन टिकी याच्याकडे तो केव्हाच निघून गेला असणार.

इतर बेटं त्या मानानं दूर होती.

पाण्याखाली झाकले गेलेले प्रवाळाचे खडक धोक्याचे असतात. काही अणकुचीदार असतात. तराफ्याचा वेग शक्यतो रोखून अशा खडकावर वेगात आदळण टाळण्याची गरज होती.

३ जुलैच्या सुमारास, जमिनीपासून १००० मैल दूर असतानाच काही पक्षाचे थवे आम्हाला दिसले होते. नंतर ते ०० अंश पश्चिमेला अदृष्य झाले. नतर पुन्हा एकदा ते असेच दिसले. हवेत उंचावरून जाताना किंवा फेसाळ पृष्टभागावर झेंप घेताना हे पक्षी मागे हजारो मैल दूर असलेल्या अमेरिकेतून नक्कीच आले नव्हते. म्हणजेच त्यांचं निवासस्थान पुढे असलेल्या एखाद्या बेटावर असणार.

१६ जुलैला निसर्ग आणखी खवळला. त्या दिवशी आम्ही नऊ फुटी शार्क माशाची शिकार केली. त्याच्या पोटात एक ताजा स्टरफिश आढळला. हा मासा नेहमीच किनाऱ्याजवळ सापडतो.

आणि दुसऱ्याच दिवशी पॉलिनेशियन बेटावरून आलेली पहिली निश्चित खूण आम्हाला दिसली.

आमच्या दृष्टीनं तो दिवस भाग्याचा होता. दोन मोठे पक्षी आपले पाच फुटी पंख पसरत क्षितिजावरून उडत आले. सथपणे आणि कमी उंचीवरून तराफ्यावर त्यांनी कित्येक घिरट्या घातल्या. नंतर पंख मिटून पाण्याच्या पृष्ठभागावर ते बसले. त्या बरोबर डॉलफिन मासे लगेच वर आले. पोहणाऱ्या त्या पक्षांचे त्यांनी दुरूनच अवलोकन केले. एकमेकाना स्पर्श मात्र त्यांनी केला नाही. पॉलिनेशियाला येण्याबद्दल त्यांनी आमचं नम्र स्वागत केलं होतं. संध्याकाळ उलटून गेली तरीही ते घराकडे परतले नाहीत. रात्रभर डोलकाठी भोवती ते फिरत असल्याचे आवाज कानावर पडत होते.

डेकवर उडते मासे येऊन पडत होते. त्यांच्या जातीवरून आणि आकारावरून फातुहिवाच्या किनाऱ्यावर आढळणाऱ्या जातीची मला आठवण झाली. खरोखर फातुहिवा बेटाजवळच आम्ही आलो होतो.

तीन दिवस आणि रात्री आमचा प्रवास सरळ फातुहिवाच्या दिशेनं झाला. पण नंतर ईशान्येच्या जोरदार वाऱ्यांनी ट्वामोटू बेटाकडे आमचा मोर्चा वळवला. प्रवाह आता नदीसारखा ओढत होता. त्याची दिशा आणि ओढ एरिक मोजत होता.

पॉलिनेशिया तोंडाशी आल्यावर वाऱ्यानं अँटार्क्टिकला नेणाऱ्या प्रवाहाकडे आम्हाला सुपूर्त केलं होतं. प्रवासात एकही दिवस आम्ही उलट दिशेनं गेलो नव्हतो. २४ तासात कमीत कमी ९ सागरी मैल आणि सरासरी ४२॥ मैल वेगानं आम्ही गेलो होतो.

या अखेरच्या टप्प्यात व्यापारी वारे अनुकूलच राहिले होते. आम्हाला दगा देण्याचं धैर्य त्यांच्यात नव्हतं. जगाच्या एका नव्या विलक्षण प्रदेशात आम्ही येऊन पोचलो होतो.

दिवसेंदिवस पक्ष्यांचं प्रमाण वाढू लागलं. सर्व दिशांना ते मनमुराद उडत होते. एका संध्याकाळी ते एकाएकी जमिनीच्या दिशेनं वेगात जाऊ लागले. माशांची किंवा आमची पर्वा न करता सर्वांची दिशा एकच होती. आम्हाला दिसत नसलेली काहीतरी गोष्ट त्यांना उंचावरून दिसली असावी. अगदी ठरल्याप्रमाणे ते सर्व घराकडे परतत होते.

त्याच दिशेला आम्ही तराफ्याचा रोख वळवला. ती रात्र आनंदात गेली. कॉन-टिकीची मोहीम सुरू झाल्यापासून तिसऱ्यांदा पूर्ण चंद्रबिंब उगवलं होतं.

दुसऱ्या दिवशी अधिकच पक्षी सामोरे आले. परंतु त्यांच्यावर आता आम्ही विसंबून नव्हतो. दिशा निश्चित झालेली होती. आकाशात धूरकट ढग जमले होते. फातुहिवाच्या किनाऱ्यावरून ते असेच दिसत असत. एक मोठा ढग क्षितिजावर स्थिर होता. कडक उन्हामुळे वाळू भाजून निघाली, की उबदार हवा निर्माण होते. तशीच वर जाते आणि अवकाशातील थंड पट्ट्यात स्थिर राहते. तोच ढग दिसत होता. असा ढग दिसला की जमीन खाली निश्चित असणार, ही खूणगाठ पटते.

सूर्यास्तानंतर तो दिसेनासा झाला. वारा नियमित वाहत होता. डोलकाठीवर चढून जमीन दिसते का हे बघण्याची कामगिरी आता फक्त शिल्लक होती.

रात्रभर पक्षांचा किलबिलाट कानात भरत होता. चंद्र शीतल प्रकाश-वृष्टी करत होता. कॉन-टिकी सावकाश किनाऱ्याकडे सरकावत होता.

दहा

# दक्षिण सागरीय बेटे

२९ जुलैच्या रात्री तराफ्यावर एक नवे आणि गूढ वातावरण पसरले होते पक्षांच्या आवाजाने आम्ही उत्तेजित झालो होतो खळाळणाऱ्या लाटा आणि दोर घासण्याचे आवाज आम्ही गेले तीन महिने ऐकत होतो त्या रात्री चंद्रही मोठा भासला पक्षाच्या आवाजामुळे चैतन्य भरून राहिले होते

दुसऱ्या दिवशी बेंट डोलकाठीजवळून खाली आला, आणि त्यान हर्मनला जागं केलं दहा मिनिटांनी त्या दोघांनीही पाय हालवून मला उठवलं

'ऊठ लवकर आणि तुझ्या बेटाकडे डोळे भरून पहा!'

त्यांचे चेहरे फुलून गेले होते मी उडी मारूनच उठलो डोलकाठीचे दोन बाबू ज्या ठिकाणी एकत्र आले होते, तिथपर्यंत मी वर चढलो डोक्यावर असंख्य पक्षी होते. आकाशातील फिकट निळसर जांभळा रंग पाण्यात उतरला होता पूर्वेकडे तांबड फुटत होतं आणि आग्नेयेला क्षितिजावर निळ्या पेन्सिलप्रमाणे अंधुक सावली दिसत होती

जमीन! माझे बेट! आधाशाप्रमाणे आमची नजर तिकडे खिळून राहिली होती बाकीच्यांना आम्ही उठवल अर्धवट गुंगीत डोळे चोळत त्यांनीही जमिनीच दर्शन घेतल लाल प्रकाश पसरत सोनेरी होऊ लागला

अपेक्षित दिशेला बेट दिसत नव्हतं ज्या अर्थी बेटाचं स्थान सरकण अशक्य होत, त्या अर्थी रात्री तराफा उत्तरेच्या प्रवाहाला लागला असावा लाटांच्या दिशा पाहून एका क्षणात आमच्या ध्यानात आल की तराफा बेटाकडे रेटण कठीण होत समुद्रातील खडकांमुळे आणि भरतीच्या लाटांमुळे प्रवाह किनाऱ्याच्या विरुद्ध दिशाना जात होते.

साडे सहा वाजता सूर्य नेहमीप्रमाणे सरळ वर आला. बेट अवघ्या काही मैलांवर होतं जंगलाची

फिकट ओळ दूरवर दिसत होती एरिकच्या अदाजा-प्रमाणे ते ट्वामोटू बेट समूहापैकी प्युका-प्युका बेट असाव आमच्याजवळील दोन नकाशांची नीट पहाणी केल्यावर दुसरी शक्यता दिसत नव्हती

तराफ्यावर आत्यंतिक निराशा पसरली शीड उभा-रून आम्ही मूकपणे त्या दूर जाणाऱ्या बेटाकडे बघत राहिलो. पण काही झाल तरी आम्ही पश्चिमेच्या दिशेनं खूप दूर आलो असल्याचा दृश्य पुरावा आम्हाला मिळाला होता नुसतेच सागरात गोल गोल चकरा मारत नव्हतो पॉलिनेशियाला पोचल्याची सुखद जाणीव आणि मुक्त समाधान मिळालेच होते निराशा क्षणभगूर ठरली

थोड्या वेळान बेटावरील झाडामधून धुराची रेषा आकाशात जाताना दिसली स्थानिक लोक बहुधा न्याहारी बनवीत असावेत त्याना आम्ही दिसलो म्हणून ते धुराचा इशारा करत होते किंवा कसे हे समजायला मार्गच नव्हता थोड्या वेळान आमच्या नाकात बोरॲो लाकूड जळण्याचा वास शिरला फातुहिवा बेटावरील शेकोटीच्या आठवणी माझ्या मनात लगेच जागृत झाल्या बेट हळूहळू मागे पडू लागलं प्रवासाच्या ९३ व्या दिवसानतर कोरड्या जमिनीचे दर्शन आम्हाला झाल होते त्या दरम्यान बेट पुन्हा धोरू लागला एरिक आणि टॉरस्टेन केबिनच्या भितीला टेकून प्रार्थना करू लागले आणि क्नट इकडे तिकडे धावाधाव करून नाकात लाकूड आणि पानाचा येणारा वास भरून घेऊ लागला त्यान डायरीत नोंद सुरू केली

सकाळी साडेआठ वाजता प्युका प्युका बेट पाण्या-खाली अदृश्य झालं त्या बाजूला वर आकाशात एक पाढुरका ढग स्तब्धपणे तरगताना तेवढा दिसत होता. पक्षीही दिसेनासे झाले किनाऱ्याजवळ आढळणारे डॉल्फिन कमी कमी झाले. तराफ्याखाली काही पायलट मासे मात्र पोहत होते

बेंटला जमीन दूर गेल्याच काहीसा आनंदच झाला कारण अद्याप त्याची तीन पुस्तक वाचून होणं बाकी होत टॉरस्टेनला मधूनच सफरचंद खाण्याची लहर आली

दुसऱ्याच दिवशी सकाळी दोन नवीन ढग आमच्या दृष्टीस पडले नकाशावरून त्या दिशेला दोन प्रवाळाची बेट अपेक्षित होती फगाहिना आणि अँगाताऊ तरा-फ्याचा रोख दुसऱ्या बेटाच्या दिशेनं होता पॅसिफिक-मधील निःस्तब्धता आणि स्वातंत्र्य आम्ही पहिल्या सारखे उपभोगत होतो प्रवास लवकरच संपणार अस-ल्याची भावना प्रफुल्लित करत होती

तीन दिवस आणि तीन रात्री अँगाताऊवरील त्या ढगाच्या दिशेन आम्ही वल्हवत राहिलो प्रवाह अनुकू-लच होता तिसऱ्या रात्री हर्मनला चद्रप्रकाशात समोर काळसर रेषा दिसत होती सकाळ होण्यापूर्वीच टॉर-स्टेनच्या आरोळीन सर्वांना जाग आली

' जमीन दिसते आहे ! '

धाईधाईन सर्व डेकवर जमा झाले, आमच्याजवळ असलेले सर्व ध्वज आम्ही उभारले आधी नॉर्वेचा व नंतर फ्रेंच लवकरच अमेरिकन, ब्रिटिश, पेरू आणि स्वीडिश ध्वजही डौलान फडकू लागले सूर्य जसजसा वर येऊ लागला तशी बेटावरील हिरवळ आम्हाला दिसू लागली त्यावरील आकाश धुरकट दिसत होत.

दहाच्या सुमारास आम्ही विचार करू लागलो की बेटाच्या कोणत्या भागात उतरल पाहिजे ? एव्हाना झाडांचे शेंडे स्वतंत्रपणे दिसू लागले होते त्या मागे प्रचड रान होत तथापि मधल्या मार्गात पाण्या-खाली बुडलेले खडक असण्याची शक्यता होती नका-शात त्याची नोंद होती अशा खडकांवर आदळून पूर्वी अनेक जलवाहनांच्या ठिकऱ्याठिकऱ्या झाल्या होत्या

पाण्यावर त्यांची काहीच निशाणी दिसत नव्हती. फक्त बेटाकडे वाहात जाणाऱ्या लाटांमधून लाटा जमिनीच्या अलिकडे थोड्या अतरावर, दोन जागी पाणी वर उसळताना दिसत होत त्या ठिकाणी काळजी-पूर्वक लक्ष देण जरूर होत त्याला वळसा घालून तरी गेल पाहिजे किंवा शीड उतरवून तयारीत राहिल पाहिजे

दुपारी बाराच्या सुमारास बेटावरील झाडांमध्ये लहान हिरवे ' पाम ' दिसू लागले जवळ जवळ उभे राहून ते डुलत होते झाडावर उडणाऱ्या पांढऱ्या पक्षाखेरीज प्राणिजीवनाची कोणतीही चिन्ह दिसत नव्हती

दोनला आम्ही जमिनीच्या इतके जवळ होतो की किनाऱ्याला लागून मजेत फिरत असल्यासारख वाटू लागल पाण्याबाहेर डोकावणारे खडक दिसत होते धबधब्याच्या सतत धारेप्रमाणे त्यावर आदळणाऱ्या

लाटांचा आवाज येत होता. जसजसे जवळ गेलो तसा तो आवाज समोरून धडाडत जाणाऱ्या वेगवान आगगाडीसारखा ऐकू येऊ लागला. त्या ठिकाणी हवेत उंच पाण्याचे तुषार उडत होते

दोघजण वल्हं फिरवत बसले होते केबिनसमोर ते असल्यामुळे त्यांना समोरच काही दिसत नव्हत एरिक उंचावर उभा राहून खालच्या दोघांना सूचना देत होता धोकादायक खडकापासून जास्तीत जास्त दूर जाण्याचा आमचा प्रयत्न होता वारा त्या दिशेन वाहात होता तराफ्याखालील कणा सैल झाला असल्यामुळे प्रवाहाला २० अंशाचा कोन करून जाणं जमत होत

प्रयत्न करणे आमच्या हातात होते. पण प्रत्येकाची छाती धडधडत होती उसळणाऱ्या उंच लाटांचे तांडव चालूच होते खडक लालसर रंगाचे होते एरिकच्या सूचना आम्ही तंतोतंत पाळत होतो सुदैवानं खडकाला वळसा घालून पुढे जाण्यात आम्हाला यश आल

किनाऱ्यानजिक छोटे छोटे खडक बरेच होते तीन वाजता बेटाचा बारीकसारीक तपशील स्पष्ट कळू लागला किनाऱ्याला समांतर आमचा तराफा जात होता झाडांचे प्रमाण विरळ होऊ लागले दिवसभर अँगाताऊ बेटाच्या जवळून आम्ही-वाकडी वळणे घेत राहिलो त्या बेटाचं विलोभनीय दृश्य आम्ही डोळ्यात साठवत होतो स्वर्गसुखाचा ठेवाच जणु गवसला होता आता तराफ्याला धोका नसल्यामुळे एरिक खाली उतरून गिटार वाजवू लागला दक्षिण सागरावर रचलेली काही गीतेही दर्दभऱ्या आवाजात तो म्हणू लागला बेंटन उत्कृष्ट जेवण त्या दिवशी बनवल उरलेले काही नारळ फोडून त्यातले गोड पाणी आम्ही प्यालो बेटावर संपूर्ण शांतता होती पक्षी आवाज न करता उडत होते हजारो मैल महासागर पार करून आलेले आम्ही सहाजण भारून गेल्याप्रमाणे बसलो होतो त्या वेळची भावना कधीच विसरण शक्य नाही एव्हाना आम्ही दुसऱ्या बाजूला पोचलो होतो ते दक्षिण सागरीय बेट आम्हाला स्पष्ट दिसत होत बेटावर उतरलो किंवा नाही तरीही पॉलिनेशियाला आम्ही पोचलो यात शंका नव्हती

अँगाताऊ बेटाजवळील तो उत्सवी दिवस निघाल्यापासून ९७ वा होता आश्चर्य म्हणजे न्यूयॉर्कमध्ये आम्ही अंदाजे लागणारे दिवस काढताना, पॉलिनेशियातील सर्वात जवळच बेट लागण्यास, अनुकूल परिस्थितीत, किमान ९७ दिवसच लागतील, असा हिशेब केला होता.

पाचच्या सुमारास किनाऱ्यावर दोन छोट्या झोपड्या दिसल्या आतून धूर येत नव्हता किंवा मनुष्यप्राणीही दिसत नव्हता अर्ध्यातासात बेटाच्या पश्चिम बाजूला आम्ही पोचलो किनारा गाठण्यासाठी मार्ग शोधण्याचा अखेरचा प्रयत्न करून पहात होतो. सूर्य बराच खाली कलला होता बेटाच्या बाजूला आकाशात इंद्रधनुष्य दिसत होत. अचानक किनाऱ्यावर स्थिर असे काळे ठिपके दिसू लागले त्यातील एक सावकाश पाण्याकडे सरकू लागला बाकीचेही हलताना दिसले ते लोकच होते ! वाटेतील खडकाच्या जितक्या जवळून जाता येईल, तेवढे आम्ही जात होतो वारा पडलेला होता. त्यामुळे किनाऱ्याला पाय लागण्याची आशा बळावली तेवढ्यात बेटावरील दोघांनी छोटी होडी पाण्यात लोटल्याच दिसल आमच्या दिशेन खडक टाळत ते येऊ लागले

समोर खेड दिसत होत सर्वत्र पामची झाड पसरली होती सावल्या आधीपासूनच मोठ्या होऊ लागल्या होत्या

होडीतील दोघांनी हात हलविले आम्हीही उत्साहीपणे त्यांना खूण केली. त्यांनी वेग वाढवला करड्या रंगाच्या कातडीचे दोनजण आमच्या स्वागताला सामोरे येत होते पण आता भाषेची अडचण पडणार होती फातुहिवामधील वास्तव्यामुळे मलाच फक्त काही शब्द आठवत होते पण बराच नसल्यास पॉलिनेशियन भाषा लक्षात राहणे मुष्किलच '

त्यांची होडी तराफ्याला येऊन चिकटली त्यातील एकजण भरघोस हसला आणि हात वर करून चक्क इंग्रजीत म्हणाला ' गुड नाईट ! '

' गुड नाईट ', मी चकित होऊन म्हणालो 'तुम्हाला इंग्रजी बोलता येत ?'

तो माणूस पुन्हा हसला आणि त्यान मान डोलावली

' गुड नाईट ', तो म्हणाला, गुड नाईट '

परकीय भाषेवर त्याचं एवढच प्रभुत्व होत ! 'गुड

नाईट ' एवढीच त्याची शब्दसंपत्ती पण बाजूला बस-लेल्या माणसाला आपल्या ' अनुभवी ' मित्राचा फारच अभिमान वाटत असावा तो कौतुकान हसत त्याच्या-कडे पाहत होता

' अँगाताऊ ?' बेटाकडे बोट दाखवत मी विचारल

' हँऽगाताऊ ', जोरजोरात होकारार्थी मान हलवत तो म्हणाला

एरिकनं अभिमानान मान हलवली त्याचा अदाज चुकला नव्हता सूर्याच्या स्थितीवरून त्यान निश्चित ठिकाण ओळखलं होत.

' माई माय ही इयुता ', मी प्रयत्न केला

माझ्या आठवणीप्रमाणे या शब्दांचा अर्थ, ' किना-न्याला लागायच आहे '

त्या दोघानी खडकांमधील न दिसणाऱ्या मार्गाकडे अगुली–निर्देश केला त्या दिशेला तराफा नेऊन आम्ही सधी घेण्याचं ठरवल

त्याच वेळी बेटाकडून वाऱ्याचे झोत वाहू लागले. त्यामुळे आमच्या वल्हवण्याला दाद न देता कॉन-टिकी विरुद्ध दिशेला जाऊ लागला आम्ही तळ शोधण्याचा प्रयत्न करू लागलो पण नांगराचा दोर पुरेसा लांबीचा नव्हता शीड घाईघाईन उतरवून प्रत्येकानं एक एक वल्हं हातात घेतलं त्या दोन पाहु-ण्यांनाही स्वतंत्र वल्ही देण्याचा आमचा विचार होता. पण ते आम्ही दिलेल्या सिगारेटचा आनंद घेत नुसते बसले होते

ते माना हलवत मार्ग दाखवत होते, गोधळून गेले होते आपण सर्वांनी वल्ही मारली पाहिजेत, अशी खूण मी केली. शिवाय ' किनाऱ्याला लागायचं आहे, ' हा मत्रही एकसारखा घोकत होतो. त्यावर दोघातील अनुभवी इसम उजवा हात तोडाशी नेऊन ओरडला

' बर्र र्र र्र र्र र्र '

आम्ही इजिन सुरू कराव हेच त्याला सुचवायच असावं मोठ्या बोटीच्या डेकवरच आम्ही उभे असणार अशी त्याची कल्पना झाली होती ओंडक्यामधून पाण्यात हात घालून तसे काही नसल्याचे आम्ही सांगितले त्याचा गोधळ आणखीच वाढला उडी मारून दोघेही तराफ्याच्या कडेला बसले आम्ही सहा-जण वल्ही जोरजोरात मारून तराफ्याची दिशा बदलण्याचा प्रयत्न करीत होतो पण एक इचही पुढे जायला तो तयार नव्हता बेटावरील दोघ धावरून गेले आपल्या होडीत पुन्हा उड्या टाकून ते दिसेनासे झाले अधार वाढला आणि फक्त नेहमीचे सहाजण तराफ्यावरून परत समुद्राकडे ओढले जाऊ नये म्हणून जिवाच्या आकांतानं आम्ही वल्ही मारत राहिलो.

बेट अंधारात बुडाल्यावर चार होड्या खडकामागून नाचत पुढे आल्या थोड्याच वेळात तराफ्यावर पॉलि-नेशियन लोकाची एकच गर्दी झाली सर्वांना आमच्याशी हस्तांदोलन करायची घाई झाली होती आणि त्यांना सिगारेट्स हव्या होत्या एवढे लोक आल्यावर, त्यांना स्थानिक परिस्थितीचं ज्ञान असल्यामुळे आता काहीच धोका उरला नव्हता आम्ही पुन्हा वर जाण्याची शक्यता उरली नाही त्या रात्री आम्ही नक्कीच किनाऱ्या-वर असणार !

आम्ही ताबडतोब त्या चारी होड्याना दोर बाधून ते तराफ्याच्या वल्ह्याला जोडून टाकले क्नटनं रबरी होडी पाण्यात सोडून त्यात उडी मारली बाकी पाच-जण तराफ्याच्या कडेला स्वस्थपणे बसून राहिलो अशा रीतीन प्रथमच, किनाऱ्याच्या विरुद्ध दिशेन वाहणाऱ्या वाऱ्याशी आमचा झगडा सुरू झाला

आता दाट काळोख पसरला होता चद्र अद्याप वर आला नव्हता वाऱ्याची झुळूक उत्साह आणत होती जमिनीवर खेड्यातील असंख्य लोक जमले होते त्यानी खडकामधून दिशा दाखविण्यासाठी मोठा जाळ पेटवला होता खडकांवर आदळणाऱ्या पाण्याचा आवाज गभीर वातावरण निर्माण करीत होता

आम्हाला ओढत नेणाऱ्या होड्यांमधील लोक मुळीच दिसत नव्हते पण त्यानी उच्च स्वरात म्हटलेली पॉलिनेशियन युद्धगीते मात्र ऐकू येत होती क्नट त्यांच्यात जाऊन मिसळला होता त्या लोकांचे आवाज थाबले की मधे क्नट नार्वेची लोकगीते म्हणत होता मधून मधून जोरजोरात हसण्याचा आवाज येई,

आम्ही सर्वजण अतिशय उत्तेजित झालो होतो ९७ दिवसानतर पॉलिनेशियाला येऊन आम्ही अखेर पोचलो होतो त्या रात्री खेड्यात मेजवानी होणार होती खेड्यातील लोक नक्कीच जल्लोष करणार होते. वर्षात अँगाताऊ बेटावर फक्त एकदाच ताहिती बेटा-

वरून लोक नारळाची रोपे घेऊन जाण्यासाठी येत असत. म्हणून त्या रात्री अग्नीभोवती गोल करून आनंदोत्सव साजरा होणे अपरिहार्य होते

परंतु वाऱ्याने उग्ररूप धारण केले शरिराचा प्रत्येक अवयव शिणून जाईपर्यंत आम्ही धडपड करत होतो. बराच वेळ पुढे जात राहिलो तरीही किनाऱ्यावरील शेकोटी काही जवळ येईना खडकांवर आदळणाऱ्या लाटांचा आवाजही कमी होईना लोकांचे गाणे हळूहळू बंद होत गेले सर्वजण स्तब्ध झाले होते आमची शक्ती संपुष्टात आली तीन तास यातच गेले रात्रीचे नऊ वाजले सर्वजण हवालदिल झाले

आम्ही त्या लोकांना खुणेने आणखी मदत मागव-ण्यास सांगितले तेही खूण करून म्हणाले की जमिनी-वर माणसांची कमतरता नसली तरीही त्यांच्याकडे होड्या चारच होत्या नंतर क्नटच्या डोक्यात, रबरी नाव किनाऱ्याला नेऊन, त्यातून पाच-सहा लोकांना आणावे, अशी कल्पना शिरली

पण हे धोक्याच होत. त्याला स्थानिक परिस्थितीचा अंदाज नव्हता दाट काळोखात कोणत्याही क्षणी खडकावर आदळण शक्य होत म्हणून त्यानं होडीतील लोकांच्या पुढाऱ्याला बरोबर नेण्याची इच्छा व्यक्त केली त्याला मार्ग ठाऊक होताच, पण मला ही कल्पनाही फारशी सुरक्षित वाटली नाही कारण रबरी नाव अरुंद धोकादायक मार्गातून नेण्याचा त्यालाही अनुभव नव्हता. मी पुढाऱ्याला तराफ्यावर बोलवण्यास सांगितल त्याला ह्यातून मार्ग काढता येतो का ते पहाव ! आता एक गोष्ट तर स्पष्ट झाली होती की अजून फार काळ समुद्राच्या दिशेन ढकलले जाण आम्ही थोपवू शकणार नव्हतो

क्नट नेत्याला शोधून काढण्यासाठी अंधारात दिसे-नासा झाला काही वेळ उलटून गेला तरीही तो पर-तला नाही म्हणून आम्ही त्याला जोरजोरात हाका मारल्या पण गाण्याच्या काही लकेरींखेरीज उत्तर आल नाही क्नट काळोखात अदृश्य झाला होता काय झाल असाव हे तात्काळ आमच्या ध्यानात आलं लाटा, वारा आणि गोंधळात त्याला आम्ही दिलेली सूचना समजलीच नव्हती पुढारी इसमाबरोबर तो किनाऱ्या-कडे रवाना झाला होता आमच ओरडण व्यर्थ गेल, कारण क्नटपर्यंत आवाज पोचणं शक्यच नव्हत.

आम्ही पटकन् दिवा पेटवला आणि एकजण डोल-काठीवर चढला त्यान ' परत या, मागे फिरा ' असे इशारे दिले

पण कोणीच परतल नाही.

दोन माणस दूर गेलो, एकजण खुणा करत बसलेला आणि बाकीचे लोक पुरते थकून गेलेले या कठीण परिस्थितीत तराफा वेगानं मागं ओढला जाऊ लागला. आम्ही हळूहळू पण निश्चितपणे चुकीच्या दिशेन सरकत होतो शेकोटी लहान दिसू लागली, लाटांचे आवाज कमी होऊ लागले विरुद्ध दिशेच्या वाऱ्यान आमचा ताबा घेतला पुन्हा समुद्रात शिरल्यासारखच होतं. सर्वांची आशा मावळू लागली बल्हवण मात्र कोणीच बाबवल नाही क्नट पुन्हा परतेपर्यंत तराफ्याचा वेग सर्व शक्ती पणाला लावून रोखण अगत्याच होतं

पाच मिनिट उलटली दहा मिनिटं अर्धा तास. शेकोटी मधून-मधून दिसेनाशी होत होती लाटांचा आवाज दुरवरून ऐकू येत होता तेवढ्यात चंद्र उगवला. किनाऱ्यावरील पाम वृक्षांचे शेंडे त्यामुळे प्रकाशित झालेले दिसत होते आकाश धुरकटलेल आणि ढगांनी झाकलेल वाटत होत

खेडूत लोकांची कुजबूज ऐकू येत होती एकदम चारातील एक होडी दोर सोडून दिसेनाशी झाली बाकीच्या तीन होड्यांमधील लोक थकून गेले होते, भीतिग्रस्त झाले होते कॉन-टिकी उघड्या समुद्रात परत जात होता

लौकरच त्या तीनही होड्यांचे दोर सैल झाले आणि तराफ्याला होड्या लगटल्या. एकजण तराफ्यावर येऊन डोक हलवत शांतपणे म्हणाला, ' त्यूटा. ' (जमिनीकडे जातो.)

शेकोटीकडे तो काळजीन बघत होता ती आता मधूनच ठिणगीप्रमाणे दिसत होती आम्ही वेगात मागे जात होतो लाटा शांत झाल्या होत्या फक्त सागर गर्जना नित्याप्रमाणे ऐकू येत होत्या कॉन-टिकीचे सर्व दोर जोरात घासत होते

आम्ही निरोप घेणाऱ्या लोकांना सिगारेट्स दिल्या एकाच्या हातात मी घाईघाईन चिठ्ठी कोंबली त्यात क्नटला उद्देशून लिहिलं होत :

' दोन खेडुतांना होडीत घेऊन ये रबरी नाव त्याला दोरान बांधून आण काही झाल तरी एकटा नावेतून परत येऊ नकोस '

मदत करण्याची इच्छा बाळगणाऱ्या लोकांच्या भर-वशावर आम्ही विसंबून होतो. त्यांना होडी पाण्यात सोडणं धोक्याचं वाटल, तर रबरी नावेतून क्नटनं तराफा गाठण्याची धडपड करण वेडेपणाच ठरल असतं

होड्यातून सर्वजण अंधारात अदृश्य झाले. आमचा पहिला मित्र जाताना नम्र स्वरांत म्हणाला

' गुड नाईट ?'

नतर त्यांचे आवाज विरून गेले जमिनीपासून दोन हजार मैल लांब असाव त्याप्रमाणें पुन्हा वाटू लागल.

आम्ही चौघांनी वल्हवणं चालू ठेवण्यात काहीच फायदा नव्हता डोलकाठीवरून इषारे देण्याच काम तेवढ आम्ही चालू ठेवल, ' परत ये ' म्हणायला आम्ही धजत नव्हतो फक्त दिवा आडवा हालवत होतो इत-कच. मिट्ट काळोख पसरला होता ढगाआडून चद्र क्वचितच डोकावत होता

दहा वाजता आम्ही क्नट पुन्हा दिसण्याची अंधुक आशाही पुरती सोडून दिली तराफ्याच्या कडेला मूक-पणे बसून काही बिस्किट आम्ही चघळत राहिलो मनाच्या समाधानासाठी पाळीपाळीने इषारा चालू होता.

दिव्याचे इषारे रात्रभर चालू ठेवण्याचा आम्ही निर्णय घेतला क्नटचा ठावठिकाणा लागण्याचा संभव नाकारता येत नव्हता. तो सकटात सापडला असेल, असे मानायला आम्ही तयार नव्हतो पण पॅसिफिक-मधल्या एका अनामिक बेटावर तो अडकून पडणे तितकेच गैर व धक्कादायक होते. एका माणसाला पॉलिनेशियातील एका बेटावर पोहचते करून माघारी फिरणे हा आमच्या मोहिमेचा उद्देश नव्हता परिस्थिती गंभीर होती त्यात तराफ्याचे दोरही भयानक आवाज करीत होते झोपण्याचा विचारही कोणाच्या मनाला शिवला नाही

साडे दहा वाजले बेट नुकताच डोलकाठीवरून खाली उतरला होता, आणि आम्ही एकदम उभे राहिलो अंधारातून लोकांचे आवाज अस्पष्टपणे ऐकू येत होते ती भाषा पॉलिनेशियन होती सर्वजण छातीफुटेपर्यंत ओरडलो त्यांच्या ओरडण्याचे आवाजही आले–त्यात क्नटचा आवाज आम्हाला स्पष्ट ओळखता आला अत्यानंदामुळे आम्हाला वेडच लागण्याची पाळी आली. थकवा कुठल्या–कुठे पळून गेला सकट दूर झाल होत अंगाताऊहून दूर गेलो म्हणून काय झाल ! सागरात इतर अनेक बेटे होती आता बालसा ओंडक्यांना प्रवासाची फारच सवय झाली होती आम्ही सहाजण एकत्र असलो तर कुठेही वाहत जाण्यास आमची हरकत नव्हती

तीन नावा काळोखातून पुढे आल्या आणि क्नटने आपल्या आवडत्या कॉन टिकीवर प्रथम उडी टाकली. मागोमाग सहा काळे लोक आले स्पष्टीकरणाला वेळ नव्हता त्या धाडसी पर्यटकांना भेट वस्तू देऊन बेटा कडे परत पाठविण जरूरीचे होत जमीन किंवा प्रकाश दिसत नसताना आणि तारे ढगाखाली लपल्या-मुळे त्याना अदाजान परत फिरायचं होत आम्ही त्याना भरपूर वस्तु व सिगारेट्स दिल्या त्यांनी निघण्या-पूर्वी सर्वांशी मनपूर्वक हस्तादोलन केलं, आणि निरोप घेतला

त्यांना आमची काळजी लागली होती पश्चिमेकडे खूण करून त्या बाजूला धोक्याचे खडक असल्याची जाणीव त्यांनी करून दिली निघताना त्याच्या नेत्याला अश्रू आवरले नाहीत त्यानं माझ्या गालांचा मुका घेतला मी प्रथमच माझ्या दाढीला धन्यवाद दिले त्याच्या होड्या मागे फिरल्यावर आम्ही सहा साथीदार एकत्र पण पुन्हा एकाकी राहिलो

तराफ्याला प्रवाहावर सोपवून आम्ही क्नटची कथा ऐकू लागलो

क्नट मोठ्या अपेक्षेनं नेत्यासह किनाऱ्याकडे गेला होता त्याला परतीचे इषारे दिसत होते म्हणून त्यान नाव माघारी वळवण्याच ठरवल पण खेडुतान सपशेल नकार दिला झगडत बसण्याची ती वेळ नव्हती पाण्यावर आलेल्या खडकांमधून सुरक्षितपणे वाट काढून दोघ जमिनीला जाऊन पोचले खेडुतांच्या गर्दीने नाव ओढून घेतली क्नट भोवती प्रचंड जनसमु-दाय गोळा झाला त्याची भाषा त्याना कळत नव्हती काळ्या रगाचे, उघडे–बोडके सर्व वयांचे स्त्री–पुरुष व लहान मुलें क्नटच्या अंगातील कपड्यांना हात लावून

पहात होती त्या लोकांच्या अंगावर फाटके युरोपियन कपडे होते गोरा माणूस एकही नव्हता

क्नटन रबरी नावेतून परत जाण्याविषयी खाणाखुणा केल्या तेवढ्यात एक जाड माणूस पुढे आला. तो बहुधा नायक असावा. कारण त्याच्या डोक्यावर एक जुनी गणवेशातील टोपी होती आणि आवाजात हुकमत होती इतरांनी त्याला वाट दिली क्नटन समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की त्याला मदत हवी होती बाकीचे साथीदार (आम्ही) दूर निघून जाण्या पूर्वी परत गेलं पाहिजे होत नायक नुसताच हसला. त्याला शब्दही कळला नव्हता क्नटच्या विरोधाला न जुमानता गर्दीनं त्याला खेड्याच्या दिशेनं चालवलं. त्याला कुत्री, डुकरे व हातात फळे घेतलेल्या काही तरुण मुली सामोऱ्या आल्या क्नटन रहावं म्हणून त्याची ही सारी धडपड होती पण त्याच्या डोळ्यासमोरून दूर जाणारा तराफा हालत नव्हता. क्नटला थोपवलं, म्हणजे बाकीचे गोरे लोक नक्की किनाऱ्यावर येतील आणि त्यांच्या 'जहाजा' वरील वस्तू आपल्याला मिळतील, अशी त्यांची अपेक्षा होती ती खरीही होती. आपल्या मित्राला अनोळखी बेटावर टाकून कोण पुढे जाईल ?

बरीच धडपड केल्यानंतर क्नटन रबरी नावेपर्यंत मागे जाण्यात यश मिळवलं. तिथेही बायका–मुलं उभी होतीच त्याची परकी भाषा व आविर्भाव आता सर्वांना कळू लागले होते काही झालं तरी तो आपल्या मित्राकडे घाईघाईनं परतणार हे त्यांना कळून चुकलं

म्हणून लोकांनी एक युक्तीच केली खूण करून त्यांनी दाखवलं की 'बाकीचे लोक बेटाच्या दुसऱ्या बाजूला उतरणार आहेत ' काही मिनिट क्नट पेचात पडला तेवढ्यात तीन होड्या परत आलेल्या दिसल्या माझी चिठ्ठी क्नटला मिळाली तो पुरता हताश झाला एकटा येऊ नको अशी सूचना केलेली आणि बरोबर कोणीच यायला तयार नाही !

मोठ्या आवाजात तेथील लोकांमध्ये चर्चा चालू होती क्नटला ठेवून घेण्यात काहीच अर्थ नाही, आणि त्याच्यासाठी आम्ही किनाऱ्याला पोचणंही अशक्य होतं हे होडीतून आलेल्या लोकांना पटलं असावं. क्नटनं दिलेली आश्वासने आणि धमक्या ऐकून अखेरीस तीन होड्या त्याला सोडण्यास तयार झाल्या, जमिनीवरील लोक अग्नीभोवती निश्चलपणे बसून होते अचानक आलेला नवा देखणा मित्र तितक्याच लौकर निघून जात होता !

समुद्रात दूर अंतरावर आमच्या निशाण्या त्यांना अंधुक दिसत होत्या ओहोटीच्या जोराबरोबर होड्या वेगानं पुढे जाऊ लागल्या. पुन्हा तराफ्याला पाय लागेपर्यंत काही क्नटच्या जिवात जीव नव्हता.

'किनाऱ्यावर वेळ मजेत गेला ना ?' टॉर्स्टेन मत्सरानं म्हणाला

'ओ हो, तू तेथील हुला पोरी बघायला हव्या होत्यास !' क्नटन त्याला खिजवलं

शीड उतरवून आम्ही केबिनमध्ये शिरलो आणि अँगाताऊ वरील खडकाप्रमाणे निद्रिस्त झालो

तीन दिवस आम्ही समुद्रात भटकत होतो, त्या काळात जमीन दिसलीच नाही.

आता तराफा ताकूम आणि रेरोया खडकाच्या दिशेनं जात होता ४०–५० मैलांवर ते होते ते टाळून उत्तरेकडे वळण्याची आमची धडपड चालू होती त्यात यशही येत होतं. एका रात्री त्यावेळचा ' रक्षक ' घाईघाईनं केबिनमध्ये आला आणि त्यानं सर्वांना बाहेर नेलं.

वाऱ्यानं दिशा बदलली होती आम्ही सरळ ताकूमकडे जात होतो त्यात पावसाला सुरुवात झाली समोरच काहीच दिसत नव्हतं ते खडक अगदीच जवळ असले पाहिजेत म्हणून आम्ही युद्ध–समिती प्रमाणे बैठक सुरू केली आमचे प्राण बचावण्याचा प्रश्न होता. उत्तरेकडे जाण्याची आशा सुटली होती आता दक्षिणेला जाऊन पहावं असं ठरलं पुन्हा शीड उभारून वल्हवायला सुरुवात केली वारा दगा देत होता धोक्याचे खडक ५० मैल लांबीचे होते सारच अनिश्चित झालं होतं.

कोणत्याही परिस्थितीत तराफ्यावरच बसून राहण्याचं आम्ही ठरवलं खडकावर तो आदळला तर जोराने फेकले जाण्याचा संभव होता एकमेकांना व लाकडात रोवलेल्या वस्तूंना घट्ट पकडून संकटाला तोंड देण्याची आम्ही तयारी केली रबरी नाव डेकवर ठेवून त्यात वायरलेस ट्रान्समीटर, थोडा अन्नसाठा, पाण्याच्या बाटल्या आणि औषधे बांधून ठेवली तराफ्याच्या

पुढच्या बाजूला एक लांब दोर बांधून ठेवला. एवढं झाल्यावर एकजण टेहळणीला बाहेर ठेवून बाकीचे पुन्हा झोपलो.

पण प्रवास सुरळित चालू राहिला दुसऱ्या दिवशी निघाल्याला शंभर दिवस पूर्ण झाले

त्या रात्री मला मधेच जाग आली अस्वस्थ वाटत होतं लाटा नेहमीपेक्षा वेगळ्या येत होत्या कॉन-टिकीची हालचाल बरीच बदलली होती ओडक्याची लय बदलली, त्यामुळे आम्ही सावध झालो डोळे फाड-फाडून किनारा दिसतो का ते आम्ही बघत होतो. काहीच कळत नव्हतं मला शांत झोप लागू शकली नाही वेळ सावकाश जात होता

पहाटेला, सहाच्या सुमारास टॉरस्टेन डोलकाठी-वरून धाईत खाली उतरला. त्याच्या पामचे छोटे ठिपके दूरवर दिसले होते. ते लहान प्रवाळ बेट असावं उत्तरेच्या वाऱ्यामुळे रेरोयाच्या मागील बाजूस आम्ही आलो असणार !

साडे सातला पश्चिम क्षितिजावर पामची रांग स्पष्टपणे दिसू लागली सर्वात जवळचा किनारा चार-पाच मैलावर असावा तराफा किनाऱ्याला आडव्या दिशेने जात होता मागून काही शार्क मासे पाठलाग करत असल्यामुळे सैल झालेला खालील कणा घट्ट करणं अशक्य होतं वेग प्रचंड होता कॉन-टिकीचा सहवास आता काही तासच मिळणार, अशी धास्ती सर्वांना वाटत होती प्रश्न होता आम्ही तिथे किती जोरात आदळणार !

अकरा

# खडकाळ बेटावर आगमन

तराफा लवकरच खडकावर आदळून फुटणार होता येणाऱ्या प्रसंगाला आम्ही सर्व जण सिद्ध झालो प्रत्येकानं काय करायचं हे निश्चित झालं होतं आयत्या वेळी उगीचच धावाधाव करीत एकमेकांच्या अंगावर आदळण्यात काही अर्थच नव्हता. प्रत्येकाची जबाबदारी ठरवून दिली वाऱ्याच्या जोरामुळे कॉन–टिकी वेगात वर–खाली होत होता जवळपासच्या खडकामुळे लाटा जोरात फेसाळत येत होत्या, यात शंकाच नव्हती

अजूनही शीड उभारलेलं होतं नीट वल्हवता येईल असं आम्हाला वाटत होतं खडकाळ जमीन जवळ आल्यामुळे पाम वृक्ष स्पष्ट दिसू लागले रेरोया बेट साधारण गोल आकाराचं होतं त्याचा व्यास अंदाजे २५ किलोमीटर असेल. त्याला जोडणारे ताकू-मचे खडक यात धरलेले नाहीत सर्वांत लांब असलेली बाजू समुद्राच्या पश्चिमेला होती तिकडेच आम्ही खेचले जात होतो.

क्षितिजावर निळा 'पॅसिफिक' खडकांवर आदळून सर्व दिशांनी हवेत उडत होता. आमच्या पुढे काय वाढून ठेवलं होतं, याची स्पष्ट जाणीव मला झाली

तराफ्यावर सर्वांनी मोहिमेची तिथेच अखेर होणार म्हणून सर्व तयारी केली होती मौल्यवान अशा सर्व जिनसा केबिनमध्ये नेण्यात येऊन एकमेकांना घट्ट बांधण्यात आल्या कागदपत्रे व फोटो इत्यादि वस्तू पाणीबंद पिशव्यामधून ठेवण्यात आल्या. बांबूच्या केबिनवरून कॅनव्हस पूर्णपणे गुंडाळण्यात आलं. त्यावरून जाड दोर घट्ट बांधण्यात आले आमची आशा पूर्णपणे मावळल्यानंतर बांबूचा मधोमध असलेला पृष्ठभाग उघडून खालच्या कण्याचे दोर चाकूनी कापून टाकले. हे काम त्यावर उगवलेल्या वनस्पतीमुळे अतिशय अवघड होतं. शीडही उतरवण्यात आलं कणा व शीडाच्या अनुपस्थितीमुळे तराफा खूपच हलका झाला आता तो केवळ वारा आणि सागराच्या इच्छेवर तगणार होता.

मुद्दाम तयार केलेल्या नांगराला आम्ही लांब दोर घट्ट बांधला डोलकाठीला त्याच टोक बांधण्यात आल. नांगर मागे टाकल्यावर तराफा खडकांवर आदळण्याचा वेग कमी होणार होता

तराफा घट्ट धरून ठेवण्याची ताकीद प्रत्येकाला देण्यात आली होती, वाटेल ते झालं तरी आपली पकड घट्ट राहिल्यावर खडकांचा प्रचंड दाब नऊ मोठ्या ओंडक्यावर जो काही पडावयाचा असेल तो पडो ! पाण्याचा मारा चुकविण्यासाठी बरंच काही करायला लागणार होत मागच्या बाजूला पाण्यात उडी टाकली तर अणुकुचीदार खडकावर वेगात आदळण्याची धास्ती होती. रबरी नावेचाही उपयोग नव्हता पण लाकडी ओंडके केव्हातरी किनाऱ्याला नक्कीच लागणार आणि ते घट्ट पकडले तर आम्हीही त्यावरून किनारा गाठू शकणार होतो

दुसरी गोष्ट म्हणजे १०० दिवसानंतर प्रथमच आम्ही बूट चढवले लाईफ बेल्ट तयार ठेवले. कोणीही मागे पाण्यात फेकला गेला तर बुडण्याऐवजी तो आदळूनच ठार होणार होता आपापले पासपोर्ट व शिल्लक असलेले डॉलर्स प्रत्येकान खिशात घातले

आम्ही सर्वजण काळजीन व्याकुळ झालो होतो. बरेच तास हताशपणे किनाऱ्याच्या बाजून पण एकेक फूट त्याच्या जवळ जवळ प्रवास चालू होता तराफ्यावर जाणवण्याइतकी शांतता होती आमची कामं नेहमीप्रमाणे चालूच होती प्रत्येकजण गंभीर चेहेरा करुन वावरत होता तरीही तराफ्यावरील गाढ विश्वासामुळे कोणीही खचून गेल नाही केबिनमध्ये एकत्र बांधलेल्या सामानामुळे पुरता गोंधळ उडालेला होता वायरलेस सेटजवळ टॉर्स्टेनला जेमतेम बसण्यापुरती जागा होती शॉर्ट वेव्ह ट्रान्समीटर अद्याप काम देत होता. कॅलाओ बंदरापासून आम्ही चार हजार मैलावर येऊन पोचलो होतो वायरलेस वरून नेहमीच्या ठिकाणी संपर्क चालूच राहिला. त्या दरम्यान एका नव्या मित्राशी सेटवरून ओळख झाली. तराफा किनाऱ्याकडे जोरात जात असताना टॉर्स्टेन सर्व काळ बटन दाबत बसला होता

त्यावेळी डायरीत केलेल्या नोंदी

८–१५ जमीन जवळ जवळ येत चालली आहे आता उघड्या डोळ्यांनी प्रत्येक पाम वृक्ष स्वतंत्र दिसत आहे

८–४५ वारा अधिकच प्रतिकूल झाला आहे कोणीही निराश झालेला नाही, पण डेकवर, जोरदार तयारी चालू आहे किनाऱ्यावर काहीतरी पडलेलं दिसत. एखाद्या नौकेचा तो अवशेष असावा किंवा नुसता लाकडाचा ढीगही असेल

९–४५ वारा आम्हाला सरळ शेवटच्या बेटाकडे नेत आहे प्रवाळ खडकाचा किनारा स्पष्ट दिसत आहे. चहूबाजूनी पाण्याचा पांढरा फेस आकाशात उडत आहे. बेंट आताच गरमगरम अन्न पुरवत आहे बहुधा हे तराफ्यावरील अखेरच जेवण ! आम्ही अतिशय उत्तेजित झालो आहोत

९–५० आता अगदी जवळ खडकांना लागूनच जात आहोत अंतर १०० यार्डही नसेल टॉर्स्टेन नव्यान ओळख झालेल्या माणसाशी वायरलेस वरून बोलत आहे ओंडके घट्ट धरून ठेवण्याची वेळ आलेली आहे सर्वजण उत्तम मूडमध्ये आहेत वेळ कठीण असली तरी आम्ही यातून सहीसलामत बाहेर पडू !

काही मिनिटांनंतर आम्ही घाईघाईनं नांगर पाण्यात टाकला तो लगेच तळात घुसला त्यामुळे तराफा जागच्या जागी पुढे-मागे होत राहिला ती काही मिनिटं फारच मोलाची ठरली- टॉर्स्टेन वायरलेसची बटन दाबतच होता आणि त्यान संपर्क साधला लाटाच तुफान तांडव चालू होत सर्व हात डेकवर कार्यमग्न होते.

टॉर्स्टेनन संदेश दिला : 'आम्ही रेरोया खडकाकडे खेचले जात आहोत प्रत्येक तासान आमच्या संदेशाची वाट पहा ३६ तासात आमच्याकडून काहीच संदेश मिळाला नाही तर तुम्ही वॉशिंग्टन मधील नॉर्वेच्या वकिलातीला त्वरित कळवा ' त्याचे अखेरचे शब्द होते 'ओ के फक्त ५० यार्ड बाकी आहेत. तिकडे आम्ही चाललो आहोत गुड बाय् !' नंतर त्यान स्टेशन बंद केलं तो आणि क्नट घाईघाईन बाहेर येऊन आम्हाला मिळाले नांगराची पकड सुटू लागली होती

लाटांची उंची वाढू लागली तराफा एकसारखा वर-खाली होत होता एकजण ओरडला, 'स्वतःला

सांभाळा. सामानाची चिंता करू नका. ओंडका घट्ट पकडा !'

सर्वजण जास्तीत जास्त सुरक्षित ठिकाणी दोर व ओंडका धरून पडले होते फक्त एरिक आयत्यावेळी केबिनमध्ये घुसला त्याचे बूट त्याला सापडले नव्हते

खडकांचा जोरदार धक्का लवकरच अपेक्षित होता. तेवढ्यात नांगराचा दोर तुटला आणि आम्ही एकदम उचलले गेलो तराफा हवेत उचावला तो क्षण जवळ आला होता उत्तेजित झाल्यामुळे रक्त गरम झालं होत हात वर करून मी ओरडलो, अगदी जीव खाऊन ओरडलो ' हुर्रे ! ' त्यामुळे माझ मलाच हलकं हलकं वाटल. बाकीच्यांना वाटलं की मला बहुधा वेड लागलं. पण ते सगळे जोरात हसले वेळ आणीबाणीची होती. यातून निभावून बाहेर पडलंच पाहिजे

पण लाटांची उंची लगेच कमी झाली. नंतर आलेल्या लाटेच्या तडाख्यात आम्ही पार बुडालो माझ सार शरीर लुळ पडल्यासारख झाल सारे स्नायू ताणून मी मनाशी म्हणालो–' सावर थोडा वेळ धीर धर !' क्षणभर मी खचून गेलो पुढच्या क्षणी पाण्याचा डोंगर बाजूला झाला त्यामुळे ताणही कमी झाला माझ्या शेजारी कनट भेदरलेल्या स्थितीत होता तिघं जण केबिनच्या छताला घट्ट पकडून पडले होते त्याच्या अंगावरून पाणी वाहून गेल

आम्ही अजूनही तरंगत होतो

मी बाहू व पायांनं दोराची पकड नव्यानं घट्ट केली कनट वाघासारखी उडी मारून बाकीच्यांत जाऊन मिसळला त्यांच्यात काहीतरी बोलण चालू झाल एवढ्यात नवी लाट समोरून येताना दिसली ओरडून मी सर्वांना इशारा दिला अंग दुमडून मी खाली चिकटून राहिलो. पुन्हा ती प्रचंड लाट पाण्याचे पर्वतच जणु ! तराफा त्या खाली पूर्णपणे बुडला पुन्हा आम्ही पाण्यावर आलो थोड्या वेळात तिसरी लाट येऊन गेली

कनटन एक विजयी आरोळी ठोकली

' पाहा, पाहा, आपला तराफा शाबूत आहे !

तीन लाटांच्या तडाख्यात फक्त केबिनची व डोलकाठीची थोडी हानी झाली होती निसर्गावर मात केल्याची भावना सर्वांना नवी शक्ती देण्यास उपयोगी पडली

तेवढ्यात नेहमीपेक्षा मोठी पुढची लाट आली. मी पुन्हा सूचना दिली प्रथम मी पाण्यात गेलो माझ्यावर निदान वीस फूट पाण्याची भिंत होती. त्यावेळी प्रत्येकाच्या मनात एकच विचार होता–धीर धरा, सांभाळा

त्याचवेळी आम्ही बहुधा खडकांवर आदळलो मला थोडाच धक्का जाणवला तो वरून होता का खालून होता हे मला कळलंच नाही तो काही सेकंदच टिकला खरा, पण अंगात नेहमीपेक्षा अधिक बळ हव असण्याची गरज मला वाटली स्नायूंपेक्षा मानवी रचनेत विलक्षण शक्ती असते जर मरणच येणार असेल तर ते याच स्थितीत यावं अस मी ठरवून टाकल गर्जना करीत पाणी ओसरल्यावर एक भयानक दृश्य मला दिसल काँन टिकी पूर्णपणे बदलून गेला होता एखादी जादूची काडी लागावी त्याप्रमाणे कित्येक महिने आम्ही ज्यावर काळ काढला होता तो तराफा शिल्लक राहिला नव्हता काही क्षणातच आमच्या त्या एकुलत्या एक जगाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या होत्या

माझ्या व्यतिरिक्त एकजण तेवढा मला दिसत होता. तो केबिनच्या छताला घट्ट चिकटून, तोंड खाली करून पडला होता केबिन दोन्ही बाजूला पत्त्याच्या कॅटप्रमाणे ढासळल होत. निश्चल पडून राहिलेली ती आकृती म्हणजे हर्मन होता बाकी कोणाचीही निशाणी दिसत नव्हती उंच लाटा खडकावर आदळतच होत्या. डोलकाठी पार मोडली एकूण तराफ्याची दुर्दशा झाली होती

भीतीनं माझं शरीर थंड पडल मी सुस्थितीत असूनही काय उपयोग होता आमच्या पैकी एक जण जरी गमावला तरी सर्वस्व गमावल्यासारखं होत ! आणि सध्या तरी फक्त एकच माणूस दिसत होता तेवढ्यात मला टॉरस्टेन दिसला तो एखाद्या माकडासारखा दोरीवर लोंबकळत होता नंतर तो खाली ओंडक्यावर उतरला हर्मनन डोक हलवून माझ्याकडे पाहिल तो प्रयत्नपूर्वक हसला पण जागचा हलला नाही बाकीच्यांना शोधून काढण्याच्या प्रयत्नात मी असताना बेंटचा शांत आवाज कानावर पडला सर्वजण किनाऱ्यावर आल्याचं त्यानं सांगितल ते मागच्या बाजूला दोर धरूनच पडले होते

काही सेकंदातच हा सारा प्रकार घडला ठराविक वेळानंतर लाटा आदळतच होत्या. मी ओरडलो, 'सांभाळा!' आणि दोन-तीन सेकंद पाण्याच्या लोंढ्याखाली बुडलो ओंडक्याच्या कडा खडकावर आदळत होत्या पण तराफा पूर्णपणे किनाऱ्यावर आला नाही पुन्हा एकदा मी पाण्यात बुडलो आता आमच्यापैकी कोणीच हसत नव्हत मागून गंभीर आवाज आला

'आता हे फार झालं !'

मी थोडा खचल्यासारखा झालो होतो, पुरता थकून गेलो होतो पाण्यातून डोकावणारे लालसर खडक मला प्रथमच दिसले दोर धरून टॉरस्टनन पाय खाली खडकावर टेकले होते क्नट उडी टाकण्याच्या बेतात होता. मी ओरडलो, 'आपण ओंडक्यांना धरूनच राहिल पाहिजे !'

पुढच्या लाटांचा जोर कमी कमी होत गेला तराफा थोडा किनाऱ्याकडे सरकला. त्या बाजूला आम्ही सर्व जण सरपटत गेलो नंतर एरिक मोडकळलेल्या केबिनमधून बूट घालून बाहेर आला तो सामानावर स्वस्थपणे पडून होता बेटही मागोमाग आला एक-एक करून आम्ही बाहेर उड्या टाकल्या तराफाही पूर्णपणे खडकावर आला होता तो आता वाहून जाण्याची धास्ती उरली नव्हती आमचे हात वेगान कामाला लागले आता क्वचित एखादी लाट तिथपर्यंत पोचत होती आजूबाजूचे खडक चित्रविचित्र आकाराचे आणि रंगाचे होते.

थोड्या अतरावर रबरी नाव पडली होती. त्यात थोड पाणीही होत ते रिकाम करून आम्ही त्यात रेडिओ सेट, पाण्याच्या बाटल्या आणि इतर महत्त्वाचा साठा भरला वर उथावर जाऊन हे सर्व काढून ठेवल आणि पुन्हा नव्याने साठा भरण्यासाठी खाली गेलो भरतीच्या वेळी पाणी किती चढेल याची आम्हाला कल्पना नव्हती

खडकांतून निवडुंग व इतर वनस्पती उगवलेल्या होत्या. आम्हाला ती बागच वाटली सर्व रंगाच संमेलन तिथे भरल होत लहान मोठे मासे स्वच्छ पाण्यातून दिसत होते तीन-चार फुटी शार्कही तिथपर्यंत आलेले दिसले त्या जागेवरून दूर जाण आवश्यक होत. कारण भरतीच्या वेळी काय परिस्थिती असेल, याचा अदाज नव्हता

एखाद्या किल्ल्याच्या भिंतीप्रमाणे खडक पाण्यात दक्षिणोत्तर बुडले होते दूरवर दक्षिणेला पाम वृक्षांनी बहरलेल बेट होतं आणि उत्तरेला ६००-७०० यार्डांवरच दुसरं एक तसच पण छोट बेट होत तो संपूर्ण भागच हिरवागार, फुलांच्या करंडीसारखा दिसत होता

हे बेट आम्ही अखेर निवडल होत

हर्मन माझ्या जवळ दाढी कुरवाळीत बसला होता काहीही न बोलता, हात ताणून तो नुसता हसत बसला कॉन-टिकीवर पाण्याचे तुषार उडत होते तो फुटला होता, पण हा अपघात सन्मानदर्शक होता डेकवरील सर्व काही नष्ट झाल, पण इक्वेडोरमधील किवेडो जंगलातून आणलेले नऊ बालसा ओंडके पहिल्यासारखेच मजबूत होते त्यांनीच आम्हाला जिवंत ठेवल होत. सामानापैकी थोडच वाहून गेल केबिनमधील वस्तू जशाच्या तशा राहिल्या त्या आता उन्हात तापणाऱ्या खडकांवर सुरक्षित होत्या

इमानी पायलट मासे पसार झाले होते डॉलफिन्सही अदृश्य झाले. आम्ही नव्या जगात येऊन पोचलो होतो.

मी तराफ्याकडे अखेरची नजर टाकली. एका टोपलीत एका नारळाच्या 'डोळ्यातून' कोंब फुटले होते. तो हातात घेऊन मी बेटाकडे चालू लागलो माझ्या समोरच क्नट हातात तराफ्याची प्रतीकृती घेऊन आनंदात चालला होता. संपूर्ण प्रवासात त्यान अत्यंत मेहनत घेऊन ती बनवली होती। आमच्याही पुढे स्वयंपाकाच्या सामानाची पेटी अभिमानान हातात घेऊन उत्कृष्ट स्वैपाकी बेंट निघाला होता प्रायमस स्टोव्ह व इतर वस्तू जशाच्या तशा राहिल्या होत्या हे विशेष !

पाम वृक्षराजीकडे आम्ही निघालो हा खडकाळ प्रवास मी आयुष्यात विसरू शकणार नाही मऊ-मऊ वाळूपर्यंत पोचल्यावर मी बूट काढून टाकले उबदार वाळू सुखद संवेदना निर्माण करीत होती पावलाच्या प्रत्येक ठशाकडे मी प्रेमभरान पाहत होतो हिरवे नारळ लटकलेली झाड आम्हाला सामोरी आली इतर वनस्पतींचा सुवास इतका गोड होता की त्यामुळे मला आनंदामुळे चक्करच आली लालसर रंगाचे छोटे पक्षी आसपास उडत होते दोन सरडे माझ्या पायाजवळून उड्या मारत गेले.

मी अतिशय भारावून गेलो होतो. गुडघ्यावर खाली बसून मी दोन्ही हात उबदार वाळूत खुपसले

सफर पूर्ण झाली होती आम्ही सर्वजण जिवंत होतो वस्ती नसलेल्या एका लहान बेटावर आम्ही येऊन पोचलो होतो किती सुंदर बेट ! टॉरस्टेन जवळ आला खांद्यावरील सामान फेकून देऊन खाली आडवा पडला पाम वृक्षाचे शेंडे आणि आमच्या डोक्यावरच घिरट्या घालणारे पांढरे पक्षी–त्यावर अथांग आकाश ! सहा जण तिथेच पडलो हर्मन नेहमीच उत्साहात असायचा. त्यानं एका लहान झाडावर चढून काही हिरवे नारळ काढले त्यांचे नाजूक भाग चाकून हलकेच उघडून सर्वांनी नारळ तोंडाला लावले गोड, थंडगार शहाळी आम्हाला तृप्त करत होती. आम्ही ताजेतवाने झालो दूरवर लाटा नियमितपणे खडकांवर आदळत होत्या. स्वर्गसुखाची कल्पना आम्हाला तिथे येत होती

' स्वर्ग म्हणजे अगदी माझ्या कल्पनेप्रमाणेच निघाला की ', बेंट उद्‌गारला

आम्ही आरामात पहुडलो होतो एकसारखे हसत होतो अखेर पॉलिनेशियाला पोचण्याचं स्वप्न पूर्ण झालं स्थिर, अचल भूमीला स्पर्श झाला होता

लाटांचं तांडव सुरूच होतं.

बेंटचं म्हणणं खरं होतं–हा खरोखरी स्वर्ग होता

• •• •• •••

बारा

# पॉलिनेशियन लोकांच्यात

त्या बेटावर वस्ती मुळीच नव्हती. तेथील प्रत्येक पाम वृक्ष आमच्या परिचयाचा झाला एकूण परिसर २०० यार्डांपेक्षा अधिक लांबीचा नव्हता

झाडांवर लटकलेल्या हिरव्या नारळातील मधुर पाण्यामुळे आमची तहान भागणार होती. काही नारळ तयार झाले होते तसच किनाऱ्यावर विविध मासे मिळत असल्यामुळे आम्ही तिथे तब्बतीत राहणार होतो

उत्तरेकडे असंच एक छोटं बेट दिसत होतं त्यामानानं दक्षिणेकडील घनदाट झाडीनं बहरलेलं बेट अधिक जवळ होतं मनुष्य वस्ती असल्याची चिन्हं मात्र कुठेच दिसत नव्हती तूर्त आमच्यापुढे इतरच प्रश्न होते

एरिक छोटे मासे पकडून घेऊन आला क्नट कोरड्या लाकडाच्या शोधात होता त्यानं विस्तव पेटवला लवकरच सर्वांना मासे आणि नारळाची मेजवानी मिळाली नंतर कॉफी बनवण्यात आली

‘ किनारा गाठल्यामुळे छान वाटतंय, नाही ? ’ क्नट खाताना रंगात येऊन म्हणाला. त्याला अशाच सफरीचा पूर्वानुभव होता १०१ दिवस समुद्रात गेल्यानंतर जमिनीवर आमचे पाय अडखळत होते चालण्याची सवय मोडली होती ना !

खडकावर तराफा आदळण्यापूर्वी मला असंख्य वेळा स्नान घडलं होते एरिकनं त्या दिवशी आंघोळ न करण्याचा निश्चय जाहीर केला जेवण झाल्यावर आम्ही जमिनीवरच ताणून दिली त्यानंतर वायरलेस यंत्राकडे आम्ही मोर्चा वळवला लवकरच त्यावरून संदेश पाठविण्याची गरज होती नाहीतर आमचा दुःखद शेवट झाला असणार, असं अमेरिकेतल्या लोकांना वाटलं असतं वायरलेसच्या पेट्या भिजून चिंब झाल्या होत्या त्याला हात लावताच बेंटला विजेचा सौम्य धक्का बसला क्नट व टॉरस्टेन त्या उद्योगाला लागल्यावर बाकीचे तंबू उभारण्याची तयारी करू लागले

मोडतोड झालेल्या तराफ्यावर भिजलेलं शीड पडून

होत दोन बाबू आणि दोन कमी उंचीच्या पाम वृक्षा-वर आम्ही शीड ताणून बांधल त्यामुळे छत तयार झाल तीन बाजूला शीडाचं कापड भिंतीप्रमाणे सोडल होत. किनाऱ्याची बाजू उघडी ठेवली होती या सुखाला सीमाच नव्हती. इथे आलो हे फारच छान झालं. प्रत्येकजण अधूनमधून नकळत हसत होता पामच्या झावळ्यापासून बिछाने तयार झाले रात्र पडण्या-पूर्वीच आम्हाला भरपूर विश्रांती मिळाली जमिनीला पाठ टेकल्यावर वरती कापडावरील कॉन–टिकीचा चेहरा दिसत होता बाजूला आकाशात असंख्य तारे चमचमत होते

तराफ्यावरील सर्व वस्तू किनाऱ्यावर पडलेल्या होत्या एक दिवस आणखी त्या उन्हात राहिल्या म्हणजे पूर्णपणे सुकून जातील त्या दिवशी वायरलेस-लाही हात लावता आला नाही आज स्वस्थपणे झोपता येणार होत

सकाळी आम्हाला सूर्योदयाबरोबरच जाग आली छतावर पावसाच पाणी साठल्यामुळे ते खाली ताणल गेल होतं बेंटन ते स्वच्छ व सुंदर पाणी भांड्यात ओतून घेतल नाश्ता उरकण्यासाठी त्यान बरेच मासे पैदा केले

हर्मनची मान व पाठ थोडी दुखत होती एरिकचे पाय दुखत होते एवढ सोडलं तर आम्ही केवळ चम–त्कारानच किनाऱ्याला सुखरूप लागलो होतो किरकोळ खरचटणे दुर्लक्ष करण्याजोगे होते दोर घट्ट धरून ठेवल्यामुळे माझे दंड आणि पाय काळे निळे झाले होते

मंद वारे वाहत होते झाडाचे शेंडे त्यानुसार हलत होते किनाऱ्यालगतच्या बाजूतील पाणी आरश्याप्रमाणे चमकत होत, रंगीबेरंगी मासे त्यात फिरत होते वातावरण उत्साहवर्धक होत समोरच दृश्य एकटक बघत बसावं अस सर्वांना वाटत होत, परंतु वायरलेस-वरून संदेश पाठवणं अगत्याच असल्यामुळे दोघजण तिकडे वळले संध्याकाळपर्यंत संदेश देण्यात यश आल नाही रात्री दहा वाजेपर्यंत संदेश पोचू शकला नाही तर आमचा दक्षिण अमेरिकेतील मित्र साऱ्या जगाला दुःखद वृत्त देणार होता विमान किंवा अन्य मार्गाने आमचा शोध सुरू झाला असता

बारा वाजले, दुपार उलटली, आणि सूर्यास्तही झाला बघता बघता नऊ वाजले ट्रान्समीटर दाद देईना ! परंतु मध्येच हळू आवाजात संगीत ऐकू येऊ लागल, संदेश मात्र देता आला नाही आता एक तासच बाकी होता सर्वांच्या मनावर असह्य ताण पडला होता तारा ओल्या झाल्यामुळे बहुधा वायरलेस सेट काम देत नव्हता बॅटऱ्यांची दुर्दशा झाली होती एव्हाना छत्तीस तासांची मुदत संपली होती त्यांनी आमच्या सुटकेसाठी हालचाल सुरू केली असेल का ?

दोन ऑपरेटर्स झगडत होते. त्यांच्या कपाळावरून घाम निथळत होता आणि अचानक ट्रान्समीटरच्या एरियलमध्ये जीव आला आता तो सुरू होण्याची चिन्ह दिसत होती टॉरस्टेनन आमच्या ' रॅराटोंगा ' नावाच्या होडी रेडिओ–धारकाशी बोलण्याचा प्रयत्न केला पण पलिकडून उत्तर आल नाही लॉस एन्जलस-मधल्या ' हॉल ' आणि ' फॅक 'शी, तसच लिमाच्या नेव्ही स्टेशनशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण कोणीच आमच बोलण ऐकू शकल नाही

नंतर टॉरस्टेनन ' सीक्यू ' संदेश सेटवरून धाडला. त्याचा अर्थ जगातील कोणत्याही स्टेशनवर तो पोचणार होता त्याची तपश्चर्या फळाला आली एक मंद स्वर आम्हाला ऐकू येऊ लागला आम्ही त्याला उद्देशून पुन्हा बोललो पुन्हा तो बोलू लागला

' माझं नाव पॉल मी कोलोरॅडोचा रहिवासी आहे तुम्ही कोण आहात ? कुठून बोलत आहात ?'

तो एक वायरलेस फॅन होता आम्ही उत्तर दिल

' आम्ही कॉन-टिकीवरील उतारू आहोत, पॅसिफिक मधल्या एका वैराण बेटावर आम्ही येऊन पोचलो आहोत

पॉलचा या माहितीवर विश्वास बसला नाही त्याला वाटल की जवळपासच्या सेटवरून कोणीतरी थट्टा करत होत, तो पुढे काही बोललाच नाही आम्ही येथ अनो ळखी बेटावर ताऱ्याखाली बसलो होतो पण आमच्या बोलण्यावर त्याचा विश्वास बसत नव्हता

टॉरस्टेनन माघार घेतली नाही तो सर्व सुरक्षित सर्व सुरक्षित , असा संदेश पाठवत राहिला आमच्या सुटकेसाठी कोणी निघण्यापूर्वी त्यांना थोपवण आव-श्यक होत

त्याला हलक्या आवाजात ऐकू आल

'सर्व सुरक्षित असेल तर चिंता कसली?'

पुन्हा सर्व शांत संदेश देवाणघेवाण समाप्त

आणि अचानक हॉर्न व रॅराटोंगा याचे संदेश आले हॉलला अतिशय हर्ष झाला होता त्यानं आमचा संदेश पकडला होता आणि आमच्या शोधार्थ निघणाऱ्या तुकडीला त्यानं थोपवलं.

त्यानंतरच आम्ही बिछान्यावर अंग टाकलं

दुसऱ्या दिवशी सर्वजण अधिक मोकळेपणानं आणि उत्साहानं बेटावर वावरू लागले मासे पकडणं, स्नान इ उरकल्यावर काहीजण किनाऱ्यावरील अनोख्या प्राण्यांच्या शोधार्थ भटकू लागले दोघांनी तंबूचा परिसर स्वच्छ केला जवळच पेरहून आणलेली नारळाची कोंब फुटलेली रोप जमिनीत लावली त्याच्या संरक्षणार्थ आम्ही कुंपण तयार केलं

तराफा जवळजवळ कोरडा झाला होता त्याखाली पाण्याची डबकी साठलेली होती उबदार वाळूत दोन दिवस लोळल्यानंतर एरिक आणि हर्मन ताजेतवाने झाले दक्षिणेकडे असलेल्या आमच्याहून मोठ्या बेटावर पाण्यातून, खडकांवरून चालत जावं, असा त्यांचा इरादा होता वाटेत सापासारख्या 'ईल' माशांची भीती होती त्यांच्या विषारी दातांत माणसाचा पाय फाडून काढण्याची शक्ती असते विद्युत वेगानं ते आपल्या लक्ष्यावर तुटून पडतात पॉलिनेशियातील लोकांना शार्क माशाच्या भागात पोहण्यात काहीच वाटत नाही पण 'ईल' माशांना मात्र ते अतिशय घाबरतात

खडकांवरून दोघंजण बेटाच्या रोखानं जाऊं लागले मधे मधे खोल पाणी लागत असल्यामुळे तिथून ते पोहत पुढे गेले थोड्याच वेळात ते सुरक्षितपणे मोठ्या बेटाच्या किनाऱ्याला लागले तिथेही पाम वृक्षांच जंगल दिसत होत किनाऱ्याकिनाऱ्यानं दोघजण पुढे जात राहिले एके ठिकाणी त्यांना फुटलेल्या जहाजाचे अवशेष आढळले त्याला चार डोलकाठ्या होत्या ते एक जुनं स्पॅनिश जहाज होतं रेल्वेचे रूळ घेऊन ते निघाल असावं, कारण आसपास गंजलेले रूळ इतस्ततः पडलेले दिसत होते

परत येताना वाटेत असंख्य रंगीबेरंगी मासे दिसत होते, ते पकडण्याच्या प्रयत्नात असतांना सातआठ 'ईल'नी दोघावर हल्ला चढवला माणसाच्या हाता-एवढे ते जाडजूड होते दोघानी खडकावर उड्या मारल्या दोघांजवळ चाकू होते एका माशाला एरिकन डोक्यावर चाकून मारलं दुसरा मासा जखमी होऊन पळाला पाण्यात रक्त पसरल्यामुळे लहान निळसर शार्क मासे तिकडे आकर्षित झाले ईल माशांवर ते तुटून पडले तोपर्यंत पुढील उंच खडकावर उड्या मारण्यात दोघांना यश आलं

त्यानंतर मोठ्या बेटावर आम्ही बऱ्याच वेळा ये जा केली वाटेत कित्येक माशांनी त्रास दिला बेटावरील मुक्कामात रोज नव्या अनुभवाची भर पडत होती पण राहिलेलं आयुष्य आम्हाला तिथंच काढायचं नव्हतं नेहमीच्या जगात परत जाण्याचा विचार सुरू केला पाहिजे

तराफा आता वाळूत रूतून बसला होता त्याचा पुन्हा उपयोग होण्यासाठी खूपच मेहनत घ्यावी लागणार होती बेटाच्या मागच्या बाजूस जाऊन तेथे मनुष्य-वस्ती आहे किंवा कसं याचा शोध घ्यावयाचा होता जवळपासच्या अलग झालेल्या बेटांवर तशी शक्यता नाकारता येत नव्हती

दिवस भराभर जात होते

एक दिवस जवळच्या खाडीतून पाढर शीड पुढे येताना दिसलं मागोमाग दुसरही दिसल बेटाच्या मागच्या बाजूला ते जाणार असाव त्याचा आकार स्पष्ट होऊ लागला आम्ही एका झाडाला फ्रेंच ध्वज लावला, तसच एका बांबूवर आमचा नॉर्वेचा ध्वज लावला

त्या पॉलेनेशियन पद्धतीच्या होड्या होत्या करड्या कातडीचे दोनजण आमच्याकडेच बघत होते आम्ही इशारा केल्यावर त्यांनी हात हलवले तोपर्यंत होड्या अगदी जवळ आल्या

'ला ओरा ना, आम्ही पॉलिनेशियन भाषेत अभि-वादन केल

'ला ओरा ना,' दोघेही एकदमच आनंदानं ओरडले. एकानं खाली उडी टाकली आणि होडी हातानं ओढत तो पुढे आला

दोघेही गोऱ्या लोकांच्या वेषात होते पाय उघडे, बळकट शरीर आणि डोक्यावर गवताच्या हॅटस् थोडे

बिचकतच ते पुढे आले दोघानी आमच्याशी हस्तांदोलन केल्यावर ते प्रसन्नपणे हसले ते हास्य शब्दापलीकडे बरच काही सांगून गेल

त्याच्या भाषेत आम्ही बोलल्यामुळे दोघही चकित झाले होते त्या मोजक्या शब्दसपत्तीपलिकडे आम्ही काहीच बोलू शकत नव्हतो नुसत हसण्याखेरीज आमच्या हातात काहीच नव्हत तेवढ्यात दुरून आणखी एक होडी येताना दिसली त्यात तिघजण होते ते जवळ आल्यावर, त्यातल्या एकाला थोड फ्रेंच येत असल्याच समजल जवळच्या एका बेटावर छोट खेडेगांव असल्याच आम्हाला समजल आम्ही रात्री जो विस्तव पेटवत होतो, ते तिथल्या लोकांना दिसत असे तेथील लोकांना अस वाटल होत की या खडकाळ बेटावर, त्यांना दिसल्याशिवाय कुणीच पोचण शक्य नसल्यामुळे तो विस्तव म्हणजे अतिमानवी शक्तीचा खेळ असावा पण एक दिवस त्याना एक पेटी किनाऱ्याला तरगत आलेली दिसली त्यावर लिहिलेली 'टिकी' ही अक्षर एकाला वाचता आली मग तर खडकाळ बेटावर भुत असल्याची त्याची खात्रीच झाली, कारण टिकीला स्वर्गात जाऊन कित्येक शतके लोटली होती त्यांच्या जमातीचा तोच सस्थापक होता.

पण मागून खाद्यपदार्थांचे डबे, सिगारेटची पेटी तरगत आलेली पाहून त्याच्या लक्षात आल की बेटाच्या पूर्वेकडे एखाद जहाज आदळलं असाव म्हणून खेड्याच्या प्रमुखान दोन होड्यातून, बचावलेल्या लोकांच्या तपासासाठी माणस पाठवली होती

फ्रेंच जाणणाऱ्या इसमाला आम्ही आमचा इतिहास थोडक्यात सांगितला खडकांवर आदळूनही आमच्यातील एकहीजण दगावला नाही याच त्यांना अतिशय आश्चर्य वाटलं साध्या तराफ्यावर आम्ही आलो यावर त्याचा विश्वासच बसेना होड्यामधून आम्हाला लगेच त्याच्या खेड्यात नेण्याचा त्यांचा विचार होता पण आम्ही नम्रपणे नकार दिला. आम्हाला कॉनटिकीची डागडुजी करावयाची होती पण फ्रेंच बोलणारा म्हणाला की त्यांच्या प्रमुखानं आम्हाला बरोबर घेतल्याशिवाय परतायच नाही अशी आज्ञा दिली होती

मग आम्ही ठरवलं की आमच्यापैकी एकानं त्यांच्या बरोबर जाव खेड्यातील परिस्थितीचा अदाज घेऊन परत याव म्हणून शेवटी बेंट त्यांच्याबरोबर गेला वाऱ्याच्या वेगाबरोबर होड्या पश्चिमेकडे अदृश्य झाल्या

दुसऱ्या दिवशी क्षितिजावर असख्य शीड दिसू लागली. आम्हा सर्वांना बरोबर नेण्याचा चग बांधून खेडूत येत असावेत बेंट त्यांच्याबरोबर होताच खेड्याचा प्रमुख बरोबर आल्याच त्यान ओरडून सांगितल आम्ही पाचजण आदर दर्शविण्यासाठी ओळीत उभे राहिलो

बेंटन आमची समारभपूर्वक प्रमुखाशी ओळख करून दिली. त्याच नाव 'तेरीफाताऊ' होत, पण आम्ही त्याला 'टेका' म्हणाव अस त्यान सुचवल टेकाचे डोळे विलक्षण चमकदार होते तो रेरोया आणि ताकूम या दोन बेटांचा प्रमुख होता ताहितीमधील शाळेत शिकल्यामुळे त्याला फ्रेंच लिहिता-वाचता आणि बोलता येत होत गेल्या दहा वर्षात केवळ तीन होड्या तिथल्या किनाऱ्याला येऊन लागल्या होत्या ताहिताचे लोक मात्र दरवर्षी अनेकवेळा येत असत काही वस्तूंच्या मोबदल्यात नारळाची रोप घेऊन जात आताही तिकडचे लोक केव्हाही येण्याची शक्यता होती

बेंटच्या अहवालानुसार रेरोया खेड्यात एकही गोरा माणूस नव्हता शाळाही नव्हतीच वायरलेस वगैरेचा प्रश्नच सोडा! परंतु तिथल्या १२० नागरिकांनी आमच्या स्वागताची जय्यत तयारी केली होती

टेकान आमची होडी बघण्याची इच्छा व्यक्त केली ४३०० मैल आम्हाला सुखरूप आणणाऱ्या वाहनाविषयी त्याला स्वाभाविक कुतूहल वाटत होतं आम्ही त्याला कॉन–टिकीकडे नेल मागोमाग सर्वजण आलेच तराफ्यावर दृष्टी पडताच कित्येकजण जोरजोरात कुजबुजू लागले एक जण जोरात ओरडला

ही होडी नाहीच मुळी! हा 'पे–पे' आहे!'

'पे–पे!' बाकीचे एका सुरात ओरडले

बरेच जण तराफ्यावर जाऊन उभे राहिले, ओंडके आणि दोर हाताळू लागले टेकालाही धक्का बसला होता पे–पे म्हणजे पॉलिनेशियन भाषेत अर्थातच तराफा इस्टर बेटावर होडीलाही तोच शब्द वापरतात सध्या तिथे तराफे वापरात नव्हते परंतु जुनी माणस पुराणकाळातील तराफ्यांची वर्णन ऐकवत असत बालसा ओंडक्याच कौतुक करत सर्वजण निरीक्षणांत

मग्न होते

आम्ही 'शोध' लावलेल्या त्या बेटाचं नाव ठरल्या-प्रमाणे 'कॉन–टिकी' असं ठेवण्यात आलं. आमची सहा जणांची नावं उच्चारणं तेथील लोकांना जमत नव्हतं. ती माहिती बेटावर प्रथम गेलो असताना तेथील प्रमुख व्यक्तीनं माझं नाव 'तेराई' ठेवलं होतं. त्या नावानं मला हाक मारण्यास हरकत नाही, असं सांगितल्यावर त्या खेडुतांना अत्यानंद झाला.

त्यांनी होड्यांमधून अंडी, मासे इ. पदार्थ आणले होते. आमच्या तंबूजवळ शेकोटी करून आम्ही सर्वजण भोवताली बसलो. सर्वांनी उत्तम मेजवानी झोडली. नंतर समुद्रातील आमचे अनुभव एकेकाने सांगायला सुरुवात केली. शार्क माशाच्या शिकारीचं वर्णन ऐकताना उत्तेजित होऊन लोक आरोळ्या ठोकत होते. त्या शिकारीचं वर्णन त्यांनी पुन्हा पुन्हा सांगायला लावलं. व्हेल शार्कविषयी त्यांनी काहीच ऐकलं नव्हतं किंवा पूर्वी त्याला पाहिलही नव्हतं.

संध्याकाळ उलटल्यावर आम्ही वायरलेस-सेट सुरू केला. त्यावरील आवाज ऐकून सर्वजण खुशीत आले. प्रथम चर्चमधील संगीत चालू होतं. त्यानंतर आश्चर्य म्हणजे अमेरिकेत लागलेलं 'हुला' संगीत आम्हाला ऐकू आलं. ते ऐकताच खेडूत मंडळी हातात हात अडकवून त्या तालात फेर धरून नाचू लागली. रात्र झाल्यावर शेकोटी भोवती आम्ही किनाऱ्यावरच आडवे झालो. आमच्या इतकंच त्यांनाही अनोळखी बेटावर उघड्यावर झोपणं धाडसाचं वाटलं.

सकाळी आम्ही उठण्यापूर्वीच बाकीचे लोक उठले होते. नव्यानं मासे पकडून ते भाजण्याचा कार्यक्रम चालू होता. सहा माणसांची न्याहाळी आमची तहान भागवण्यासाठी सिद्ध होती.

त्या दिवशी लाटा जोरात उसळू लागल्या. वाऱ्याचा जोर वाढला होता. पाण्याचा पृष्ठभाग हवेत झेपावत होता.

'आज मोठी भरती येणार आहे,' टेका समोर हात करीत म्हणाला.

अकराच्या सुमारास पाणी वेगानं पुढे सरकू लागलं. किनाऱ्यावरील छोटी-मोठी डबकी व खाचखळगे पाण्यानं भरून गेले.

त्या छोट्या बेटावर पाणी पसरू लागलं. हळूहळू पाण्यावर डोकावणारे खडक दिसेनासे झाले. बेटाच्या दोन्ही बाजूनं पाणी पुढे सरकत होतं. कॉन-टिकी हलू लागला. किनाऱ्यावरील बारीक सारीक वस्तू पाण्याबरोबर बेटाच्या आतल्या भागात लोटल्या जाऊ लागल्या. आम्ही घाईघाईनं महत्त्वाच्या गोष्टी तिथून सुरक्षित स्थळी नेऊन ठेवल्या. या समुद्राच्या आक्रमणामुळे संपूर्ण बेट पाण्याखाली जाईल काय अशी भीती वाटू लागली.

खेडूत मंडळी पाण्यात उडी टाकून पोहू लागली. तरंगणाऱ्या तराफ्याला दोर बांधून तो एका पामला अडकवण्यात त्यांना यश आलं. लोकांच्या 'हे-के टे हुरु हुरु' अशा आरोळ्यांमुळे साऱ्या परिसरात चैतन्य भरून राहिलं होतं. नेहमीच्या पातळीपेक्षा फक्त चार फूट पाणी वर चढलं होतं. आणि सारं बेटच अदृश्य होईल, अशी भीती आम्हाला निष्कारणच पडली होती.

वेगवान वारे आणि लाटांना न जुमानता खेड्यातील मंडळी त्यांच्या बेटावर घाईघाईनं जायला निघाली. बेंट आणि हर्मन त्यांच्याबरोबर गेले. खेड्यातल्या एका मुलाच्या डोक्यावर गळू आलं होतं, आणि आमच्याजवळ पेनिसिलिन होतं.

दुसऱ्या दिवशी कॉन टिकी बेटावर आम्ही फक्त चार जण उरलो. भरतीचा जोर एवढा होता की रेरोयावरील लोकांना आमच्याकडे येणं शक्यच झालं नाही. त्यानंतर पाणी संथ झालं. आम्ही तराफ्याखाली सूर मारून नऊच्या नऊ बालसा ओंडके शाबूत असल्याची खात्री करून घेतली. दुपारी होड्या पुन्हा दिसू लागल्या. हर्मन आणि बेंट त्यात होतेच. आम्हाला बरोबर नेण्याचा सर्वांचा इरादा होता. तिथे मोठ्या प्रमाणात उत्सव साजरा होणार होता.

अंतर अदाजे सात मैलांच होतं. होड्यांमधून आम्ही निघालो. कॉन टिकी बेट पाम वृक्षाच्या फांद्या हलवून आम्हाला निरोप देत होतं.

रेरोया खेड दुरून दिसू लागलं. तेथील झोपड्यांवरून धूर आकाशात जाताना दिसत होता. पण एकही मनुष्य किनाऱ्यावर दिसेना. नंतर हळूहळू दोन निश्चल आकृती दिसू लागल्या. त्यातील एक होता टेका आणि दुसरा त्याचा सहाय्यक 'तुपुहो'. तुपुहोच्या दिलखुलास

हास्यामुळे आम्हाला त्याच्या विषयी एकदम जवळीक वाटू लागली टेका हुशार व धोरणी होता पण तुपुहो अतिशय सरळ स्वभावाचा वाटला त्याच्या भरदार शरीरयष्टीवरून तोच बेटाचा राजा शोभत होता प्रत्यक्षातही तोच पूर्वी मुख्य होता पण टेकाला फ्रेंच बोलता येत होत आणि लिहिणे व मोजमाप करण्याची कला अवगत होती, त्यामुळे त्याच अधिपत्य निर्माण झाल ताहितीहून व्यापारासाठी येणाऱ्या लोकांकडून त्याच्यामुळे फसवणूक होण्याचा संभव नाहीसा झाला होता

नियोजित ठिकाणी एका लहानशा मिरवणुकीसारखे आम्ही जाऊ लागलो सर्वांत पुढे हर्मन एका हारपूनच्या काठीवर ध्वज फडकवत जात होता मी दोन प्रमुखांच्या मधून चालत होतो, सर्व लोकांना एकत्र जमण्यासाठी एक मोठ लाकडी घर बांधण्यात आल होत आम्ही सहाजण तिथेच मुक्काम करणार होतो मागच्या बाजूस असलेल्या छोट्या दारातून सर्वांनी आत प्रवेश केला समोर पाहतो तर चौरसाकृती ओळीत खेड्यातील समस्त स्त्री-पुरुष उभे होते सर्वांचे चेहेरे अतिशय गंभीर होते कॉन-टिकी बेटावर मैत्री झालेले लोकही ओळख दाखवण्याचं नाव घेत नव्हते

आम्ही सहा गोरे लोक पायरीवर उभे राहताच सर्वजण उच्च स्वरात गाऊ लागले. टेका सर्वांना प्रथम ओळी सांगत होता फ्रेंच आणि नॉर्वेचा ध्वज आमच्या समोर उभारला होता थोड्या वेळाने तुपुहोन एक खूण करताच सर्वजण नवे गीत गाऊ लागले आम्हाला ती रचना अधिक भावस्पर्शी वाटली त्या गीताचा अर्थ नंतर समजला तो असा

सुस्वागतम्! तेराई ( म्हणजे मी ) व बाकीचे लोक तराफ्यावरून हजारो मैल ओलांडून आमच्या रेरोया बेटावर आला आहात, सुस्वागतम्! आमच्या बरोबर तुम्ही सर्वजण दीर्घकाळ राहा आपण सुखद स्मृतींची देवाण घेवाण करू तुम्ही पुन्हा दूर निघून गेलात तरी त्या स्मृतीमुळ आपण कायमचे एकत्र राहू सुस्वागतम्!'

आम्ही हे गाण त्यांना पुन्हा म्हणायला लावल त्यामुळे वातावरण खूपच प्रसन्न झाल नंतर तुपुहोन मला चार शब्द बोलण्याची विनंती केली इतक्या दूर वरून त्या बेटावर जाण्याचं प्रयोजन काय होत याची सर्वांना उत्सुकता होती मी फ्रेंचमध्ये बोलायच आणि टेकान दुभाषाच काम करायच

माझ्या भाषणाची सर्वजण वाट बघत होते लोक अशिक्षित असले तरी खूपच बुद्धिमान वाटत होते मी त्यांना सांगितलं ' दक्षिण सागरीय बेटावर मी पूर्वी आलो होतो टिकीच्या कथा मला तिथेच समजल्या तो अज्ञात देशाहून आपल्या लोकांना घेऊन या बेटावर आला होता आणि एके काळी पेरू देशात टिकी नावाचा बलाढ्य राजा राज्य करीत होता नंतर तो देश सोडून मोठ्या तराफ्यावरून आपल्या अनुयायांसह समुद्रमार्गे अदृश्य झाला या बेटावर प्रथम वस्ती करणारा तो टिकीच असावा, असं आम्हा सहा जणांना वाटतं तराफ्यावरून एवढी प्रचंड सफर करणं अशक्य आहे, असं आमच्या लोकांना वाटत होत म्हणून आम्हाला पेरूहून तसा प्रवास करून दाखवायचा होता आणि आम्ही आज तुमच्यात सुरक्षितपणे दाखल झालो आहोत

भाषण चालू असताना तुपुहो उत्स्फूर्तपणे मधून मधून काहीतरी बोलत होता लोकांना ते बरोबर समजत होत आकाशाकडे बोट दाखवून तो ' टिकी ' शब्द वारंवार पुटपुटत होता आणि आमच्याकडे अंगुलीनिर्देश करत होता सर्व लोक खूपच उत्तेजित झाले होते टेका मात्र रूपांतर करताना गोंधळून गेला होता, त्यांचा पूर्वज केवळ देव नसून प्रत्यक्ष अस्तित्वात होता हे माझ्या तोंडून ऐकल्यावर सर्वांना अतिशय हर्ष झाला टेका आणि तुपुहो यांच्यासारखाच तो महान माणूस होता, हे मी सांगितल्यावर सर्व लोकांना फारच आनंद झाला माना डोलवत त्यांच्यात कुजबुज चालू होती

तीन म्हातारे लोक इतरांना बाजूला सारत पुढे आले त्यांना आमच्याशी हस्तांदोलन करायच होत टिकीच्या आठवणी त्यांनीच जिवंत ठेवल्या होत्या जुन्या काळच्या परंपरा आणि ऐतिहासिक पोवाडे पूर्वजांपासून त्यांच्यापर्यंत चालत आले होते टिकी सूर्याच्या दिशेन तराफ्यावरून आला, हे त्यातल्या एकाला ठाऊक होत एका पोवाड्यात 'पुरा' देशाचा उल्लेख होता.

माझ्या सिद्धान्ताला त्यामुळे बळकटी येत होती

तराफ्याचा वापर हळूहळू बंद होत गेला होता पण त्यांचे पूर्वज मोठमोठ्या तराफ्यावरून समुद्रात जात, एवढं त्यांना ठाऊक होतं म्हाताऱ्या लोकांना टिकीबद्दल चर्चा करायची होती, तर तरुणांना व्हेल शार्क आणि सफरीचा वृत्तांत हवा होता पण जेवण तयार झालं होतं आणि टेका दुभाषाचं काम करून पुरता थकला होता

आता सर्वांना आम्हाला भेटण्याची मोकळीक मिळाली हस्तांदोलन करताना ते आमच्या खांद्यापासून हात हलवत होते तरुण मुली लाजत लाजत पुढे येत होत्या वयस्कर बायका आमच्या दाढ्या आणि कातडीच्या रंगाकडे बोट दाखवत होत्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर मित्रत्वाची निशाणी दिसत होती भाषेचा एकच गोंधळ उडाला होता खेड्यातील १२७ लोकांशी ओळख झाल्यावर एक मोठं टेबल तिथं आणण्यात आलं दोन प्रमुख आणि आम्ही सहा असे त्याभोवती बसलो मुली चविष्ट पदार्थांच्या बश्या घेऊन आल्या हे काम चालू असताना काहीजणांनी आमच्या गळ्यात फुलांचे हार घातले आणि डोक्यावर लहान लहान फुलांच्या माळा ठेवल्या स्वागताची मेजवानी त्या दिवशी जी सुरू झाली ती पुढे कित्येक आठवडे आम्ही निघेपर्यंत चालू होती विविध पदार्थांकडे पाहूनच आमच्या जिभेला पाणी सुटलं पपया आणि नारळ जोडीला होतेच आम्ही त्यावर अक्षरशः तुटून पडलो आमचं जेवण चालू असताना लोक हुला गीत म्हणत होती आणि काही मुली टेबलाभोवती नाचत होत्या

लहान मुलं हसत होती त्यांची खूपच करमणूक होत होती गळ्यातल्या हारांमुळे खाताना आमची तारांबळ उडत होती कित्येक दिवस उपाशी असल्याप्रमाणे आम्ही जेवत होतो दोन प्रमुखांना तो दिवस त्यांचा भाग्याचा वाटत होता

जेवणानंतर मोठ्या प्रमाणात 'हुला' नाच सुरू झाला तेथील लोक-नृत्याचा तो अविष्कार होता दोघांनी गिटार वाजवायला सुरुवात केली कमरेभोवती पानांच्या झावळ्या गुंडाळलेले स्त्री-पुरुष ओळीत लयबद्ध नाचत होते आणि सूर्य पॅसिफिकमध्ये बुडाला त्यानंतर नाच-गाण्यात अधिक चैतन्य निर्माण झालं आम्ही सहाजण त्यांच्याशी एकरूप झालो होतो

एकामागून एक नाच सुरूच होता संगीताची लय वाढू लागली नाचात एकूण एक मुलगी सामील झाली त्यांचं नृत्य कौशल्य पाहून आम्ही सर्वजण थक्क झालो मी हर्मनला म्हणालो, पुढे हो, 'तू उत्तम नाचू शकतोस' त्याच्या पुढे एक मुलगी हात समोर करून नाचत होती हर्मन क्षणभर गोंधळला, पण लगेच रिंगणात उडी टाकून त्या हुला नृत्यात सहभागी झाला आधीच्या उत्साहाला त्यामुळे उधाण आलं लवकरच बेंट आणि टॉरस्टेनही त्यात सामील झाले सर्वांच्या चेहऱ्यावरून घाम निथळत होता सारी संध्याकाळ आमचीच होती. अचानक ड्रम थांबला

पुढचा कार्यक्रम होता पक्षी-नृत्य रेरोया बेटाचं ते वैशिष्ट्य होतं त्यात मी सहभागी झालो मला इतरांची नक्कल करताना पाहून तुपुही हसता हसता गडबडा लोळू लागला गायक आणि इतर कलाकारही मागोमाग हसू लागले आता जवळ जवळ प्रत्येकजण नाचत होता

एरिक पुरता थकून गेला शेवटी खाली बसून तो पाईप ओढू लागला अनेक मुलींनी त्याला उठवण्यासाठी प्रयत्न करून पाहिले, पण तो जागचा हलला नाही शेवटी एका आडदांड बाईनं त्याला रिंगणात ओढलंच तिच्याबरोबर नाचताना त्याची फारच त्रेधातिरपिट उडाली गायक आणि वादकही ते पाहून जोरजोरात हसू लागले

अखेर तो कार्यक्रम संपला थोडा वेळ विश्रांती पुन्हा १२७ लोकांशी हस्तांदोलन त्या बेटावरील मुक्कामात रोज सकाळ-संध्याकाळी आम्हाला असंच हस्तांदोलन करावं लागलं त्या रात्री मुद्दाम तयार केलेल्या सहा बिछान्यावर आम्ही मेल्यासारखे झोपलो.

दुसऱ्या दिवशी ६ वर्षाच्या आजारी मुलाची प्रकृती अधिकच बिघडली त्याच्या अंगात १०६ ताप होता डोक्यावरील मुठीच्या आकाराचं गळू प्रचंड ठणकत होतं टेकान सांगितलं की खूप मुलं अशा रीतीने मरत होती आम्ही त्याच्यावर काही उपचार करू शकलो नाही तर तो लवकरच मरणार होता आमच्याकडे

पेनिसिलीनच्या गोळ्या होत्या. पण लहान मुलाला त्या किती प्रमाणात द्याव्यात याची आम्हाला काहीच कल्पना नव्हती तो मुलगा आमच्या उपचारानंतर मेला तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागले असते

क्नट आणि टॉरस्टेनन वायरलेस सेट वर काढला. त्याची एरियल सर्वात उंच झाडावर लावली रात्री हॉल आणि फ्रँक या कधीही न बघितलेल्या मित्रांशी आम्ही संपर्क साधला लॉस एन्जलसच्या डॉक्टरकडून आम्ही काय करावं याचा सल्ला घेतला रोगाची लक्षण आम्ही त्याना कळवली होती नतर आम्ही 'हौमता 'च्या झोपडीत गेलो तो बिचारा तापानं फणफणला होता निम्म खेड त्याच्याभोवती रडत बसल होत एकच गोंगाट तिथे होत होता

हर्मन आणि क्नट उपचार करणार होते. बाकीच्या चार जणांना गर्दी हटवता हटवता नाकी नव आले आम्ही टोकदार चाकू बाहेर काढल्यावर त्या मुलाच्या आईला वेडच लागण बाकी राहिलं आम्ही उकळत पाणी मागवून घेतलं त्याच्या डोक्यावरील केस काढून टाकण्यात आले चाकूच्या टोकाचा गळवाला स्पर्श करताच पूच कारंज हवेत उडालं चिडलेले लोक आत घुसण्याचा प्रयत्न करत होते त्यांना आवरण म्हणजे विनोद नव्हता सर्व पू निघाल्यावर आम्ही त्यावर पेनिसिलीन टाकल पुढचे दोन दिवस दर चार तासांनी त्याच्यावर उपचार चालू होता तापाला उतार नव्हता रोज रात्री लॉस एन्जलसच्या डॉक्टरचा सल्ला घेण्यात आला आणि मुलाचा ताप एकदम उतरला त्याची जखम सुकत चालली होती रोज त्याला गोऱ्या लोकाच्या जगातील चित्र आणि घर, मोटार गाड्यांची वर्णन ऐकवावी लागत

एका आठवड्यानतर हौमता इतर मुलांबरोबर किनाऱ्यावर नाचू-बागडू लागला. त्याच्या डोक्याला बँडेज लावलेल होत नंतर तेही काढून टाकायला आम्ही संमती दिली

एवढ झाल्यावर आमच्या कौतुकाला पारावारच उरला नाही दातदुखी आणि पोटाच्या तक्रारी असलेले लोक आमच्याकडे येऊ लागले अनेकांना ठिकठिकाणी फोड आले होते डॉक्टर क्नट आणि डॉक्टर हर्मन सर्वांची देखभाल करू लागले आमच्याजवळ असलेल्या गोळ्या, मलम आणि जोडीला जेवणावर नियंत्रण यांच्या द्वारे त्याची ' प्रॅक्टिस ' चालू होती. काही जण बरे झाले. कोणाची प्रकृती जास्त कधीच बिघडली नाही, हे नशीब.

काही दिवसांनी एक नवीन समारभ आयोजित करण्यात आला रेरोयाचे नागरिक म्हणून आम्हाला मान्यता देण्याचा त्या लोकाचा विचार होता आमच्या पैकी प्रत्येकाला ते पॉलिनेशियन नावं देणार होते ताहितीमध्ये मला तेराई म्हणतील, पण त्यांच्यात ते नाव चालणार नाही

एका चौरसाच्या मध्यावर सहा स्टूल्स ठेवण्यात आली चागली जागा मिळण्यासाठी खेड्यातील प्रत्यक जण लवकर उठून तिथे हजर झाला टेका लोकांतच शांतपणे बसला होता जुन्या प्रकारच्या समारंभात तुपुहो नेहमीच मुख्य असे

सर्वजण वाट बघत होते वातावरण अत्यत गभीर होत तुपुहो हातात एक काठी घेऊन आला तो जन्मत च नेतृत्व घेऊन आला असावा तो उत्तम नटही होता आमच्यासमोर येऊन तो उभा राहिला हळू आवाजात पार्श्वसंगीत चालू होत अचानक तुपुहो डोळे मोठे करून आमच्याकडे पाहू लागला काठी प्रत्येकासमोर धरून तो पारंपारिक मत्र म्हणू लागला

खेड्यातील लोकांना त्याच्या शब्दाचा अर्थ समजत नव्हता समूह गीत चालू असताना तुपुहो माझ्या छातीवर हात ठेऊन समुदायाकडे वळला त्यान माझ नाव व्हेरोआ टिकारोआ ' ठेवल्याच जाहीर केल हर्मन व बेंटची नाव अनुक्रमे 'इटेताहुआ आणि टोपॅकिनो ' ठेवण्यात आली ही नाव जुन्या काळच्या वीरपुरुषाची होती टॉरस्टेनला मेरोक, एरिकला मातारोऊ आणि क्नटला तेफूनुर अशी नाव मिळाली नगारा जोरजोरात वाजतच होता

समारंभ समाप्त झाला. पुन्हा एकदा रेरोया बेटावर गोरे दाढीवाले ' नेते ' दाखल झाले होते तेवढ्यात सहा मुलींनी आमच्या डोक्यावर लाकडी मुकुट चढवले. आमच्यासाठी पान आणि गवताचे खास झगे करण्यात आले होते आनदोत्सव पुढे चालू राहिला

एक दिवस रात्री रॅराटोंगाकडून सदेश आला.

ताहितीच्या प्रशासकान आमच्या आगमनाबद्दल आनद व्यक्त केला होता पॅरिसहून त्याला अशी सूचना देण्यात आली की आम्हाला नेण्यासाठी सरकारी बोट 'तमारा' पाठवावी ताहिती बेट फ्रेंच वसाहतींचा मध्यबिंदू होता जगाशी सपर्क असलेलं तेच एकमेव बेट होतं तिथूनच मोठ्या जहाजातून आम्हाला आमच्या जगात परत जाण सोप होत

निरनिराळे उत्सव चालूच होते एका रात्रीत समुद्रात आम्हाला प्रकाश दिसला ते सरकारी जहाज होत का ? अनत्यास पुढे का येत नाही ? खेडुतांची अस्वस्थता वाढू लागली एका अदृश्य खडकाला ते वाहन अडून पडल होत

टॉरस्टेननं एक दिवा हातात घेऊन इशारा दिला. मागोमाग प्रत्युत्तरही मिळाल

व्यापाऱ्याच्या निमित्तान हिंडणारी ती बोट होती. त्यावर तिचा कॅप्टन आणि सेवकवर्ग दिसत होता. त्याना खडकाच स्थान पक्क ठाऊक असूनही अधार पडल्यामुळे आणि पाण्याच्या जोरामुळे ते पुढे येत नव्हते. शेवटी होडचा पाण्यात सोडून त्यावरील लोक किनाऱ्याकडे निघाले बोटीच्या डोलकाठीला दोर बाधून बोट ओढत किनाऱ्याकडे आणण्यात आली झाडाला तो दोर बांधण्यात आला बोटीतील सामान होड्यामधून आणून कोरड्या जमिनीवर ठेवण्यात आल बोट उसळत्या पाण्यामुळे खालच्या खडकावर आदळत होती, रात्रभर अशीच आदळली तर तळाला भेगा पडणार त्याचे तुकडे तुकडे होण्याचा सभव होता

अखेर व्हायच ते झालच त्या महिन्यात रेरोया खडकांना दुसर भक्ष्य मिळाल

त्याच दिवशी दुपारी बाराच्या सुमारास पश्चिम क्षितिजावर तमारा जहज दिसू लागल आम्हाला घेऊन जाण्यासाठी ते येत होते त्यावर ट्वामोटू आणि तुबुई बेट समुहाचा फ्रेंच प्रशासक आला होता. त्याशिवाय एक छायाचित्रकार व तार अधिकारी सोबत होता. बाकीचे लोक पॉलिनेशियन होते खडकामधून काळजीपूर्वक वाट काढत जहाज पुढ येत होत

तमारा जहाजाला आमचा तराफा जोडून ताहितीला नेण्याच ठरल. एक होडी आमच्यासाठी पुढे आली

रेरोया बेटावरील नागरिकांचा निरोप घेताना आमची अत करण अतिशय जड झाली प्रत्येक माणूस आम्हाला निरोप देण्यासाठी धडपडत किनाऱ्यावर आला होता ते सर्वजण आमच आवडतं गीत गुणगुणत होते

गर्दीच्या मधोमध जाडजूड तुपुहो ठळकपणे दिसत होता त्यान हौमताला हाताशी धरल होत. तो छोटा मुलगा मुसमुसत रडत होता टेकाच्या गालावरूनही अश्रू ओघळू लागले साऱ्यांचे डोळे पाणावले होते, परतु प्रत्येकजण आमचं आवडत गीत गात होता. जोडीला लाटा किनाऱ्यावर जोरात आदळत होत्या

त्या निष्पाप लोकाचे सहा मित्र लवकरच त्यांना अतरणार होते आणि निश्चिलपणे उभे असलेले सहाजण १२७ प्रिय व्यक्तींना मुकणार होते त्या गीताच्या अखेरच्या ओळी आम्ही कानात साठवत होतो

'—आपण सुखद स्मृतींची देवाण-घेवाण करू तुम्ही परत दूर निघून गेलात तरी त्या स्मृतीमुळे आपण कायमचे एकत्र राहू—अलविदा ।'

चार दिवसानतर ताहिती बेट दिसू लागल आकाशापर्यंत उचावलेले निळे डोंगर अस्पष्ट दिसत होते ढग त्यांच्या शिखरांभोवती हार घातल्याप्रमाणे पसरले होते थोड जवळ गेल्यावर निळ्या डोंगरावरील हिरवी झाडी दिसू लागली किनाऱ्यावर पाम वृक्षांची दाटी होती

सकाळच्या सुमारास आम्ही 'पपीते' बदरात जाऊन पोचलो समोर दाट झाडीमध्ये चर्च आणि लाल छत असलेली छोटी छोटी घर दिसू लागली पपीते ही ताहितीची राजधानी. पूर्व पॅसिफिकमधील वाहतुकीचं ते मुख्य केंद्र आहे

ताहितीवरील लोक बदरात उपस्थित होते अमेरिकेहून आलेला तराफा बघण्याची साऱ्यांना उत्कठा लागली होती कॉन-टिकीला सन्मानपूर्वक किनाऱ्यावर बांधण्यात आलं एका लहान मुलीन आम्हा सहाजणांना पुष्पगुच्छ अर्पण केले तिथल्या मेयरन आमच स्वागत केल काही तरुण मुलींनी पुढे येऊन आमच्या गळयात

हार घातले

त्या गर्दीत मी एक विशिष्ट चेहरा शोधत होतो. ताहितीमधील तो जुना म्हातारा. तो हजर होताच. 'तेराई, तेराई' असं म्हणत तो पुढे धावला वय वरंच असूनही तो पूर्वीसारखाच उत्साही आणि कार्यक्षम दिसत होता.

'तुम्हाला इथे यायला उशीर झाला,' तो हसत म्हणाला, 'पण तुम्ही चांगली बातमी घेऊन आलात. तुमचा तराफा रहस्य उलगडण्यासाठी अखेर येऊन पोचला, कारण आमचे पूर्वज नक्की कुठून आले हे आता आम्हाला समजलं आहे'

आमच्यावर निमंत्रणांचा वर्षाव झाला टाऊन हॉलमधे गव्हर्नर मेजवानी देणार होता.

रेरोया बेटाप्रमाणे माझ्या खेरीज इतर पाचजणांना नवी ताहिती नावं देण्यात आली. दिवस आनंदात जाऊ लागले काही आठवडे आम्ही मनसोक्त भटकलो. अद्याप आम्हाला घरी नेणाऱ्या जहाजाचा पत्ता नव्हता. आणि एक दिवस नॉर्वेहून संदेश आला की सामोआ बेटावरून 'थॉर' जहाज निघालं होतं

सकाळच्या वेळातच एक दिवस ते पत्तीते बंदरावर दाखल झालं. कॉन टिकी तराफा त्यावर चढवण्यात आला जहाजाच्या भोंग्याचा आवाज तिथल्या परिसरात घुमू लागला

ताहितीच्या नागरिकांनी आम्हाला संस्मरणीय निरोप दिला गळ्यातल्या हारांमुळे आम्ही खाली वाकलो होतो

'ताहितीला परत येण्याची तुम्हाला इच्छा असेल,' माझा आवडता म्हातारा ओरडला, 'तर गळ्यातला हार जहाज निघालं की आमच्या दिशेनं पाण्यात फेका!'

इंजिनाची घरघर सुरू झाली जहाज पुढे सरकू लागलं किनारा लहान दिसू लागला डोंगर हिरव्याचे निळे झाले

लाटा वरखाली होत होत्या पण आमचे हात तिथपर्यंत आता पोचू शकत नव्हते, परतीचा मार्ग वेगळाच होता. निसर्गाच्या तालावर आम्ही आता अवलंबून नव्हतो. विसाव्या शतकाचा उत्तरार्ध आम्हाला खुणावत होता

आम्ही सहाजण बालसा लाकडाच्या नऊ ओंडक्याशेजारी जिवंत उभे होतो आणि आमच्या गळ्यातील सहा हार ताहितीच्या किनाऱ्यावर लाटांच्या मर्जीनुसार पुढे मागे होत होते.

**समाप्त**

५८४
२९४-३